शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूर शिक्षण केंद्र

भारतातील सामाजिक चळवळी

(Social Movement in India)

(शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून)

(समाजशास्त्र : Gr. A Paper No. SOE 01**)**

एम. ए. भाग-१ : सत्र १

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
प्रथमावृत्ती : २०१८
एम. ए. भाग १ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

प्रती : २००

■

प्रकाशक
डॉ. व्ही. डी. नांदवडेकर
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

मुद्रक
श्री. बी. पी. पाटील
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-81-8486-393-2

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सल्लागार समिती

प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

प्रा. पी. प्रकाश
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

प्रा. (डॉ.) सीमा येवले
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) भारती पाटील
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. व्ही. डी. नांदवडेकर
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

श्री. एम. ए. काकडे
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

श्री. व्ही. टी. पाटील
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

समाजशास्त्र समन्वय समिती

अध्यक्ष - **प्रा. (डॉ.) जगन कराडे,**
विभागप्रमुख, समाजशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. शैलजा माने**
  लालबहादूर शास्त्री महाविद्यालय,
  सातारा
- **डॉ. उषा पाटील**
  महावीर महाविद्यालय,
  कोल्हापूर

अभ्यास घटकांचे लेखक

लेखक	घटक क्रमांक
डॉ. दयावती पाडळकर भारती विद्यापीठाचे मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगांव	१
श्री. एम. एस. शिंदे छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.	२
डॉ. सौ. शैलजा माने लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, सातारा	१, ३, ४
श्री. प्रकाश कांबळे भोगावती कॉलेज, भोगावती	३
श्रीमती संध्या अरुण पौडमल प्रा. संभाजीराव कदम कॉलेज, देऊर, ता. कोरेगाव, जि. सातारा.	१

■ संपादक ■

डॉ. शैलजा माने
लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय,
सातारा

प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण विभागांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी समाजशास्त्र विषयाची निवड केलेल्या सर्व विद्यार्थी मित्रांचे आम्ही हार्दिक स्वागत करतो. या अभ्यासक्रमात तुम्ही समाजशास्त्राचे एकूण चार पेपर्स अभ्यासणार आहात. त्यापैकी सत्र १ साठी एक पेपर भारतातील सामाजिक चळवळी (Gr. A Paper-SOE 01) असा आहे. या पेपरमध्ये सत्रपद्धतीनुसार एकूण चार अध्ययन घटक समाविष्ट असून त्यांचे लेखन अत्यंत सुलभपणे व पद्धतशीरपणे केलेले आहे. त्यामुळे तुम्हा विद्यार्थ्यांना भारतातील सामाजिक चळवळींचे यथार्थ आकलन होईल याची आम्हाला खात्री आहे.

सदर पुस्तक लेखनात सहकार्य केलेले सहलेखक श्रीमती संध्या अरुण पौडमल, श्री. एम. एस. शिंदे, प्रा. प्रकाश कांबळे, डॉ. दयावती पाडळकर यांना मनःपूर्वक धन्यवाद. दूर शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. एम. ए. अनुसे आणि केंद्रातील कर्मचारी यांचे त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार.

■ **संपादक** ■

डॉ. शैलजा माने
लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय,
सातारा

दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

समाजशास्त्र अभ्यासमंडळ

अध्यक्ष – **रिक्त**

- **प्रा. डॉ. जे. एच. कराडे**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती प्रतिमा शहाजीराव पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. सतीश सर्जेराव देसाई**
  एस. एम. डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज,
  मिरज, जि. सांगली
- **डॉ. संजय हिंदुराव सनदे**
  सरदार बाबासाहेब माने कॉलेज,
  रहिमतपूर, जि. सातारा
- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती के.आर.पी. कन्या महाविद्यालय,
  उरुण–इस्लामपूर, जि. सांगली.
- **डॉ. अर्जुन पांडुरंग जाधव**
  विवेकानंद कॉलेज,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर
- **डॉ. अरुण विठ्ठल पौडमल**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज (के.एम.सी.)
  कोल्हापूर
- **डॉ. मच्छिंद्र ज्ञानू सकटे**
  सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप महाविद्यालय,
  उंब्रज, जि. सातारा.

अनुक्रमणिका

घटक क्रमांक	घटकाचे शीर्षक	पान क्रमांक
१.	सामाजिक चळवळी	१
२.	नेतृत्व, सामाजिक चळवळी व सामाजिक परिवर्तन	४५
३.	भारतातील पारंपारिक सामाजिक चळवळी	७१
४.	भारतातील नवीन सामाजिक चळवळी	१३६

■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१७-१८ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक – १ (अ) (ब)

सामाजिक चळवळी

(Social Movements)

घटक संरचना :

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ अभ्यास विषयाची मांडणी

१.२.१ सामाजिक चळवळी अर्थ, व्याख्या, स्वरूप/वैशिष्ट्ये

१.२.२ सामाजिक चळवळींचे संरचनात्मक घटक

१.२.३ सामाजिक चळवळींची मूलभूत स्थिती

१.२.४ सिद्धांत : संरचनात्मक व कार्यात्मक–मार्क्स व वेबर

१.३ सारांश

१.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सरावासाठी प्रश्न

१.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

१.० उद्दिष्टे : (Objective)

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास –

- सामाजिक चळवळींचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करता येईल.
- सामाजिक चळवळींची महत्वपूर्ण वैशिष्ट्ये सांगता येतील.
- सामाजिक चळवळींचे संरचनात्मक घटक कोणते आहेत ते समजेल व त्यामुळे सामाजिक चळवळी निर्माण होतील की नाही, त्या यशस्वी होतील की अयशस्वी, तसेच सामाजिक चळवळींची दिशा व फलनिष्पती याबाबतचे सखोल स्पष्टीकरण मिळेल.
- सामाजिक चळवळींची उद्दिष्टे स्पष्ट होतील.
- सामाजिक चळवळी कशा अस्तित्वात येतात ते स्पष्ट होईल.
- सामाजिक चळवळींचे समाजावरील परिणामांचे स्पष्टीकरण मिळेल.

१.१ प्रस्तावना : (Introduction)

भारतीय समाजव्यवस्थेत अगदी ऐतिहासिक काळापासून सामाजिक चळवळी चालत आलेल्या आहेत. पण प्रामुख्याने ब्रिटिश राजवटीत सामाजिक चळवळींना अधिक जोर आल्याचे दिसते. उदा. अस्पृश्यता चळवळ, सांस्कृतिक चळवळ, स्त्री-मुक्ती चळवळ, शेतकरी चळवळ, कामगार चळवळ, राजकीय चळवळ, सामाजिक सुधारणा चळवळ वगैरे, अनेक सामाजिक चळवळी उदयास आल्या.

समाज हा कधीही स्थिर असत नाही त्यामध्ये सातत्याने परिवर्तन किंवा बदल होत असतात. आणि या परिवर्तन प्रक्रियेमध्ये सामाजिक चळवळींचा निश्चितच संबंध असतो. यावरून असे लक्षात येते की, सामाजिक चळवळी या समाजव्यवस्थेतील एखाद्या क्षेत्रात किंवा सूंपर्ण समाज व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणत असतात. म्हणजेच सामाजिक चळवळी या सामाजिक परिवर्तनाला चालना देत असतात.

परंतु सामाजिक चळवळींचा अर्थ साधारणपणे लोक अत्यंत संकुचित घेतात. सामाजिक चळवळी समाजामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी जशा कार्यरत असतात त्याचप्रमाणे सामाजिक परिवर्तनाला संघटीतपणे विरोध करण्यासाठी सुद्धा निर्माण होत असतात. उदा. नर्मदा बचाव आंदोलन. म्हणून सामान्य लोकांच्या मनात किंवा एकूण व्यवहारात समाजसुधारकांनी केलेल्या समाजसुधारणेविषयीच्या चळवळीना सामाजिक चळवळी म्हटले जाते. परंतु समाजशास्त्रात केवळ सामाजिक सुधारणा घडवून आणणाऱ्या चळवळी म्हणजे सामाजिक चळवळी अशी संकल्पना मान्य केली जात नाही त्यामध्ये सुधारणेबरोबर समाजातील लोकांचे स्थलांतर करणाऱ्या चळवळी, समाजात क्रांतीकारक बदल घडवून आणणाऱ्या चळवळी, समाज अपेक्षित सामाजिक परिवर्तनाला विरोध करणाऱ्या चळवळी अशा अनेक चळवळींचा समावेश होतो.

खऱ्या अर्थाने सामाजिक चळवळींचा अर्थ अतिशय व्यापक असा आहे. या प्रकरणात आपण सामाजिक चळवळींचा अर्थ, सामाजिक चळवळींचे स्वरूप व सामाजिक चळवळीचे निर्धारक घटक याची माहिती करून घेणार आहोत.

१.२ अभ्यास विषयाची मांडणी : (Presentation of Subject Matter)

'भारतातील सामाजिक चळवळी' हा एम.ए. भाग-१ समाजशास्त्र विषयाच्या ऐच्छिक पेपर क्रमांक १ चे नाव आहे. त्यातील पहिले प्रकरण 'सामाजिक चळवळी' आहे. सामाजिक चळवळींबाबत सर्वसाधारण पणे सामाजिक सुधारणा विषयीची प्रक्रिया असा संकुचित अर्थ घेतला जातो. परंतु सामाजिक चळवळी ही अतिशय व्यापक अशी संकल्पना आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये सामाजिक चळवळींच्या विविध समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या त्याची स्वरूपात्मक वैशिष्ट्ये पहिल्या युनिटमध्ये दिली आहेत. दुसऱ्या युनिटमध्ये सामाजिक चळवळीचे संरचनात्मक घटक दिले आहेत. त्यानुसार सामाजिक चळवळी निर्माण होतील की नाही? सामाजिक चळवळी अस्तित्वात आल्या तर त्या यशस्वी होतील का? त्या टिकतील का? याचे स्पष्टीकरण मिळते व तिसऱ्या युनिटमध्ये सामाजिक चळवळींची उद्दिष्टे दिली आहेत. या पहिल्या प्रकरणातून सामाजिक चळवळीची ही संकल्पना नेमकी काय आहे ते मांडण्याचा प्रत्यन केला आहे.

१.२.१ अ) सामाजिक चळवळीची व्याख्या (Definittion of Social Movements):

सामाजिक चळवळींचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी आपण सामाजिक चळवळींची व्याख्या पाहू. सामाजिक चळवळी संबंधी अनेक विचारवंत, समाजशास्त्रज्ञ यांनी व्याख्या केल्या आहेत. त्यापैकी काही प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे.

१) राल्फ टर्नर आणि लेवीस किलियन :

"एकत्रित आलेले अनेक लोक ज्या समूहाचे किंवा समाजाचे घटक भाग असतात. त्यात परिवर्तन घडवून आणण्यासाठी किंवा परिवर्तनाला विरोध करण्यासाठी जेव्हा काहीशा सातत्याने कार्यरत असतात तेव्हा त्याला सामाजिक चळवळ असे म्हणतात."

Ralph Turner and Lewis Killian - "A collectively acting with some continutity to promote or resist a change in the society or group of which it is a part."

२) रूडाल्फ हेबर्ले :

"एखाद्या समाजातील प्रस्थापित संबंधात रूपांतरण (किंवा परिवर्तन) घडवून आणण्यासाठी केलेला सामूहिक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय."

Rudolf Heberle - "Collective effort to transform established relations within a particular society."

३) हर्बर्ट ब्लूमेर :

"सामाजिक जीवनाची नवी व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी करण्यात येणारा सामूहिक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय."

Herbert Blumer - "A collective enterprise to establish a new social order of life.

४) जॉन विल्सन :

"सामाजिक व्यवस्थेत व्यापक प्रमाणावरील परिवर्तन घडवून आणण्यासाठी किंवा घडून येणाऱ्या बदलांना प्रतिकार करण्यासाठी जाणीवपूर्वक संघटितरित्या, असंस्थीकृत साधनांचा किंवा मार्गांचा अवलंब करण्यात येणारा प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय."

John Willson - "A social movement is a conscious, collective, organized attempt to bring about or resist large scale change in the social order by non-intitutionalized means."

५) ड्रेसलर आणि विलिस :

"अनेक लोक हेतूपुर्वक आणि सामूहिकरित्या परिवर्तन घडवून आणण्याचा जेव्हा प्रयत्न करतात तेव्हा त्याला सामाजिक चळवळ असे म्हणतात."

Dressler and Willisas - "When a deliaberate attempt is made by a large numer of people to bring about change through group effort, it is called a social movement."

६) विल्यम स्कॉट :

"अपेक्षित सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी किंवा ते रोखण्यासाठी बहुसंख्य लोकांनी केलेला संघटित प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ असून सामूहिक वर्तनाचा तो एक महत्वाचा प्रकार आहे."

William Scoott - "An important form of collective behevior in which large number of people are organized or alerted to support and bring about or to resist social change."

७) एम्.एस्.ए. राव :

"समाजातील एखाद्या भागाने पूर्ण किंवा आंशिक परिवर्तन करण्यासाठी विचाराधिष्टीत संघटित प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय."

M.S.A. Rao - "A social movement is an organisal attemplt on the part of a section of society to bring about partial or total change is society through collective mobilisation based on ideology."

८) पीटर रोझ :

"सामाजिक परिवर्तनाला चालना देण्यासाठी किंवा विरोध करण्याच्या हेतूने कमी अधिक प्रमाणात झालेल्या व्यक्ती समुच्चय किंवा समूहांचा सामाजिक चळवळीत समावेश होतो."

Peter Rose - "Social movement : a more lets loosely organized collection of individuals and group intended to promote or resist social change."

९) जी.ए. लुंडबर्ग व इतर :

"सामाजिक चळवळी म्हणजे लोकांच्या अशा प्रकारच्या ऐच्छिक संघटना की, ज्या लोकांचे दृष्टीकोण, वर्तन, आणि सामाजिक संबंध यामध्ये मोठ्या प्रमाणावर परिवर्तन घडवून आणण्याच्या एकत्रित प्रयत्नात गुंतलेल्या असतात."

G.A. Lundberg and others - "Social movement as, a voluntary association of people engaged in a concerned effort to change attitudes, behaviour and social relationships in a larger society."

१०) जॉर्ज थेओडोर्सन आणि अचिल्लेज थेओडार्सन :

"सामाजिक चळवळ म्हणजे सामूहिक वर्तनाचा असा एक प्रकार की, ज्यामध्ये सामाजिक परिवर्तन घडावे किंवा घडणाऱ्या सामाजिक परिवर्तनाला प्रतिरोध करावा म्हणून फार मोठ्या प्रमाणावर लोक संघटित किंवा क्रियाशील झालेले असतात."

George Theodorson and Achilles Theodorson - "Social movement an importantant form of collective Behaviour in which large number of people are organized or alerted to support and bring about to resist social change."

११) हॉर्टन आणि हॅन्ट :

"सामाजिक चळवळी म्हणजे अशा प्रकारचे सामुदायिक प्रयत्न की ज्यामध्ये समाज किंवा त्यामधील सभासद यांच्यामध्ये परिवर्तन होण्यासाठी प्रेरणा दिली जाते किंवा प्रतिरोध केला जातो."

Horton and Hunt - "Social movements are collective attempts to promote or resist change either in socity or in its members."

१२) जोसेफ आर. गसफिल्ड :

"समाजव्यवस्थेच्या एखाद्या भागात परिवर्तन घडवून आणण्यासाठी सामुदायिकरित्या केल्या जाणाऱ्या मागण्या म्हणजे सामाजिक चळवळी होत."

Joseph R. Gusfield - "Social movements are defined as socially shared demands for change in same aspect of the social order."

थोडक्यात सामाजिक चळवळ म्हणजे सामाजिक परिवर्तनाला चालना देण्याचा किंवा विरोध करण्याचा निरंतर सामूहिक प्रयत्न होय. वरील व्याख्यांवरून असे स्पष्ट होते की,

१) सामाजिक चळवळी ही सामुदायिक वर्तनाच्या परिवर्तनाची प्रक्रिया आहे.

२) हा सामुहिक प्रयत्न सतत व दीर्घकाळ चालू असतो.

३) योग्य असे सामाजिक परिवर्तन घडवून आणणेचे उद्दिष्ट असते.

४) योग्य सामाजिक परिवर्तन रोखणेचेही उद्दिष्ट असते.

५) सामूहिक चळवळ ही निरंतर प्रक्रिया आहे.

सामाजिक चळवळींचे स्वरूप अधिक स्पष्ट होण्यासाठी सामाजिक चळवळींची वैशिष्ट्ये पाहणे आवश्यक ठरते.

१.२.१ ब) सामाजिक चळवळींची सर्वसाधारण वैशिष्ट्ये :

(General Features of Social Movements)

सामाजिक चळवळींच्या विविध व्याख्यांवरून सामाजिक चळवळीसंबंधी रूडाल्फ हेबर्ले व पार्थ मुखर्जी यांनी सांगितलेली महत्वाची वैशिष्ट्ये व त्यांना अनुसरून सर्वसाधारण वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे –

अ) रूडाल्फ हेबर्ले :

रूडाल्फ हेबर्ले यांनी सामाजिक चळवळींची चार वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

१) **सामाजिक एकत्रीकरण :** (Social Collective)

सामाजिक चळवळ ही कोणत्या ना कोणत्या सामाजिक आधारावर समूहाचे एकत्रीकरण करीत असते आणि हे एकत्रीकरण सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करतात. याचे दोन प्रकार आहेत.

a) **गर्दी** (Croud) **:** काही वेळा एखाद्या आकस्मित घटनेमुळे गर्दी जमते. पुन्हा ती गर्दी निघून जाते परंतू काही वेळा अशी गर्दी चळवळीच्या विकासाची पहिली पायरी असू शकते.

b) **सामान्य जनता** (Public) **:** सर्वसाधारणपणे सामान्य जनतेमध्ये एकाच प्रकारचे विचार नसतात. पण हेच लोक एखाद्या विषयावर विचार विनिमय करून एकत्रित येतात. व त्यांचे समान उद्दिष्ट पूर्तीसाठी प्रेरित होऊन चळवळ निर्माण करतात.

२) **सामूहिक आचरण/वर्तन :** (Collective Behaviour)

सामाजिक चळवळींमध्ये सामूहिक वर्तनावर भर असतो व समान उद्दिष्ट गाठण्यासाठी सामूहिक आचरणाचा अवलंब करतात.

३) **समाजव्यवस्थेत परिवर्तन :** (Change in Social System)

सामाजिक चळवळींचे मुख्य वैशिष्टे म्हणजे समाजव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणणे हे असते. मात्र यामध्ये प्रचलीत व्यवस्थेत अन्यायकारक अयोग्य गोष्टीत परिवर्तन घडवून आणणे तसेच अयोग्य, अन्यायी, नको असलेल्या गोष्टीत परिवर्तन घडवून आणणे परंतु एक गोष्ट सक्षम येते की दोन्हीत परिवर्तन हे आवश्यक असते.

४) **समूहाचे दृढ ऐक्य :**

जेव्हा सामाजिक चळवळ सुरू होते तेव्हा सदस्यातील ऐक्य वाढीस लागते आणि पुढे तर आपले उद्दिष्ट गाठणेसाठी समूहातील लोक एकत्रीत राहूनच कार्य करतात व त्यामुळेच त्यांच्यात दृढ ऐक्य वाढीस लागते.

ब) पार्थ मुखर्जी :

पार्थ मुखर्जी यांनी सामाजिक चळवळीबाबत पाच वैशिष्टे सांगितली.

१) **सामाजिक संरचनेशी संबंध :** (Related with Social Structure)

सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठीच सामाजिक चळवळ अस्तित्वात येते. त्यामुळे प्रत्येक चळवळींचा सामाजिक संरचनेशी संबंध असतो म्हणूनच सामाजिक चळवळींचा उद्देश सामाजिक संरचनेत परिवर्तन घडवून आणणे हाच असतो.

२) **विशिष्ट परिस्थिती :** (Certain Conditions)

काळी वेळा समाजात अशी विशिष्ट परिस्थिती निर्माण होते की ज्यामुळे सामाजिक चळवळी निर्माण होतात व वाढीसही लागतात. उदा. बालमजूरी, स्त्रियांवरील अत्याचार वगैरे आणि अशा परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी व त्यामध्ये बदल करण्यासाठी सामाजिक चळवळ कार्यरत राहते.

३) **परिणाम आणि निष्पत्ती :** (Effects and Consuqunces)

प्रत्येक सामाजिक चळवळींचा परिणाम समाज व्यवस्थेवर होत असतो. त्यामुळे त्याची निष्पत्ती म्हणून एक नवी सुधारात्मक व्यवस्था निर्माण होते.

४) **प्रतिकात्मक व्यवस्था :**

प्रत्येक चळवळींच्या विचार प्रणाली प्रगट करणारी अशी प्रतिके असतात. त्यांच्या विशिष्ट मागण्या असतात. अशा मागण्या व प्रतिके जनते समोर येतात व त्यावरून चळवळीची ओळखही होते.

५) **सामाजिक परिवर्तन हाच मूळ उद्देश :** (Goal of Social Change)

सामाजिक चळवळींचा अंतिम उद्देश हा प्रचलित समाज व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणणे हा असतो. हे परिवर्तन अंशिक किंवा संपूर्णही असू शकते.

थोडक्यात, सामाजिक चळवळ ज्या विविध परिस्थितीतून निर्माण होते व सुरू राहते त्यानुसार आपली उद्दिष्टे पूर्ण करण्याचा प्रयत्न करते. पार्थ मुखर्जींच्या मते सामाजिक चळवळ ही समावेशक, व अमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी कार्यरत राहतात.

वरील वैशिष्ट्यानुसार सामाजिक चळवळीबांबत काही सर्वसाधारण वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) **सामाजिक चळवळीतून सामाजिक परिवर्तन :**

सामाजिक चळवळ ही प्राधान्याने सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठीच निर्माण होतात. किंबहुना त्या सामाजिक परिवर्तनाला प्रभावित करतात. उदा. एखाद्या प्रथेत परिवर्तन करण्यासाठी म्हणजेच सती प्रथा, हुंडा प्रथा, अस्पृश्यता वगैरे घटकांत परिवर्तन व्हावे म्हणून सामाजिक चळवळ निर्माण होतात. परंतु त्याच बरोबर दुसऱ्या बाजून परिवर्तनाला विरोध करण्यासाठीही सामाजिक चळवळी पुढे येतात. उदा. नर्मदा बचाओ आंदोलन. याचाच अर्थ सामाजिक चळवळीतूनच सामाजिक परिवर्तन घडून येते.

२) **विचार प्रणाली :**

विचारप्रणाली हे सामाजिक चळवळींचे एक प्रभेदक वैशिष्ट्य आहे. प्रत्येक सामाजिक चळवळीला विचारप्रणाली असतेच कोणतीही सामाजिक चळवळ ही विशिष्ट कारणांनी विशिष्ट परिस्थीतीमुळे निर्माण होत असते. एखाद्या विशिष्ट परिस्थितीबाबत लोकांमध्ये असंतोष निर्माण होतो आणि त्या परिस्थितीत बदल घडवून आणला पाहिजे अशी तीव्र भावना निर्माण होते व ती परिस्थिती बदलण्यासाठी हे संबंधीत अनेक

लोक त्यामध्ये सहभागी होतात व त्यांचे समर्थन करण्यासाठी त्यावर काही मार्ग काढले जावेत म्हणून प्रयत्न करतात.

अर्थात सर्वच चळवळींची विचारप्रणाली सारखीच असते असे नाही. विचारप्रणाली म्हणजे सामाजिक किंवा राजकीय स्वरूपाचे विशिष्ट असे तत्वज्ञान असते. विचारप्रणाली म्हणजे सामुदायिक किंवा संघटितरित्या एकत्र येऊन सामाजिक व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्याचा दृष्टीने प्रयत्न करणे होय. की जेणेकरून समाजव्यवस्था सुरळीतपणे चालावी.

३) नेतृत्व :

सामाजिक चळवळींना यश प्राप्त होण्यासाठी जशी संघटनेची गरज असते, तशीच त्यांना नेतृत्वाचीही आवश्यकता असते सामाजिक चळवळीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी असामान्य व्यक्तीमत्व असलेल्या व्यक्तींची नेता म्हणून गरज असते. सामाजिक चळवळीत सहभागी झालेला लोकांचे मनोबल वाढवणे, चळवळींची ताकद वाढविणे व चळवळीत येणारे अडथळे दूर करणे अशा सगळ्या गोष्टींची जाणीव नेता सदस्यांना करून देत असतात. त्यांची ती जबाबदारीच असते. कार्यकर्त्यांचा उत्साह टिकवून चळवळींना योग्य दिशा देण्याचे कार्य नेते करत असतात. स्वातंत्र्य चळवळीत अनेक नेते लाभल्यामुळेच देशाला स्वातंत्र्य मिळाले.

४) सामुदायिक कृती व समूह भावना :

सामाजिक चळवळी ही सामूहिक प्रयत्नातूनच कार्यरत असते. सामाजिक चळवळ व्यक्तीगत स्वरूपाची नसते. सामाजिक चळवळींची उद्दिष्टे गाठण्यासाठी चळवळीतील सदस्यांत सामूहिक भावना असली पाहिजे. सामुदायिक कृती जितकी प्रभावी तितके चळवळीतील अनुयायांमध्ये ऐक्य प्रस्थापित होण्यास मदत होते.

५) संघटना :

सामाजिक चळवळींचे हे एक महत्वाचे वैशिष्टे आहे. चळवळींच्या स्वरूपानुसार व त्यांच्या व्याप्ती नुसार सामाजिक चळवळी संघटित किंवा असंघटीत स्वरूपाच्या असू शकतात. पण त्याही बहुतांश प्रमाणात सामाजिक चळवळी या संघटीत स्वरूपात असतात. चळवळीमध्ये अनेक सदस्य असतात परंतु ते सगळेच संघटनांचे प्रत्यक्ष सहभागी नसतात. मात्र चळवळींना व संघटनांना पाठिंबा देणाऱ्यांची संख्या जशी वाढत जाईल त्यानुसार त्यामध्ये समन्वय साधणे अधिक सोयीस्कर होईल.

६) सामाजिक असंतोषातून सामाजिक चळवळींचा उदय :

जेव्हा एखाद्या परिस्थितीबाबत लोकांच्या मनात असंतोषाची भावना निर्माण होते तेंव्हा आपल्यासारखे इतरही अनेक लोक सुद्धा असमाधानी आहे याची जाणीव होते. तो असंतोष बाहेर काढण्यासाठी कोणाच्या तरी नेतृत्वाने प्रयत्न करतात व त्या असंतोषाला वाचा फोडतात. आणि सामाजिक चळवळी जन्माला येतात. मात्र सामाजिक असंतोष समाजातील असंख्य लोकांमध्ये असला पाहिजे. त्याच्या विरोधात सामुदायिकरित्या उभे राहिले पाहिजे.

७) अहिंसक तसेच हिंसक :

सामाजिक चळवळी ह्या अहिंसक तसेच हिंसक प्रकारच्या असू शकतात. साधारणतः समाज सुधारणेच्या चळवळी ह्या अहिंसक स्वरूपाच्या असतात. तर बहुतांशी राजकीय क्रांतीच्या चळवळी ह्या हिंसक मार्गांचा अवलंब करताना दिसतात. उदा. फ्रेंच राज्यक्रांती, रशियन राज्यक्रांती इ. अर्थात काही वेळा अहिंसक मार्गानेही राज्यक्रांती घडून आल्याचे दिसते. उदा. भारतीय स्वातंत्र्य चळवळ म. गांधीनी अहिंसक मार्गाने राबविली व देशाला स्वातंत्र्य मिळविले. काही वेळा विशिष्ट मागण्या पूर्ण करण्यासाठी सुरू झालेल्या चळवळींचे कालांतराने हिंसक वळण लागू शकते.

८) अनिश्चित कालावधी :

सामाजिक चळवळी या विशिष्ट उद्दिष्टांची पूर्ती करण्यासाठी सुरू झालेल्या असतात. त्यामुळे ते उद्दिष्ट किती कालावधीत साध्य होईल हे सांगता येत नाही. म्हणून काही चळवळी अल्प कालीन तर काही दिर्घ कालीन स्वरूपाच्या असतात.

९) यशस्वी–अयशस्वी :

प्रत्येक सामाजिक चळवळी यशस्वी होतीलच असे नाही. ज्या चळवळींना समाजाचा पाठिंबा असेल त्या काही अंशी यशस्वी होतात. त्यामुळे त्या संघटित होती. नंतर त्यांची रूपरेखा तयार करतील, त्याची योग्य अंमलबजावणी केली जाईल अशा लोकांच्या विश्वास बसतो. एकदा का चळवळीने आपले उद्दिष्ट गाठणेसाठी चळवळ सुरू केली आणि सुरूवातीला या चळवळींना त्यांनी पाठिंबा दिला तर चळवळ यशस्वी होतात.

थोडक्यात, सामाजिक चळवळी या समाज रचनेमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी आणि नको असलेले परिवर्तन होणार नाही या दृष्टिने निर्माण होतात. समाजाचे उद्दिष्ट साध्य करणेचा प्रयत्न करतात. सामाजिक चळवळींच्या वरील वैशिष्ट्यानुसार हे स्पष्ट होते.

✢ स्वंय अध्ययनासाठी प्रश्न – १

अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सामाजिक चळवळींची जॉन विल्सन यांनी केलेली व्याख्या लिहा.

२) सामाजिक चळवळींचा कोणत्या प्रक्रियेशी आजही निकटचा संबंध आहे.

३) कोणत्या प्रकारच्या सामाजिक परिस्थितीमुळे सामाजिक चळवळींचा उदय होतो?

४) परिवर्तन म्हणजे सामाजिक चळवळी होय हे विधान चूक की बरोबर ते सांगा.

५) सामाजिक चळवळीत यश मिळविण्यासाठी कोणत्या दोन गोष्टींची जास्त गरज असते?

१.२.२ सामाजिक चळवळींचे संरचनात्मक निर्धारक घटक

(Structural Determinants of Social Movements) :

सामाजिक चळवळी कशा निर्माण होतील, निर्माण होतील किंवा नाही, त्यात लोकांचा सहभाग किती असेल, त्या व्यवस्थित कार्यरत होतील की त्यामध्ये अडथळे येतील, त्यामध्ये यश मिळेल की अपयश हे सर्व सामाजिक चळवळींच्या संरचनात्मक घटकांवर अवलंबून असते. सामाजिक चळवळीं अस्तित्वात येणे, त्याचे नेमके कार्य, दिशा, यशापयश यामध्ये संरचनात्मक घटकांचा अभ्यास काही समाजशास्त्रज्ञांनी केला आहे. सामाजिक चळवळीतील सदस्यांच्या सामूहिक वर्तन प्रकारांच्या ज्या संरचनात्मक पूर्व अटी सांगीतल्या आहेत त्या पुढील प्रमाणे. प्रामुख्याने पुढील समाजशास्त्रज्ञांनी त्यावर प्रकाश टाकणेचा प्रयत्न केला आहे.

अ) नेल स्मेल्सर :

नेल स्मेल्सर यांनी सामूहिक वर्तन प्रकार, त्यांचे अस्तित्वात, दिशा व परिणाम याबाबतचे काही घटक स्पष्ट केले आहेत ते खालीलप्रमाणे –

१) संरचनात्मक अनुकूलता :

सामाजिक चळवळी निर्माण होण्यासाठी सामुहिक वर्तन प्रक्रिया कशी आहे, अनुकूल की प्रतिकूल त्यानुसार त्या अस्तित्वात येतात. सर्वसाधारण पणे समाजातील अनुकूल परिस्थिती असेल तर सामाजिक चळवळी निर्माण होत असतात.

२) संरचनात्मक तणाव :

एखाद्या समाजातील प्रत्यक्ष असलेली परिस्थिी आणि समूहाचे आदर्श यामध्ये संघर्ष निर्माण झाले की संरचनात्मक तणावात्मक परिस्थिती निर्माण होते. विशेषत: वांशिक, जातीय, वर्गीय संघर्ष हे संरचनात्मक तणावामुळे निर्माण होत असतात. म्हणजे समजा एखाद्या समाजात समानता प्रस्थापित केली जात असेल, तेव्हा, काही घटकांना या समानतेपासून वेगळे ठेवले असते त्यांचा यामध्ये विचार केला जात नाही. सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा अधिकारापासून ते घटक जर बाजूला ठेवले गेले तर त्यांच्यात कमालीची विषमता निर्माण होते. त्यांच्या मनात असंतोषाची भावना निर्माण होते. अशा तऱ्हेने ज्यांच्यावर अन्याय झाला आहे, ज्यांना आपण दुर्लक्षित झाले आहोत असे वाटते असे लोक एकत्र येतात संघटित होतात व सामाजिक चळवळी सुरू करतात. उदा. भारतातील दलितांच्या चळवळी किंवा अमेरिकेतील काळ्या लोकांनी केलेली दंगल या संरचानात्मक तणावग्रस्त परिस्थितीमुळेच निर्माण झाल्या.

३) सामान्यीकृत श्रद्धांची वाढ आणि विस्तार :

संरचनात्मक तणाव परिस्थिती निर्माण झाल्यानंतर आपण संघर्ष केल्याशिवाय आपल्याला हव्या त्या गोष्टी मिळणार नव्हत्या, आपले अस्तित्व उभे राहणार नाही. अशा प्रकारच्या श्रद्धेमध्ये वाढ होतो व असे अनेक लोक संघटित होऊन सामाजिक चळवळी उभ्या करण्यास प्रवृत्त होतात व सामाजिक चळवळी निर्माण होतात.

४) नैमित्तिक घटक :

संरचनात्मक तणावामुळे लोकांमध्ये असमाधनात्मक, असंतोषाची भावना निर्माण होते. ती इतकी वाढीस लागते की त्यामध्ये शेवटी लोकांच्या भावनांचा उद्रेक होतो मग प्रसंगी कोणत्याही प्रकारच्या नैमित्तीक घटना त्याला कारणीभूत ठरतात व लोक संघटित होऊन चळवळ उभी करतात.

५) सामूहिक कृतींसाठी संघटना :

चळवळी निर्माण होण्यासाठी संघटनात्मकतेची आवश्यकता असते. जेव्हा समुदायातील अनेक लोक एका विधायक कार्यासाठी स्वतंत्रपणे वैयक्तिक प्रयत्न करतील तर त्यात यश येणार नाही. म्हणूनच कोणीतरी पुढाकार घेऊन एखादी संघटना स्थापन करून प्रयत्न करणेची आवश्यकता असते. बलात्काराविरोधी चळवळ उभी राहण्यामध्ये अशाच पद्धतीने विविध स्वायत्ता महिला समूहांनी एकत्रित येऊन प्रयत्न केले म्हणूनच ती चळवळ निर्माण होऊ शकली.

६) सामाजिक नियंत्रणाच्या यंत्रणा :

समाजामध्ये चळवळी उभ्या करत असताना काही वेळा निदर्शने करतात, मोर्चे काढतात अशा वेळी शासन किंवा पोलिस यंत्रणा या चळवळींना विरोध करतात. त्या दाबून टाकण्याचा प्रयत्न करतात. त्यांना त्यांच्या ध्येयापासून विचलित करतात. जेणेकरून त्यांनी पुन्हा त्या मार्गाला जाऊ नये. परंतु जेव्हा या सर्वांवर मात करून एखादी चळवळ उभी राहते तीच पुढे वाटचाल करते व ती चळवळ टिकून राहते.

थोडक्यात स्मेल्सर यांनी सामाजिक चळवळीचे निर्धारक घटक सांगून चळवळी निर्माण होतील की नाही व त्या टिकून राहतील की नाही याबाबतचे स्पष्टीकरण दिले आहे.

ब) स्टॉकडल (Stockdle)

स्टॉकडल यांनी सामूहिक वर्तन प्रकार अस्तित्वात येण्यासाठी आवश्यक असलेल्या संरचनात्मक अटी पुढीलप्रमाणे सांगितल्या आहेत.

१) सामाजिक असंतोष :

एखाद्या सामाजिक परिस्थितीविषयी जेव्हा अनेक लोकांच्या मनात असमाधानाची भावना निर्माण होते तेव्हा सामाजिक चळवळीला निर्माण होण्यास सुरवात होते सामाजिक असंतोष ही सामाजिक चळवळी निर्माण होण्याची पहिली अट आहे.

२) संरचनात्मक अडथळे :

सामाजिक असंतोषाची भावना जितकी तीव्र स्वरूपाची होईल तितके संरचनात्मक अडथळे त्यांच्या प्रक्रियेला विरोध करत राहतात. लोकांचा कोंडमारा होऊ लागतो व ते अधिक शक्तीनिशी संघटित होऊन निर्माण होणाऱ्या संरचनात्मक अडथळ्यांवर मात करणेचा प्रयत्न करतात. हीच परिस्थिती सामाजिक चळवळींना पोषक ठरते.

३) संपर्क :

ज्या लोकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली असते त्यांच्यात परस्परात संपर्क घडून आला की आंतरक्रिया निर्माण होऊन असंतोष हा सामूहिक स्वरूपाचा बनत जातो. त्यामुळे पुढे सामूहिक अभिवृत्तीतून निर्माण होणारी परिस्थिती सामाजिक चळवळींना विधायक ठरते.

४) असंतोष दूर करता येण्यासाठी आत्मविश्वासाची भावना :

लोकांमध्ये परस्पर संबंध घडून आले की विधायक असमाधानकारक सामाजिक परिस्थिती काय आहे, ती कशी बदलता येईल त्यासाठी कोणकोणत्या मार्गांचा अवलंब करावा लागेल याबाबतचा आराखडा तयार केला जातो. कोणत्या प्रकारच्या मार्गाने परिस्थितीत नक्की बदल करता येईल याबाबत चर्चा करून एकमत निश्चित केले जाते. त्यामुळे असंतोष नक्की दूर करता येईल अशा प्रकारचा आत्मविश्वास लोकांच्या मनात निर्माण होतो. मात्र आपण ठामपणे परिस्थिती बदलू शकणारच अशी तीव्र स्वरूपाची भावना असली पाहिजे अन्यत: चळवळ अस्तित्वात येऊ शकणार नाही.

५) विचारप्रणाली :

विचारप्रणालीमुळे लोकांच्या मनात चळवळीमध्ये सहभागी होण्याची प्रेरणा मिळते. आणि विचारप्रणाली विकसित झाल्याशिवाय चळवळ टिकून राहू शकत नाही. म्हणूनच चळवळीतील कार्यक्रमांचे नियोजन करणे, कार्यकर्त्यांच्या कल्पनांचा संच करणे म्हणजेच विचारप्रणाली असावी लागते. विचारप्रणालीमुळे नेत्यांकडून आंतरीकरण घडून येणे आवश्यक असते. विशेष म्हणजे विचार प्रणालीमुळे आपण जे करित आहोत ते बरोबर आहे की नाही यापेक्षा ते बरोबरच आहे अशी भावना प्रस्थापित होते चळवळीला चालना मिळते.

थोडक्यात, सामाजिक चळवळी अस्तित्वात येण्यासाठी व सामाजिक चळवळी व्यवस्थीत कार्यरत राहून त्या टिकून राहण्यासाठी वरील प्रकारचे सर्व घटक प्रस्थापित होणे अत्यंत गरजेचे आहे. तरचं चळवळीना एक दिशा मिळते, चालना मिळते व त्या टिकून राहू शकतात.

स्वयं अध्ययन प्रश्न – २

प्रश्न खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सामाजिक चळवळींच्या संरचनात्मक निर्धारक घटकाबाबत कोणते महत्वपूर्ण सैद्धांतिक योगदान आहे?

२) संरचनात्मक तणाव म्हणजे काय?

३) स्टॉकडल यांनी सामाजिक चळवळीच्या किती संरचनात्मक पूर्वअटी सांगितलेल्या आहेत?

१.३ सारांश : (Summary)

भारतातील सामाजिक चळवळी या पेपर मध्ये आपण सामाजिक चळवळींचे स्वरूप, अर्थ, प्रकार, अवस्था, सैद्धांतिक विवेचन, त्याचबरोबर काही जुन्या पारंपरिक व काही नवीन सामाजिक चळवळींचा सखोल अभ्यास करणार आहोत.

प्रस्तुत, प्रथम प्रकरणातील पहिल्या घटकामध्ये सामाजिक चळवळींची विविध समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्यातून सामाजिक चळवळींचा अर्थ लक्षात येतो. त्याचबरोबर सामाजिक चळवळींचा सखोल अर्थ लक्षात येण्यासाठी त्याची काही स्वरूपात्मक वैशिष्ट्ये देखील स्पष्ट केली. त्यानुसार असे लक्षात येते की, सामाजिक चळवळी ही सामाजिक परिवर्तनाची दुसरी बाजूच आहे. ज्या समाजामध्ये योग्य परिवर्तन घडवून आणण्यासाठी व अयोग्य परिवर्तन रोखण्यासाठी कार्यरत असतात. सामाजिक चळवळी हा एक सामुहिक व संघटित असा वर्तन प्रकार आहे. जो समाजातील असंतोष दूर करण्याच्या उद्देशाने प्रेरित होऊन कार्यरत राहतात. सामाजिक चळवळींना यश मिळो ना मिळे परंतु समाज व्यवस्थेला नक्कीच हितकारक ठरतात.

दुसऱ्या घटकामध्ये सामाजिक चळवळींचे काही संरचनात्मक निर्धारक घटकांचा अभ्यास केला आहे. सामजिक चळवली कशा निर्माण होतात. त्या निर्माण होतील की नाही, लोक त्याला पाठिंबा देतील की नाही, त्या यशस्वी होतील की अपयशी याबाबतचे स्पष्टीकरण मिळते. नेल स्मेल्सर व स्टॉकडल या समाजशास्त्रज्ञांनी व्यक्त केलेल्या घटकातून ते लक्षात येते.

१.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययन प्रश्न–१

१) जॉन विल्सन – ''सामाजिक व्यवस्थेत व्यापक प्रमाणावरील परिवर्तन घडवून आणण्यासाठी किंवा घडून येणाऱ्या बदलांना प्रतिकार करण्यासाठी जाणीवपुर्वक संघटितरित्या, असंस्थिकृत साधनांचा किंवा मार्गांचा अवलंब होय.''

२) सामाजिक चळवळींचा सामाजिक परिवर्तनाशी आजही निकटचा संबंध आहे.

३) समाजात असंतोषात्मक परिस्थिती निर्माण झाली की सामाजिक चळवळींचा उदय होतो.

४) हे विधान चुकीचे आहे.

५) सामाजिक चळवळीत यश मिळविण्यासाठी संघटितपणा व नेतृत्वाची जास्त गरज असते.

स्वयं अध्ययन प्रश्न – २

१) सामाजिक चळवळीच्या संरचनात्मक निर्धारक घटकांबाबत नेल स्मेल्सर यांचे सैद्धांतिक योगदान अतिशय महत्वपूर्ण आहे.

२) एखाद्या समाजातील प्रत्यक्ष असलेली सामाजिक परिस्थिती आणि समूहाचे आदर्श यामध्ये संघर्ष निर्माण झाले की संरचनात्मक तणाव निर्माण झाला असे म्हणतात.

३) स्टॉकडल यांनी सामाजिक चळवळींबाबतच्या पाच संरचनात्मक पूर्व अटी सांगितल्या.

१.५ सरावासाठी प्रश्न :

अ) दीर्घोत्तरी प्रश्न.

१) सामाजिक चळवळींची व्याख्या देऊन सामाजिक चळवळी ही संकल्पना स्पष्ट करा.

२) सामाजिक चळवळीची व्याख्या देऊन सामाजिक चळवळीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

ब) थोडक्यात टीपा लिहा.

१) सामाजिक चळवळींची विचारप्रणाली

२) सामाजिक असंतोष व सामाजिक चळवळ

३) सामाजिक चळवळींच्या संरचनात्मक पूर्वअटी

१.६ अधिक वाचनासाठी पुस्तके :

1) Rao, M.S.A. (1979) Social Movements in India, Manohar Publications, New Delhi.

2) Shah, Ghanashyam, (1990) Social Movements in India, A Review of the Literature, Delhi, Sage Pub.

3) Banks, J.A. (1972), Sociology of Social Movements, London Macmillan.

4) डॉ. साळुंखे सर्जेराव (१९९६), समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन पुणे.

5) प्रा. चंद्रकांत खंडागळे, भारतीय समाज (१९९८), प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली

❑❑❑

घटक – १ (क)
सामाजिक चळवळींची मुलभूत स्थिती

घटक संरचना

१.१ प्रस्तावना

१.२ उद्दिष्टे

१.३ विषय विवेचन

१.३.१ सामाजिक चळवळीची मूलभूत स्थिती

१.३.२ सामाजिक चळवळीच्या व्याख्या

१.३.३ सामाजिक चळवळीची वैशिष्ट्ये

१.३.४ सामाजिक चळवळीची कारणे

१.३.५ सामाजिक चळवळीचे महत्त्व

१.३.६ सामाजिक चळवळीचे प्रकार

१.३.६.१ कामगार चळवळ

१.३.६.२ शेतकरी चळवळ

१.३.६.३ जातीच्या न्यायासाठी चळवळ

१.३.६.४ पारंपारिक चळवळी

१.३.६.५ पर्यावरण चळवळ

१.३.६.६ लिंगभाव चळवळ

१.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ क्षेत्रीय कार्य

१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके.

१.१ प्रस्तावना (Introduction) :

या घटकाद्वारे आपणास भारतातील सामाजिक चळवळी, त्यांचे स्वरूप व व्याख्या, वैशिष्ट्ये, कारणे, महत्त्व व चळवळी प्रकार यांचा परिचय होणार आहे. या घटकात कामगार चळवळ, शेतकरी चळवळ, जातीच्या न्यायासाठी चळवळी, पारंपारिक चळवळी, पर्यावरण व लिंगभाव चळवळ कशा निर्माण झाला. त्या चळवळीत कोणाकोणाचे योगदान आहे व कोणाला त्याचा न्याय मिळाला इ. गोष्टी अभ्यासायला मिळणार आहेत.

१.२ उद्दिष्टे (Objective) :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणाला सामाजिक चळवळीचा :

- सामाजिक चळवळीचे स्वरूप, व्याख्या, वैशिष्ट्ये, कारणे व महत्त्व समजून घेता येईल.
- सामाजिक चळवळीचे प्रकार समजून घेता येतील.
- सामाजिक चळवळींना आलेले यश समजून घेता येईल.
- सामाजिक चळवळीत अनेकांचे असणारे योगदान समजून घेता येईल.

१.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter) :

या घटकात सामाजिक चळवळी म्हणजे काय? त्यांचे कारणे, वैशिष्ट्ये व प्रकार याचा अभ्यास करताना चळवळीचे प्रकार व त्या चळवळीत अनेकांचे असणारे योगदान व त्याला आलेले यश यांची सविस्तर माहिती घेणार आहे.

१.३.१ सामाजिक चळवळीची मूलभूत स्थिती :

समाज हा सातत्याने बदलत असतो. पण हा बदल कधीही अचानक होत नाही. तर त्यासाठी समाजाच्या गरजेनुसार एकादी बाब प्राप्त करून घेण्यासाठी वेळप्रसंगी एखादी चळवळही उभी करावी लागते. कधी ती मर्यादित असते तर कधी ती व्यापक स्वरूपाची असते.

सामाजिक चळवळी ह्या अगदी प्राचीन काळापासून ते आजच्या युगापर्यंत कोणत्या ना कोणत्या मागणीसाठी चालत आल्या आहेत. ब्रिटीश राजवटीत सामाजिक चळवळींनी जोर धरला.

सामाजिक चळवळ म्हणजे सामाजिक बहुसंख्य लोकांकडून समाजाच्या काही घटकात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न अगर त्यात होणाऱ्या बदलांना विरोध करण्याचा संघटितरित्या केलेला प्रयत्न होय. ही संकल्पना प्रथम सेट सायमन या फ्रेंच विचारवंताने वापरली. कोणत्याही चळवळीला प्रतिचळवळ विरोध करण्यासाठी असते. एखादा समाजात निर्माण झालेल्या समाजिक समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी मोठ्या स्तरावर समुदायाद्वारा केला जाणारा सामूहिक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय.

समाजामध्ये ज्या अनेक चळवळी निर्माण झाल्यात त्या म्हणजे उदा. अस्पृश्यता चळवळ, सांस्कृतिक चळवळ, स्त्री-मुक्ती चळवळ, शेतकरी चळवळ, कामगार चळवळ, राजकीय चळवळ, सामाजिक सुधारणा चळवळ इ. चळवळी उदयास आल्या आहेत.

भारतातील सामाजिक चळवळींचा अभ्यास आणि तज्ञ व्यक्तीने गेल्या तीन दशकांमध्ये अनेक वेळा केला गेला. एकूणच १९६० च्या मध्यावधीनंतरच या सामाजिक चळवळीविषयक संशोधन केले.

सामाजिक चळवळींमध्ये थोड्याफार प्रमाणात का संघटनात्मक कार्याचा सहभाग असावा लागतो. हा सहभाग अनौपचारिक किंवा संस्थात्मकही असू शकतो. सामाजिक चळवळींशी संबंधित असलेले बहुतेक साहित्य हे चळवळींच्या इतिहासावर, चळवळींसाठी उपयोगी प्रारुप आणि सिद्धांताशी संबंधित आहे. समाजात होणाऱ्या चळवळीत मूळ कारणे जी लपलेली असतात ते म्हणजे असंतोषाची भावना, चळवळीला प्रेरणा देणारी परिस्थिती आणि गती देणारे नेतृत्व यांचाही चळवळीत परिणाम होतो. चळवळीमागची प्रेरणा, उद्देश, श्रद्धा कामावरही निष्ठा या मुद्यांनाच सर्वाधिक महत्त्व आहे. व्यक्तीच्याच इच्छा, आकांक्षाना एकत्रितपणे व्यक्त करण्याचे कार्य म्हणजे सामाजिक चळवळ असे म्हटले जाते.

पर्याय, विचारधारा, कार्यक्रम, नेतृत्व आणि संघटना हे चळवळीचे मुख्य घटक आहेत. हे सर्व घटक एकमेकांवरच अवलंबून होते.

नूतन सामाजिक चळवळीच्या पार्श्वभूमीवर अँडे गुंदर फ्रँक आणि मार्ता फ्युएंटिस यांनी सामाजिक व राजकीय चळवळ यात फरक करायला सुरूवात केली. सामाजिक चळवळींना सत्तेपेक्षा स्वायत्तता मिळवण्यातच अधिक रस असतो.

बऱ्याचवेळा सामाजिक चळवळींशी संबंधित संशोधन हे मार्क्सवादी आणि बिगर मार्क्सवादी अशा दोन विभागांमध्येच विभागली जाते. पण सगळ्या प्रकारचे संशोधन या दोन प्रकारात विभागले जाऊ शकत नाही.

१.३.२ सामाजिक चळवळीच्या व्याख्या :

सामाजिक चळवळींचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी सामाजिक चळवळींच्या व्याख्या जास्त महत्त्वाच्या ठरतील की जेणे करून त्यातून अधिक स्पष्टीकरण होण्यास मदत होईल. अशा व्याख्या पुढीलप्रमाणे –

१) **ब्लूमर हर्बर्ट** – ''सामाजिक जीवनाची नवी व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी करण्यात येणारा सामूहिक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय.''

Herbert Blumer - "A collective enterprise to establish a new social order of life."

२) **हॉर्टन व हंट** – ''सामाजिक चळवळी म्हणजे अशा प्रकारचे सामुदायिक प्रयत्न की ज्यामध्ये समाज किंवा त्यामधील सभासद यांच्यामध्ये परिवर्तन होण्यासाठी प्रेरणा दिली जाते किंवा प्रतिरोध केला जातो.''

Horton and Hunt - "Social movements are collective attempts to promote or resist change either in socity or in its members."

३) **जोसेफ आर. गसफिल्ड** – ''समाज व्यवस्थेच्या एखाद्या भागात परिवर्तन घडवून आणण्यासाठी सामुदायिकरित्या केल्या जाणाऱ्या मागण्या म्हणजे सामाजिक चळवळी होत.''

Joseph R. Gusfield - "Social movements are defined as socially shared demands for change in same aspect of the social order."

४) **एम.एस.ए.राव** – ''समाजातील एखाद्या भागाने पूर्ण किंवा आंशिक परिवर्तन करण्यासाठी विचाराधिष्ठित संघटित प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय.''

M.S.A.Rao - "A social movement is an organisal attemplt on the part of a section of society to bring about partial or total change is society through collective mobilisation based on ideology."

५) **रूडाल्फ हेबर्ले** – ''एखाद्या समाजातील प्रस्थापित संबंधात रूपांतरण किंवा परिवर्तन घडवून आणण्यासाठी केलेला सामूहिक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय.

Rudolf Heberle - "Collective effort to transform established relations within a particular society."

१.३.३ सामाजिक चळवळीची वैशिष्ट्ये :

आजचे युग हे अनेक सामाजिक चळवळीने व्यापलेले आहे. सामाजिक चळवळी संपूर्ण मानवी समाजात आढळतात. भारतात अनेक सामाजिक चळवळी उदयास आल्या.

उदा. हुंडा प्रतिबंधक चळवळ, पर्यावरण चळवळ, सतीप्रथा प्रतिबंधक चळवळ, बालविवाह, प्रतिबंधक चळवळ इ. सामाजिक चळवळही सामाजिक परिवर्तनाची पद्धती आहे. चळवळी निर्मितीच्या मागे अनेकविध उद्देश असतात. उदा. समाज परिवर्तन करणे, समाजात होणाऱ्या परिवर्तनाचा विरोध करणे इ. अशा या सामाजिक चळवळीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे –

१) निश्चित उद्देश :

सामाजिक चळवळ निर्माण होताना त्याला एक निश्चित उद्देश असतो. लोक विशिष्ट उद्देशांनी एकत्र येतात, संघटित होतात व जाणीवपूर्वक प्रयत्न करून चळवळ घडवून आणतात. म्हणजेच सामाजिक चळवळीला निश्चित असा उद्देश असतो.

२) समस्यांतून जन्म :

समाजात जेंव्हा सामाजिक समस्या जन्म घेते आणि तीव्र स्वरूप धारण करते तेंव्हा सामाजिक चळवळीचा उदय होतो. समस्येमुळे होणारा त्रास सहन करू शकत नाहीत. तेंव्हा ती परिस्थिती बदलण्यासाठी सामाजिक चळवळ समाजात उभा राहते.

३) पूर्वनियोजित प्रयत्न :

सामाजिक चळवळीची रचना ठरवून नियोजनबद्धरित्या तिची आखणी केली की चळवळीचा उद्देश अथवा हेतू साध्य होतो. म्हणजेच अचानक उठून चळवळ न करता पूर्वनियोजितरित्या केली तर सामाजिक चळवळींना यश मिळण्यास सुलभता निर्माण होते.

४) सामुदायिक प्रयत्न :

समाजात कोणत्याही गोष्टीत सुधारणा करताना कोणी एका व्यक्तीने करून उपयोग नाही. त्यासाठी दोन पेक्षा अधिक व्यक्ती करून येऊन विचारांची देवाण घेवाण करून सामाजिक चळवळ कोणत्या दिशेने घेऊन जायचे याचे विचार विनिमय करून सर्व प्रकारचे प्रयत्नही एकत्रित म्हणजेच सामुदायिकरित्या करणे गरजेचे असते.

५) अनौपचारिक संघटन :

सामाजिक चळवळ एक अनौपचारीक संघटन असते. या संघटनेद्वारा चळवळीच्या उद्देशाना प्राप्त करण्यासाठी योजना बनविली जाते. पैसा गोळा करून सर्व सदस्यांना दिशा दिली जाते. यासाठी सदस्यांची अनौपचारिक संघटना स्थापना करून सामाजिक चळवळ वाढत जाते.

✢ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न** (Check Your Progress) **:**

अ) एका वाक्यात उत्तरे द्या.

१) सामाजिक चळवळीची व्याख्या सांगा.

२) सामाजिक चळवळ म्हणजे काय?

३) सामाजिक चळवळींना निश्चित असे काय असते?

४) सामाजिक चळवळींचे संघटन कसे आहे?

५) सामाजिक चळवळींचे मूळ कशात असते?

१.३.४ सामाजिक चळवळीची कारणे :

सामाजिक चळवळी निर्माण होण्यापाठीमागे अनेकविध अशी कारणे आहेत. ती पुढीलप्रमाणे –

१) सामाजिक न्याय :

समाजातील काही घटकांवर अन्याय जेंव्हा होतो, त्यांना त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवले जाते, असमानतेची वागणूक मिळते, गरीब-श्रीमंत अशी दरी निर्माण होते. व गरीब लोकांवर श्रीमंत मंडळीकडून जुलूम केला जातो. तेंव्हा अशा अन्यायांना वाचा फोडण्यासाठी लोक एकत्रित येतात. व अन्यायाला वाचा फोडण्यासाठी सामाजिक आंदोलन छेडतात. सामाजिक न्याय मिळेपर्यंत सामाजिक चळवळींची विविध रूपे पाहायला मिळतात.

२) सामाजिक असंतोष :

समाजातील जनतेत जेंव्हा असंतोषाचे प्रमाणे वाढते तेंव्हा सामाजिक चळवळीसाठी पोषक असे वातावरण निर्माण होते. श्रीमंत-गरीब, भेदभाव श्रेष्ठ-कनिष्ठ हे भेदभाव वाढून अन्याय वाढतो तेंव्हा सामाजिक चळवळी निर्माण होऊन पुढे त्या वाढत जातात.

३) सांस्कृतिक घटक :

माणसाच्या जीवन जगण्याच्या पद्धतीला संस्कृती असे म्हणतात. मानसशास्त्रज्ञ हर्सकोव्हीटस यांनी संस्कृतीबाबत असे म्हटले आहे की, समाजाचा मानव निर्मित भाग म्हणजे संस्कृती होय. तर हार्टन व हंट यांनी म्हटलेली वर्तमान काळात आदिवासी व आधुनिक समाजात मूल्यामध्ये हळूहळू विस्तृत व मोठ्या प्रमाणात परिवर्तन होते. त्यास सांस्कृतिक वहन म्हणतात. सांस्कृतिक वहन होत असताना नवीन मूल्यांचा जन्म होतो. उदा. हुंडाविरोधी चळवळ.

४) सामाजिक नियंत्रण :

समाजातील रूढी - परंपरांचा इतर घटकांवर नको तिथे होत असणारे सामाजिक नियंत्रण समाजात आंदोलनास कारणीभूत ठरते. समाजातील अयोग्य नियंत्रणामुळे समाजातील गतीशीलता मंदावते आणि समाजातील समानतेची दरी अधिकच रूंदावत जाते. यामुळेच सामाजिक चळवळ निर्माण होते.

५) असुरक्षिततेची भावना :

समाज काही व्यक्तींना पूर्णपणे स्विकारत नाही. तो त्या समूहांशी एकात्म होत नाही. अशा व्यक्ती सामाजिक चळवळी निर्धारित करतात. दुसऱ्या ठिकाणावरून आलेल्या व्यक्ती नवीन संस्कृतीशी समायोजन करू शकत नाहीत. त्या स्वतःला असुरक्षित मानतात आणि सामाजिक चळवळीत सहभागी होतात.

१.३.४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :

ब) पुढील विधाने चूक की बरोबर सांगा.

१) अन्यायाला वाचा फोडण्यासाठी सामाजिक आंदोलन छेडतात.

२) समाजात असंतोषाचे वातावरण वाढल्यावर आनंदी आंनद होतो.

३) माणसाच्या जीवन जगण्याच्या पद्धतीला संस्कृती असे म्हणतात.

४) समाज सर्वांना स्विकारतो.

५) समाजातील गतीशीलता मंदावते आणि समाजातील समानतेची दरी अधिक रूंदावत जाते तेंव्हाच सामाजिक चळवळ निर्माण होते.

१.३.५ सामाजिक चळवळीचे महत्त्व :

सामाजिक चळवळी ह्या समाजातील बहुतेक लोकांना उपयुक्त ठरतात तर काही घटकांना त्या अनावश्यक वाटतात. म्हणूनच ते त्याला विरोध करतात. परंतु बहुसंख्य लोकांच्या गरजेतून सामाजिक चळवळींची निर्मिती होते. आधुनिक समाजात तर अनेक सामाजिक चळवळी उदयास आल्या आहेत. उदा. स्त्री चळवळ, दलित चळवळ, आदिवाशी चळवळ, सत्यशोधक चळवळ इ. या चळवळी त्या-त्या समूहाच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरत आहेत. सामाजिक चळवळीच्या माध्यमातून सामूहिकरित्या सामाजिक प्रश्न किंवा समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. अशारितीने अनेक सामाजिक चळवळी महत्वाच्या ठरल्या आहेत. त्यांचे महत्त्व पुढील प्रमाणे -

१) जनजागृतीसाठी :

समाज हा वेगवेगळ्या सामाजिक समस्यांनी व्यापलेला असतो तेंव्हा त्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजनांचा विचार केला जातो. सर्व बाजूंनी विचार विनिमय झाल्यावर त्या सोडविण्यासाठी प्रथम सामाजिक प्रबोधन करण्यासाठी जनजागृती केली जाते. समाज देखील सामुदायिक प्रयत्नातून एक संघ होतो व सामाजिक देखील सामुदायिक प्रयत्नातून एक संघ होतो व सामाजिक समस्यांची सोडवणूक सामाजिक चळवळीतून करतो. म्हणजेच सामाजिक समस्या सोडविण्यासाठी सामाजिक चळवळी उभ्या करून त्यातून समाजात जनजागृती केली जाते.

२) सामाजिक समानता निर्माण करण्यसाठी :

भारतीय समाज हा विविधतेने नटलेला असल्याने समाजात विषमताही अनेकविध प्रकारची आढळून येते. उदा. उच्च-नीचता, श्रेष्ठ, कनिष्ठता जातीभेद, वर्गभेद इत्यादी या अनेकविध भेदांतून समाजाची प्रगती होण्याऐवजी अधोगती होते. समाजाचा विकास खुटतो. तेंव्हा या भेदांचे उच्चाटन करण्यासाठी सामाजिक चळवळी उभ्या केल्या जातात.

३) समाजसुधारणेसाठी :

भारतीय समाजात अनेकविध समाजसुधारक हे सामाजिक चळवळी उभ्या करून समाजातील अनिष्ट प्रथा परंपरा, रितीरिवाज, अंधश्रद्धा निपटून काढतात. म्हणजेच अनिष्ट प्रथा परंपरांचे उच्चाटन करण्यासाठी सामाजिक चळवळी कार्य करीत असतात.

उदा. देवदासी प्रथा, हुंडाविरोधी चळवळ, अस्पृशता निर्मूलन चळवळ, स्त्री शिक्षणासाठी केलेली चळवळ इ. याखेरीज प्रार्थना समाजाती चळवळ, सत्यशोधक चळवळ व ब्राम्होसमाजाची चळवळ या चळवळीमुळे समजात सुधारण घडून येण्यास मदत झाली. स्त्री शिक्षणविषयक उभारलेल्या चळवळीमुळे स्त्रियांना शिक्षण मिळू लागले.

४) सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी :

सामाजिक चळवळीमुळे नेहमीच सामाजिक परिवर्तन घडून येते. समाजात समता प्रस्थापित करणे व ज्या कार्यासाठी चळवळ सुरू केली आहे त्या कर्यात यश मिळवून देणे म्हणजेच सामाजिक परिवर्तन घडवून

आणणे होय. सामाजिक चळवळीतून नवनवीन तंत्रज्ञान शोधून काढणे, जुन्या व प्रस्थापित व्यवस्थेला विरोध करून ते मोडीत काढणे या सारखे महत्त्वाचे कार्य सामाजिक चळवळी करीत असतात. उदा. सत्यशोधक, समाजाची चळवळ, ब्राम्हणोत्तर चळवळ, स्त्री शिक्षण विषयक उभारलेले बंडाचे धोरण इ. तून समाजाला उपयुक्त अशा घटना घडत गेल्या व समाजात वेगवेगळ्या क्षेत्रात सामाजिक परिवर्तन घडून आले.

५) अन्याय, अत्याचार व शोषणाला विरोध करण्यासाठी :

आपल्या भारतीय समाजात गोर-गरीब, दलित, पिडित आश्रित व माहिला यांच्यावर अन्याय करणारा वर्ग होता. त्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी पूर्वी आजच्या इतके पुरेसे कायदे अस्तित्वात नव्हते. त्यामुळे या शोषणाला अनेक लोक बळी पडत असत. म्हणून समाजातील काही समाजसुधारकांनी याविरूद्ध बंडाचे निशाण उभा केले. याबाबत शाहू, फुले, आंबेकर यांचे नांव आवर्जुन घेतले जाते. यांनी समाजातील सर्व जनतेला समानतेने जगण्यासाठी त्यांचे हक्क प्राप्त करून देण्यासाठी सामाजिक चळवळी उभ्या केल्या. व त्यांचे शोषण थांबवून त्यांना त्यांचे हक्क मिळवून दिले. विशेषतः महिलांबाबत होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात सामाजिक चळवळी उभ्या केल्या व महिलांना न्याय मिळवून दिला.

सामाजिक चळवळ ही एक महत्वपूर्ण सामूहिक कृती असून मानवी जीवनात या कृतीला अतिशय महत्वाचे स्थान आहे की ज्यामुळे मानवाचे जीवन बदलून टाकले जाते व ते सुकर केले जाते त्यामुळेच सामाजिक चळवळ यशस्वी होते.

अशा भारतीय समाजात अनेकविध चळवळी घडून आल्या त्या पुढील प्रमाणे -

१.३.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :

क) पुढील विधानातील रिकाम्या जागा भरा.

१) ..... ह्या समाजातील बहुतेक लोकांना उपयुक्त ठरतात.

२) समाज हा वेगवेगळ्या ..... व्यापलेला असतो.

३) भारतीय समाज हा ..... ने नटलेला आहे.

४) भारतीय समाजात अनेकविध ..... हे सामाजिक चळवळी उभ्या केल्या.

५) सामाजिक चळवळीमुळे नेहमीच सामाजिक ..... घडून येते.

१.३.६ चळवळींचे प्रकार :

१) वर्गाच्या चळवळी २) जातीसंघटनेच्या चळवळी

३) पारंपारिक चळवळी ४) लिंगभाव चळवळी इ.

१) वर्गाच्या चळवळी :

१९ व्या शतकाच्या १९५० च्या दरम्यान पाश्चात्य तंत्रज्ञानावर आधारीत आधुनिक विजेच्या वापरावर चालणारे उद्योगधंदे भारतात सुरू झाले. मुंबई व कलकत्ता सारख्या शहराभोवती आगगाडीच्या रूळांचे जाळे

विपले गेले. १८५५ मध्ये मुंबईतील पहिल्या सूतगिरणीने आपले उत्पादन चालू केले. याच सुमारास कलकत्याला तागाचा कारखाना सुरू झाला. २० व्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत औद्योगिकरण सूत आणि ताग यांच्याशी संबंधित होते. मोठ्या प्रमाणात चहाची लागवड सुरू झाली. परंतू तेथे काम करणाऱ्या कामगारांना औद्योगिक कामगार मानण्यात येत नव्हते.

१९१४ साली २६४ सूतगिरण्यात २,६०,००० कामगार काम करीत होते. बंगालमध्ये ६० तागाच्या गिरण्यात १९१२ साली २,७०,००० कामगार काम करीत होते. १९१४ साली रेल्वे खात्याने ६ लाख लोकांना कामांवर घेतले. १९११ साली लोखंड आणि पोलादाची कारखानदारी जमशेदपूर मध्ये सरू झाली. १९१० मध्ये १,५०,००० कामगार खाणीमध्ये नेमले आणि ७ लाख कामगार चहाच्या लागवडीमध्य नेमले गेले. १९९९ मध्ये उद्योगाच्या सर्वेक्षणानुसार २८१ लाख कामगारांना खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रात नेमले गेले. यात ग्रामीण व शहरी दोन्ही प्रकार येतात. यात कारखान्यात काम करणारे कामगार, लागवड, खाण, बांधकाम, सेवा, वाहतूक व दळणवळण या सर्व क्षेत्रातील कामगारांचा समावेश होतो. अशा सर्व कामगारांनी आपल्या स्वतःच्या न्यायासाठी व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधी हक्क देण्यासाठी संघटना निर्माण करून कामगार चळवळी उभ्या केल्या. त्यापुढीलप्रमाणे –

१.३.६.१ कामगार चळवळी :

जेंव्हा समाजात सत्ता, संपत्ती, हक्क व सवलती यांच्यात असमानता निमार्ण होते व लोकांच्यात असंतोष निर्माण होतो तेंव्हा चळवळ निर्माण होते. कामगारांनी १२ ते १५ तास काग करून त्यांना पुरेसे वेतन मिळेना, साप्ताहिक सुट्टी नाही पण त्यांच्या कष्टातून उद्योग व्यापार करणाऱ्यांना मात्र फायदा मोठ्या प्रमाणात होऊ लागला. तेंव्हा या अन्यायाला कंटाळून कामगारांनी एकत्र येऊन स्वतःची चळवळ उभी केली. त्यालाच कामगार चळवळ असे म्हटले आहे.

१) रावबहादूर लोखंडे आणि कामगार चळवळ :

म. फुले यांच्या विचारांनी प्रभावित असलेले व सत्यशोधक चळवळींची कास धरलेले लोखंडे समाजातील स्त्री-पुरूष समानता व जातीभेद निर्मूलनासाठी पुढाकार घेतला. याबाबत समाजात जनजागृती करण्यासाठी दिनबंधू या नियतकालीकातून लिखाण करून कामगारांच्यात जागृती निर्माण केली. कामगारवस्तीत जावून त्यांना आपल्या चळवळीचे महत्त्व पटवून दिले. सर्व कामगारांना त्यांचे म्हणणे पटल्याने सर्व कामगार एकत्रित आले व चार हजार कामगारांची सभा घेऊन त्यात आपल्या मागण्या मान्यतेसाठी ठेवल्या. त्या म्हणजे रविवारची सुट्टी, जेवणासाठीची सुट्टी, पगारी रजा मिळावी व कामावर असलेल्या कामगाराचा मृत्यू झाल्यास कुटुंबियांना पेन्शन मिळावी. महिलांना कामाच्या ठिकाणी स्वच्छतागृहे असावीत अशा विविध मागण्यासाठी कामगारांचा नेता नारायण लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली लढा देऊन यश मिळविले.

२) लोकमान्य टिळकांची शिक्षा आणि कामगार चळवळ :

लोकमान्य टिळकांना जेंव्हा काळ्या पाण्याची शिक्षा ठोठाविण्यात आली तेंव्हा मुंबई कामगारांनी संप पुकारला सर्व व्यवहार बंद केले. गव्हर्नरला काळे झेंडे दाखवून निदर्शने केली. यात पोलिसांच्या गोळीबारात

माणसे मारली गेली. तरीही सहा दिवसांचा संप चालूच होता. त्यावेळी लेनिन सारख्या अभ्यासू तज्ञांनी मत व्यक्त केले की 'हिंदूस्थानात श्रमजीवी वर्ग जागृत झाला आहे.'

३) महात्मा गांधी तुरूंगवास आणि कामगार चळवळ :

स्वातंत्र्याच्या चळवळीत अहोरात्र काम करणारे महात्मा गांधी यांना जेंव्हा रौलट सत्याग्रहात अटक झाली होती तेंव्हा अहमदनगर येथील गिरणी कामगारांनी संप पुकारला होता. या चळवळीत अनेक लोक मारले गेले तर अनेक जखमीही झाले होते. परंतु कामगारांनी माघार घेतली नाही. तसेच अमृतसर येथे कामगारांच्या विकासासाठी देशभर कामगार संघटना उभी केली. पुढे त्याचेच रूपांतर आयकरमध्ये झाले.

४) कामगारांची वेतनवाढ व कामगार चळवळ :

कामगारांच्या वेतनाच्या ५०% दैनिक भत्ता दिला जावा. अशी मागणी असताना मिल मालकांनी ती मागणी नाकारली तेंव्हा महात्मा गांधीनी अशी भूमिका घेतली की कामगारांना ३५% वेतनवाढ मिळावी. ही जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत उपोषण करणार म्हणजे कामगारांची ही चळवळ अहिंसेच्या मार्गाने यशस्वी झाली.

✢ स्वातंत्र्योत्तर काळातील कामगार चळवळी :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात विधायक पाऊल उचलण्यात आले. १९४८ साली किमान वेतन कायदा करण्यात आला. १९५२ मध्ये कामगार भविष्य निर्वाह निधीचा कायदा झाला. १८५१ पासून पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात कामगार संघटना स्थापना करण्याचा अधिकार मान्य करण्यात आला. १९५४ पासून समाजवादी समाजरचना हे धोरण मांडण्यात आले.

१९६५ नंतर देशात आर्थिक स्थिती खालावली महागाई वाढली. जीवनावश्यक वस्तूंचे भाव कडाडले. आर्थिक आणीबाणीमुळे कामगारांमध्ये असंतोष निर्माण झाला. ठिकठिकाणी संपाचे प्रमाणे वाढू लागले. कामगार चळवळी जोर धरू लागल्या.

१) संघटित कामगारांच्या चळवळी :

स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिकीकरण, पंचवार्षिक योजना, सरकारचे कामगारविषयक धोरण आणि कामगार कायद्यांची अंमलबजावणी यातून कामगार संघटनांची वाढ झाली. उदा. सी.पी.आय, सी.पी.आय. (एम), हिंदु मजदूर सभा, प्रजा समाजवादी, संयुक्त समाजवादी, हिंदू मजदूर पंचायत इ. ह्या ट्रेड युनियनचा प्रसार भारताच्या विविध क्षेत्रात झाला. उदा. भारतीय कामगार संघटना मद्रास व तामिळनाडूतील डी.एम.के ची लेबर प्रोग्रेसिव्ह फेडरेशन मुंबईतील दत्ता सामंत यांची कामगार आघाडी, पुण्याचा आसपास राजन नापर यांची महाराष्ट्र लेबर युनियन.

२) असंघटित कामगार :

असंघटित कामगरांमध्ये लहान उद्योगधंद्यातील कामगार, दुकानांमध्ये काम करणारे कामगार, घरगडी, मोलकरणी, स्वयंपाकी, बांधकामातील कामगार, विटभट्टीवरचे कामगार, शेतीवरील कामगार इ. समावेश हा

असंघटित कामगारांमध्ये होतो. अशा कामगारांना एकत्रित करून त्यांचे संप, मोर्चे बांधून त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम होते.

अशा रितीने कामगारांची चळवळ सुरू झाली वाढली व स्वतःच्या न्याय हक्कासाठी सातत्याने झगडत राहिली.

१.३.६.२ शेतकरी चळवळ :

शेतकऱ्यांच्या चळवळी समाजात वेगवेगळ्या कारणांनी झाल्याचे दिसून येते. सध्याचे सर्वत्र गाजणारे ऊस आंदोलन हे सर्व शेतकरी एकत्र आल्याचे प्रतीक आहे. त्यांच्या चळवळीचा रोख हा नेहमी विषम जमीनवाटप, कर्जाचा अतिरिक्त व्याजदर, बेकारी, शेतीचे व्यापारीकरण, शेतसारा या सारख्या गोष्टीबाबत असल्याचे दिसून येते.

✢ १९ व्या व २० व्या शतकातील शेतकऱ्यांच्या चळवळीचे स्वरूप :

शेतकऱ्यांनी इंग्रजा विरूद्ध पहिली चळवळ उभी केली ती महसूल वसूलाविरोधात. तर १८६९ ते १८७७ या कालखंडात बंगालमध्ये जमिनीच्या खंडात वाढ केली म्हणून त्या विरूद्ध तीळ पिकविणाऱ्या शेतकऱ्यांनी उठाव केला.

१८७५ मध्ये शेतकरी कर्ज फेडू शकत नाहीत. म्हणून सावकारांनी त्यांच्या जमिनी काबीज करावया सुरूवात केली. म्हणून शेतकऱ्यांनी चळवळ करून कागदपत्रे गहाळ करण्यास सुरूवात केली.

१९ व्या शतकात महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांना एकत्र करून त्यांच्यात सावकार व भटजी वर्गाबाबत जाणीव निर्माण करून दिली. तसेच शेतकऱ्यांचे शोषण कसे केले जाते. याचे विवेचन शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथात केले.

२० व्या शतकात महात्मा गांधींनी शेतकऱ्यांचे प्रश्न ओळखून शेतीविषयक समस्या सोडविण्यासाठी विशेषरस घेऊन विविध आंदोलने घडवून आणली. ती पुढील प्रमाणे –

१) चंपारण्य सत्याग्रह : (बिहार १९१७-१८)

युरोपीय मळेवाले नीळ लागवडीसाठी भारतीय शेतकरी व शेतमजूरांना अत्यल्प दरात मजुरीवर राबवून घेत या अन्याया विरूद्ध गांधीजींनी चंपारण्याच्या शेतकऱ्यांचा लढा. उभारला परिणामी शेतकऱ्यांच्या मागण्या मंजूर होऊन उपाय योजना सुचविल्या गेल्या.

२) खेडा सत्याग्रह : (गुजरात १९१९)

गुजरातमध्ये खेडा जिल्हात दुष्काळ पडला तरीही महसुल कर आकारणीला सुरूवात झाली. हे अन्यायकारक व नियमबाह्य होते. महसूल कर आकारणी स्थगित करावी अशी शेतकऱ्यांची मागणी होती. ही मागणी सरकारने मान्य केली नाही. म्हणून या लढ्यात फार मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी आंदोलन घडवून आणून आपल्या मागण्या मान्य करून घेतल्या.

३) मोपण्याचे बंड : (मलबार १९२१)

मलबारमध्ये याकाळात जमिनदार व फुले यांच्यात संबंध बिघडले होते. कुळांच्या हक्कांचे संरक्षण गरीब व शेतकऱ्यांचे प्रश्न या सर्व परिस्थितीमुळे मोपल्यांनी बंड केले. परंतु ते अयशस्वी ठरले. शेतीतील असंतोष हेच बंडाचे कारण होते.

४) साताऱ्याचे बंड : (१९१९-२१)

या भागातील खंडकरी शेतकऱ्यांनी ब्राह्मण व मारवाडी जमीनदारा विरूद्ध आंदोलन केले. कारण जमीनदार त्यांच्याकडून पीकाच्या २/३ किंवा ३/४ खंड ने घेता १/२ खंड द्यावा अशी मागणी खंडकरी शेतकऱ्यांनी केली. शेतीच्या मशागतीवर बहिष्कार टाकला परंतु संघटीत नसल्यामुळे बहिष्कार प्रभावी ठरला नाही.

५) बारडोली सत्याग्रह :

ब्रिटिशांच्या काळात शेतसाऱ्याची रक्कम ३० वर्षांनी वाढविली जात असे तेव्हा शेतकऱ्यांनी वाढवलेला हा सारा रद्द करण्याची मागणी केली परंतु ब्रिटिशांनी दडपणूकीचे धोरण स्विकारून सत्याग्रहींना तुरूंगात टाकणे असे धोरण स्विकारले म्हणून वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली असहकार, तत्वाचा अवलंब करण्यात आला. तेंव्हा ब्रिटीश सरकारला माघार घ्यावी लागली.

६) जंगल सत्याग्रह :

सरकारच्या जंगल कायद्यात शेतकऱ्यांना वेगवेगळ्या मार्गानी दंड करण्याच्या व जंगल संपत्तीवरील त्यांचे नैसर्गिक अधिकार काढून घेण्याच्या तरतूदी केल्या. अहमदनगर, नाशिक, पश्चिम खानदेश, सातारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या संदर्भात काही प्रमुख मागण्या केल्या त्या म्हणजे, १) गुरे चारण्याचे शुल्क कमी करावे. २) जंगली जनावरांपासून संरक्षण करण्यासाठी शस्त्रे बाळगण्याची परवानगी मिळावी. ३) राखीव जंगल्यांच्या लिलावात शेतकऱ्यांना सवलती द्याव्यात. ४) वाळलेले लाकूड, सरपण, पाचोळा इ. शेतकऱ्यांना मोफत घेऊ द्याव्या. ५) मालकीच्या जमीनीमध्ये वाढलेल्या सागवानाच्या झाडांवर शेतकऱ्यांचा हक्क असावा इ. मागण्यासाठी शेतकऱ्यांनी चळवळ उभी केली.

७) किसान सभेचे कार्य :

शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी डाव्या गटांनी एकत्र येऊन १९३६ मध्ये आखिल भारतीय किसान सभा स्थापन केली. बिहाद प्रादेशिक किसान सभेने स्वामी सहजानंदाच्या नेतृत्वाखाली जमीनदारा विरूद्धी कुळांच्या जमिनीचे सरंक्षरण करण्यासाठी चळवळ सुरू केली. आंध्रमधील किसान सभेचे नेतृत्व प्रा.एन.जी.रंगा यांनी केले. त्यांनी मध्यम व श्रीमंत शेतकऱ्यांचे प्रश्न हाताळले. काहीवेळा गरीब शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष दिले. डिसेंबर १९३६ मध्ये अखिल भारतीय किसान सभेचे दुसरे अधिवेशन महाराष्ट्रात फैजपूर या ठिकाणी भरले. या अधिवेशनात शेतसारा, वेठबिगारी व ग्रामीण कर्ज या विषयांच्या मागण्या मांडण्यात आल्या.

✢ शेतकरी संघटनेची विविध आंदोलने :

१) कांदा आंदोलन :

कांद्याचे भाव १९८० साली घसरले म्हणून शेतकरी संघटनेने काद्यांला भाव वाढवून मिळण्यासाठी चळवळीला सुरूवात केली. रस्ता रोको आंदोलन करून सरकारला नाफडे खरेदी विक्री संस्थेमार्फत कांदा खरेदीची योजना सुरू करण्यास भाग पडले व आंदोलन मागे घेतले.

२) ऊस आंदोलन :

ऊस प्रतिटन ३००/- रू. भाव मिळावा म्हणून निफाड येथे आंदोलन केले होते. तर सध्या स्वाभीमानी शेतकरी संघटनेने ऊसाचा पहिला हप्ता ३०००/- रू. असावा म्हणून खासदार शेट्टी यांनी बारामतीत कृषीमंत्र्यांच्या गावात तर २०१३ मध्ये मुख्यमंत्र्यांच्या गावात कऱ्हाडला आंदोलन केले. हिंसक वळण मिळाल्याने बऱ्याच वाहनांची मोडतोड जाळपोळ झाली.

३) तंबाखू आंदोलन :

या आंदोलनाचे कारण तंबाखू उत्पादन शेतकऱ्याचे व्यापाराकडून होणाऱ्या शोषणा विरूद्ध हे आंदोलन होते. या आंदोलनात देखील गोळीबार अश्रूधूर यासारख्या हिंसक मार्गाचा अवलंब झाला तरी देखील शेतकऱ्यांनी आपले आंदोलन चालूच ठेवले. कर्नाटक सरकारने तंबाखू खेरदी विक्री प्रक्रिया पार पाडण्यासाठी सहकारी संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे हे आंदोलन मागे घेण्यात आले.

४) कापूस आंदोलन :

या आंदोलनात कृत्रिम कपड्यांच्या वापरावर बंदी घालून कापसाला योग्य भाव मिळावा अशी मागणी करण्यात आली. हे आंदोलन विदर्भ व मराठवाडा येथील काही भागात घडून आले. रास्ता रोकोच्या मार्गाचाही आंदोलकाने वापर केला. शेवटी हे आंदोलन यशस्वी ठरले.

५) दूध आंदोलन :

दुधाचे भाव वाढवून मिळण्यासाठी अनेक वेळा आंदोलकांनी आंदोलने केली. या आंदोलनाच्या यशस्वीतेसाठी शेतकरी संघटनेकडून बरेच प्रयत्न करण्यात आले.

६) कर्जमुक्ती आंदोलन :

१९८८-८९ शेती मालाला रास्त दर दिला जात नाही. असा तुटीचा धंदा करण्यासाठी शासन जे कर्ज देते त्याची परतफेड होणे जवळजवळ अशक्यच असते. म्हणून शेतकऱ्यांनी या कर्जातून नादारी घोषित करून मुक्त व्हावे असा विचार कर्जमुक्ती आंदोलनामागे होता. हे आंदोलन शेतकऱ्यांकडून कर्जमाफीचा अर्ज भरून घेऊन न्यायालयात करण्यात आले व कर्ज वसुलीवर स्थगिती आणली ही न्यायालयीन लढाई दिर्घकाळ चालली. दरम्यान केंद्रशासन आणि राज्यशासनाने कर्जमाफीची योजना सुरू केली. त्यामुळे कर्जमुक्ती आंदोलन स्थगित करण्यात आले.

७) स्वाभिमानी शेतकरी संघटना :

खासदार राजू शेट्टी यांनी ऊस उत्पादक आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या कच्च्या मालाला योग्य दर मिळावा यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना स्थापन केली. महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा व सोलापूर इ. जिल्हातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्च भागेल अशा स्वरूपाचा ऊसाला दर मिळाला पाहिजे यासाठी चळवळीच्या माध्यमातून प्रयत्न केला.

महाराष्ट्रातील शेतकरी ऊस आणि दूध उत्पादन करून आपले सर्वसाधारण जीवन जगतो. त्यासाठी त्यांना जगण्याचा अधिकार मिळावा आणि उत्पादन खर्च भागून कर्जमुक्त होता यावे यासाठी मोठी शेतकऱ्यांची चळवळ उभारली यांचाच परिणाम म्हणून गेल्या पाच-सहा वर्षामध्ये दूध व ऊसाच्या किंमतीमध्ये वाढ होत गेली आहे.

अशा पद्धतीने शेतकऱ्यांच्या चळवळी झाल्याचे दिसून येते.

१.३.६.३ जातींच्या न्यायासाठी चळवळी :

वेगवेगळ्या जातींमध्ये आपल्यावर होणाऱ्या अन्याया विरोधात, शोषणाबाबत चळवळी उभ्या राहिल्या. त्यापुढील प्रमाणे -

१) कुणबी जात संघटना :

कुणबी जातीस चाळीस व पन्नासीच्या दशकात ब्रिटीश सरकारने नोकरी व शिक्षण याक्षेत्रात आरक्षण ठेवले होते. (१९४० ते १९५९) साठीच्या दशकापासून या दोन क्षेत्रातील आरक्षण महाराष्ट्र शासनाने रद्द केले. त्यामुळे कुणबी समाज व नेते काँग्रेस विरोधात संघटित होत गेले.

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर मराठा-कुणबी ही अस्मिता भक्कम झाली. त्याआधी मराठा-कुणबी ही अस्मिता संयुक्त महाराष्ट्रा आंदोलन व ब्राह्मणेत्तर चळवळीत घडली. मात्र मराठा-कुणबी अस्मितेला राजकारण्याची घडी १९६० नंतर पडली. या अस्मितेमध्ये मराठा ही एक अस्मिता होती तर कुणबी ही दुसरी अस्मिता होती. मंडल आयोगाने मराठा व कुणबी असे विभाजन केले. मंडल आयोगाने मराठा जातीचा समावेश ओबीसी मध्ये केला नाही. मात्र कुणबी समाजाचा समावेश ओबीसीमध्ये केला. त्यामुळे मराठा-कुणबी अस्मिता फुटली गेली. या अस्मितेचे दोन तुकडे पडले आणि त्यातूनच मराठा सेवा संघ, मराठा महासंघ, छावा अशा संघटना निर्माण झाल्या. रत्नागिरी जिल्ह्यात तिल्लोरी कुजबी समाज संघ स्थापन झाला. ठाणे येथे कुणबी समाज सेवा संघ स्थापन झाला, कुणबी सेना संघटना स्थापन झाली. व सध्या मराठा जातीला आरक्षण मिळावे म्हणून संघटनेची चळवळ सध्या वाढली आहे.

२) माळी संघटना :

महाराष्ट्र माळी समाज महासंघ व महाराष्ट्र राज्य माळी समाज कल्याण महासंघ या दोन माळी समाजातील जात संघटना आहेत. महाराष्ट्र माळी समाज महासंघाची स्थापना २६ जानेवारी १९८१ ला पुणे येथे झाली. ८० च्या दशकात यांना कोणी स्पर्धक नव्हते. मात्र ९० च्या दशकात महात्मा फुले समता परिषद व महाराष्ट्र राज्य माळी समाज कल्याण महासंघ अमरावती या दोन संघटना स्पर्धक म्हणून पुढे आल्या. या

संघटनांनी ओबीसीसाठी शैक्षणिक क्षेत्रात राखीव जागा, खाजगी क्षेत्रात राखीव जागा व माळी समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती असे कार्यक्रम ह्या संघटनांनी राबविले.

३) धनगर समाजातील जात संघटना :

साठीच्या दशकापासून धनगर समाजातून राजकी चळवळ उदयास आली. धनगर समाजातील जात संघटनांनी समाजांतर्गत राजकीय चळवळ गतिमान केली. यांची उदाहरणे म्हणजे धनगर समाजोन्मती मंडळ, धनगर समाज महासंघ, मल्हार सेना, अहिल्या महिला संघ, धनगर सेना, धनगर समाज कर्मचारी संघटना, शिवमल्हार सेना, यशवंत सेना, धनगर युवक मंडळ इ.

संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. त्याच वर्षी खुद्द यशवंतराव चव्हाण यांच्या जिल्ह्यात धनगर समाज उन्नती मंडळ १९६१ ला या जात संघटनेची स्थापना झाली.

धनगर समाजाचे राजकीय व आर्थिक हितसंबंध पुढे रेटण्यासाठी मोर्चा व आंदोलने या मार्गाचा वापर केला. १९६१-६२ साली महाराष्ट्र शासनाच्या विरोधात धनगर समाजोन्नती मंडळाने आंदोलन केले होते. लोकसंख्येच्या प्रमाणात सत्तेत वाटा मिळावा, मेंढपाळ लोकांवरील अन्याय थांबवणे, मेंढपाळ्यांना चराऊ कुरणे खुली करावी, अनूसूचित जमातीमध्ये धनगरांचा समावेश करावा, स्वतंत्र महामंडळ स्थापन करावे या मागण्या शासनाकडे केल्या. शिवाय अहिल्यादेवी होळकर यांचे नांव विद्यापीठास द्यावे अशी मागणी करण्यात आली.

४) तेली जात संघटनांच्या चळवळी :

तेली समाजातील जात संघटन साठीच्या दशकाच्या शेवटी स्थापन झाली. ही संघटना विशिष्ट अशा राजकीय संदर्भात स्थापन झाली आहे. अखिल भारतीय तेली समाज महासभा या संघटनेने सत्ता, अधिकार व प्रतिष्ठा या मुद्यांचा शोध सुरू केला. महाराष्ट्रामध्ये तेली ही जात इतर मागासवर्गीय गटामध्ये आहे. माळी, धनगर व वंजारी समाजानंतर तेली हा चौथा ओबीसीमधील मोठा गट आहे. ही जात विदर्भ विभागात संख्यात्मक दृष्ट्या प्रभावी ठरणारी आहे. विदर्भात तेला समाज महासंघ या संघटनेची स्थापना २६ नोव्हेंबर १९९४ रोजी झाली. या संघटनेचे नेते मधुकर वाघमारे व विजय बाभुळकर यांनी १९९२ पासून तेली समाजात काम सुरू केले होते.

विदर्भ तेली समाज महासंघाला ओबीसी ही अस्मिता मंडळ आयोगाच्या शिफारशींमधून आली. मंडल आयोगाचा लाभ तेली समाजाला मिळावा, त्यांचे हितसंबंध जपण्यासाठी संघटना ओबीसी अस्मितेच्या चौकटीत अनेक मुद्दे उठवते. मे १९९४ मध्ये विदर्भाच्या नऊ जिल्ह्यांत मंडल आयोगाच्या मागणीसाठी आंदोलन केले होते.

विदर्भ तेली महासंघांने शिष्यवृत्ती दुप्पट करा, ओबीसी यादीत इतरांचा समावेश करू नये, सदुंबरे येथे संत संताजी जगनाडे महाराज यांचे राष्ट्रीय स्मारक करावे. जातनिहाय जनगणना करण्यात यावी असे मुद्दे मांडले. तसेच आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात यावी, ओबीसी वित्त व विकास महामंडळाच्या अनुदानात वाढ करण्यात यावी. या मागण्या संघटनेने केल्या.

५) दलित चळवळ :

दलित चळवळींची संकल्पना व्यापक आहे. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणीकदृष्ट्या वंचित असलेल्या व शोषणाला बळी पडलेल्या व्यक्ती किंवा समाजाचा समावेश करता येईल.

याबाबत घनश्याम शहा म्हणतात समानतेच्या शोधासाठी दलितांनी धार्मिक व सामाजिक सुधारणेची चळवळ केली. तसेच माणसाचे माणूस म्हणून असलेले नैसर्गिक मूल्य प्रस्थापित करणारी चळवळ म्हणजे दलित चळवळ होय.

बाबूराव बागल : यांच्या मते दलित हा अन्याय अत्याचार व पिळवणुकी विरूद्ध न्याय मागणारा वर्ग आहे. तसेच तो स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि सम्यक क्रांतीचा पुरस्कर्ता आहे.

✢ दलित चळवळीच्या उदयाची कारणे :

१) दलितांवर होणारे अन्याय, अत्याचार :

पूर्वी दलितांवर अनेक प्रकारचे जुलूम केले जात होते. समाजात माणूस म्हणून जगण्याची परिस्थिती नव्हती. मानवी हक्कांपासून वंचित असणारा हा समाज सार्वजनिक जीवनातूनही वंचित होता. दुजाभावाची वागणूक मिळत होती. सार्वजनिक विहीरी, मंदिरे या ठिकाणी जाण्यास मज्जाव होता. या सर्व अन्यायकारक घटनाविरोधी त्यांनी आपली चळवळ उभा केली.

२) वंचिततेची भावना :

प्राचीन काळापासून अस्पृश्यांना सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक व धार्मिक हक्कापासून वंचित ठेवले गेले होते. माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देखील हिरावून घेतला होता. समाजात निम्मस्तरीय वागणूक मिळत होती. एकूण समाजात सर्वांगदृष्ट्या वंचित ठेवल्याने समाजात माणून म्हणून जगण्यासाठी त्यांनी ही चळवळ उभा केली.

३) शैक्षणिक स्थिती :

दलितांना शिक्षणाची संधी नव्हती. शाळेत प्रवेश नव्हता. समाजातील वेद, संस्कृत सुभाषिते ऐकण्यास मज्जाव होता. त्यामुळे दिर्घकाळ या समाजाला निरक्षर राहावे लागले. अज्ञानात, अंधःकारातून जीवनाची वाटचाल करताना शिक्षण ही महत्त्वाची बाब आहे. हे लक्षात आल्याने ते शिक्षण मिळालेचे पाहिजे या साठी त्यांनी आपली चळवळ चालू ठेवली.

४) धार्मिक स्थिती :

पूर्वी दलितांना सार्वजनिक ठिकाणी, पाणवठे, तळी तसेच देवालयात प्रवेश नव्हता. देवळात प्रवेश केल्यास विटाळ होतो म्हणणारे उच्च वर्णीय यांनी त्यांना धार्मिक, तीर्थ स्थळी कुठेही प्रवेश दिला नाही. म्हणून तर त्यांनी या गोष्टींला विरोध करून नाशिकच्या काळाराम मंदिरात सामुदायिकरित्या प्रवेश केला. त्यासाठी त्यांना आपली चळवळ उभा करावी लागली.

५) दुष्ट प्रथा परंपरांचे निर्मूलन :

दलित समाजावर पूर्वापार परंपरेने काही अनिष्ट प्रथा चालत आल्या होत्या. यादुष्ट चक्रातून बाहेर पडण्यासाठी व अस्पृश्यता हा कलंक नाहीसा करण्यासाठी आपल्या समाजात दलित चळवळ उभा राहिली.

अशा वेगवेगळ्या कारणांनी दलित चळवळ उभा राहिली व त्या चळवळीतून स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक, न्याय या मानवी मूल्यांची प्राप्ती करून दिली. त्यांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय परिस्थिती सुधारली. त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली. दलित चळवळीने भारतीय समाजात क्रांतीकारक बदल घडवून आणले म्हणून तो भारतीय इतिहासातील एक महत्त्वाची चळवळ ठरली.

✢ महाडच्या सत्याग्रह :

दलित चळवळीमध्ये महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाला विशेष महत्व आहे. हा सत्याग्रह म्हणजे मानवी समाजात समानता घडवून आणणारा समतेचा सागर होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सार्वजनिक जीवनाची सुरूवात २० मार्च १९२७ च्या महाड येथे भरलेल्या बहिष्कृत परिषदेपासून झाली. ते सामाजिक समतेचे पुरस्कर्ते होते. त्यांना भारतीय समाजातील जाती व्यवस्थेचे उच्चाटन करावयाचे होते. हिंदू कोडबील, धर्मात्तराची घोषणा, मनुस्मृतीचे दहन, काळाराम मंदीराचा सत्याग्रह, पुण्यातील पार्वतीमंदीराचा सत्याग्रह एवढेच नव्हे तर राज्य घटनेचे शिल्पकार झाले. दलितोद्धारासाठी अस्पृश्यता निर्मूलनासाठी त्यांनी सर्वोतेपरी प्रयत्न केले.

डॉ. आंबेडकर यांनी आपल्या कार्याची सुरूवात महाडच्या चवदार तळ्याच्या समता संगरापासून केली. निसर्गाची देणगी असलेल्या पाण्यावरची सवर्णांची बंदी हटवून सर्वासाठी ते खुले करून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह हजारोंच्या उपस्थितीत घडवून आणला. डॉ. आंबेडकर यांनी महाड येथे दुसरी परिषद घेतली या परिषेत हजारोच्या संख्येने दलितांनी सक्रिय सहभाग घेतला. या परिषदेचे अध्यक्ष ते स्वतःच होते. महाड नगरपालिकेने ठराव घेवून चवदार तळे खुले केल्याचा ठराव मागे घेतला. म्हणून डॉ. आंबेडकरांनी या ठरावाच्या विरोधात दहा हजार अनुयायासोबत चवदार तळ्यात उतरून पाणी प्राशन केले आणि आपला सत्याग्रह यशस्वी करून ते विश्रामगृहाकडे गेले. हे पाहून सवर्ण हिंदूनी सत्याग्रहीवर दगडफेक करून त्यांची डोकी फोडली. ही गोष्ट डॉ. बाबासाहेबांना समजली. तेंव्हा त्यांनी तेथे जावून अनुयायांना शांत केले.

याच महाड परिषदेत आणखी एक महत्वाची घटना घडली मनुस्मृती हा हिंदू धर्माचा आधार धर्मग्रंथ म्हणून मानाला जातो. हा धर्मग्रंथ विषमतेचा आणि अस्पृश्यतेच्या पुरस्कार करणारा असल्यामुळे या ग्रंथामुळे दलितांवर अन्याय अत्याचार झाले. या ग्रंथाचे महाड येथे दहन केले.

✢ दलित पँथरची चळवळ :

दलित पँथरची चळवळ ही दलितांवर होणाऱ्या अन्याय अत्याचारा विरूद्धची प्रतिक्रियाच होती. स्वातंत्र्यानंतर अनेक दलित तरूणांनी संघटना स्थापन करून आंदोलने केली. मोर्चे काढले. दलित पँथरमुळे चळवळ गतिमान झाली.

९ जुलै १९७२ रोजी नामदेव ढसाळ, राजा ढाले, ज.वी.पवार व इतर काही तरूण दलित नेते यांनी दलित पँथरची स्थापना केली. जातीव्यवस्था, दलितावरील अत्याचार विरूद्ध चीड यातून पँथरचा जन्म झाला. एकीकडे दलितावरील अत्याचार, अन्याय वाढत होते. तर दुसरीकडे दलित तरूण शिक्षण, विज्ञान, कायदा आणि आंबेडकरांचे तत्वज्ञान आत्मसात करीत होते. दलितांच्या समोर असंख्य प्रश्न होते. त्यामुळे ते एकत्र आले संघर्ष केला.

महाराष्ट्रातील दलित तरूण शहरात संघटित होत होते. म्हणून एखादी प्रभावी संघटना निर्माण होणे अपरिहार्यच होते ही संघटना म्हणजे दलित पँथर चळवळ होय.

१.३.६.४ पारंपारिक चळवळी (Ethnicity Movements) **:**

भारतीय समाजात काही चळवळी अशा झाल्या की त्या पारंपारिक चालत आल्या आणि त्या चळवळी ज्या ज्या समाजामध्ये झाल्या त्या समाजात परिवर्तन झालेले दिसून येते. अशा चळवळी म्हणजे आदिवासी चळवळी, पर्यावरण चळवळी हाये.

१) आदिवासी चळवळी :

भारत देशात आदिवासींची संख्या अधिक आहे. आर्य लोक भारतात येण्यापूर्वी पासून टोळी जीवनाने आदिवासी लोक भारतात आले व भारतातच वास्त्यव्य केले. या आदिवासींना गिरीजन, भूमिजन, अरण्यक, प्राणीपुजक, जंगलचाराजा या नावाने ओळखले गेले. डॉ. घुर्ये यांनी त्यांना मागासलेले हिंदू म्हटले तर भारतीय राज्यघटनेत आदिवासींना अनुसूचित जमाती म्हटले आहे. अशा या आदिवासीचा लेखन कलेचा अभाव, बोलीभाषेचा प्रश्न व निरक्षरता यामुळे प्रगत समाजातील सावकार, जमीनदार, ठेकेदार यांनी त्यांचे शोषण केले. वेठबिगारी पद्धतीने कष्ट करून घेतले. त्यामुळे आदिवासीच्यात काही मंडळी शिकली सवरली व ठक्कर बाप्पा सारख्या माणसांनी त्यांच्या न्याय हक्कासाठी हाक मारली.

आदिवासांच्या चळवळी ह्या वेठबिगारी पद्धती नाहीशी करणे, शेतमजूरांत काम देणे, सामान्य माणसाप्रमाणे आदिवासींना वागणूक मिळावी, आदिवासींच्या जमिनी बळकाविणे बंद करावे, जंगलबाबतचे हक्क त्यांना मिळावेत आदिवासींवर होणारे अन्याय, अत्याचार, जुलूम, शोषण, कर्ज याबाबत चळवळी उभ्या केल्या. जमिन विषयक पारंपारिक अधिकार मिळावेत. या विविध कारणासाठी आदिवासींनी लढा दिला. तर सध्या पर्यावरणाच्या रक्षणासाठी व संवर्धनासाठी आदिवासींच्या चळवळी चालू आहेत.

१) बिरसा मुंडा चळवळ :

मुंडा जमातीतील आदिवासींच्या जमिनी व्यापारी, महाजन, जमीनदार यांच्या जमिनी हडप करण्याच्या मार्गावर असल्याने शेतमालक हेच मजूर झाले. मुंडा, उराव व कोळा जमातीत अशाप्रकारचे शोषण सुरू झाले. आदिवासीवर होणाऱ्या शोषणाला विरोध म्हणून इंग्रजांच्या विरोधात चळवळी सुरू झाल्या. ब्रिटीश राजवट समाप्त झाली आणि मुंडाचे राज्य आले. अशी बिरसाने घोषणा केली. त्याला अटक झाली. शिक्षा भोगून आल्यावर बिरसाने सेवादलाची स्थापना केली. जमिनदार व ब्रिटीश शासन यांच्या विरोधात पुन्हा उठाव केला. या चळवळीत आदिवासी महिला व बालकांचा समावेश होता.

२) भिल्ल चळवळ :

आदिवासी समाजात भिल्ल चळवळ एक वैशिष्ट्यपूर्ण चळवळ ठरली. भिल्ल लोक महाराष्ट्र, गुजराथ, राजस्थान, मध्यप्रदेशातील सह्याद्री, सातपुडा आणि विंध्य पर्वताजवळ वसलेली आहे. या भिल्ल लोकांच्या जमिनी गुजर जमिनदार लोकांनी हडप केल्या. भिल्ल लोकांच्या गरिबी, दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा, कर्जबाजारीपणामुळे त्यांच्या जमिनी सावकारांच्या ताब्यात गेल्या. त्यामुळे भिल्ल भूमिहीन अल्पभूधारक बनले. सर्व भिल्लांनी एकत्र येऊन गुजर जमिनदारांविरूद्ध बंड पुकारले. शिवाय त्यांच्यावर होणारे अत्याचार, अन्याय, त्यांची होणारी आर्थिक पिळवणूक, भिल्ल स्त्रियांवरील अत्याचार या सर्वांचा राग येऊन भिल्लांनी इंग्रजांच्या विरोधात विद्रोह केला. सरंजामदाराच्या विरोधातही आंदोलने केली.

३) संथाळ चळवळ :

भारतातील सर्व आदिवासी जमातीमध्ये सर्वात जास्त लोकसंख्या असणारी जमात म्हणजे संथाळ होय. झारखंड, बंगाल, बिहार, ओरिसा या राज्यात त्यांचे जास्त अस्तित्व आहे. हे लोक अतिशय धाडसी आहे. त्यांच्या जमिनी इंग्रजांनी घेतल्या त्यामुळे त्यांनी पहिला लढा इंग्रजाविरूद्ध दिला. त्यांचे आर्थिक शोषण झाले. त्यांच्या कोंबड्या, अन्नधान्य, प्राणी व स्त्रियांचे अलंकार सावकार, कर्जाच्या मोबदल्यात घेऊन जात असत. सावकारांच्याघरी वेठबिगारी पद्धतीने रहावे लागे. संथाळांना मालगुजारी पद्धत लागू केली. या पद्धतीमुळे संथाळावर आर्थिक बोजा पडू लागला. त्यामुळे संथाळांनी मालगुजारी पद्धती विरूद्ध व इंग्रजांच्या धोरणा विरूद्ध आपली चळवळ उभा केली.

४) नागा जमातीची चळवळ :

१९४७ नंतर नागा जमातीच्या सामाजिक, राजकीय परिस्थितीतील बदल, नागांच्या स्वतंत्र अस्तित्वाला निर्माण झालेला धोका तसेच नागा टेकड्यांवरील मालकी हक्कावरील गडांतर परिस्थितीमुळे नागा चळवळ सुरू झाली. त्यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला. म्हणून त्यांनी चळवळ उभी केली.

५) मिझो जमातीची चळवळ :

मिझोराममध्ये भाषिक प्रश्न निर्माण झाला. मिझो प्रदेशातील काही जमातींना आपली भाषा आणि हक्क धोक्यात येतील असे वाटू लागले. म्हणून मिझोराम मधील आदिवासींनी आपल्या अस्तित्वासाठी सरकार विरोधी चळवळ केली.

६) खासी जमातीची चळवळ :

मेघालयातील खासी जमातीच्या लोकांनी आपल्या सांस्कृतिक वारसा आणि राजकीय व्यक्तीमत्व अबादित राखण्यासाठी चळवळ उभारली. खासी जमातीच्या लोकांनी समूह नृत्य, धार्मिक सण समारंभ साजरे करून चळवळीचे ऐक्य वाढविण्याचा प्रयत्न केला. बाहेरच्या प्रदेशातील व्यापारी व धंदे करणाऱ्या लोकांशी संपर्क वाढविला. आदिवासींच्या जमिनी हडप करण्याचा प्रयत्न सुरू केला. याला प्रतिबंध करण्यासाठी चळवळ उभा केली.

१.३.६.५ पर्यावरण चळवळ :

जे लोक जंगलाशी निगडीत असतात व त्यावर त्यांचे जीवनमान अवलंबून असते. त्याबरोबर एक प्रकारचा संघर्ष चालू असतो. त्या संघर्षालाच पर्यावरण चळवळ असे म्हणतात. जंगलाशी संबंधित असणाऱ्या चळवळींना आदिवासींच्या चळवळी असेही संबोधले जाते.

चिपको आंदोलन व नर्मदा आंदोलनाबाबत बावीस्कर यांनी अभ्यास केला. १९३० मध्ये जंगलवासींयानी जंगलातले अतिक्रमण या मुद्यावरून फॉरेस्ट डिपार्टमेंटबरोबर सत्याग्रह केला होता. याच पद्धतीने स्वातंत्र्योत्तर काळात संघर्ष होत गेला.

पर्यावरण चळवळीतल्या सर्वात महत्वाच्या मानला जाणाऱ्या चिपकोबाबत रामचंद्र गुहा आणि नर्मदा आंदोलनाबाबत अमिता बावीस्कर यांनी अभ्यास केला. बाविस्कर म्हणतात नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करण्याच्या क्षमतेने गेल्या पाच दशकातील सुधारणेचे धोरण नाकारले आहे. त्याबाबत ते म्हणतात – जेंव्हा समाजाकडून वनांचा पारंपारिक पद्धतीने उपयोग करून घेतला जात होता. तेंव्हा स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विकासाचे मॉडेल मांडण्यात आले. नव्याने स्वतंत्र झालेल्या राज्यांच्या विकास आराखड्यानुसार वनांचे व्यवस्थापन करण्याच्या नवीन धोरणामुळे तणाव वाढला. वनवासी आणि वनविभाग यांच्यात न संपणाऱ्या संघर्षाला यामुळे सुरूवात झाली.

भारतातील पर्यावरणवादी चळवळ म्हणजे नैसर्गिक स्त्रोतांचे अर्थकारण आणि बाजारीकरण आधारित विकास तंत्राला विरोध करण्याच्या प्रयत्नांची अभिव्यक्ती आहे. असे शिवा व सेठी यांनी म्हटले आहे.

हर्ष सेठी यांनी पर्यावरणविषयक संघर्षाची पाच वर्गामध्ये विभागणी केली आहे.

१) जंगलविषयक

२) जमीन विषयक

३) मोठ्या धरणांच्या विरोधात.

४) औद्योगिकरणामुळे होणारे प्रदूषणाच्या विरोधात.

५) सागरी स्त्रोतांच्या अतिरिक्त वापराच्या विरोधात.

पर्यावरणाचा समतोल बिघडला की प्रदूषण निर्माण होते. त्याचा मानवी जीवनावर विघातक परिणाम होतो. याबाबत इ.स. १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे पर्यावरणावर आधारित परिषद भरविली. यामध्ये पर्यावरण कसे वाचवावे, जतन करावे, हानी होऊ देऊ नये या अनुषंगाने विचार विनिमय झाले. ही चळवळ हरितक्रांतीमुळे जगभर पसरली.

मानवाने चालविलेली जंगलतोड, पाणी अडवून मोठमोठी धरणे बांधणे, दळणवळण वाहतूक साधने वाढली असून धूर सोडत जातात. प्लॅस्टीक पिशव्या कचरा याचा होणारा दुरूपयोग पाण्यात होणारे विसर्जन यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडते प्रदूषण वाढते.

आदिवासी भागात पेपरमीलचे मालक वारेमाप अवैद्य मार्गाने जंगलतोड करीत आहेत. त्याचा विपरीत परिणाम आदिवासींच्या जीवनावर होत आहे. हे दृश्य पाहूनच सुंदरलाल बहुगुणा, बाबा आमटे, मेघा पाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलने झाली. यातील विशेष उल्लेखनिय आंदोलने म्हणजे चिपको आंदोलन टेहरी बांध आंदोलने, नर्मदाबचाव आंदोलने ही महत्वाची आंदोलने होत.

चिपको आंदोलनात आदिवासी महिलांचा सहभाग मोठा होता. वृक्षतोड करायला आलेल्या ठेकेदारांना त्यांनी धडा शिकविला. ते आले की झाडाला चिकटून बसायचे. आणि आधी आम्हांला तोडा मग झाडांवर घाव घाला. असे म्हणत झाडाबरोबर बसत त्यालाच चिपको आंदोलन असे म्हटले.

याप्रमाणेच धरणाबाबत म्हणजेच भाक्रा-नानगल, हिराकुंड, कोयना धरण, नर्मदा सरोवर या धरणांच्या बांधकामातून शेतीला पाणीपुरवठा होईल असे सांगितले. परंतु त्यात गावची गाव बुडणार होती. तेथील लोक विस्थापित होणार म्हणून मेघा पाटकर, बाबा आमटे यांनी चळवळ उभा केली. अशी आंदोलने महराष्ट्र, आंध्र, मध्यप्रदेश, भोपाळ पट्टणम यासाठी झाली आहे.

याबरोबरच वायू प्रदुषणही होते. भोपाळला झालेली वायू गळती, पंढरपूरजवळील दाऊ कंपनीचा गॅस प्रकल्प, एन्रॉन सारखे प्रकल्प याला विरोध करण्यासाठीही मोठ्या चळवळी उभ्या केल्या.

तसेच ध्वनी प्रदुषण सध्या मोठ्या प्रमाणात होत आहे. ते म्हणजे गणेशोत्सव, दुर्गादेवी, धार्मिक स्थळे, स्पीकर इ. नी नियमित डेसिंबल्सपेक्षा जास्त आवाज देऊन ध्वनी प्रदूषण करतात. त्यामुळे बरेचजणांना बहिरत्व येते. आजारी, वयोवृद्ध, बाळंत स्त्रियांना त्या आवाजाचा त्रास होतो. दिवाळीतील फटाके, लग्नातल्या बॅडबाजा यामुळे आवाजाचे प्रदूषण होते. वायू व ध्वनी प्रदूषण घडून येते. सध्यातर या गोष्टीत वाढ होत असून प्रदूषण वाढते आहे. म्हणून तर आज फटाके मुक्त दिवाळी, लग्नातील बँडवर बॅन आणणे अशा चळवळी चालू आहे.

१.३.६.६ लिंगभाव चळवळ (Gender Movement) :

निसर्गानेच स्त्री आणि पुरूष हे दोन लिंग वेगवेगळे निर्माण केले आहेत. तरी ही समाज पुरूष श्रेष्ठ व स्त्रीला कमी लेखतो. याचा अभ्यास वेगवेगळ्या शास्त्रज्ञांनी केला. स्त्रियांनी देखील आपली क्षमता असल्याचे दर्शवून दिले आहे. काही वेळा त्यांना स्वतःच्या हक्कांसाठी चळवळी उभ्या कराव्या लागल्या.

✢ स्त्री चळवळीचे वर्गीकरण :

स्त्रियांची चळवळ म्हणजे समानता आणि स्वातंत्र्य हे समान ध्येय मिळविण्यासाठी केलेला संघटित प्रयत्न आणि स्त्रियांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या निर्णायक बाबींविषयी संवेदनाशिलता गृहित धरलेली असते.

ओमवेद यांनी स्त्रियांच्या चळवळीचे दोन प्रकार सांगितले. १) स्त्रियांच्या समानेच्या चळवळी २) स्त्रियांचा मुक्तीच्या चळवळी

याना एव्हरेट यांनी आदर्शवादावर वर्गीकरण केले. १) स्त्रिया राजकारणात ठसा उमठवू शकतात असा दावा करणारी सामुदायिक स्त्रीत्वाची चळवळ. २) स्त्रिया या पुरूषांच्या बरोबरीने असल्यामुळे पुरूषांना मिळालेले हक्क स्त्रियांच्या चळवळीचे वर्गीकरण करतात.

भारतातील स्त्रियांच्या चळवळीचे काळानुरूप प्रकार पडतात ते म्हणजे – १) स्वातंत्र्याच्या चळवळीच्या वेळची सामाजिक सुधारणेची चळवळ. २) १९४७ ते १९७५ या काळातील चळवळी. ३) आंतरराष्ट्रीय स्त्री दशकाच्या दरम्यान आणि नंतर निर्माण झालेल्या चळवळी. त्यापुढील प्रमाणे –

१) सामाजिक सुधारणेच्या चळवळी आणि स्त्रिया :

राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, महादेव गोविंद रानडे, बेहरामजी मलबारी यांनी तत्कालीन धार्मिक व सामाजिक जुलमी रितीरिवाजाविरूद्ध आवाज उठविला. त्यामुळे इंग्रज सरकारने काही ठराविक कायदे केले ते म्हणजे सतीची प्रथा बंद केली, स्त्रियांच्या पुनर्विहाला संमती, बालविवाहाची पद्धत बंद केली. मुलींच्या शिक्षणाबाबत प्रसार केला इ.

२) स्वातंत्र्यसंग्राम आणि स्त्रिया :

कमलदेवी चट्टोपाध्याय, अपर्णा बसू, उमा राव आणि मीरा देवी आणि इतर यांनी स्वातंत्र्य संग्रामातील स्त्रियांच्या भूमिकेचा अभ्यास केला. स्त्रियांना समाजातील गृहिणींची भूमिका शाबूत ठेवून गांधीजींच्या आदर्शवादाने स्त्रियांना सार्वजनिक जीवनात भाग घेणे सोपे केले. तसेच स्त्रियांना लढण्यासाठी एकत्र गोळा केल्यामुळे स्त्रियांचा स्वातंत्रसंग्रामातील सहभाग सोपा झाला. सुभाषचंद्र बोसयांनी सुद्धा महिला राष्ट्रीय संघ नावाची संघटना स्थापन केल्यामुळे स्त्रियांना स्वातंत्र्य संग्रामामध्ये सक्रिय सहभाग घेता आला.

३) लोकांच्या चळवळी आणि स्त्रिया :

लोकांनी ज्या विविध चळवळी केल्या त्यात स्त्रियांचा सहभाग हा आहेच. स्त्रियांनी सामाजिक आणि राजकीय चळवळींमध्ये वैशिष्ट्यपूर्ण भूमिका बजावली आहे.

४) स्त्री सुधारणावादी चळवळी :

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात अनेक समाज सुधारकांच्या प्रयत्नांनी स्त्रियांच्या समस्यांना वाचा फोडली गेली. स्त्रियांवरील होणारे अन्याय व लादली जाणारी बंधने या विरूद्ध बंडाचे निशाण रोवले. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, कर्वे, न्यायमुर्ती रानडे, लोकहितवादी, पंडिता रमाबाई या सारख्या समाजसुधारकांनी स्त्रीच्या मानेवरची जू काढून टाकली.

पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. त्या शाळेत सावित्रीबाई पहिली स्त्री शिक्षिका म्हणून काम करीत होत्या. स्त्रियांच्या उन्नतीसाठी स्त्रिया प्रयत्न करू लागल्या. आनंदीबाई जोशी, रमाबाई रानडे, पंडिता रमाबाई यांनी महिलांच्या परिषदा आयोजित करून त्यांच्या प्रश्नांची जाणीव करून दिली.

१९३२ च्या सविनयम कायदे भंगाच्या लढ्यात हजारो स्त्रियांनी सहभाग घेतला होता. १९४२ च्या लढ्यात महिला सहभागी झाल्या. कर्वे यांनी महिला विद्यापीठाची स्थापना १९१६ मध्ये केली.

५) स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री चळवळ :

स्त्रियांनी स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी एकत्र येऊन केलेले प्रयत्न म्हणजे स्त्री चळवळ होय. वैदिक काळापासून स्त्रियांना आपल्या हक्कांसाठी चळवळ ही करावीच लागली. १९७५ हे आंतरराष्ट्रीय वर्ष जाहीर झाले. इ.स. १९८० ते १९९० या काळखंडात लिंगभेदावर अभ्यास केला. महिलांवर झालेल्या लिखाणातून महिलांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय लढा दिल्याचे दर्शविले आहे. दारूची दुकाने बंद करण्यासाठी गावोगावी महिलांनी चळवळ उभा केली. शिक्षणाबरोबरच स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य मिळावे व स्त्रीला सक्षम होता यावे यासाठी स्त्री मुक्ती चळवळ निर्माण झाली.

१९८० मध्ये नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठाने निरंतर शिक्षण योजनेअंतर्गत महिलांची परिषद भरविली व त्यात अत्याचार, अन्यायाविरूद्ध आवाज उठविला. १९८१ ला महिला आयोग स्थापन करून स्त्री सक्षमीकरणाचे उद्दिष्ट ठेवून चळवळी उभ्या केल्या.

१९७५ ला मेक्सिको येथे पहिली महिला परिषद भरली तर कोपनहेगन येथे दुसरी भरली. १९८५ ला तिसरी नैरोबी येथे परिषद भरली. १९९४ ला महिला धोरण ठरले. २००१ च्या सुधारित महिला धोरणात महिलांचे संरक्षण, ग्रामसभेत सहभाग, महिला सक्षमीकरण, स्वंयसाहाय्यता गट समावेश केला.

अशा रितीने महिलासक्षमीकरणाकरीता महिला चळवळी उभ्या राहिल्या.

१.३.६ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :

✢ एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) कोणत्या चळवळीला कामगार चळवळ म्हणतात?

२) शेतकरी चळवळ सुरूवातीला कोणाच्या विरोधात उभा केली?

३) जातींच्या न्यायासाठी कोणकोणत्या चळवळी उभ्या राहिल्या?

४) पारंपारिक चळवळी कोणकोणत्या आहेत?

५) पर्यावरण चळवळ कशाशी निगडीत आहे?

१.५ सारांश :

या घटकात आपणाला भारतातील सामाजिक चळवळी कशा झाल्या व त्या कोणकोणत्या आहेत याचा अभ्यास झाला. त्या चळवळींचे महत्व त्याचे प्रकार व चळवळींची कारणे कोणकोणती आहेत याची माहिती मिळाली. कामगार चळवळ निर्माण होण्यापाठीमागची कारणे तसेच शेतकरी चळवळ कशी उभा राहिली, पारंपारिक चळवळी, पर्यावरण चळवळी व लिंगभाव चळवळी या विषयक सखोल माहिती मिळाली. त्यामुळे समाज आपल्या न्याय हक्कासाठी चळवळी कशा उभा करतो हे यातून दिसून येते.

१.६ सरावासाठी स्वाध्याय :

अ) पुढील प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा.

१) सामाजिक चळवळी म्हणजे काय ते सांगुन चळवळीचे महत्व सांगा.

२) सामाजिक चळवळींची कारणे विशद करा.

३) शेतकरी चळवळ सविस्तर माहिती द्या.

४) लिंगभाव चळवळीबाबत माहिती द्या.

५) पारंपारिक चळवळी विशद करा.

ब) टिपा लिहा.

अ) शेतकरी चळवळ

ब) पर्यावरण चळवळ

क) पारंपारिक चळवळ

ड) कामगार चळवळ

इ) लिंगभाव चळवळ

१.७ क्षेत्रीय कार्य :

१) सामाजिक चळवळींचा अभ्यास केल्यानंतर तुमच्या आसपास असणाऱ्या एखाद्या चळवळींच्या लोकांना भेट द्या.

२) आपल्या सभोवती असणाऱ्या समाजाला सामाजिक प्रबोधान करा.

३) सामाजिक चळवळीच्या अभ्यासातून काय घेता येईल ते पहा.

४) न्याय हक्कासाठी सामाजिक चळवळीस हातभार लावा.

१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१) जाधव सुलोचना – भारतातील सामाजिक चळवळी, ... प्रकाशन, लातूर. २०१३

२) शहा घनश्याम – भारतातील सामाजिक चळवळी, डायमंड पब्लिकेशन, पुणे – २००८

३) देगावकर एस.जी.देगावकर शैलजा, सामाजिक चळवळी परंपरागत आणि नवीव, साईनाथ प्रकाशन. २००९

४) Singh Yogendra - Indian Sociology, Vistaa Publication, New Delhi. 1986

५) बोबडे प्रकाश – आर्थिक विकास व सामाजिक चळवळी – श्री. मंगेश प्रकाशन – २००७

६) जैन पी.सी. – सामाजिक आंदोलन का समाजशास्त्र – नॅशनल पब्लिशिंग हाऊस, जयपूर २००३

❑❑❑

घटक–१ (ड)

सिद्धांत : संरचनात्मक व कार्यात्मक–मार्क्स व वेबर

घटक संरचना :

१.१ प्रस्तावना

१.२ उद्दिष्टे

१.३ विषय विवेचन

१.३.१ संरचनात्मक व कार्यात्मक

१.३.२ मार्क्सचा सिद्धांत

१.३.३ वेबरचा सिद्धांत

१.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.५ सारांश

१.६ स्वयंअध्यन प्रश्नाची उत्तरे

१.७ सरावासाठी प्रश्न

१.८ क्षेत्रीय कार्य

१.९ अधिक वाचनासाठी पुस्तके.

१.१ प्रस्तावना :

या घटकात सामाजिक चळवळीविषयक कार्ल मार्क्स व वेबर यांचे सिद्धांत अभ्यासणार आहात. हे सिद्धांत समाजात सामाजिक चळवळी कशा निर्माण करतात. किंवा चळवळी निर्माण होतात त्याला सिद्धांत कसे तयार केले जातात याचा अभ्यास होणार आहे. सामाजिक चळवळीच्या उदयाची कारणे, वेगवेगळ्या विचारवंतानी सामाजिक चळवळीविषयी मांडलेले सिद्धांत त्याचा पाया हा संरचनात्मक व कार्यात्मकतेवर उभारलेला आहे. याचा अभ्यास केला जाणार आहे. विशेषतः संरचनात्मक व कार्यात्मकबाबत मार्क्स व वेबरचा सिद्धांत या घटकात अभ्यासला जाणार आहे.

१.२ उद्दिष्टे :

या घटकांचा अभ्यास केल्यामुळे पुढील उद्दिष्टे अभ्यासता येणार आहेत.

- सामाजिक चळवळीबाबत संरचनात्मक व कार्यात्मक सिद्धांत समजून घेणे.
- संरचनात्मक व कार्यात्मक सिद्धांताबाबत मार्क्सची मांडणी अभ्यासणे.
- संरचनात्मक व कार्यात्मक सिद्धांताबाबत वेबरच्या सिद्धांताचा अभ्यास करणे.

१.३ विषय विवेचन :

सामाजिक चळवळी विषयकचे विविध सिद्धांत अभ्यासताना विवेचनाच्या सोयीसाठी मार्क्स व वेबरची संरचनात्मक व कार्यात्मक सिद्धांताबाबत स्वतंत्रपणे अभ्यास केलेला दिसून येईल. समाजशास्त्रीय व सिद्धांताची निर्मिती करतेवेळी अभ्यासकाचा एखाद्या घटनेकडे पाहण्याचा दृष्टीकोन जरून जाणून घ्यावा लागतो.

१.३.१ संरचनात्मक व कार्यात्मक :

संरचनात्मक कार्यात्मक दृष्टीकोनात प्रामुख्याने दोन मूलभूत संकल्पना अंतर्भूत झालेल्या आहेत. एक म्हणजे संरचनात्मक घटकांत एखाद्या घडामोडीला जबाबदार असणाऱ्या घटकांचा शोध घेऊन त्यातील परस्पर संबंध जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो. तर कार्यात्मक घटकात संबंधीत घटकाचे अस्तित्व कायम टिकवून परस्परातील आंतरक्रियेचा क्रियात्मक स्वरूपातून अभ्यास केला जातो. रचना व कार्य या दोन मूलभूत संकल्पना परस्परावलंबी स्वरूपाच्या आहेत.

एखाद्या वस्तूच्या किंवा घटकाच्या अथवा घटनेचा रचनात्मक वैशिष्ट्यांवर त्या वस्तुची किंवा घटनेची क्रियाशिलता अवलंबलेली असते. एवढेच नव्हे तर घटनेच्या क्रियाशिलतेवर त्या घटनेची आंतरीक रचना देखील बदलू शकते व अशा रचनात्मक बदलावर कार्यात्मक स्वरूपाचा बदलही घडून येऊ शकतो.

संरचना व कार्य यांची निश्चित व्याख्या करणे कठीण आहे. अनेक घटकांच्या माध्यमातून संरचना तयार होत असते. या संरचनेत प्रत्येक घटकाला विशिष्ट स्थान प्राप्त झालेले दिसून येते. विशिष्ट सहसंबंध किंवा परस्परीक संबंध निर्माण होत असतात. एवढेच नव्हेतर प्रत्येक घटक विशिष्ट प्रकारची कार्ये करीत असल्याने त्यांच्यात क्रियात्मक स्वरूपाचे संबंध निर्माण होण्यास चालना मिळत जाते.

१.३.२ मार्क्सचे संरचनात्मक कार्यवाद्यांचे योगदान :

संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोनाची संकल्पना ही आधुनिक काळात विकसित झालेली नसून समाजशास्त्रज्ञाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करण्यास जेंव्हा सुरूवात झाली तेंव्हा पासून रचनात्मक कार्यवादासंबंधीचे विवेचन अनेक समाजशास्त्रज्ञानी केलेले आहे. चार्ल्स डार्विन, हर्बर्ट स्पेन्सर, ऑगस्त कॉम्त तसेच कार्ल मार्क्सनी सुद्धा आपले समाजशास्त्रीय विचार मांडले आहेत.

कार्ल मार्क्सनी वर्गीय स्वरूपाची जी समाजव्यवस्था अभ्यासली, आर्थिक घटकांवर आधारित असल्याचे दर्शविले व याच गोष्टींवर अधिक भर दिला. मनुष्य हा कोणत्या ना कोणत्या वर्गाचा सभासद हा असतोच अतिप्राचीन काळी समाज व्यवस्थेत वर्ग अस्तित्वात नव्हते. आपल्या स्वतःच्या गरजा परिपूर्ण करण्यासाठी निसर्गातील योग्य वस्तूंचा व साधनांचा तो वापर करीत असे. परंतु जेंव्हा संपत्तीच्या मालकी हक्कांची जाणीव होऊ लागली. तसतसे परस्परविरोधी शोषक व शोषित, जमिनदार व कूळ, भांडवलदार व कामगार सत्ताधारी व सत्ताहीन, सबल-दुर्बल, श्रीमंत-गरीब, असे अनेक वर्ग निर्माण होऊ लागले. यापैकी प्रत्येक प्रभावशाली अथवा सत्ताधारी वर्गाचा उदय त्यांच्या विरोधी अथवा सत्ताधारी वर्गाचा उदय त्यांच्या विरोधी वर्गातील लोकांच्या शोषणातून झाला. असे मत मार्क्सनी ऐतिहासिक भौतिकवादात केलेले आहे.

समाजातील श्रेष्ठ-कनिष्ठतेचे विभाजन समाजव्यवस्थेत होते. अशा प्रत्येक समाजव्यवस्थेत श्रेष्ठ वर्ग हा कनिष्ठांची पिळवणूक करून आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत असतो.

कार्ल मार्क्सचा सामाजिक स्तरचनेकडे पाहण्याचा दृष्टीकोन वर्गीय हितसंबंधावर आधारलेला होता. मार्क्सनी शोषितांना आवाहन केले होते की पिळवणूकीला तोंड देण्यासाठी व स्वसंरक्षणासाठी आत्मिक बल संघटीत करून उघड संघर्ष करावेत. त्या संघर्षातून वर्ग विहिन समाज व्यवस्था निर्माण करण्याचे स्वप्न त्यांनी निश्चित केले. श्रमाशिवाय कोणत्याही वस्तूंची निर्मिती होत नाही हे सामाजिक सत्य मार्क्सनी विशद केले. परंतू आर्थिक अथवा सांपत्तिक स्थितीवर आधारलेल्या समाजरचनेत श्रमाला योग्य ती सामाजिक व आर्थिक प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न वरीष्ठ वर्ग करू देत नाही व त्यामुळे आर्थिक स्वरूपाचे संघर्षसमाज व्यवस्थेत नेहमीच घडत जातात. असा दावा मार्क्सनी केलेला आहे. औद्योगिक क्रांतीनंतरच्या समाजरचनेत जो आमूलाग्र बदल घडून आला त्या समाज व्यवस्थेचे तार्किक, बौद्धिक व वास्तववादी दृष्टीकोनातून मार्क्सनी आपल्या विचारांची मांडणी केली. समतावादी समजाव्यवस्था निर्माण करण्याच्या महत्वकांक्षेतून समाजशास्त्रीय विचारांची मांडणी मार्क्सनी केली.

आजपर्यंतचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे. असे मार्क्स म्हणतो इतिहासाची भौतिक मिमांसा करताना मार्क्सने उत्पादन व्यवस्थेच्या आधारे मानव इतिहासाची पाच युगे म्हणजेच टप्पे वा कालखंड कल्पिलेली आहेत. ती म्हणजे

१) आदिम युग

२) गुलामगिरीचे युग

३) सरंजामशाहीचे युग

४) भांडवलशाहीचे युग

५) समाजवादी युग

याबाबत मार्क्स म्हणतो सद्याचे युग हे भांडवलशाहीचे युग असून या युगात उद्योगधंदे हा प्रमुख व्यवसाय असून उद्योगधंद्यावर स्वतःची मालकी दाखविणारे उद्योगपती व ज्यांच्याकडून काम करवून घेतले जाते. तो कामगार वर्ग असे दोन वर्ग निर्माण झाले. भांडवलदार वर्गांनी कामगार वर्गाचे केलेले शोषण यामुळेच संघर्ष निर्माण झाले व त्यातूनच 'कामगार क्रांती' उदयास आली.

✢ कामगार क्रांती :

मार्क्सच्या मते भांडवलदार व कामगार वर्ग यांच्यातील वादातून संघर्ष उफाळले. कामगार वर्गाचे शोषण होऊ लागले. या शोषण प्रकारातून कामगारानी एकत्र येऊन संघर्ष सुरू करून स्वतःची एक कामगार क्रांती घडवून आणली. याबाबत मार्क्सचे म्हणणे असे आहे की,

१) आर्थिक घटकांमुळेच समाजात परिवर्तन घडून येते.

२) समाजात दोन वर्ग असतात व त्यांच्यात सतत संघर्ष असतो.

३) भांडवलशाहीत कामगार वर्गाची स्थिती अत्यंत खालावत जाईल व हा वर्ग क्रांती करेल.

४) क्रांतीनंतर समाज वर्गविहिन व राज्यविहीन बनेल.

५) मार्क्सने सामाजिक परिवर्तनासाठी रक्तरंजित क्रांतीचा वा हिंसेचा केलेला पुरस्कार देखील असमर्थनीय वाटतो.

स्वतः मार्क्सने पुढाकार घेऊन कामगारांची बाजू लढविली. त्यांना एकत्र केले व कामगार क्रांती घडवून शोषणापासून मुक्त करण्यासाठी प्रयत्न केले.

१.३.३ वेबरचे संरचनात्मक व कार्यात्मक योगदान :

बदलत्या सामाजिक व ऐतिहासिक परिस्थितीत मानवी वर्तनात कोणकोणत्या प्रकारचे बदल होतात व ते का होतात याचा अभ्यास समाजशास्त्रात नेहमीच करावा लागतो असे वेबर म्हणतात.

सामाजिक क्रिया हीच सामाजिक घडामोडीला विशेष कारणीभूत असल्याने त्याचा आशय जाणून घेणे जरूरीचे असते. मात्र त्यासाठी वैज्ञानिक मूल्यावर आधारलेल्या आदर्श प्रारूपांचा अवलंब केल्यास सामाजिक क्रियेची व घटनेची वास्तवता शोधून काढता येते. आपल्या समाजिक क्रियेच्या सिद्धांतात वेबरनी असे मत मांडले आहे की, अनेक व्यक्ती एकमेकांच्या संपर्कात जेव्हा येतात तेंव्हा त्याच्या वर्तनात काही बदल होतात. या वर्णनात्मक स्वरूपाच्या बदलातून जी क्रिया अथवा प्रतिक्रिया घडून येते त्यास सामाजिक क्रिया अशी संज्ञा वेबरनी वापरलेली आहे.

सामाजिक क्रियेतून सामाजिक संबंधाचा उदय होत असल्याने त्यांचे कार्यकारणाविषयक संबंध अभ्यासल्याखेरीज वास्तवता स्पष्ट होऊ शकत नाही. प्रत्येक सामाजिक क्रियेला विशिष्ट हेतू चिकटलेला असतो त्या हेतूने काम करण्यासाठी व्यक्ती त्या सामाजिक क्रियेत अथवा सामाजिक संबंधात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सहभागी होत असते. व्यक्तीच्या वर्तनातून तार्किक, मूल्यधिष्ठित, भावनात्मक व पारंपारीक अशा वेगवेगळ्या सामाजिक किंवा समजा रचनेच्या चौकटीत राहून विषमतेवर आधारलेली समाज रचना व त्यातील सत्ता किंवा अधिकार संपादन करणारा वर्ग मानवी वर्तनावर सामाजिक क्रियेवर सामाजिक संबंधावर आपले वर्चस्व प्रस्थापित करून ते नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतात. म्हणून मॅक्स वेबर यांनी सामाजिक संरचनेचा अभ्यास करते वेळी फक्त सामाजिक क्रिया किंवा सामाजिक संबंध यांच्या अध्ययनापेक्षा त्यावर प्रभाव टाकणाऱ्या असंतुलित घटकांच्या प्रभावांच्या अध्ययनाकडे विशेष भर देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अशा विचारांचे योगदान वेबर यांनी संरचनात्मक व कार्यात्मक सिद्धांतात केल्याचे आढळून येते.

वेबरच्या मते सामाजिक व्यवस्था ही शक्तीवर आधारीत असते. या शक्तीबाबत वेबर असे म्हणतो की शक्तीचे तात्पर्य अशा परिस्थितीशी आहे की जिला एक व्यक्ती वा काही व्यक्ती कोणत्यातरी सामूहिक क्रियात आपल्या इच्छापूर्तीसाठी त्या क्रियेत भाग घेणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीकडून विरोध होऊनही प्राप्त करीत असतात. म्हणजे असे म्हणता येईल की, ज्या व्यक्ती किंवा व्यक्तीच्या जवळ शक्तीचा अवसर आहे, त्या व्यक्ती किंवा व्यक्तीच्या जवळ शक्तीचा अवसर आहे. त्या आपल्या उद्देशपूर्ती किंवा लक्ष्याची प्राप्ती, त्या व्यक्ती वा व्यक्तींच्या तुलनेत ज्यांच्याजवळ शक्ती नाही त्या अधिक सरळपणे करतात. या शक्तींच्या किंवा

अवसराच्या आधारावरच व्यक्ती समाजात एक निश्चित पदाला प्राप्त करते आणि ते पद त्या व्यक्तीला सामाजिक प्रतिष्ठा प्रदान करते. वेबर असेही म्हणतात की, ज्या पद्धतीने सामाजिक प्रतिष्ठा कोणत्याही समुदायाच्या विशिष्ट समूहात वाटलेली असते. तिलाच आम्ही सामाजिक व्यवस्था म्हणू शकतो. तथापि वेबर सामाजिक आर्थिक आणि वैद्यानिक व्यवस्थांमध्ये अंतर असे म्हणतो. सामाजिक व्यवस्था आणि अर्थिक व्यवस्था दोन्हीही प्रामुख्याने समान रूपाने वैधानिक व्यवस्थेशी संबंधीत असतात. परंतु सामाजिक व्यवस्था आणि आर्थिक व्यवस्था मात्र एकच आहेत असे नाही, तर त्या वेगवेगळ्या आहेत.

सामाजिक व्यवस्था बऱ्याच हद्दीपर्यंत आर्थिक व्यवस्थेद्वारा प्रभावित होत असते आणि स्वतः देखील आर्थिक व्यवस्थेला प्रभावित करीत असते. परंतु या दोन्ही एक आहे असा समज करून घेणे चुकीचे होईल असे वेबर म्हणतात. सामाजिक व्यवस्थाही व्यापक असून आर्थिक व वैधानिक व्यवस्था त्या व्यापक व्यवस्थेचे अंग किंवा भाग आहेत.

१.४ स्वंय अध्ययनासाठी प्रश्न:

अ) एका वाक्यात उत्तरे द्या.

१) कार्ल मार्क्सचा सामाजिक स्तररचनेकडे पाहण्याचा दृष्टीकोन कोणता होता?

२) इतिहासाची पाच युगे कोणती?

३) सध्याच्या युगाला मार्क्स काय म्हणतो?

४) सामाजिक घडामोडीला कोणती क्रिया कारणीभूत ठरते?

५) वेबरच्या मते सामाजिक व्यवस्था कशावर आधारित आहे?

ब) चूक की बरोबर सांगा.

१) संरचनात्मक कार्यात्मक दृष्टीकोनात प्रामुख्याने दोन मूलभूत संकल्पना अंतभूर्त झालेल्या आहेत.

२) समाजातील श्रेष्ठ-कनिष्ठतेचे विभाजन समाजव्यवस्थेत होत नाही.

३) कार्ल मार्क्सचा सामाजिक स्तररचनेकडे पाहण्याचा दृष्टीकोन वर्गीय हितसंबंधावर आधारलेला होता.

४) आजपर्यंतच्या इतिहासाला वर्ग संघर्षाचा इतिहास म्हणता येणार नाही.

५) सामाजिक क्रिया हीच सामाजिक घडामोडीला विशेष कारणीभूत असल्याने त्याचा आशय जाणून घेणे जरूरीचे असते.

१.५ सारांश :

वेबर व कार्ल मार्क्स या दोन्ही शास्त्रज्ञांनी सामाजिक चळवळीच्या अभ्यासात संरचनात्मक व कार्यात्मक सिद्धांताबाबत आपले मोलाचे योगदान दिले आहे. कार्ल मार्क्सनी वर्गीय स्वरूपाची समाजव्यवस्था अभ्यासली. कामगार वर्ग व मालकवर्ग यांच्यातील संघर्ष यावर प्रकाश टाकून कामगारांवरील अन्याय दूर झाला पाहिजे याबाबत लक्ष वेधले. म्हणूनच आजपर्यंतच्या इतिहासाला वर्गसंघर्षाचा इतिहास

असे मार्क्सनी म्हटले आहे. मानवी इतिहासाची पाच युगे सांगितली आहेत. कामगार क्रांती घडवून आणून शोषणापासून कामगारांना मुक्त करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

१.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

अ) १) वैज्ञानिक दृष्टीकोन होता.

२) आदिम, गुलामगिरीची, सरंजामशाहीचे, भांडवलशाहीचे व समाजवादी युग अशी पाच युगे होती.

३) सध्याच्या युगाला भांडवलशाहीचे युग म्हणतात.

४) सामाजिक व्यवस्था शक्तीवर आधारीत आहे.

ब) १) बरोबर २) चूक ३) बरोबर ४) चूक ५) बरोबर

१.७ सरावासाठी प्रश्न :

अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) सामाजिक चळवळीविषयीचा संरचनात्मक व कार्यात्मक सिद्धांताबाबत मार्क्सवादी सिद्धांत स्पष्ट करा.

२) वेबरचे संरचनात्मक व कार्यात्मक सिद्धांताबाबतचे योगदान विशद करा.

ब) टीपा लिहा.

१) मार्क्सचा संरचनात्मक व कार्यात्मक सिद्धांत.

२) वेबरचे सैद्धांतिक योगदान.

१.८ क्षेत्रीय कार्य :

तुमच्या आसपासच्या एखाद्या सामाजिक चळवळीचा अभ्यास करण्यासाठी त्या चळवळीच्या संघटनांना भेट द्या.

१.९ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१) काचोळे दा. धो. समाजशास्त्रीय सिद्धांत : २००२ : कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद

२) आगलावे प्रदिप : समाजशास्त्र – संकल्पना आणि सिद्धांत : २००९ साईनाथ प्रकाशन, नागपूर

३) कुलकर्णी पी.के. : सामाजिक विचार प्रवाह, २००८ श्री. मंगेश प्रकाशन नागपूर.

४) सिंग व्ही.एन. सिंग जनमेजय, २००५ भारत के सामाजिक आंदोलन, रावत पब्लिकेशन्स, जयपूर

५) कुलकर्णी पी.के. प्रगत समाजशास्त्रीय सिद्धांत १९९७, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

६) गजेंद्रगड व्ही. एन. समकालीन समाजशास्त्रीय सिद्धांत, १९९३ फडके प्रकाशन, कोल्हापूर

❑❑❑

घटक – २
नेतृत्व, सामाजिक चळवळ व सामाजिक परिवर्तन
(Leadership, Social Movement and Social Change)

घटक संरचना

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ अभ्यास विषयाची मांडणी

- २.२.१ नेतृत्व व्याख्या आणि भूमिका
- २.२.२ नेतृत्वाचे प्रकार
- २.२.३ नेता आणि जनता यांच्यातील परस्पर संबंध
- २.२.४ सामाजिक चळवळी आणि सामाजिक परिवर्तन यांच्यातील परस्परसंबंध

२.३ सारांश

२.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सरावासाठी स्वाध्याय

२.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

२.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास

- नेतृत्वाचा अर्थ, व्याख्या, संकल्पना समजून घेता येईल.
- नेतृत्वाची भूमिका समजून येतील.
- नेतृत्वाचे प्रकार समजून येतील.
- नेता व जनता यांचे परस्परसंबंध समजून घेणे.
- सामाजिक चळवळी व सामाजिक परिवर्तन यांच्यातील परस्पर संबंध समजून घेणे.
- एकूण नेतृत्व, सामाजिक चळवळी व सामाजिक परिवर्तन यांच्यातील परस्पर संबंध व प्रभाव समजून घेता येईल.

२.१ प्रस्तावना :

ज्या ठिकाणी दोन किंवा दोन पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतात तेव्हा त्यात आपल्याला नेता आढळून येतो जेव्हा व्यक्तींचा एखादा गट निर्माण होतो तेव्हा निश्चितच त्यामध्ये एखादी व्यक्ती नेतृत्व करते. ती व्यक्ती इतर सदस्यांपेक्षा सक्रीय, वर्चस्व गाजवणारी सर्वांमध्ये स्विकारली जाते. आणि त्या व्यक्तीला सर्वांमध्ये मान असतो. सामाजिक कार्यात पुढाकार घेण्याची श्रेष्ठ पदावर पोहोचण्याची क्षमता, पात्रता असलेले लोक समाजाचे नेतृत्व करू शकतात. जो आपल्या विचारांना बरोबर घेऊन जातो तो नेता होय. परिस्थिती कोणतीही असो अन्यायाला प्रतिकार करणे असो किंवा त्यात पुढाकार करणे असो नेता जनतेवर छाप पाडून, आपला प्रभाव टाकून समूहाचा कार्य प्रेरीत करत असतो.

सामाजिक चळवळीतही नेत्याला, नेतृत्वाला अधिक महत्व असते. कोणतीही चळवळ आपोआप निर्माण होत नाही. नेता आपल्या विचारसरणीने प्रेरित होऊन सामुहिक जागृती निर्माण करून समाजाला कृतीशील बनवितो. विशिष्ट उद्दिष्टांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी जनता अनुयायी त्याला पाठिंबा देतात. त्याला सहकार्य करतात. नेतृत्वाच्या अंगी दूरदृष्टी असावी लागते, तो लोकांमध्ये संघटन घडवून आणतो. समाजाची उद्दिष्टे समजावून घेऊन आपले कार्यक्रम निश्चित करतो व लोकांना त्यामध्ये सहभागी करून कार्य करण्यास प्रवृत्त करतो या प्रकरणामध्ये आपण नेतृत्व म्हणजे काय? हे समजावून घेऊन त्यांच्या भूमिका व प्रकार पाहणार आहोत तसेच नेतृत्व व जनता यांच्यातील परस्पर संबंध कसे आहेत हे पाहणार आहोत. त्याचबरोबर सामाजिक चळवळी व सामाजिक परिवर्तन यांच्यातील परस्पर संबंधाचा अभ्यास करणार आहोत. कारण सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी काही वेळा सामाजिक चळवळ किंवा आंदोलन करावे लागते सामाजिक चळवळ व सामाजिक परिवर्तन दोन्हींचा उद्देश एकच आहे तो म्हणजे समाजाच्या गरजांची पूर्तता करणे व त्यासाठी समाजात बदल घडवून आणणेचा प्रयत्न करणे. म्हणूनच या प्रकरणात आपण या चळवळ व सामाजिक परिवर्तनाचा त्यादृष्टिने अभ्यास करणार आहोत.

२.२ अभ्यास विषयाची मांडणी :

या घटकामध्ये आपण नेतृत्वाचा अर्थ समजून घेऊन नेतृत्वाची भूमिका व प्रकार पाहणार आहोत. सामाजिक चळवळीमध्ये नेतृत्वाचे काय महत्त्व आहे ते पाहणार आहोत. तसेच सामाजिक चळवळी व सामाजिक परिवर्तन यांच्यातील परस्पर संबंधाचा अभ्यास करणार आहोत. नेतृत्व व जनता यांच्यातील परस्परसंबंधी पाहणार आहे. सामाजिक चळवळी व सामाजिक परिवर्तन यांचे मानवी जीवनात किती महत्त्व आहे हे लक्षात येईल.

२.२.१ नेतृत्व :

सामाजिक चळवळीमध्ये नेतृत्वाला महत्त्व असते कारण कोणतीही चळवळ आपोआप कार्यरत होत नाही. एखादा नेता समुहाची जाणीव जागृती करून त्यांना सामूहिक कृती करायला भाग पाडतात. प्रभावी नेतृत्व, नवीन विचार, नवीन मुद्दे लोकांमध्ये रूजविण्याचा प्रयत्न करतात. विशेषत: समाजात पुढाकार घेण्याची आणि श्रेष्ठ पदावर पोहोचण्याची पात्रता असलेले लोकच नेतृत्व करतात. आणि इतर लोक त्यांचे अनुयायी बनतात. व त्यांच्या नेतृत्वानुसार कार्य करतात. प्रत्येक क्षेत्रात नेत्यांची आवश्यकता असते. एखादी

समस्या किंवा अन्यायाला सामारे जायचे असेल किंवा एखादी नैसर्गिक आपत्ती असेल त्या ठिकाणी पुढाकार घेणाऱ्या व्यक्तींची म्हणजे नेत्यांची आवश्यकता असते. ती व्यक्ती पुढाकार घेते व पुढे त्याला अनुयायी मिळतात. नेता सांगेल त्या त्याप्रमाणे अनुयायी कार्य करतात. म्हणजेच नेता व अनुयायी दोघांची गरज असते. म्हणून नेतृत्वाचा विचार करताना पुढील घटकांचा विचार करावा लागतो.

१. अनुयायी–नेत्यांच्या मार्गदर्शनानुसार कृती करणेचे कार्य अनुयायी करतात. पुढे जाऊन अनुयायी नेता बनू शकतो.

२. नेता–समूहाचे विशिष्ट उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी समूहातील लोकांना एकत्रित आणून कार्य करतो परिस्थितीनुसार नेतृत्वात बदल होऊ शकतो.

३. परिस्थिती– नेतृत्व परिस्थिती सापेक्ष असते. परिस्थितीतील बदलाचा परिणाम नेतृत्वावर होतो त्यानुसार नेतृत्व बदलू शकते.

४. कार्य–समूहाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासठी विशिष्ट प्रकारचे कार्य करावे लागते. अर्थात विशिष्ट समूहाचे जसे उद्दिष्ट असेल त्या त्या प्रकारचे कार्य करावे लागेल व त्यानुसार नेतृत्वाची आवश्यकता राहते.

वरील प्रकारच्या घटकांचा विचार केल्यानंतर नेतृत्वाची कल्पना लक्षात येते कारण कोणत्याही प्रकारच्या समूहाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी नेतृत्वाची गरज असते. परंतु नेमके नेतृत्व याचा अर्थ काय आहे हे पाहणेही आवश्यक आहे. त्यासाठी समाजशास्त्रज्ञांनी नेतृत्वाची केलेली व्याख्या पाहावी लागेल.

२.२.१ अ. नेतृत्वाची व्याख्या :

१. किंबाल यंग :

''समाजातील लोकांच्या मनोवृत्ती प्रभावीत करण्याचे काम करणाऱ्यास नेतृत्व असे म्हटले जाते.

२. पीटर ड्रकर :

नेतृत्व म्हणजे व्यक्तिने आपला दृष्टिकोन उच्चस्तराला पोहचविणे व आपले व्यक्तिमत्व सर्वसाधारण मर्यादेपलिकडे नेणे होय.

३. लिपीअर व फ्रान्सवर्थ :

''नेतृत्व म्हणजे स्वत:च्या वर्तनाने इतरांवर प्रभाव टाकणे पण स्वत: इतरांच्या वर्तनाने प्रभावित न होणे होय.''

४. मॅकआयव्हवर व पेज :

नेतृत्व म्हणजे कोणत्याही अधिकाराशिवाय केवळ स्व गुणांच्या बळावर इतरांना निर्देश करण्याची किंवा मन वळविण्याची क्षमता होय.

कोणतीही चळवळ स्वयंभू नसते सामाजिक चळवळीमध्ये नेतृत्वाला महत्त्व असते. नेतृत्व लहान किंवा मोठे असू शकते. भारतीय स्वातंत्र्य लढयात आंदोलनाचे नेतृत्व महात्मा गांधीने केले व स्वातंत्र्योत्तर काळात स्वातंत्र्यावरती निर्बंध आल्यामुळे जयप्रकाश नारायण यांनी चळवळीचे नेतृत्व केले. तसेच नक्षलवादी

चळवळींचे नेतृत्व कानुसन्याला यांनी केले. या चळवळीमध्ये मुख्य नेत्याच्या नावाने चळवळ ओळखली जाते. नेतृत्व प्रभावी असले तर सामाजिक मूल्य व मानदंड जनमाणसांत रूजू शकतात.

२.२.१ ब. नेतृत्वाची भूमिका :

नेत्याचे यश हे तो लोकांच्या अपेक्षा किती पूर्ण करतो व आपली भूमिका कशाप्रकारे पार पाडतो यावर अवलंबून असते. नेत्याकडून लोकांची अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी असते. आज व्यक्तिगत नेतृत्वाऐवजी कार्यात्मक नेतृत्वाला महत्त्व प्राप्त झाले आहे. नेता अनुयायांना सतत कार्यप्रवण ठेवून निरनिराळया उपक्रमांना त्याने चालना दिली पाहिजे. तळागाळातील स्तरापासून ते राष्ट्रीय स्तरापर्यंत प्रेरणा व प्रोत्साहन देणारे नेतृत्व निर्माण होणे ही काळाची गरज आहे. तसेच नेत्याचा कार्यकर्त्यांशी संपर्क असला पाहिजे व नेत्याचे अनुकरण अनुयायांनीही केले पाहिजे. यावरच नेत्याची यशस्विता अवलंबून असते. लोकशाही मध्ये परिपक्व राजकीय व्यवस्था व आर्थिकदृष्टया विकासाच्या किंवा कल्याणकारी योजना राबविणाऱ्या तसेच त्या समाजातील समस्यांचा परिचय असणाऱ्या नेतृत्वाची गरज असते. नेतृत्वाची पात्रता ही जन्मजात असते प्रवाह आहे, परंतु नेते विशिष्ट परिस्थितीतून जन्माला येतात असा विचार प्रवाह प्रचलित आहे. समाजाच्या पेचप्रसंगातून नेतृत्व निर्माण होते तसेच युद्धकालीन परिस्थिती व शांततेच्या काळात वेगवेगळे नेतृत्व असू शकते. उदा.इंग्लड मध्ये दुसऱ्या महायुद्धात चर्चिलने नेतृत्व केले व युद्ध संपल्यानंतर समाजवादी वाटचालीसाठी ॲटलीला लोकांनी निवडून दिले. कोणत्याही परिस्थितीत अधिमान्यता हा नेतृत्वाचा आधार असतो. लोक नेत्याचे कार्य पाहतात व वर्तणूकही पाहतात. लोकांचा विश्वास असेपर्यंत नेतृत्व राहते.

कोणत्या ना कोणत्या प्रकारचे नेतृत्व हे सर्वच प्रकारच्या समूहामध्ये आढळून येते. एखाद्या व्यक्तीची काम करण्याची शैली आणि त्याचे नेता म्हणून उदयास येणे ह्या दोन्ही बाबी त्या विशिष्ट परिस्थितीची गरज प्रतिबिंबित करतात.

''जी व्यक्ती समूहातील इतर सदस्यांवर आपल्या सक्रीय कार्यामुळे इतरांवर प्रभाव टाकतो आणि समुहाच्या यशाची ध्येयधोरणे ठरविण्यात मध्यवर्ती भूमिका बजावतो आणि त्या समूहाची विचारधारा ठरविण्यात मोलाची भूमिका बजावतो. ती व्यक्ती म्हणजे नेता होय.''

समूहाचा नेता ओळखण्याची दोन मुख्य तत्व आहेत.

१. आपण समूहातील सर्व सदस्यांना असे विचारू शकतो की, ते सर्व कोणाला सर्वात प्रभावी सदस्य म्हणून स्वीकारतात.

२. किंवा त्या समूहातील सदस्यांना असे विचारू शकतो की, त्या समूहातील कोणती व्यक्ती सर्वात प्रभावशाली आहे की, ज्याचा सर्वांवरती प्रभाव पडतो.

या दोन्ही तत्वामध्ये नेत्याचा इतर सदस्यांवर 'प्रभाव' टाकणे किंवा पडणे हीच बाब नेतृत्वाच्या बाबतीत महत्त्वाची आहे. त्यामुळे आपण नेता म्हणजे असे म्हणू शकतो की, जी व्यक्ती आपल्या कार्यकुशलतेने सर्व व्यक्तींवर प्रभाव टाकते. नेतृत्व दोन प्रकारे काम करते. तो आपल्या अनुयायांवर प्रभाव टाकतो आणि अनुयायी आपल्या नेतृत्वावर प्रभाव टाकतात. Haythrone (१९५६) च्या मतानुसार नेत्यांचे

वागणे, कार्य शैली इ. बाबी ह्या समूहातील सर्व सदस्यांच्या समूह मनाच्या कल ठरवत असते. कार्यालयीन प्रमुख आणि नेतृत्वात तसा फार फरक असतो. कार्यालयीन प्रमुखाचा त्याच्या समूहावर तसा कमीच प्रभाव असतो. परंतु नेत्याच्या त्याच्या समूहावर प्रचंड प्रभाव असतो. त्यामुळे सर्वच औपचारिक नेते, हे दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर, खरे नेते नसतात किंवा नेते होऊ शकत नाहीत.

नेतृत्व केवळ निष्क्रिय व्यवस्था नसून अनेक गुणांचा तो समुच्चय असतो. नेतृत्वाचा सहभाग सक्रिय असतो. तसेच सहकाऱ्यांच्या मदतीने नियोजित उद्दिष्टांची पूर्ती करण्याची क्षमता नेतृत्वात असते. नेतृत्वात संघटन कुशलता, जागृतता, जिद्द व आत्मविश्वास या गेष्टी असणे आवश्यक असते तरच सामामिक चळवळ राबविणे शक्य होते. एक नेतृत्व या नात्याने त्याला विविध प्रकारच्या भूमिका पार पाडाव्या लागतात. त्या पुढीलप्रमाणे

१. समूहाच्या अनेक योजनांच्या अंमलबजावणीचा एक मुख्य समन्वयक म्हणून भूमिका नेत्यांना बजावावी लागते. त्यासाठी समूहातील सदस्यांत विभागणी करून योग्य ती अंमलबजावणी केली जाते.

२. समूहाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी नेहमी सामाजिक चळवळींचे पूर्वनियोजन करावे लागते.

३. कौशल्य असेल तरच नियोजीत कार्य पुढे नेणे सोयीस्कर जाते.

४. समूहाच्या प्रतिनिधी म्हणून समूहातील सर्वांशी संपर्क ठेवावे लागतात.

५. समूहातील सदस्यांवर नियंत्रण ठेवणे.

६. सार्वजनिक जीवनात नैतिक मूल्यांची जपणूक करून, योग्य असे वर्तन करून समाजापुढे आदर्श ठेवावे.

७. काही वेळा समूहातील सदस्यांचा पालक या नात्याने भावनीक भूमिका बजावावी लागते प्रत्येक सदस्यांच्या भावना जपण्याचा प्रयत्न तो करतो.

८. काही वेळा नेत्याला एक सल्लागार किंवा न्यायाधिश म्हणून भूमिका बजावावी लागते.

९. निश्चित उद्दिष्ट किंवा ध्येय प्राप्तीसाठी बदलत्या परिस्थितीनुसार अनेक मार्ग शोधावे लागतात. दूरदृष्टी ठेवावी लागते. तरच उद्दिष्ट प्राप्ती होते.

१०. लोकांना योग्य मार्गदर्शन करावे लागते. वैशिष्टयपूर्ण आचरणाद्वारे लोकांचे उद्बोधन केले जाते.

११. समर्पण भावनेने समाजसेवा करावी लागते त्यामुळे नेतृत्व अधिक लोकप्रिय होते.

१२. विविध समस्यांबाबत जनजागृती करून राष्ट्रीय जनमत तयार करणे.

थोडक्यात नेतृत्वात नेता लोकांच्या अपेक्षा परिपूर्ण करणेसाठी आपली भूमिका किती प्रमाणात व कशाप्रकारे पार पाडते यावर त्या सामाजिक चळवळींचे यश अवलंबून असते. नेतृत्व ही आजची काळाची गरज आहे समाजाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी, हितसंबंधाची जपणूक करण्यासाठी, अनेक प्रकारच्या समस्यातून बाहेर पडण्यासाठी सामाजिक चळवळींची आवश्यकता असते. परंतु ती चळवळ नेतत्वाच्या कार्यावर, भूमिकावर दिशेनुसार कार्यरत राहते.

२.२.२ नेतत्वाचे प्रकार :

बहुधा हुकुमशाही अधिकारी आणि लोकशाही पद्धतीचे नेतृत्व हे महत्त्वाचे आणि सामाजिक संबंधावर आधारित असे दोन नेतृत्वाचे प्रकार आहेत. परंतु त्या दोन्ही संकल्पना फक्त नेतृत्वाच्या काम करण्याच्या शैलींवर आधारीत आहे.

१. हुकूमशाही :

हुकूमशाही नेतृत्व, लोकशाही नेतृत्वापेक्षा अनियंत्रित सत्ता प्राप्त करून कार्य करत असतो. तो एकटाच समूहाची धोरणे ठरवित असतो. अशाप्रकारे नेतृत्व अशा प्रकारे नेतृत्व एकाच समूहाचे महत्वाचे नियोजन करत असतो आणि त्याचा एकट्यालाच त्याच्या यशाच्या पायऱ्या माहित असतात. एकटीच व्यक्ती निर्णय घेवून कामाची विभागणी करत असतो. त्याचबरोबर समूहातील इतर सदस्याचे परस्पर आंतरसंबंध सुद्धा अशा प्रकारचे नेतृत्व नियंत्रित करत असते. हुकूमशाही प्रणाली नेतृत्व हे सत्कार आणि शिक्षेला एकटाच सामोरे जात असते, त्यामुळे सदस्यांचे भविष्य त्याच्याच हातात असते.

हुकूमशाही नेतृत्व जाणूनबुजून अशा प्रकाराची कार्यपद्धती आत्मसात करते आणि ह्या पद्धतीत बदलाला मोडीत काढून वर्चस्व प्रस्थापित करतो. ह्यामध्ये सदस्यांचा सहभाग परावलंबी व तुटक असतो आणि त्यांना समूहाची ध्येय धोरणा विषयी माहिती बहुधा नसते. बऱ्याचदा हे नेते कौतुक किंवा टीका टिप्पणीवर गुंग असतात, फक्त एखाद्या बाबीचे दिग्दर्शन करावयाचे असल्यास पुढे येतात अन्यथा सदस्यांमधील सक्रीय सहभागापासून दूरच राहतात.

हुकूमशाही वृत्तीचे नेतृत्व विभाजीत समूह संरचनेला चालना देते आणि समूहातील सदस्यांचे आपापसातील आंतरक्रियेवर मर्यादा आणतात किंवा झालीच तर नेतृत्वाच्या पर्यवेक्षणाखाली घडते. या सर्व बाबींचा दुर्दैवाने पूर्ण संघटनेवर विपरीत परिणाम होतो. एका बाजूला समूहातील सदस्यांना आंतरक्रियेला कमीतकमी संधी दिली जाते तर दुसऱ्या बाजूला नेत्याच्या अलिप्त वागण्यामुळे संघटनेत गोंधळ माजण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे हुकूमशाही नेतृत्वाची सोशिओमेट्रीक आकृती खालीलप्रमाणे दाखविता येईल की ज्यामध्ये चांदणी प्रमाणे दिसते ज्यामध्ये नेतृत्व हे मध्यभागी दिसते.



हुकूमशाहीच्या पद्धतीच्या नेतृत्वात

गटातील सदस्य वरील आकृती प्रमाणे एकमेकांशी संपर्कात नेतृत्वामार्फत असतात. जस जसा समूह, संघटना वाढत जाते, तसतसा नेता हा जास्तच दूर आणि वरच्या स्तरावर जात असतो. तशा स्थितीत सुद्धा नेतृत्व चांदणी सारखी संरचना ठेवून सदस्यातील आंतरक्रिया कमीतकमी पातळीवर ठेवत असतो.

२. लोकशाही नेतृत्व :

हुकूमशाही शैली च्या नेतृत्वापेक्षा सत्तेच्या अधिकाराबाबत लोकशाही वादी नेतृत्वात फारसा फरक नसतो. फरक असतो तो म्हणजे त्या सत्तेचा वापर करण्याच्या शैलीत लोकशाही वादी नेतृत्व हे संघटनेतील सदस्यांना कामकाजात नेतृत्व जबाबदाऱ्यांची विभागणी करून सर्व सदस्यांना समान संधी देते. हुकूमशाही नेतृत्वासारखे सत्तेचे केंद्रीकरण न करता विकेंद्रीकरण करते. संघटनेतील सदस्यांच्या आंतरक्रिया आणि संबंध वाढविण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. जेणेकरून संघटना एकसंघ होवून शक्तीशाली होवू शकतो. लोकशाहीवादी शैली नेतृत्व हे उतरंडी संघटनेचा संरचना होवू देत नाही, त्यात कुणालाही एकाला विशेषाधिकार किंवा दर्जा न देता सर्वांना एकाच दर्जावर ठेवले जाते. लोकशाही वादी नेतृत्व शैलीची सोशिओमेट्रीक आकृती खालीलप्रमाणे दिसेल.





जरी नेतृत्व हे मध्यवर्ती आणि महत्वाचे असले तरी,त्यांच्यात एकमेकांशी जवळीकता आणि बांधीलकी असते. तुलनात्मकरित्या जर दोन्ही नेतृत्व शैलीचा अभ्यास केला तर, हुकूमशाही शैली नेतृत्व हे सर्व सभासदांच्या मधील एक महत्त्वाचा 'दुवा' असतो. लोकशाही नेतृत्व बऱ्याचदा एखादी ध्येय धोरण मिळून राबविण्याचा प्रयत्न करते किंवा ते राबविण्यासाठी सदस्यांना प्रोत्साहित करून योग्य ती साधन सामुग्री दिली जाते. याऊलट हुकूमशाही नेतृत्व हे त्या त्या संघटनेचे महत्त्वाचे केंद्रिय सत्तास्थान असते, त्याने संघटनेची अशी रचना केलेली असते की, त्याच्याशिवाय संपूर्ण संघटनाच कोसळण्याची शक्यता असते. परंतु लोकशाही नेतृत्व मात्र त्याच्या अनुपस्थितीत संघटनेचे कार्य आणि यशस्विता बघतो आणि सदस्य एकमेकांशी सहकार्य करून ध्येय प्राप्ती कशी करतात याच्यावर नजर ठेवतो. या प्रकारच्या शैलीत संघटनेची ध्येयधोरणे ही सदस्यांबरोबर चर्चा करून सर्वमताने ठरवली जातात. सभासदांना स्वत:च्या कामाच्या विभागणीची पूर्णपणे स्वातंय असते. या प्रकारचे नेतृत्व बऱ्याचदा 'प्रशंसा' आणि टीकात्मक टिप्पणीला वस्तुनिष्ठपणे पाहात असतो. हे नेतृत्व संघटनेतील सदस्य होण्याचा नियमित आणि प्रामाणिक प्रयत्न करते, ज्यायोगे संपूर्ण संघटना उत्साहाने कार्यरत राहील.

मॅक्स वेबर यांनी सामाजिक चळवळींचा अभ्यास करतांना नेतृत्वाचे तीन आदर्श प्रकार सांगितले आहेत. त्यानी चळवळीची रचना, आंदोलन, चळवळीची उद्दिष्टे काय आहेत यावर चळवळीचे नेतृत्व अवलंबून असते असे म्हटले आहे.

१. परंपरागत नेतृत्व :

मागासलेल्या किंवा आदिवासी समाजात धार्मिक श्रद्धा, परंपरा रूढी यांना अनुसरून वर्तन करणाऱ्या नेतृत्वाची निर्मिती होते. विशेषत: सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीमध्ये हे नेतृत्व प्रभावी ठरते. आदिवासी किंवा मागासलेला समाज आजही राजघरांण्यातील व्यक्तिला नेता म्हणून स्विकारतो मुस्लिमांमध्ये मौलवी किंवा इमाम, शिखांमध्ये धर्मगुरू, ख्रिश्चनमध्ये पोप यांना आजही महत्त्व दिले जाते.

२. वैधानिक नेतृत्व :

हे नेतृत्व औपचारिक स्वरूपाचे असून त्याला कायद्याची व विधिसंस्थेची मान्यता असते म्हणून या नेतृत्वाला वैधानिक संस्थावादी नेतृत्व म्हटले जाते. या नेतृवाला कायद्याचा आधार व पाठबळ असते सामाजिक चळवळींची यशस्विता या नेतृत्वाद्वारे होत असते. उदा.अस्पृश्यता, हुंडाबंदी, सतीबंदी नष्ट करणारे कायदे म्हणजे सामाजिक चळवळीच्या नेतृत्वाला दिलेला कौलच असतो. हे नेतृत्व सर्वश्रेष्ठ प्रकारचे असते.

३. करिश्माई नेतृत्व :

संमोहक, दिव्य वलयी असे नेतृत्व आश्चर्यकारकरित्या पुढे आलेले असते. या नेतृत्वात विलक्षण गुण असतात अल्पकाळात ते पुढे येते व आपल्या कार्यक्रमांना, कृतींना पाठिंबा मिळवते. उदा. महात्मा गांधी, नेल्सन मंडेला, नेहरू, इंदिरा गांधी ही त्याची उदाहरणे आहेत. सुरूवातीच्या काळात ते खूप प्रभावी असते. व लोकही प्रभावीत होऊन त्याला पाठिंबा देतात व चळवळीत सहभागी होतात. परंतु मॅक्स वेबरच्या मते कालांतराने या नेतृत्वाचा प्रभाव कमी होतो. व ते सामान्य स्थितीक येऊन पोहोचतात.

याशिवाय नेतृत्वाचे आणखी काही प्रकार आहेत ते पुढीलप्रमाणे

१. आदर्शवादी नेतृत्व :

आदर्शवादी नेता तंत्र कौशल्यात पारंगत नसून तो श्रद्धा कल्पना यामध्ये तज्ञ असतो. तो विविध मूलभूत सिद्धांताशी अथवा तत्वांशी संबंधीत असून त्याद्वारे मानवी जीवनातील मूळ प्रश्नांचे तो विश्लेषण करतो, व आदर्श जीवन जगण्याचा मार्ग दाखवतो. कार्ल मार्क्स, गौतम बुद्ध, महावीर, पैंगबर, महात्मा गांधी इत्यादी आदर्शवादी नेते म्हणता येतील. त्यांच्या आदर्शवादामुळे हजारो लोकांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला. उदा.ब्रिटिशांच्या लढयात महात्मा गांधीच्या सत्य व अहिंसा या तत्वाचा प्रभाव भारतीय जनमाणसावर होता.

२. प्रशासकीय नेतृत्व :

संयोजन, नियोजन व्यवस्थापन मार्गदर्शन संघटन अशाप्रकारच्या कार्य करणाऱ्या नेत्याला प्रशासक म्हणतात. उद्दिष्टे साध्य करण्याकरता निर्माण झालेल्या समूहात प्रशासकाचे काम अत्यंत महत्त्वाचे असते.

उद्दिष्टे लक्षात घेऊन त्याच्या प्राप्तीसाठी मार्गदर्शन करणे व ध्येयधोरणानुसार काम करणे, ही दोन्ही कामे पूर्ण करण्यासाठी स्वतंत्र प्रशासक असतात उदा.भारतीय विधीमंडळात धोरण ठरविले जाते व त्याची अंमलबजावणी पोलीस किंवा सरकारीयंत्रणे मार्फत होत असते.

३. प्रतिकात्मक नेतृत्व :

नेता आपल्या समूहाचे प्रतिबिंब असतो तो समूहाचे प्रतिनिधित्व करतो. उदा.दुसऱ्या देशात राजदूतांचा आदरपूर्वक सन्मान केला जातो. यामध्ये स्थानाला महत्त्व असल्याने त्या व्यक्तिला महत्त्व प्राप्त होते त्याला प्रतिकात्मक नेता असे म्हटले जाते. या नेत्यांचे स्थान मोठे असते. समाजमान्यता ही असते पण प्रत्यक्ष काहीही अधिकार नसतो. उदा.शहराचा महापौर याला मानाचे स्थान असते पण निर्णय घेण्याचा अधिकार त्याला नसतो.

४. शिथील किंवा निष्क्रिय नेतृत्व :

लोकांना जो नेता आपल्या मर्जीनुसार वागणूक देतो, समूहातील सदस्यांना मनाप्रमाणे वर्तनाची मुभा देतो त्या नेत्याला शिथील किंवा निष्क्रिय नेता म्हणतात. हा नेता समुहातील लोकांना समर्थपणे व कार्यक्षमतेने मार्गदर्शन करू शकत नाही. तसेच समूहात तो दीर्घकाळ सहभागी होत नाही. सभासद आपल्या इच्छेप्रमाणे काम करत असतात. तसेच नेता कोणत्याही कार्याची प्रामाणिकपणे दखल घेत नाही गरज भासल्यास तो आवश्यक ती माहिती देण्याचे काम करतो. उदा.प्रयोगशाळेत विद्यार्थी प्रयोग करत असतात. प्रयोगशाळानिरीक्षक हा नेत्याच्या भूमिकेत असतो.

५. श्रेणीश्रेष्ठ नेतृत्व :

आज आधुनिक समाजात विशेषकरणावर आधारीत कार्य`विभाजन पद्धतीमुळे हा नेतृत्वाचा प्रकार निर्माण झाला आहे. मध्यम किंवा कनिष्ठ स्तरावर ज्यांना प्रशासकीय कार्य करावे लागते. अशा नेत्यांना श्रेणी श्रेष्ठ नेता म्हणतात. समूहाला मार्ग किंवा दिशा देण्याच्या, कामावर नजर ठेवण्याचा प्रयत्न विशेषप्रकारे करावे लागतात. प्रशासनाने ठरवून दिलेली कामे किंवा त्याची अमंलबजावणी करावी लागते. उदा.कोणत्याही कचेरीत कनिष्ठ लेखनिक, वरिष्ठ लेखनिक, ऑफिसर, मुख्याधिकारी उपस्थित अशी विविध रचना आढळते. त्यांना धोरण ठरविण्याचे अधिकार नसतात. फक्त अंमलबजावणी करावी लागते हे अधिकारी कार्यक्षम असतील तर संघटनेचे काम व्यवस्थित चालते फक्त नेतृत्व बदलले तरी त्यांचे अधिकार, स्थान बदलत नाहीत.

स्वयंअध्ययन प्रश्न १ :

अ. एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. जी व्यक्ती समुहाचा पुढाकार घेऊन नेतृत्व करते त्याला काय म्हणतात ?

२. नेतृत्व ची किंबॉल यंग यांनी केलेली व्याख्या लिहा.

३. लोकशाहीवादी नेतृत्व कशाला म्हणतात?

४. नेत्याला गेट किपर कोणी म्हटले आहे ?

५. लोकशाही नेतृत्वाची सोशिओमॅटिक आकृती काढा.

ब. पर्यायी शब्द शोधून वाक्य पून्हा लिहा.

१. समूहाच्या योजनाच्या अंमलबजावणीसाठी नेत्याला कोणती भूमिका बजावावी लागते ?

अ) आयोजक ब) कार्यवाह क) समन्वयक ड) नियंत्रक

२. सामाजिक सुधारणेच्या चळवळीत कोणत्या प्रकारचे नेतृत्व कार्य करत असते ?

अ) आदर्शवादी ब) वैधानिक क) करिश्माई ड) परंपरागत

२.२.३ नेता आणि जनता यांच्यातील परस्पर संबंध :

उद्दिष्टाशिवाय चळवळीची निर्मिती होऊ शकत नाही. प्रत्येक चळवळीला उद्दिष्ट असते. प्रत्येक चळवळीमध्ये काही प्रमाणके, मूल्ये समाविष्ट असता. सर्वसामान्य व्यक्तिपर्यंत चळवळीची विचार प्रणाली रूजवणे आणि त्या चळवळीवरती विश्वास श्रद्धा निर्माण करणे, हे नेतृत्वाचे कौशल्य असते. नेता हा सरळ साध्या भाषेत आपली विचारप्रणाली समजावून देऊ शकतो. नेते चळवळीला पाठिंबा मिळवून देऊ शकतात. केवळ एवढेच करून चालत नाही तर आपल्या मागण्या प्रभावी मांडून त्यासाठी उचित कार्यक्रम हे नेते राबवू शकतात. अशा प्रकारचा विश्वास लोकांमध्ये निर्माण झाला पाहिजे. सर्वसाधारणपणे असे दिसते की, ज्या नेत्यांची जनतेच्या मनात गुणात्मक आणि सकारात्मक प्रतिमा आहे तेच नेते समाजकार्य करू शकतात.

समाजासाठी समुहाच्या बाहेर येऊन कृती किंवा ठोस कार्यक्रम राबविण्यात पुढाकार घेतो याला 'प्रत्यक्ष नेतृत्व' असे म्हणतात. जो नेता समुहासमोर मान्यता प्राप्त म्हणून उभा राहतो आणि समुहातील व्यक्तींशी त्याचा समोरासमोरचा संबंध असतो त्याला प्रत्यक्षदर्शी नेतृत्व म्हणून ओळखले जाते तसेच त्याचे नेतृत्व औपचारिक असून त्याचा दर्जा सार्वजनिक व स्पष्ट असतो त्याची जबाबदारी निश्चित स्वरूपाची व प्रभावी व्यक्तिमत्वाची असते. अशा नेतृत्वाने साद दिल्यास त्याला प्रतिसाद दिला जातो म्हणून अशा नेत्याला सर्वसामान्य स्तरातून किंवा जनसामान्यातून अधिमान्यता प्राप्त होते आणि अनुयायी त्याचा मनापासून स्विकार करतात.

काही नेतृत्व प्रकारात गाजावाजा न करता शांतपणे प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या मागे राहून इतरांना प्रोत्साहित करत असतात. अशा प्रकारचे नेतृत्व औपचारिक किंवा स्पष्टपणे मान्य केलेली जबाबदारी स्विकारत नसते. त्याला दूरदृष्टी व उद्दिष्टांची जाणीव असते तसेच सामुहिक कृतींचे नेतृत्व स्विकारण्यासाठी योग्य व्यक्तिची निवड करते अशा नेतृत्वाला चळवळीचा नेता बनविते. सत्ता किंवा प्रतिष्ठा नसतानाही चळवळीस ऊर्जा देण्याचा प्रयत्न तसेच मार्गदर्शन करते. अशा नेतृत्वाच्या प्रकाराचा प्रभाव दीर्घकाळ टिकणारा असतो यालाच आपण अप्रत्यक्ष नेतृत्व असे म्हणतो. असे नेतृत्व चळवळीसमोर जाऊन प्रत्यक्ष नेतृत्व करणाऱ्यामध्ये समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न करत असते. यामध्ये नेतृत्वाचे यश हे जनसामान्यात जाऊन किती प्रभाव निर्माण केला व ती चळवळ दमदारपणे कशी चालू ठेवली यावर अवलंबून असते. काही नेत्यांच्या मृत्यूनंतरही त्यांचे अनुयायी दाखविलेल्या दिशेने चळवळी चालू ठेवतात. उदा.रामकृष्ण मिशन मधील काम,

दलितासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले कार्य हे नेते निघून गेल्यानंतर सुद्धा सुरू आहे. नेता मरण पावल्यानंतर त्यांचे काम जोमाने पुढे जात असेल तर नेता व अनुयायी यांच्या संबंधातील विश्वासार्हता व उत्कटता आपणाला अनुभवयास मिळत असते. नेता सातत्याने लोकांचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न करीत असतो. जनसामान्यही आपल्या अपेक्षा नेत्याकडून पूर्ण होतील अशी आशा बाळगातात. नेताही जनतेच्या निष्ठा संपादन करण्याचा प्रयत्न करीत असतो. नेतृत्व प्रसारमाध्यमे, वृत्तपत्रे, दूरदर्शन, आकाशवाणी इ. साधनांचा प्रभावीपणे वापर करत असतात.

अ. जनतेची नेत्यासंबंधीची मते :

१. नेता समूहाला सदस्य असला पाहिजे :

यशस्वी नेत्याचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की नेते काही विशिष्ट गोष्टी त्यांच्या समूहातील सदस्यामध्ये देवाणघेवाण करीत असतात. नेत्याला 'आपल्यामधील एक' समजला जातो 'परका' नव्हे. समूहातील व्यक्तिला बाहेरच्या व्यक्तिच्या सहाय्याने स्वत:ला ओळखणे खूपच अवघड जाते. ब्राऊन यांच्यामते ज्या समूहाचा नेता नेतृत्व करणार आहे त्या समूहाचा तो सदस्य असलाच पाहिजे. सर्व संघटित समूहात असा ठराव केला जातो की अधिकाऱ्यांना समूहाचे सदस्यत्व असलेच पाहिजे. सामाजिक, मानसिक दृष्टया सभासद व्यक्ती ही गोष्ट यापेक्षा वेगळी आहे. म्हणजे व्यक्तिकडे अशा प्रकारचे दृष्टीकोण व प्रतिक्रिया असतात की जे त्या समूहामध्ये समान असतात.

२. नेता आपल्या सर्वामधीलच असावा :

नेत्याजवळ फक्त समूहाचे सदस्यत्वच असणे महत्वाचे नाही, तर त्याने विशिष्ट पद्धतीने मूल्ये आणि प्रामाणके जी समूहामध्ये मध्यवर्ती आहेत ती एकत्र केली पाहिजेत.

प्रस्थापित समूहामध्ये नेत्याचे कार्य काय असते हे खाली केलेल्या शेती नेतृत्वाच्या अभ्यासामधून स्पष्ट होते लॉयनबर्जर (Lionberger) यांच्या मते शेतीचे नेतृत्व करणारे नेते हे शेतीमध्ये नवीन प्रयोग करणारे होते. निक्लेनिंगनी ज्या समाजाचा अभ्यास केला त्या समाजातील शेतकरी नेते हे शेतीत नवीन प्रयोग करणारे नव्हते. तर समाजाची परंपरागत मूल्ये व प्रमाणके यांना महत्त्व देणारे होते. जर समाज सुधारणा आणि बदलांना महत्त्व देत असेल तर सुधारणा करणाराला त्या समूहाचा नेता म्हणून निवडले जाते. पण जर समाजाने सुधारणांना महत्व दिले नाही तर नेता मवाळ राहण्याची काळजी घेत असतो. नेतत्वाची 'थोरपुरूष' ही संकल्पना असे स्पष्टपणे प्रतिपादित करते की नेता आपल्या इच्छा समुहामध्ये आपल्या प्रभावाचा वापर करून लादू शकतो. परंतु दुसरा विचार असा सांगतो की समूह हा नेत्यापेक्षा सक्षम असतो, म्हणून त्याला समाजाने मान्य केलेली मूल्ये व प्रमाणके यांच्याशी जुळवून घ्यावे लागते. समूहात नेत्याचे काय स्थान असते हे फ्रेंच राज्यक्रांतीच्या नेत्यावरून स्पष्ट होते. जेव्हा नेत्याने समाजाला झपाटयाने पुढे जाताना पाहिले तेव्हा तो म्हणाला, 'मी त्यांचा नेता आहे, मला त्यांच्या पाठीमागे गेलेच पाहिजे नेत्याने समूहाची परंपरा, प्रमाणके, मूल्ये, ध्येये स्विकारलीच पाहिजेत आणि समूहाला त्याची उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी मदत केलीच पाहिजे.

३. नेता सर्वोत्तम असला पाहिजे :

नेता म्हणून एखाद्याची नेमणूक करताना त्याने केवळ समूहाची प्रमुख मूल्ये स्विकारली जाणे महत्त्वाचे नाही. तर जो कोणी नेता असेल तो फक्त सर्वोत्तम असला पाहिजे. कारण त्यालाच सर्वोत्तम व्यक्ती म्हणून ओळखले जाते व तो समाजाचा एक आदर्श नमूना असतो व तो पितसमान असतो. प्रभावी नियंत्रण आणि सुसंस्कार करण्यासाठी तो सर्वोत्तमच असला पाहिजे. जर नेता समूहाच्या अडचणी सोडविण्यात तज्ञ नसेल तर समूहाची उद्दिष्टे पूर्ण केली जाणार नाहीत किंवा अधिक प्रभावीपणे मिळावली जाणार नाहीत.

४. नेता अनुयायांच्या अपेक्षा पूर्ण करणारा असावा :

समुहातील सदस्यामध्ये नेत्याने कसे वागावे, त्याने कोणती कार्ये करावीत याबद्दल काही सामान्य कल्पना असतात. सदस्य अशाच व्यक्तिची निवड करतील की जो त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात यशस्वी होईल यावरून आपण असे म्हणू शकतो की नेत्याचे नेतृत्व हे त्याच्या अनुयायांच्या व्यक्तिमत्वावरती परिणामी होत असतो. अधिकारी म्हणून काम करणाऱ्या व्यक्ती जरी त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या व्यक्ती आणि त्यांच्यामधील सामाजिक अंतर कमी करून, लोकशाही नेतृत्वाची अपेक्षा करीत असले तरी बऱ्याचवेळा त्यांच्याकडून हुकूमशाही नेतृत्वासारखेच वर्तन होत असते. अनुयायांकडून पाळल्या जाणाऱ्या नेत्याच्या सर्व सूचना म्हणजे अनुयायांच्या आज्ञाधारकपणा नसून नेता आणि अनुयायांचे वर्तन असते. काही इतर समूहामध्ये किंवा संघटनेमध्ये शांत नेतृत्वालासुद्धा विचार प्रणालीने मान्यता दिलेली असते. म्हणून दबावतंत्राचा वापर करणारा नेता व त्याचे वर्तन समाजाकडून स्विकारले जाईलच असे नाही.

हुकूमशाही आणि लोकशाही नेतृत्वाचा अभ्यास करताना त्यामधून असे सूचित होते की लोकशाही नेतृत्व समुहाची उद्दिष्टे स्विकारण्यासाठी चालना देते व सभासदामधील आंतरसंबंध व समाधान यांच्यात वाढ करते. नेता म्हणून ज्या व्यक्तिला समाजमान्यता मिळवायची आहे त्यांना समूहातील सदस्यांनी आपल्यातीलच एक सर्वामधील एक सर्वोत्तम समजला पाहिजे. याशिवाय नेता अनुयायांच्या अपेक्षा आणि गरजा पूर्ण करणारा असाच पाहिजे. अशाप्रकारे लोकशाहीचे अनुयायी लोकशाही नेतृत्वाची मागणी करतात व हुकूमशाहीचे अनुयायी हुकूमशाहीचे नेतृत्वाची मागणी करतात.

नेतृत्व हे अंतरदृष्टि प्राप्त असले पाहिजे. नेत्याचे सामाजिक स्थान व व्यक्तिमत्व या घटकांवर भर दिला जातो. सामाजिक पार्श्वभूमी व नेत्याचे व्यक्तिमत्त्व हे अनुयायावर प्रभाव टाकणारे घटक आहेत. व्यक्तिच्या निरपेक्ष अध्ययनापेक्षा नेत्याच्या गुणवैशिष्ट्या राजकीय वर्तनाच्या नेतृत्वावर प्रभाव पडतो. नेतृत्व भिन्न गट व परिस्थिती यांचे प्रत्यक्ष संबंध व गुणवैशिष्टे यांनी मिळून नेतृत्व तयार होते.

ब. विशिष्ट संरचनेतील पुढारी अनुयायी यांचे संबंध :

लोकशाही पद्धतीत अनुयायाच्या मताला व मान्यतेला विशेष महत्त्व असते. विशेषत: गुप्त स्वरूपाच्या निर्भय मतदार आपल्या मताचा उपयोग करून पुढाऱ्यावर नियंत्रण ठेवू शकतो. मतदारांचा कौल पाहून पुढाऱ्यांना निर्णय घ्यावा लागतो. अविकसनशील देशातील पुढारी व अनुयायी यांचे परस्पर संबंध विकसित स्वरूपाच्या लोकशाही देशापेक्षा भिन्न स्वरूपाचे असतात. नेतृत्वाबद्दल त्यांच्या मनात एक प्रकारचा भक्तीभाव असतो.

१. भिन्न संरचनेतील पुढाऱ्यांचे परस्पर संबंध :

देशाच्या अंतर्गत भिन्न स्वरूपाच्या संरचना अथवा संस्था असतात. लोकशाही देशात वेगवेगळया पक्षातील पुढाऱ्यांचे संबंध स्पर्धात्मक स्वरूपाचे असतात. ते परस्परांवर टिका करतात. टिकाकारांचा दर्जा व त्यांची अभिरूची त्यांच्या व्यक्तिमत्वावर अवलंबून असते. दोन्हीही पक्षातील नेत्यांचे संबंध सौहार्देपूर्ण असतात. पण एखाद्या विशिष्ट घटनेमुळे त्यांच्यात तणावपूर्ण वातावरण निर्माण होते. उदा.बाबरी मशिद पाडल्यामुळे दोन पक्षातील संबंध तणावपूर्ण झाले.

२. नेतृत्व व अन्य संरचनेतील अनुयायी :

भिन्न राजकीय पक्षाच्या संरचनेत फरक असतो. प्रत्येक पक्षाचे नेतृत्व व त्यांचे विशिष्ट अनुयायी असतात. बहुतांशी प्रमाणात पुढारी व अनुयायी यांचे संबंध विशिष्ट हितसंबंधावर अवलंबून असतात. कोणत्याही पक्षाचे पुढारी दुसऱ्या पक्षाच्या अनुयायांचे पुढारीपण करू शकत नाही. उदा.मुस्लीम लीगचे पुढारी भारतीय जनता पक्षाचे नेतृत्व करू शकत नाही.

३. नेतृत्व व असंघटीत समुह :

नेतृत्व व अनुयायी व दोघांचे संबंध अयोग्य असून नेतृत्वाचे ते अभिन्न घटक आहेत. परंतु देशामध्ये पुढाऱ्यांना अनुयायी नसलेला असा असंघटीत अथवा कोणत्याही संलग्न नसलेला मोठा समूह असतो. त्याचे पुढाऱ्यांशी संबंध संकीर्ण स्वरूपाचे असतात. संख्याही बरीच मोठी असते. पण जो नेता समाजाला आकर्षित करतो तोच त्या समाजाचे नेतृत्व करू शकतो. उदा.१९७१ मध्ये इंदिरा गांधी यांनी गरीबी हटवा हा नारा दिला. त्यामुळे त्या सत्तेवर आल्या. पण १९७७ साली आणीबाणीच्या काळात निवडणूकीत प्रचंड पराभव पत्करावा लागला. म्हणजे उपरोक्त असंघटीत समूह हा इंदिराजींच्या नेतृत्वाला अनुकूल नव्हता. मतदार एखाद्या निवडणूकीत पक्षाला मत देतो म्हणजे त्या नेतृत्वाचा तो अनुयायी असतोच असे नाही. नेते लोकांच्या पाठिंबा मिळविण्याचा सतत प्रयत्न करत असतात. लोकही आपल्या अपेक्षा व मागण्या नेते पूर्ण करतील अशी आशा बाळगतात. जनतेच्या निष्ठा संपादन करण्याचा सतत प्रयत्न करतात. त्यासाठी संसूचनाची साधने वृत्तपत्रे, दूरदर्शन, आकाशवाणी इ.चा वापर प्रभावीपणे करतात. अशा कार्यात श्रेष्ठीजनांचा पुढाकार असतो.

नेडल यांनी श्रेष्ठीजन जनतेशी कोणत्या प्रकारे संपर्क साधून आपले वर्चस्व प्रस्थापित करतात. त्याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे दिले आहे.

१. सामाजिक प्रतिष्ठेच्या आधारावर श्रेष्ठीजन जनतेकडून सहजपणे लोकांचा पाठिंबा मिळतात. लोक त्यांच्या आज्ञांचे पालन करतात.

२. विशेषज्ञ म्हणजे वैज्ञानिक संशोधक कायदेतज्ञ, डॉक्टर इंजिनिअर त्यांना समाजातील लोकांवर नेहमीच विश्वास दर्शवतात.

३. ज्या व्यक्तीमध्ये प्रामाणिकपणे सचोटी, लोकाभिमुखता असते, त्यांना नेतृत्वाची संधी मिळते. लोक त्यांच्यावर श्रद्धा ठेवतात त्यालाच आपला नेता म्हणून स्विकार करतात.

थोडक्यात नेडलच्या मते जे जनसामान्यांच्या भावना ओळखून त्यांच्या प्रश्नांची, अडचणींची सोडवणूक करण्याचा प्रयत्न करतात असे लोक सामाजिक चळवळींच्या नेतृत्वात अग्रेसर राहतात.

मॅक्स वेबरने दैवीगुणाधिष्ठीत नेतृत्व व सत्ता यांच्यात भेद केला आहे. दैवी दैवीगुंणाधिष्ठित नेतृत्व म्हणजे व्यक्तिला तिच्या दैवी सामर्थ्यावर अनुयायांच्या विश्वासामुळे प्राप्त झालेले नेतृत्व होय. नेतृत्वामधील अलौकीक सामर्थ्य व अलौकीक गुणावर असणारा विश्वास यावर आधारलेले असते म्हणून हे नेतृत्व पूर्णपणे इतरांवर असणाऱ्या प्रभुत्वाचे निदर्शक आहे. गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त, पैंगबर यांच्यावर त्यांच्या अनुयायांची श्रद्धा आहे त्यामुळे त्या महापुरूषांचे त्यांच्या अनुयायावर असलेले प्रभुत्व ही एक प्रकारची सत्ता होय. या नेतृत्वावर श्रद्धेमुळे किंवा विश्वासामुळे त्यांचे ते अनुयायी बनतात व आपल्या नेत्याचा शब्द म्हणजे प्रमाण मानतात. दैवीगुणाधिष्ठित नेतृत्व हे क्रांतिकारी स्वरूपाचे असते. आपल्या नेत्यास कोणतीतरी अलौकीक शक्ती प्राप्त झालेली आहे.या श्रद्धेमुळे त्यांचे अनुयायी आदेशांचे पालन करतात. गौतम बुद्ध प्राचीन काळात जन्माला आले ते एक सर्व सामान्य व्यक्तिमत्त्वच होते. ते देवाचा अथवा धर्माचा प्रेषित नव्हते. तरीही तत्कालीन समाजव्यवस्थेने त्यांना नेता म्हणून सहज स्विकारले. गौतम बुद्धांनी धर्माचे व दैवी सत्तेचे अस्तित्व मान्य केले नाही. त्यांनी समाजाला जागृत करण्याचे कार्य केले त्यामुळे शेकडो लोक त्यांचे अनुयायी बनले. गौतम बुद्धांनी धर्म, वर्ण व्यवस्था यावर टिका केली आहे. हे त्यांचे विचार क्रांतिकारक होते म्हणून गौतम बुद्ध हे क्रांतिकारी नेतृत्व होते.

येशू ख्रिस्त, पैंगबर यांनी प्रस्थापित समाज व्यवस्थेच्या विरोधी विचार मांडले याचा त्यांना खूप त्रास झाला. पण ते स्थिर राहून एक स्वतंत्र तत्वज्ञान मांडले. दैवी गुणाधिष्ठीन नेतृत्व हे क्रांतीकारक असते. प्रस्थापित समाज व्यवस्थेच्या विरोधी असते म्हणून समाजात नेतृत्वाला कोणीही थांबवू शकत नाही उलट प्रस्थापित परंपरांना आव्हान दिले जाते. अनुयायी पूर्ण ताकदीने त्यांच्या पाठीशी उभे राहतात. कारण समाज अशा क्रांतिकारी नेतृत्वावर विश्वास ठेवून ते नेतृत्व स्विकारतात. ते विशिष्ट कार्य हे उद्दिष्ट मानतात आणि त्याच्या पूर्ततेसाठी सतत प्रयत्न करतात. येशू ख्रिस्त यांना विरोध असतानांही त्यांनी विचार सोडला नाही, छळ करणाऱ्या विरूद्ध रागावले नाहीत उलट प्रभूने छळ करणाऱ्याला क्षमा करावी अशी प्रार्थना केली गौतम बुद्ध हे राजपुत्र होते. पण खऱ्या ज्ञान प्राप्तीसाठी सर्वसुखांचा त्याग करून आपल्या उद्दिष्टापासून बाजूला झाले नाहीत शेवटी त्या ज्ञानांचा उपयोग लोककार्यासाठी व्हावा म्हणून प्रयत्नशील राहिले. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या राज्याची कल्पना मांडली व निश्चय करून स्वराज्याची स्थापना केली. हिंदवी स्वराज्याची स्थापना हे आपले जीवन कार्य मानले. या उदाहरणावरून जे महापुरूष समाजाचे नेतृत्व करतात ते अत्यंत प्रामाणिक व दुसऱ्यासाठी सर्व सुखांचा त्याग करण्यास तयार असतात. या नेतृत्वाच्या कार्यावर लोकांचा अढळ विश्वास असतो. नेतृत्व हे समाजामध्ये विश्वास निर्माण करते त्यामुळे विशिष्ट कार्य पूर्ण करून समाजात क्रांती घडून येते. उदा.हिटलरने वंशवाद व क्रौर्य या गोष्टींना महत्त्व देऊन हुकूमशाही प्रवृत्तीचे नेतृत्व केले तर गांधी, नेहरूनी मानवतावादी दृष्टीकोनातून समाजाचे नेतृत्व केले. अशा नेतृत्वाकडे समाज आकर्षित होतो त्यांना अनुयायांचा मोठा वर्ग लाभतो. जगात ज्या क्रांत्या घडून आल्या त्या दैवीगुंणाधिष्ठीत नेतृत्वामुळेच घडून आल्या असे म्हणता येईल.

स्वयंअध्ययन प्रश्न : २

१. प्रत्यक्ष नेतृत्व म्हणजे काय?

२. नेत्याचे नेतृत्व हे जनतेच्या कोणत्या गोष्टीवर परिणाम करणारी ठरते.

३. दैवी गुणधिष्ठीत नेतृत्व व सत्ता यांच्यात कोणी भेद केला.

४. दैवी गुणधिष्ठीत नेतृत्व हे कोणत्या स्वरूपाचे असते ?

(क) शासन संस्था, समाजातील दबावतंत्र आणि सामाजिक चळवळींची प्रक्रिया (The bearing of political institutions / forces and the process of social movement.)

सामाजिक चळवळ हा सामूहिक वर्तनाचा एक प्रमुख प्रकार म्हणून ओळखला जातो. सामाजिक चळवळींच्या अभ्यासाबाबत अलिकडच्या काळात भारतीय समाजशास्त्रां बरोबर पाश्चात्य समाजशास्त्रज्ञांचा देखील कल वाढत चालला आहे. सामाजिक चळवळींना चालना देणारे किंवा कोणत्याही समाजात सामाजिक चळवळींचा उगम होण्यापाठीमागे सामाजिक घटकांचा कशा प्रकारे संबंध असतो या संबंधीची माहिती सदरच्या उपघटकात आपण पहाणार आहोत.

✢ सामाजिक चळवळी आणि शासन संस्था यांच्यातील परस्पर संबंध :

कोणत्याही मानवी समाजात अनादिकाळापासून चालत आलेली 'शासन संस्था' एक महत्वाची आणि सार्वजनिक स्वरूपाची समाजिक संस्था म्हणून ओळखली जाते. भारतामध्ये सामाजिक चळवळीचा अभ्यास करत असताना, स्वातंत्र्यपुर्व कालखंडामध्ये ब्रिटीश राजवटीच्या कालखंडात, महात्मा गांधी यांनी सुरू केलेल्या राष्ट्रीय चळवळीचे स्वरूप, सर्वप्रथन अभ्यासणे गरजेचे आहे.

१) ब्रिटीश शासन विरोधातील राष्ट्रीय चळवळीचे स्वरूप :

भारताला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी ब्रिटीश शासन संस्थे विरोधात जी चळवळ सुरू करावी लागली. त्याला प्रामुख्याने भारतातील सांप्रदायिक वाद, शिक्षणाची व्यवस्था, जाती व्यवस्था आणि राजकीय जागृती हे प्रमुख घटक जबाबदार आहेत. ब्रिटीशांना आपले शासन टिकवून ठेवण्यासाठी त्यांनी भारतीय समाज व्यस्थे मध्ये नेहमीच जात, धर्म, समुदाय आणि प्रदेश या घटकांचा आधार घेवून विभाजन ठेवण्याचा प्रयत्न केला ब्रिटीशांच्या 'Divide and Rule' धोरणाचा परिणाम म्हणून स्वातंत्र्यपूर्व कालखंडात, हिंदू-मुस्लिम समुदायातील तणावामुळे सांप्रदायिकतेची समस्या निर्माण झाली होती. १८३५ मध्ये मॅकोलीच्या कालखंडात भारतामध्ये आधुनिक शिक्षणाचा पाया घातला गेला परंतू त्याचा फायदा भारतातील काही विशिष्ट वर्गानी घेतला होता.

वरील प्रकारच्या सामाजिक परिस्थितीचा परिणाम म्हणून ब्रिटीश शासनव्यवस्थेविरोधात, राष्ट्रीय चळवळीची सुरूवात होत होती. त्यानंतर २० जुलै १९०५ मध्ये लॉर्ड कर्झन या ब्रिटीश अधिकाऱ्याने बंगालची फाळणी केल्यामुळे, ब्रिटीशांविरोधात लढा अधिक तीव्र झाला. त्यानंतर ब्रिटीशांना विरोध करण्यासाठी म्हणून, स्वदेशी चळवळ सुरू झाली. बाळ गंगाधर टिळक यांनी या चळवळीला महत्त्व प्राप्त

करून दिले. महात्मा गांधी यांनी १९२० मध्ये अहिंसा आणि असहकाराची चळवळ ब्रिटीश शासना विरोधात सुरू केली. त्यानंतरच्या घटनेमध्ये ब्रिटीश अधिकारी 'सर मायकेल डोयर' यांनी १३ एप्रिल १९१९ मध्ये पंजाब राज्यातील अमृतसर ठिकाणच्या 'जालियनवाला बाग' हत्या प्रकरण घडवून आणले त्याचा रोष म्हणून महात्मा गांधीनी सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. अशा प्रकारे, स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील ब्रिटीश शासनव्यवस्थे विरोधात झालेला १८५७ चा उठाव त्याच प्रमाणे ब्रिटीशांची एकूण शासन करण्याच्या पद्धतीला विरोध म्हणून सामाजिक चळवळींचा उदय झालेला दिसतो.

२) स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शासन संस्था आणि सामाजिक चळवळी :

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये, भारतात असलेल्या लोकशाहीचा परिणाम म्हणून सामाजिक चळवळींना विशेष महत्त्व प्राप्त होते. कारण सामाजिक चळवळी म्हणजे 'सामूहिक कृतीचा लढा' असल्यामुळे लोकशाही मध्ये लोक संघटितपणे आपल्या हक्कासाठी चळवळी सारख्या माध्यमाचा उपयोग करतात. स्वातंत्र्य प्राप्ती पासून काँग्रेस पक्षाने अधिक तर शासन संस्थेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली असली तरी, कम्युनिस्ट आणि डाव्या पक्षानी अधिक तर चळवळींच्या माध्यमातून प्रस्थापित शासन व्यवस्थेच्या निर्णय आणि कार्य पद्धतीवर आक्षेप घेताना आंदोलनाच्या माध्यमातून विरोध केलेला दिसतो.

भारत हा शेती प्रधान देश असल्यामुळे स्वातंत्र्य प्राप्ती नंतर सत्तेवर आलेल्या शासन संस्थेने जमिन सुधारणा अंतर्गत अनेक प्रकारच्या कायदेशीर सुधारणांना अग्रक्रम दिला. त्यामध्ये कुळांना जमिनीचा मालकी हक्क देण्याबाबत आणि कमाल जमिन धारणा कायदा कसेल त्याची जमिन, शेत जमिनीची तुकडे जोड टाळण्यासाठीचा कायदा इ. मुळे जमिन सुधारणा होण्यास मदत झाली. परंतू कायदे करूनही शेती व्यवस्थेमधील जमिनदार आणि शेतमजूर या दोन वर्गातील अर्थिक विषमता कमी न झाल्याने, शेतमजूरांच्या चळवळी वाढू लागल्या याला प्रमुख कारण शासन संस्था किंवा शासन अंतर्गत असणारा जमिनदारांचा वर्ग केवळ श्रीमंत शेतकरी वर्गाचे हितसंबंध जोपासत आल्यामुळे शेती सुधारणा होऊन देखील, चळवळींचे प्रमाण वाढलेले दिसते.

स्वातंत्र्य पूर्वकाळात, काँग्रेस पक्षाचा शेतकऱ्यांच्या हितासाठी चळवळीत जो सहभाग होता तो स्वातंत्र्योत्तर काळात तो पक्ष सत्तेवर आल्याने कमी झाला. तसेच १९४८ ते १९५१ या कालखंडात कम्युनिस्ट पक्षावर भारत सरकारने बंदी घातली. त्याचा परिणाम शेतमजूरांच्या चळवळीवर झाला. काँग्रेस पक्ष सत्तेवर आल्यावर जमिनदारी निमूर्लन, कुळकायदे, कमाल जमिन धारणा इ. सारख्या योजनांच्या माध्यमातून निर्णय होवू लागला. परंतू त्यांना विरोध करणारा कम्युनिस्ट हा एकमेव पक्ष होता.

✢ १९६७ ची नक्षल वादाची चळवळ :

पश्चिम बंगाल मधील दार्जिलिंग जिल्ह्यातील सिलिगुडी तालुक्यात नक्षलवादी या संथाळ अदिवासींच्या गांवात शेतकऱ्यांनी जमिनदारां विरूद्ध १९६७ सालच्या मे महिन्यात उठाव केला आणि त्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या. नक्षलवादी चळवळीचा हा उगम होता. चारू मुरूमदार, कान सन्याल व जंगल संथाळ या नेत्यांनी या चळवळीचे नेतृत्व केले होते. त्यांच्यावर मार्क्स व लेनिन खेरीज चीनच्या

क्रांतीकारी माओ चा प्रभाव होता. या चळवळीचा आज देखील प्रभाव शासन संस्थेच्या कार्यावर दिसतो. ही चळवळ बिहार, पश्चिम बंगाल, आंध्रप्रदेश तामीळनाडू व महाराष्ट्रच्या काही प्रांतात आढळते.

✢ डाव्या राजकीय पक्षाची आंदोलने :

यामध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे किसान सभेचे कार्य, शेतकरी कामगार पक्षाचे कार्य, लालनिशाण पक्षाचे कार्य, समाजवादी पक्षाची शेतकरी शेतमूर पंचायत, १९७८ साली पुणे जिल्हातील खेड तालुक्यात शरद जोशी यांनी स्थापन केलेली शेतकरी संघटना, अशा विविध राजकीय पक्षांची भूमिका मुल्यता प्रस्थापित शासन व्यवस्थेच्या राज्य कारभारा विरूद्ध आणि त्यांनी घेतलेल्या शेतमजूरांच्या विरोधातील भूमिके बद्दलची होती.

३) अदिवासींच्या राजकीय स्वायत्ततेच्या चळवळी (Movements for Political autonomy) **:**

अदिवासींना राजकीय स्वातंत्र्य की, त्यांच्या राज्यांना स्वयंशासीत राज्य या अर्थाने काही घटनात्मक तरतूदी केलेल्या आहेत. परंतू अदिवासींनी अशा स्वरूपांची राजकीय स्वायत्ता मिळवण्यासाठी काही चळवळी केलेल्या होत्या त्यामध्ये . १) आसाममधील विद्यार्थी संघटनांची चळवळ, २) नागा अदिवासी जमातीची चळवळ, ३) मिझो नॅशनल फ्रंट, ४) खासी जमातीची चळवळ, ५) आसाम मधील बोदो चळवळ, ६) ओहम जमातीच्या चळवळी इ. सर्व अदिवासींच्या चळवळी मागे शासन व्यवस्थेचा सहभाग आणि अदिवासी समुदायाचे हितसंबंध जबाबदार असल्याचे आढळते.

✢ दबावतंत्र आणि सामाजिक चळवळी :

कोणत्याही मानवी समाजाचे एक अविभाज्य लक्षण असते ते म्हणजे 'परिवर्तन' होय. समाज हा परिवर्तनशील असतो. परंतू परिवर्तनाचे स्वरूप कसे असावे हा मात्र व्यक्तीवादी किंवा सापेक्ष स्वरूपाचा प्रश्न असतो. (Subjective) कारण, समाजात घडून आलेले परिवर्तन, समाजातील विशिष्ट समुदायाच्या हिताचे असले तरी, त्या परिवर्तनाचा तोटा किंवा विपरीत परिणाम समाजातल्या ज्या घटकांवर होणार असतो. तो मात्र परिवर्तनाला विरोध करीत असतो. त्यामुळे समाजिक चळवळी सारख्या 'दबावतंत्राचा' उपयोग करून परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न समाजामध्ये नेहमी सुरू असतो. समाजामध्ये अनेक प्रकारचे दबावतंत्र असतात की ज्याचा परिणाम म्हणून सामाजिक चळवळींचा समाजात उगम घडून येत असतो.

१) समाजातील उपेक्षित वंचित वर्गाच्या हितसंबंधाचा दबाव :

कोणत्याही मानवी समुदायामध्ये अर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, एक संघता नसते. त्यामुळे प्रत्येक समाज विविध स्तरामध्ये विभागलेला दिसतो. परंतू सामाजिक स्तरीकरणातून निर्माण होणाऱ्या सामाजिक विषमतेचा परिणाम म्हणून समाजात अनेक दबावगट (Forces) निर्माण होत असतात. उदा. सामाजिक विषमतेमधून निर्माण झालेली जाती व्यवस्था, अर्थिक विषमते मधून निर्माण झालेली गरिब श्रीमंत विषमता इ. प्रकारची विषमता दबाव गटांना जन्म देत असते. कारण समाजामध्ये विषमतेच्या माध्यमातून निर्माण होणारा शेतमजूर, दलित, कामगार, महिला यांच्या सारख्या उपेक्षित किंवा वंचित वर्ग, नेहमी आपल्यावर होणाऱ्या

अन्याया विरूद्ध संघटितपणे, लढा देण्यासाठी चळवळींच्या माध्यमातून दबावतंत्राच्या स्वरूपाचे दबावगट समाजात सर्वच ठिकाणी असतात.

२) प्रस्थापित शासन व्यवस्थे विरूद्धचा दबाव :

प्रस्थापित शासन व्यवस्थेची विचारसरणी त्यांच्या एकूण राजकारभाराची पद्धत, त्यांचे निर्णय, कशा स्वरूपाचे आहेत. या वरून सामाजिक चळवळींना चालना मिळते. कारण, भारतासारख्या लोकशाही सारख्या देशात संसद ही जरी प्रमुख निर्णय घेणारी संस्था असली तरी, अशा निर्णय प्रक्रियेला जनता जाब विचारू शकते. त्यामुळे दबावतंत्राच्या माध्यमातून चळवळी स्थापन करून योग्य ते निर्णय घेण्यास काही दबाव गट कार्यरत असतात. उदा. आरक्षण, तेलंगणा सारख्या स्वतंत्र राज्याची मागणी किंवा सिमाप्रश्न विकास प्रकल्पा विरोधातील चळवळी, मानवी हक्क आणि समाजातील भिन्न-भिन्न समुदायांचे हितसंबंध जोपासण्यासाठी प्रस्थापित शासन व्यवस्थेच्या कार्य प्रणालीवर दबाव आणण्यासाठी सामाजिक चळवळींचा उपयोग केला जात असतो.

३) वेगवेगळ्या संस्कृती आणि त्यांचा दबाव :

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये वेगवेगळ्या सांस्कृतिक घटकांचा दबाव अधिक आढळतो. कारण भारतामध्ये सांस्कृतिक विविधता अधिक आहे. धर्म, जात, लिंग, वंश, प्रादेशिकता इ. क्षेत्रात विविधता असल्याने त्या-त्या क्षेत्रातील दबावगट सामाजिक चळवळींच्या माध्यमातून दबाव आणण्याचा प्रयत्न करतात. उदा. अदिवासी संस्कृती आपल्या सांस्कृतिक घटकाचेजतन करण्यासाठी संघटित लढा देतात, शेती, संस्कृतीशी संबंधित असणारे शेतकरी आंदोलनाद्वारे दबाव आणतात. तालेबान सारखी धार्मिक चळवळ आपल्या सांस्कृतिक घटकांचे रक्षण करण्यासाठी दबाव आणते. ग्रामीण संस्कृती आपल्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी शहरातील विकास प्रकल्पा विरूद्ध आंदोलन करते.

४) स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातून येणारे दबाव :

समाजामध्ये अनेक प्रकारच्या स्वयंसेवी संस्था समाजाचे अनेक प्रश्न आणि हित संबंध जोपसण्यासाठी प्रयत्नशील असतात. उदा. वाढत्या औद्योगिककरणानंतर पर्यावरणाच्या विनाशातून ज्या, मानवी आरोग्याच्या समस्या सर्वत्र आढळून येवू लागल्या तेंव्हा अनेक पर्यावरणवादी संघटना, एकत्रितपणे चळवळीच्या माध्यमातून शासन व्यवस्थेवर दबाव आणण्याचा प्रयत्न करू लागल्या. त्यांनी शासनाच्या अनेक विकास आणि औद्योगिक प्रकल्पांना चळवळीच्या माध्यमातून विरोध केला. उदा. मेघा पाटकर यांची नर्मदा बचाव आंदोलन किंवा सुंदरलाल बहुगूणा यांची चिपको आंदोलन इ. या खरेदी, मानवी हक्क, एड्स, झोपडपट्टी किंवा अन्य इतर मानवी सार्वत्रिक प्रश्नांच्या माध्मातून स्वंयसेवी संस्था एक दबावगट म्हणून चळवळीच्या माध्यतातून पुढे येत आहेत.

५) विविध स्तरावरील समुदायांच्या माध्ययातून येणारे दबाव :

भारतामध्ये असणारे वेगवेगळ्या धार्मिक अल्पसंख्याक समुदाय आणि त्यांच्या शासनाकडून असणाऱ्या अपेक्षा अनुसूचित जाती, जमाती, इतर मागास वर्गीय, महिला, ग्रामीण आणि शहरी समुदायातील अनेक

प्रकारच्या समस्यांच्या माध्यमातून असणारा समस्याग्रस्त समुदाय आपल्यावर होणारा अन्याय किंवा आपल्या हक्कासाठी सतत लढा देण्याचा प्रयत्न करतो. परंतू असा लढा देत असताना संघटीतपणे चळवळीच्या माध्यमातून आपले उद्दिष्ट गाठण्याचा त्यांचा नेहमी प्रयत्न असतो. उदा. महिला चळवळ आणि आरक्षण मराठा आरक्षण चळवळ, ग्रामीण शेती समस्यातून निर्माण झालेले शेतकरी आंदोलन शहरातील पर्यावरणवादीची चळवळ अशा अनेक प्रकारच्या समुदायांच्या दबावामुळे चळवळी निर्माण होतात.

२.२.४ सामाजिक चळवळी आणि सामाजिक परिवर्तन यांच्यातील परस्पर संबंध :

सामूहिक प्रयत्नातून समाजव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणणे हा चळवळीचा मुख्य उद्देश असतो. परिवर्तन घडविणे किंवा परिवर्तन थांबवणे हे या दोन्ही गोष्टी चळवळीमध्ये असतात. सामाजिक व्यवस्थेत आंतरिक तणाव आणि आवश्यकता निर्माण झाल्यास सामाजिक चळवळी निर्माण होतात. प्रत्येक सामाजिक चळवळ ही परिवर्तनाशी सलग्न असते. मग ते परिवर्तन संपूर्ण असो, आंशिक असो किंवा तत्कालिन व क्षुल्लक स्वरूपाचे असो, सामाजिक चळवळ विशिष्ट परिस्थितीत मध्यस्थ सामुहिक जाणीव जागृती आणि संबंधित दबाव आणण्याचे कार्य त्यांच्या माध्यमातून करतात. सामुहिक एकत्रित कृतीतूनच सामाजिक चळवळी कार्यरत असतात. समाजातील जास्तीत जास्त सामाजिक परिवर्तने ही संघटित कृतीतून उद्भवणाऱ्या चळवळीतूनच झालेली आहेत.

जेव्हा सामाजिक चळवळीमुळे सामाजिक परिवर्तन होते तेव्हा समाज व्यवस्था, त्या चळवळीने उचलून धरलेल्या प्रामाण्य तसेच मुद्दयांशी तडजोड करते.

समाजात कोणत्याही स्तरात मोठया प्रमाणावर सामाजिक व आर्थिक बदल घडविण्यासाठी साम, दाम, दंड यांचा वापर करून धोरण स्विकारण्याची तयारी ठेवण्यास चळवळ निर्माण होत असते. समाजातील असंतोषाची भावना, चळवळीला प्रेरणा देणारी स्थिती, गती देणारे नेतृत्व यामुळे चळवळ पुढे जात असते. तसेच चळवळीतील मुख्य भूमिका, कामावरची निष्ठा, उद्देशबद्दल श्रद्धा यांना महत्त्व असणे चळवळीत विचारधारा, पर्याय , कार्यक्रम, नेतृत्व व संघटना हे मुख्य अंग आहेत. सामाजिक चळवळीचा संबंध समाज रचनेशी असतो. सामाजिक चळवळीने सामाजिक परिवर्तन घडवून आणले जाते. परिवर्तन घडविण्यासाठीच सामाजिक चळवळ उभी केली जाते. विशिष्ट परिस्थितीत सामाजिक चळवळींची निर्मिती होत असते. सामाजिक परिवर्तन हाच सामाजिक चळवळीचा मुख्य उद्देश असतो. यावरून परिवर्तन व सामाजिक चळवळीच्या कार्याची व परस्पर संबंधाची कल्पना लक्षात येते.

सामाजिक चळवळी व सामाजिक परिवर्तन यांच्यातील असलेल्या परस्पर संभाधाबाबतचे आणखी स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देता येईल.

सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी अनेक घटक कारणीभूत आहेत. जीवशास्त्रीय घटक आणि प्रवृत्ती संबंधी घटक यामुळेही सामाजिक परिवर्तन घडून येते. वाढते आयुर्मान, स्त्री पुरूषांचे लोकसंख्येतील प्रमाण इ. घटकांचा परिणाम सामाजिक परिवर्तनावर होवू शकतो. लोकांची मनोवृत्ती, त्यांचा मानसिक कल, प्रवृत्ती यामुळे त्यांच्या विचारसरणी तसेच आचरणावर व पर्यायाने सामाजिक परिवर्तनावर परिणाम होतो. समाजशास्त्रज्ञ गिलिन आणि गिलिन यांनी पाच घटक सामाजिक परिवर्तनास कारणभूत असतात असे म्हटले

आहे. सामाजिक चळवळी सामाजिक संरचनेत परिवर्तनासाठी निर्माण केल्या जातात. सामाजिक परिवर्तनाची अनेक कारणे असू शकतात. ज्याप्रमाणे औद्योगिकीकरण, शहरीकरण, पाश्चिमात्यीकरण, आधुनिकीकरण, संस्कृतिकरण या प्रक्रियामुळे मानवी समाजात परिवर्तन घडून येताना दिसते. अशाच कारणापैकी सामाजिक चळवळ सुद्धा सामाजिक परिवर्तनास कारणीभूत आहेत. समाजात प्रामुख्याने दोन प्रकारे परिवर्तन घडते. एक बाह्य घटकामुळे व आंतरिक घटकामुळे बाह्य घटक भुकंप, वादळ, महापूर, दुष्काळ इ. घटकांनी समाज परिवर्तन घडते. तसेच आंतरिक घटकांमुळे बाह्य घटक भुकंप, वादळ, महापूर दुष्काळ इ. घटकांनी समाज परिवर्तन घडते. तसेच आंतरिक परिस्थितीत समाजातील सदस्यांकडून परिर्वतन घडते. म्हणजे समाज व्यवस्थेतील घटक परिवर्तनास जबाबदार राहतात. उदा. समाजातील चळवळ हे एक समाज परिवर्तनाचे साधन आहे. जे समाज व्यवस्थेशी संबंधित आहे. समाजात विचाराचे आदानप्रदान होऊन एका विशिष्ट विचारावरती ते संघटीत होतात, आंदोलने करतात. त्यातून घटक परिवर्तनास जबाबदार असतात. सामाजिक चळवळी निर्माण होण्याची संभावना असते.

गाय रोचर : (Guy Rocher) :

यांच्या मते, समाजात ज्या सामाजिक चळवळी आहेत त्या समाजातील स्वीकृत मूल्यांशी सलग्न असतात व त्यांची निश्चित स्वरूपात कोणती ना कोणती मागणी असते. ती मागणी सभासदांच्या हितसंबंधाशी सलग्न असते व ती सभासदांना मान्य असल्याने ते संघटित होऊन सामूहिक प्रयत्न करत असतात. जनसामान्यातून ती मागणी पुढे येत असते व त्यातून समाजाला अपेक्षित परिवर्तन हवे असते.

लेविस किलियन : यांच्या मते, सामाजिक चळवळीत व्यक्तीला अशी एक प्रबळ भावना असते की त्याच्यामुळे सामुहिक कृतीद्वारा समाजात व्यापक स्वरूपाचे परिवर्तन घडावे अशी अपेक्षा असते.

अलायन टुरेन : यांच्या मते सामाजिक परिवर्तन सामाजिक चळवळीद्वारा कसे घडवून आणले जाते. ते पुढीलप्रमाणे :

१. चळवळीच्या ओळखीचे तत्व : (Principle of Identity)

चळवळ कोणत्या विशिष्ट लोकांच्या हितसंबंधांचे प्रतिनिधीत्व करते हे महत्त्वाचे आहे. उदा. महिला चळवळ, कामगार चळवळ इ. विशिष्ट गट किंवा समूहासाठी या चळवळी आहेत. विशिष्ट गटाशी त्याचे हितसंबंध आहेत. उदा.भ्रष्टाचार, भाव वाढ विरोधी चळवळ, समाजातील सामुहिक हितसंबंधी या चळवळी निर्माण होतात.

२. विरोधी तत्व : (Principal of Opposition)

सामाजिक चळवळ ही काही लोक गट किंवा व्यवस्था यांच्या विरोधात असते. यामध्ये कोणत्या कारणासाठी विरोध होतो हे समजावून घेणे गरजेचे आहे.

३. संपूर्णतेचे तत्त्व (Principal of Totality)

समाजामध्ये ज्या सामाजिक चळवळीच्या माध्यमातून परिवर्तन घडवून आणले जाते. ती चळवळ व्यापक स्वरूपाची असल्याने पायाभूत परिवर्तन करणारी असते. अशी चळवळ उच्च आदर्श व मूल्यांशी संबंधित असते.

आधुनिक समाजात चळवळी सामुहिक कृतीतून उद्‌भवलेल्या असतात. याबाबत अलायन टुरेन यांनी पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले आहे.

१. मध्यस्थी (Meditation)

सामाजिक चळवळ ही समाजव्यवस्था आणि व्यक्ती यांच्यामधील दुवा म्हणून कार्य करीत असते. कोणत्याही एका व्यक्तीला परिवर्तन अशक्य असते. पण एकाच मूल्यावरती अथवा अधिकारावरती प्रेरित होऊन अनेक व्यक्ती अथवा सदस्य एकत्र येऊन सामुहिक कृती करतात तेव्हा चळवळ निर्माण होऊन परिवर्तन अपेक्षित असते. मध्यस्थ या भूमिकेतून समाजाला वास्तव स्थितीची जाण करून देतो आणि आंदोलनाची गरज समजावून देऊन व्यवस्थेत निर्माण होणारे अडथळे किंवा समस्या दूर करण्याचा प्रयत्न करतो व जनसामान्यांचा सहभाग वाढविण्याचा प्रयत्न केला जातो.

२. जाणिवांचे स्पष्टीकरण (Awareness Explanation)

समस्या अडथळयासंबंधी समुहात कोणत्या जाणिवा आहेत, त्या प्रकट स्वरूपात लोकांसमोर मांडून त्यांचे जनमत तयार करावे लागते. त्यामुळे लोकांच्या त्या प्रश्नासंबंधी जाणीवा स्पष्ट होऊन लोकमत तयार होत असते. संघटीत होऊन सामुहिक कृती सदस्यांकडून केली जाते. उदा.कार्लमार्क्सने पिडीत कामगारांच्या भावनांचा विचार करून वर्ग संघर्ष करावयास त्यांना प्रवृत्त केले व भांडवलदारांशी लढण्याची चेताना त्यांना दिली. हे चळवळीचे प्रमुख कार्य मानले जाते.

३. दबाव (Pressure)

लोक ज्यावेळी संघटीत होतात व सामुहिक कृतीसाठी प्रवृत्त होतात. तेव्हा प्रस्थापित वर्गावर दबाव आणतात. प्रस्थापित वर्ग बळाचा वापर करून विरोध करतात. पण त्या विरोधाला न जुमानता सत्ताधाऱ्यावर दबाव टाकून उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न सामाजिक चळवळीतून होत असतो.

जेम्स बी मॅकी :

सामाजिक चळवळीकाराने तीन प्रकारे परिवर्तन घडते असे सांगितले आहे. समाजव्यवस्थेत संपूर्ण परिवर्तन घडते. उदा.सोव्हियत रशियातील क्रांती तसेच चळवळीमुळे आंशिक परिवर्तन घडते त्यामुळे सुधारणा घडून येते. उदा.जातीभेद, अस्पृश्यता यामध्ये आंशिक परिवर्तन घडून येते. तसेच चळवळीमुळे अत्यल्प प्रमाणात परिवर्तन घडून येते. त्यामध्ये उदा.विद्यार्थ्यांच्या चळवळी, फी माफी, परीक्षासंबंधी.

ऑगबर्न :

संस्कृतीसंबंधी सांस्कृतिक मागासलेपणाचा सिद्धांत मांडला आहे. भौतिक संस्कृती व अभौतिक संस्कृती यामध्ये भौतिक संस्कृतिचा विकास जलद गतीने होत असतो. मात्र अभौतिक संस्कृतीचा विकास मंद गतीने होत असतो. दोन्हीही संस्कृतीचा विकास समान व्हावा अशी अपेक्षा असताना ते घडत नाही. त्यामुळे परिवर्तनासाठी चळवळी निर्माण होतात.

लेविस किलीयन:

सामाजिक चळवळींचा समाजावर किती प्रभाव पडतो याचे विश्लेषण केले आहे. काही चळवळी स्वप्नवादी असतात त्यांचा समाजावरती काही प्रभाव पडत नाही. पण एक सामाजिक गटाची निर्मिती होत असते. परंतु यांच्यातून भविष्यात एखादी चळवळ विशिष्ट विचारातून किंवा तथ्यातून जन्माला येते व ती एक शक्तीशाली चळवळ होऊ शकते. काही चळवळी मुल्यावर आधारित असतात ती मूल्य आदर्शात्मक स्तरावरच राहतात. उदा.सर्वोदय चळवळ समाजात तिचे स्थान मोठे आहे. लोक मूल्य स्विकारतात पण तिचे संस्था रूपात जतन करून ठेवतात. मात्र समाजवर त्याचा फारसा परिणाम झाल्याचे दिसत नाही. उदा. समानता, सर्वधर्म समभाव, धर्मनिरपेक्षता, या मूल्यांचा लोक स्विकार करतात. त्यात सामीलही होतात. पण फारसे साध्य होत नाही. कारण नेत्यामध्ये परस्पर विरोध किंवा फुट असल्याने फारसे यश संपूर्ण सामाजिक स्तरावरती मिळत नाही. प्रत्येक सामाजिक चळवळीमुळे समाजामध्ये सामाजिक परिवर्तन घडून येईल असे नाही. पण प्रत्येक चळवळ सुरू असताना पुढील प्रक्रिया घडत असतात.

१. नेतृत्वात परस्पर प्रक्रिया घडते.

२. नेता व अनुयायी यांच्यामध्ये आंतरक्रिया घडत असतात.

३. अनुयायी व विरोधक यांच्यात आंतरक्रिया घडत असतात.

४. अनुयायांच्यात प्रक्रिया घडत असतात. यांच्यातील आंतरक्रियेमुळे सामाजिक चळवळीचे स्वरूप बदलू शकते. याच आधारावर एम.एस.ए.राव यांनी सामाजिक चळवळीचे दोन प्रकार केले आहेत.

१. सुधारणावादी चळवळ :

या चळवळीत फारसे यश आलेले नसते. पण थोडया प्रमाणात यश आलेले असते.

२. क्रांतीवादी चळवळ :

यामध्ये मात्र समाजाच्या संरचनेत पूर्णपणे परिवर्तन घडून आलेले असते.

सामाजिक चळवळी आणि सामाजिक परिवर्तन यांच्यातील आंतरसंबंध

(Interrelation between Social Movement & Social Change)

समाजातील असंतोष आंतरिक तणाव निर्माण झाल्यास सामाजिक चळवळीची निर्मिती होते. सामाजिक चळवळीमुळे समाजातील अन्याय असंतोष दूर होऊन समाजातील समानता, न्यायप्रियता वाढते. प्रत्येक

चळवळीचे उद्दीष्ट समाजात न्यायकारक परिवर्तन घडावे हे आहे. म्हणून प्रत्येक चळवळ ही परिवर्तनाशी संलग्न असते. मग ते परिवर्तन संपूर्ण असो अंशिक किंवा तात्कालीन असो. सामाजिक चळवळ ही मध्यस्थाची भूमिका, सामुहिक जागृती निर्माण करण्याची भूमिका व तसेच दबाव गट निर्माण करण्याचे काम करत असते. समाजातील सामुहिक परिवर्तने ही सामुहिक व संघटीत कृतीतून निर्माण झाल्याची उदाहरणे आहेत. सामाजिक चळवळीमुळे सामाजिक परिवर्तन होते. तेव्हा समाज व्यवस्था चळवळीमुळे मूल्यांशी सुसंगत असेच समायोजन करण्याचा प्रयत्न करते. जर सामाजिक चळवळ यशस्वी झाली तर त्यातून नविन प्रबळ अशाच चळवळींचा जन्म होतो व त्यातून नविन समाज व्यवस्थेचाही प्रारंभ होऊ शकतो.

सामाजिक चळवळीतून संभाव्य परिवर्तन होऊ शकते. सामाजिक चळवळीमुळे नविन सामाजिक संबंध प्रस्थापित होतात. सामाजिक प्रमाणके व मूल्ये समाज स्वीकारतो. चळवळीच्या नेतृत्वाला नविन मान्यता मिळते. समाजात स्थावर दर्जा प्राप्त होतो. जुन्या व्यवस्थेत नव्हे तर समाज व्यवस्थेत संपूर्ण किंवा अंशिक परिवर्तन होते. काही वेळेला गुणात्मक परिवर्तन होते. तर काही समाज व्यवस्थेवर नविन आव्हाने किंवा धोका निर्माण होतो. अनेक चळवळीनंतर नविन संस्थांची निर्मिती होत असते. चळवळीमुळे नविन संरचना अस्तित्वात येते चळवळीमुळे सामाजिक परिवर्तनाशी जवळचा संबंध निर्माण होतो.

स्वयंअध्ययन प्रश्न ३

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. सामाजिक चळवळ आणि सामाजिक परिवर्तन यामध्ये कोणते साम्य आहे?

२. सामाजिक चळवळ केव्हा यशस्वी होऊ शकते?

३. चळवळीचे यशापयश कशावर अवलंबून असते?

४. सामाजिक चळवळी केव्हा संपुष्टात येतात?

२.३ सारांश

जेव्हा दोन पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतात तेव्हा त्यात आपल्याला नेता आढळून येता. जेव्हा व्यक्तींचा एखादा गट निर्माण होतो तेव्हा निश्चितच त्यामध्ये एखादी व्यक्ती नेतृत्व करते ती इतरांपेक्षा सक्रीय, वर्चस्व गाजवणारी असते. सामाजिक कार्यात पुढाकार घेऊन श्रेष्ठ पदावर पोहोचण्याची क्षमता असलेले नेतृत्व करू शकतात. परिस्थिती कोणतीही असो अन्यायावर मात करण्यासाठी जनतेला प्रेरीत करून कार्य करणारी व्यक्ती नेतृत्व चांगल्या पद्धतीने करू शकते. सामाजिक चळवळीमध्ये नेतृत्वाला अतिशय महत्त्व असते. तरच चळवळीचे कामकाज व्यवस्थितपणे पार पडू शकते. प्रभावी नेतृत्व समाजामध्ये योग्य ते परिवर्तन घडवून आणू शकतात.

नेता लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आपली भूमिका किती प्रमाणात व कशा प्रकारे पार पाडतो यावर त्या सामाजिक चळवळीचे यश अवलंबून असते. नेतृत्व ही आजची काळाची गरज आहे.

मॅक्स वेबरच्या मते परंपरागत नेतृत्व, वैधानिक नेतृत्व व करिश्माई नेतृत्व हे नेतृत्वाचे तीन आदर्श प्रकार आहेत. त्याचबरोबर हुकुमशाही नेतृत्व व लोकशाही नेतृत्व हेही प्रमुख दोन प्रकार आहेत. हुकुमशाही नेतृत्व इतर सदस्यांना कामकाजात सहभागी करून घेत नाहीत. तर लोकशाही नेतृत्व मात्र इतर सर्वांना सहभागी करून कार्य संपन्न करत असते. प्रस्थापित समाज व्यवस्थेत योग्य ते परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न नेता नेहमीच करत असतो.

सामाजिक चळवळ व सामाजिक परिवर्तन या दोन्ही परस्परांना पुरक अशा सामाजिक संकल्पना आहेत. सामूहिक प्रयत्नांतून समाज व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणलेला सामाजिक चळवळींचा मुख्य उद्देश असतो. अर्थात परिवर्तन घडविणे किंवा परिवर्तन थांबवणे या दोन्ही गोष्टी सामाजिक चळवळी करत असतात.

सामाजिक चळवळ म्हणजे एक प्रकारचे सामूहिक वर्तनच असते. चळवळीत विशिष्ट विचारसरणी, शिस्त व व्यवस्था या गोष्टी आढळतात. सामाजिक चळवळींचे स्वरूप हे नेता आणि अनुयायी यामध्ये असणाऱ्या संबंधातून ठरत असतात. नेतृत्वाला सामाजिक चळवळीत महत्त्वाचे स्थान असते. कारण चळवळीचे यशापयश नेतृत्वावर अवलंबून असते. सामाजिक चळवळी अनेक प्रकारच्या असतात व त्या सर्व समाजाच्या परिवर्तनासाठी आवश्यक असतात.

२.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययन प्रश्न १

अ. १. जी व्यक्ती समुहाचा पुढाकार घेऊन नेतृत्व करते त्याला नेता म्हणतात.

२. समाजातील लोकांच्या मनोवृत्ती प्रभावित करण्याचे काम करणाऱ्यास नेतृत्व असे म्हटले जाते.

३. जे नेतृत्व समूहातील इतर सदस्यांना चर्चा, विचारविनिमयात सहभागी करून घेते त्या नेतृत्वाला लोकशाहीवादी नेतृत्व म्हणतात.

४. लेविन यांनी नेत्याला गेटकिपर म्हटले आहे.

५.



ब. १. समूहाच्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी नेत्याला समन्वयकाची भूमिका बजावावी लागते.

२. सामाजिक सुधारणेच्या चळवळीत वैधानिक प्रकारचे नेतृत्व कार्य करत असते.

स्वयं अध्ययन प्रश्न २

१. समाजासाठी समूहाच्या बाहेर येऊन कृती किंवा ठोस कार्यक्रम राबविण्यास पुढाकार घेणे यास प्रत्यक्ष नेतृत्व म्हणतात.

२. नेत्याचे नेतृत्व हे जनतेच्या व्यक्तीमानावरती परिणाम करते.

३. मॅक्स वेबर यांनी दैवीगुणधिष्ठित नेतृत्व व सत्ता यांच्यात भेद केला.

४. दैवीगुणधिष्ठित नेतृत्व हे क्रांतीकारी स्वरूपाचे असते.

स्वयं अध्ययन प्रश्न क्र.३

१. समाज व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणणे हे सामाजिक चळवळ व सामाजिक परिवर्तन यांच्यामध्ये साम्य आहे.

२. जेव्हा आर्थिक पाठबळ असते तेव्हा सामाजिक चळबळ यशस्वी होऊ शकते.

३. चळवळींचे यशापयश हे नेतृत्वावर अवलंबून असते.

४. समुहाचे उद्दिष्ट प्राप्त झाले नंतरच सामाजिक चळवळी संपुष्टात येतात.

२.५ सरावासाठी स्वाध्याय

१. नेतृत्व म्हणजे काय ते सांगून सामाजिक चळवळीत नेतृत्वाच्या भूमिकेचे स्पष्टीकरण द्या.

२. नेतृत्वाची व्याख्या देऊन नेतृत्वाचे प्रकार स्पष्ट करा.

३. सामाजिक चळवळीत नेता आणि जनता यांच्यातील परस्पर संबंध स्पष्ट करा.

४. सामाजिक चळवळी आणि सामाजिक परिवर्तन यांच्यातील परस्परसंबंध विशद करा.

५. सामाजिक चळवळी मध्ये सामाजिक परिवर्तनाचे महत्त्व विशद करा.

२.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. David, Krech, Richards, Crutochtield & Egerton, L. Ba Machey. Individual in Sociology, University of California, 1948.

२. Dr. M.N. Shrinivas, Social Change in Modern India, University of California Press, Berkely, 1966.

३. Yogendra Singh, Indian Sociology, Vistaa Publication New Delhi, 1986.

४. Shaha, Ghanshyam, Social Movements in India, Sage Pub., New Delhi, 1990.

५. Rao M.S.A., ‘Social Movements in India, New Delhi, Manohar, 1979.

६. डॉ.एस.जी.देगावकर डॉ.शैलजा देगावकर डॉ.जयमाला डुमरे, ’सामाजिक चळवळी परंपरागत आणि नवीन साईनाथ प्रकाशन, धरम पेठ, नागपूर, २००९

७. व्ही.एन.सिंह, जनमेजय सिंह, ‘भारत में सामाजिक आंदोलन’ रावत पब्लिकेशन्स, नवी दिल्ली, २००५.

✢ **संदर्भ :**

1) K. L. Sharma 'Indian Social Structure and Change' Rawat Publication on Jaipur 2011

२) यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, SOC 222 सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक आणि सामाजिक चळवळी April, 2002

3) Shankarrao C.N. 'Sociology of Indian Society' S.Chand & Company Ltd. New Delhi - 2004.

3) Nagala B.K. 'Indian Sociological Thought' Rawat Publication Jaipur - 2008.

५) महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास – भिडे, पाटील, थोरात, फडके प्रकाशन कोल्हापूर – २००५

❑❑❑

घटक – ३ (अ)

भारतातील पारंपारिक सामाजिक चळवळी

(Traditional Social Movements in India)

घटक – संरचना

३.१ प्रस्तावना

३.२ उद्दिष्टे

३.३ विषय – विवेचन

३.३.१ ब्राम्हो समाज

३.३.२ प्रार्थनासमाज

३.३.३ आर्य समाज

३.३.४ सत्यशोधक समाज

३.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ क्षेत्रीय कार्य

३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

३.१ प्रस्तावना (Introduction)

या घटकाद्वारे आपणास सामाजिक सुधारणा चळवळी ह्या इंग्रज काळापासून कशा सुरू झाल्या याची माहिती मिळणार आहे. पाश्चात्य संस्कृतीचा पगडा असून आपल्या समाजसुधारकांनी समाजातील अनिष्ट प्रथा-परंपरा नाहीशा करण्यासाठी केलेले प्रयत्न, समाजप्रबोधन कसे केले आहे याचा परिचय यात होणार आहे. तसेच समाजसुधारकांचे कार्य व वेळप्रसंगी त्यांनी कायद्याची केलेली निर्मिती याची माहिती मिळणार आहे. या घटकात ब्राम्होसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज व सत्यशोधक समाज या सर्वांचे निर्माते, त्यांची तत्त्वे, शिकवण व त्यांचे कार्य अभ्यासायला मिळणार आहे.

३.२ उद्दिष्टे (Objectives)

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणाला सामाजिक सुधारणा चळवळीच्या :

- ब्राम्हो समाजाची स्थापना त्याचे कार्य, शिकवण स्पष्ट करता येईल.
- प्रार्थनासमाजाच्या स्थापनेने समाजाला कोणकोणत्या गोष्टी मिळाल्या हे समजून येईल.
- आर्यसमाजाच्या निर्मितीने समाजाला सामाजिक, प्रबोधनाचा कोणता संदेश गेला हे अभ्यासता येईल.
- सत्यशोधक समाजाच्या अभ्यासातून अनिष्ट प्रथा-परंपरा कशा नष्ट करता येतील हे सांगता येईल.

३.३ विषय विवेचन (Presentation of Subject-matter)

या घटकामध्ये सामाजिक सुधारणा चळवळी म्हणजे काय? व त्या कोणकोणत्या चळवळी कोणत्या कालावधीत निर्माण झाल्या. त्याचे प्रवर्तक कोण आहेत या सामाजिक चळवळीतून त्यांनी ज्या चार समाजाची स्थापना केली त्या समाजाची तत्त्वे, उद्दिष्ट्ये, स्वरूप व त्या-त्या समाजसुधारकांनी केलेले कार्य याची सविस्तर माहिती यात मिळणार आहे. यासाठी या घटकाची रचना ही चार विभागात केली आहे ती म्हणजे.

अ) ब्राह्मोसमाज

ब) प्रार्थना समाज

क) आर्य समाज

ड) सत्यशोधक समाज

३.३.१ ब्राह्मोसमाज (Brahmo Samaj)

राजा राममोहन रॉय यांनी ब्राम्होसमाजाची स्थापना बंगाल येथे इ.स. १८२८ मध्ये केली. सामाजिक चळवळी व धार्मिक चळवळी यामधील ही पहिली चळवळ सामाजिक प्रबोधन करून जनजागृती करण्याच्या दृष्टीकोनातूनच निर्माण केलेली ही चळवळ आहे. इंग्रजांचा असणारा प्रभाव, त्यांची शिक्षणपद्धती व त्यातून भारतीय समाजावर पडणारा प्रभाव व त्यामुळे भारतीयांची जीवनपद्धती, विचार प्रणाली व समाजव्यवस्था याचा अभ्यास करून अनिष्ट प्रथा-परंपरांना नष्ट करण्यासाठी ब्राम्होसमाजाची स्थापना करून प्रत्येक शनिवारी सायंकाळी त्यांनी समाजातील लोकांना एकत्र करून उपनिषदांच्या बंगाली भाषेतील वाचन व प्रवचने दिली जायची त्यामुळे सनातनी हिंदु मंडळीकडून कडाडून टीका केली जायची.

राजा राममोहन रॉय यांना इंग्रजी, संस्कृत, ग्रीक, फ्रेंच, फारशी, अरबी, लॅटीन यासारख्या अनेक भाषा बोलता येत होत्या. त्यामुळे उच्च विचारसरणी व सामाजिक परिवर्तनाचा वसाच जणू घेतला होता. हिंदु धर्मातील अनिष्ट प्रथा-परंपरा, अंधश्रद्धा, कर्मकांड, मूर्तीपूजा, जातीव्यवस्था, बहुपत्नित्व व सतीची चाल इ. बाबींवर त्यांनी स्वत: प्रसिद्ध केलेले संवाद कौमुदी या साप्ताहिकातून बरेच परखड विचार मांडून ह्या गोष्टी

समाजाला कशा हानिकारक आहेत. याबाबत आपली स्पष्ट मते मांडली याबाबत त्यांना अनेक प्रकारचे विरोध झाले. पण त्याला न जुमानता आपले सामाजिक सुधारणांचे कार्य चालूच ठेवले व या नवयुगाचे अग्रदुत झाले.

राजा राममोहन रॉय यांना हिंदु धर्माचा खऱ्या अर्थाने शास्त्रीय बैठकीवर अभ्यास व्हावा असे वाटले म्हणून त्यांनी १८२५ मध्ये वेदांचा अभ्यास करण्यासाठी वेदांत कॉलेजची स्थापना केली. जनतेला प्रबोधन करताना त्यांची स्पष्ट मते होती की परमेश्वर हा एकच असून तो निर्गुण, निराकार आहे. त्यामुळे मूर्जीपूजा त्यांना मान्य नव्हती. एकेश्वरवाद व अनेकश्वरवाद निर्माण झाल्यावर एकेश्वर ही संकल्पना स्विकारली. ब्राम्हो समाजाचे सभासदत्त्व स्त्रीयांना देण्याबाबत ते आग्रही होते. स्त्रीयांसाठी नॉर्मल स्कूल व व्हिक्टोरिया इन्स्टिट्यूटची स्थापना केली. तंत्रनिकेतन सुरू केले. बहुपत्नित्त्व व सतीची चाल, बालविवाह ह्या पद्धती त्यांना मान्य नव्हत्या. लॉर्ड बेटिंकच्या सहकार्याने १८२९ मध्ये सतीप्रथा कायदा केला.

राजाराममोहन रॉय हे स्पष्टोक्ते होते. एकदा ते मोगल बादशहा अकबर च्या निवृत्ती वेतनात वाढ करावी म्हणून कंपनी सरकारकडे इंग्लंडला गेले. त्यांच्या या कार्याचे कौतुक करून बादशहाने त्यांना 'राजा' ही पदवी बहाल केली. त्यांच्या या कार्याची धुरा पुढे देवेंद्रनाथ टागोर, व केशवचंद्र सेन यांनी सांभाळली. कारण रॉय यांच्या अल्पावधीत म्हणजे २७ सप्टेंबर १८३३ मध्ये निधन झाले.

ब्राम्हो समाजाची तत्त्वे :

राजा राममोहन रॉय यांनी ब्राम्हो समाजाची काही प्रमुख तत्त्वे सांगितली ती पुढीलप्रमाणे –

१. परमेश्वर हा एकच असून तो निर्गुण–निराकार व सर्वव्यापी असा आहे

२. मूर्तीपूजा, कर्मकांड व अनेकश्वरवाद ही संकल्पना मान्य नसून एकेश्वरवादाचे मुख्य पुरस्कर्ते राजा राममोहन रॉय होते.

३. भारतीय समाजातील सतीप्रथा, जातीप्रथा, बालविवाह पद्धती यांना विरोध दर्शवून कायदेशीर समर्थन केले गेले.

४. ब्राम्होसमाजाने मानवतावादाचा पुरस्कार करून चारित्र्य, नैतिकता, सदगुण यावर विशेष भर दिल्याचे आढळते.

५. ब्राम्हो समाजाच्या प्रार्थनास्थळी होणारी प्रार्थना एकाच परमेश्वराची राहील. इतर कोणतेही फोटो, पुतळे,मूर्ती राहणार नाही. प्रार्थनास्थळ हे सर्व धर्मीयांसाठी खुले राहील.

राजा राममोहन रॉय यांचे शैक्षणिक कार्य :

पाश्चात्य शिक्षण पद्धतीप्रमाणे भारतातही शैक्षणिक प्रगती व्हावी, अशी इच्छा इंग्रजाकडे राजा राममोहन रॉय यांनी केली. शिक्षणाशिवाय जनतेच्या मनातील अंधश्रद्धा, अज्ञान कमी होणार नाही. ज्ञानाचा प्रसार होऊन वैचारिक दृष्टिकोनातून बुद्धीवादाचा प्रभाव वाढेल व याचबरोबर आर्थिक दारिद्र्यातूनही सुटका होईल. यामुळेच खऱ्या अर्थाने भारतीयांची सुधारणा होऊ शकेल असे त्यांचे ठाम मत होते. त्यामुळेच त्यांनी १८२३

साली गव्हर्नर जनरल ॲम्हर्स्टललो पत्र पाठवून कळविले की सुसंस्कृत विद्येच्या प्रसारार्थ कंपनी सरकार दरवर्षी एक लाख रुपये खर्च करणार आहे, हा पैसा भारतीयांना पाश्चात्य शिक्षण देण्यासाठी खर्च करावा.

हिंदू समाजात इंग्रजी शिक्षण देण्यासाठी शिक्षण संस्थांनी स्थापना करण्यावर भर दिला. कलकत्त्याला १८१७ साली 'हिंदू कॉलेज' नावाची संस्था निर्माण केली. याखेरीज इंग्रजी शिक्षण देणारे एक विद्यालयदेखील त्यांनी सुरु केले. इ. स. १८२६ साली वेदांत कॉलेज काढून हिंदूच्या वेदातांचे अध्ययन व पाश्चात्यांची भौतिक विद्या या दोहोंचा समन्वयक साधला.

राजा राममोहन रॉय यांचे सामाजिक कार्य :

राजा राममोहन रॉय यांनी शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक कार्यालाही सुरुवात करुन सामाजिक प्रबोधन केले. ते कार्य पुढीलप्रमाणे

१) सती बंदीचा कायदा :

राजा राममोहन रॉय व त्यांचे सहकारी यांनी सती बंदीचे कार्य चालू ठेवले. लॉर्ड बेटिंग या इंग्रज अधिकाऱ्याच्या सहकार्याने ४ डिसेंबर, १८२९ रोजी सती बंदीचा कायदा केला. यातून समाजातील अनिष्ट प्रथा थांबविता येतील. राजा राममोहन रॉय यांनी आयुष्यभर सनातनी, बुरसटलेल्या आणि संकुचित विचारांशी लढा दिला. कलकत्यास युनिटॅरियन सोसायटी ऑफ द ख्रिश्चन या नावाची संस्था समाजातील सर्व लोकांच्या हितासाठी मानवतावादी कार्य करीत असे. अंतिम तत्वाची उपासना करणारा तो ब्राह्मो समाज होय. मूर्तीपूजा करणे, हिंदू धर्माचे पालन करणे ह्या भ्रामक समजूती आहेत.

२) जातिभेद निर्मूलन :

अनेक जातीउपजातीत विभाजित झालेला हिंदू समाज एकवटावा त्याशिवाय त्यांची सामाजिक व आर्थिक प्रगती होणार नाही असा राष्ट्रवादी विचार त्यांनी मांडला. जात, पंथ, धर्म, भेद हे त्यांच्या ब्राह्मो समाजानेच नाकारले होते. त्यामुळे जातिभेदास धर्माचा आधार नाही असा मूलभूत विचार त्यांनी मांडला.

३) विश्व बंधुत्वाचा प्रणेता :

मानवी स्वातंत्र्यावर गदा आली की राजा राममोहन रॉय यांना दु:ख होई. अनेक साहित्य वाचल्याने स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्व या चिरंतन मूल्यांवर नितांत श्रद्धा बसली होती. ज्या ज्या ठिकाणी अंतर्गत चळवळी सुरु झाल्या तेव्हा रॉय यांनी आपली सहानुभूती उदारमतवाद्याच्या बाजूने व्यक्त केली. जगात बंधुत्वाची दृष्टी महत्वाची आहे हे नम्रपणे ते सातत्याने मांडत. राजा राममोहन रॉय स्वातंत्र्यप्रिय विचार प्रणालीचे होते. समाजात आपले विचार निर्भीडपणे मांडले.

४) विश्वाच्या अंतिम तत्वाची उपासना :

राजा राममोहन रॉय यांनी 'ब्रह्म' बदल म्हटले आहे की ब्रह्म म्हणजे विश्वाचे अंतिम तत्व. या अंतिम तत्वाची उपासना तो ब्राह्मो समाजत अनेक जाती-धर्माचे, पंथाचे लोक आहेत पण ते सर्व समान आहेत. या विचारानुसारच २३ जानेवारी, १८३० मध्ये 'ब्राह्मो समाज' स्वत:च्या इमारतीत प्रवेशला. राजा राममोहन रॉय

यांनी स्वरचित केलेली प्रार्थना त्याचे वाचन, मनन, चिंतन तेथे केले जाई. ईश्वर हा एकच आहे. विश्वाचा तो निर्माता आहे. समाजातील अनिष्ट चालीरिती दूर झाल्या पाहिजे. सतीची चाल, बालविवाह, बहुपत्नीत्व आणि जातीयता नष्ट झाली पाहिजे. स्त्रियांना शिक्षण द्यावे आणि त्यांना समाजात प्रतिष्ठा मिळवून द्यावी असा राजा राममोहन रॉय यांचा विचार होता.

५) स्त्रियांचे हक्क :

समाजात स्त्रियांना दुर्बल घटक म्हणून पाहिले जाते. यात सुधारणा झाली पाहिजे म्हणून त्यांनी स्त्री-दास्य विमोचनाची चळवळ सुद्धा हाती घेतली होती. म्हणूनच स्त्रियांना हक्क मिळवून देणारे ते पुरस्कर्ते मानले गेले आहे. अनेक वर्षापासूनच चालत आलेली सतीची चाल वाईट आहे. त्यामुळे स्त्री जीवनाची हानी होते. स्त्रीला आपल्या जीवनात स्वतंत्र अस्तित्व असावे.

६) राजा राममोहन रॉय यांचे सामाजिक विचार :

अंध श्रद्धेचे मूळ अज्ञानात आहे. समाज शिक्षणाचे कार्य अवलंबिले, धर्मातील व्यंगे छाटणे, सामाजिक विवेकदृष्टी त्यांनी मांडली, हिंदूच्या भ्रष्ट चालीरिती, भारतीय मनाची कूपमंडक प्रवृत्ती यांच्यावर हल्ले चढविले. स्वतंत्रता हा मानवाचा अतिमौल्यवान ठेवा आहे. संघर्ष हा सुधारक व सुधारणा विरोधक यांच्यातला पर्यायाने स्वातंत्र्य व जुलूम, न्याय व अन्याय बरोबर व चूक यांच्यातील जागतिक संघर्षाचा भाग आहे. देशाच्या शिक्षण पद्धतीस अमूलाग्र बदल झाल्याशिवाय भारत देशाला त्याच्या शतकानुशतकांच्या धननिंद्रेतून जागे करणे केवळ असंभव आहे, हे रॉय यानी ओळखले होते. स्त्रियांबाबत ते असे म्हणत - पतीच्या अस्तित्वावर ती अवलंबून नसते. म्हणून स्त्रीने आत्मदहन करण्याची गरज नाही. सतीची चाल बंद झाली पाहिजे. याबाबत ते आग्रही होते.

अशा या ब्राम्होसमाजाच्या प्रसाराचे काम राजाराममोहन रॉय यांच्यानंतर देवेंद्रनाथ टागोर, आनंद बोरा व केशवचंद्र सेन इ. महापुरूषांनी केले ते पुढीलप्रमाणे.

देवेंद्रनाथ टागोर :

ब्राम्हो समाजाचे प्रभावीपणे काम केले. राजाराममोहन रॉय यांच्या मृत्यूनंतर या समाजाचे कार्य टागोर यांनी केले. इ.स. १८३८ मध्ये ब्राम्होसमाजात टागोर यांनी प्रवेश केला.

टागोर यांनी या समाजाची एक आचारसंहिता तयार करून त्याचे पालन सर्व सदस्यांकडून व्हावे अशी अपेक्षा केली. गायत्री मंत्राच्या जयघोषात देवाची प्रार्थना अपेक्षित केली. वेदानुसार ब्राम्होसमाजाचा प्रसार केला व अपौरूषेयत्त्व नाकारले मूर्तीपूजा, यात्रा, जत्रा, धार्मिक रितीरिवाज यांच्या खर्चाला फाटा दिला.

समाजाच्या या कार्यासाठी 'तत्त्वबोधिनी पत्रिका' प्रकाशित करण्यात आली. टागोर यांच्या कार्यानंतर याची धुरा केशवचंद्र सेन यांच्याकडे गेली.

केशवचंद्र सेन :

यांनी ब्राम्होसमाजात इ.स. १८५७ मध्ये प्रवेश केला, त्यांनी ब्राम्हो समाजाचे कार्य चांगल्यारितीने केल्यामुळे त्यांना १८६२ मध्ये आचार्यांचा दर्जा दिला गेला. त्यांनी आपल्या कारकिर्दीत स्त्रीशिक्षण आंतरजातीय विवाह, विवाहाचे वय वाढविणे, पडदा पद्धती, बहुपत्नीत्त्वावर बंदी पद्धती चालू केल्या. त्यांच्या या कार्यांची मोहीम देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचविण्यासाठी त्यांनी भारत दौरे केले. पुढे त्यांच्या प्रयत्नातून प्रार्थना समाजाची मुंबईला व वेदसमाजाची मद्रासला स्थापना झाली. परंतु पुढे टागोर व सेन यांच्यात तात्त्विक मतभेद झाल्याने ब्राम्होसमाजात फूट पडली व केशवचंद्र सेन ब्राह्मो समाजातून बाहेर पडले.

स्वयंअध्ययनासाठी प्रश्न (Check your Progress)

अ) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. ब्राह्मो समाजाची स्थापना कोणी केली?

२. ब्राह्मो समाजाची स्थापना किती साली झाली?

३. सतीप्रथा किती साली बंद झाली?

४. राजा राममोहन रॉय यांच्या नंतर ब्राम्हो समाजाचे कार्य कोणी केले?

५. वेदांत कॉलेजची स्थापना केव्हा झाली?

३.३.२ प्रार्थना समाज (Prarthana Samaj)

केशवचंद्र सेन हे ब्राम्होसमाजातून बाहेर पडले व मुंबई येथे गेल्यावर त्यांच्या कार्याने डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खडकर हे प्रभावित झाले. डॉ. आत्माराम यांच्या प्रेरणेने इ.स. १८६७ मध्ये प्रार्थना समाजाची स्थापना झाली या समाजाच्या कार्याला दादोबा तर्खडकर, वामन आबाजी मोडक, न्या. ना. ग. चंदावरकर, न्या. रानडे व रा. गो. भांडारकर यासारख्या अनेक मान्यवरांचा हातभार लागला. या समाजात महाराष्ट्राची असणारे धार्मिक दैवते म्हणजे संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, समर्थ रामदास स्वामी यांच्याबद्दल नितांत आदर होता. त्यामुळे प्रार्थना समाजाचे संस्थापक धार्मिक मतभेदात न गुंता सामाजिक चळवळीच्या वाटेने वाट चाल करून अनिष्ट प्रथा परंपरांना तिलांजली देण्याचे कार्य हाती घेतल्याचे आढळते.

प्रार्थना समाजाने परमेश्वराला सगुण मानल्याने त्यांच्या समाजात भजन, अभंग गायले जायचे प्रार्थना हे आध्यात्मिकतेचे उत्तम साधन मानले. प्रार्थना समाजाने आपले कार्यक्षेत्रात ठरवून घेऊन महत्त्वाची उद्दिष्ट्ये निश्चित केली ती म्हणजे.

प्रार्थना समाजाची उद्दिष्ट्ये :

१. जातीभेद नष्ट करणे.

२. स्त्रीशिक्षणाला प्राधान्य देणे.

३. विधवा पुनर्विवाहाला प्राधान्य देणे.

४. स्त्री-पुरूष विवाहाचे वय वाढविणे.

या उद्दिष्टांना अनुसरून प्रार्थना समाजाने समाजसुधारणेला महत्त्व दिले. महिलांच्या हितासाठी आर्य महिला समाज ही सामाजिक संस्था स्थापन केली. प्रार्थना समाजाच्या या कार्याला विठ्ठल रामजी शिंदे, नामदार गोखले, न्या. रानडे, पंडिता रमाबाई, ना.म. जोशी, गोपाळ कृष्ण गोखले, भांडारकर, चंदावरकर इ. दिग्जांनी मोलाची मदत केली. विशेषता न्या. रानडे यांनी विशेष मदत या समाजाला केली. कारण ते न्यायाधिश होते. पण तत्पूर्वी त्यांनी विधवा विवाह संघाची स्थापना केली. स्त्री मुक्तीला प्राधान्य दिले. वृत्तपत्रात अनेक लेख लिहून समाजप्रबोधन केले तर पंडिता रमाबाई यांच्या मदतीने आर्य महिला समाजाची स्थापना झाली. अशा या अनेक समाजसुधारकांच्या कार्यातून प्रार्थना समाजाचे कार्य समाजात प्रसारित झाले. अशा या समाजाचे तत्त्वदानही होते ते म्हणजे -

प्रार्थना समाजाचे तत्त्वज्ञान :

१. परमेश्वर हा एकच असून तो विश्वनिर्माता आहे.

२. मानवाची सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे.

३. परमेश्वराला आपलेसे करण्यासाठी उपासना, भक्ती, सदाचार आणि सत्व या तत्त्वांचा अंगीकार केला.

४. प्रार्थना करण्याने आध्यात्मिक प्रगती होते.

५. परमेश्वराला मुर्तीपूजा मान्य नाही पण आपण सर्व ईश्वराची लेकरे आहोत.

६. अपंग व अनाथ मुलांच्या सेवेसाठी पंढरपूर येथे आश्रम उभा केला.

७. विधवा विवाह, स्त्रीशिक्षण प्रसार, बालविवाह व पडदा पद्धतीवर बंदी, आंतरजातीय विवाह यासारखे अनेक उपक्रम हाती घेतले.

प्रार्थना समाजाचे विचार किंवा शिकवण :

१) **एकेश्वरवाद :** ईश्वर हा एकच असून तो विश्वाचा निर्माता व नियंत्रक आहे. तो सर्व शक्तीमान आहे, दयाळू व प्रेमळ आहे.

२) **मूर्तिपूजा, अवतार कल्पना अमान्य :** ईश्वर हा निराकार कोणत्याही मूर्तीत नाही. त्यामुळे मूर्तिपूजा मान्य नाही. तसेच ईश्वर अवतार घेतो ही कल्पना देखील प्रार्थना समाजास मान्य नाही.

३) **भक्तिभावपूर्वक प्रार्थनेचे महत्त्व :** ईश्वराची उपासना भक्तीभावाने केलेली प्रार्थना महत्त्वाची आहे. त्यामुळे आत्मिक उन्नती साधता येते. भौतिक फलप्राप्ती व प्रार्थनेचा संबंध नाही. ईश्वराच्या उपासनेसाठी इतर कर्मकांडांची गरज नाही.

४) **आदर्श मूल्यांचे पालन :** समतेवर भर देणाऱ्या या मूल्यांचे पालन करावे असा संदेश दिला आहे. वैयक्तिक व सामूहिक जीवनात समता, सदाचार, सत्य, नैतिकता यावर भर द्यावा. परस्परांत

बंधुभावाचे नाते ठेवावे. कारण आपण सर्व ईश्वराचीच लेकरे आहोत. रंजले-गांजलेले, दीन-दुबळे यांची सेवा करावी. त्यांच्या मदतीला जावे.

५) **अन्यायी, अनिष्ट, दुष्ट प्रथांचा निषेध :** जीतीभेद, अस्पृश्यता मानू नये, बालविवाह करु नये. तसेच अशा गोष्टींना प्रोत्साहन देऊ नये. स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवणे, विधवा पुनर्विवाहास विरोध, बहुपत्नी विवाह इ. समाजातील अनिष्ट, अन्यायी, दृष्ट प्रथांचा सामाजिक चालीरितींचा निषेध करावा.

प्रार्थना समाजाची साप्ताहिक उपासना :

१) **उद्‌बोधन :** उपासकाने जमलेल्या सर्व मंडळींची वृत्ती उपासनोन्मुख करुन, इतरांच्या मनातील विचार काढून टाकून ते परमेश्वरावर केंद्रित करावे.

२) **स्तवन :** सर्वशक्तिमान अशा ईश्वराच्या सर्व गुणांचे स्तवन व गायन करावे.

३) **कृतज्ञता दर्शन :** दयाळू, परमेश्वराविषयी कृतज्ञता व्यक्त करावी.

४) **प्रार्थना :** स्वत:च्या आत्मिक उन्नतीसाठी प्रार्थना करावी.

५) **विरुपण :** उपासकाने वा मुख्य वक्त्याने उपदेशात्मक प्रवचन द्यावे.

६) **प्रार्थना व आरती :** मूर्तिपूजा त्याज्य मानल्याने उपासकाने प्रार्थना व आरती करावी, प्रार्थना समाजाच्या साप्ताहिक सभा असतात. त्यातून चर्चा विचार विमर्श होई. कुटुंबातील सदस्य संस्कार विधी मूर्तीपूजेशिवाय करु लागले. आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी समाजाला स्वत:च्या मतपत्राची गरज वाटू लागली. यातूनच सुबोधपत्रिकेचा जन्म झाला.

सुबोधपत्रिका :

या नावानी प्रार्थना समाजाचे एक मुखपत्र ४ मे १९७३ रोजी सुरु झाले. सुरुवातीला काही काळ मराठी, इंग्रजी व गुजराती भाषेत हे पत्र प्रसिद्ध झाले. या पत्राचे ब्रीदवाक्य 'सत्यमेव जयते' होते. सर्वापर्यंत हे पत्र पोहचण्यासाठी एक पैसा एवढी त्याची किंमत ठेवली. सुरुवातीला काही काळ मामा परंमानंद यांनी संपादकीय कामकाज केले. सुबोध पत्रिकेच्या लेखकांपैकी डॉ. रा. गो. भांडारकर, न्या. तेलंग व न्या रानडे यांचा समावेश होता. डॉ. भांडारकरांनी विधवा-पूनर्विवाह, प्रौढविवाह या सुधारणांस शास्त्राधार काढून देवून लेखन केले.

सामाजिक कार्य :

प्रार्थना समाज नुसतीच वैचारिक कृतीवरही भर देण्याचा त्यांचा प्रयत्न होता. मुंबई, पुणे, इंदूर, गुजरात, आंध्र, तामिळनाडू, सातारा, नाशिक येथे प्रार्थना समाजाच्या शाखा उघडल्या गेल्या. प्रार्थना समाजाच्या संस्थापकांबरोबरच महर्षि विठ्ठलरामजी शिंदे, श्री. सुखटणकर यांनी जातिभेद निर्मुलन, विधवा विवाह, बालविवाह बंदी, स्त्री शिक्षण प्रसार, पडदा पद्धत यांच्या संदर्भात भरपूर कार्य केले. सामाजिक सुधारणा चवळवळ अधिक गतिमान करण्यासाठी अनाथ स्त्रिया व मुले यांच्या संदर्भात समाजाने विशेष काम केले. १८७२ मध्ये त्यासाठी बॉम्बे थिईस्टिक असोसिएशन संस्था स्थापली. याच्याच कामाचा विस्तार म्हणून आर्य

महिला समाज, पुणे राममोहन आश्रम, पुणे अनाथ बालकाश्रम, पंढरपूर येथे अनाथाश्रम काढले. कामगारांना शिक्षण देण्यासाठी रामशाळा काढल्या. खातनाम कामगार नेते ना. म. जोशी यांनी या कामासाठी सोशल सर्व्हिस लीग संस्था काढून कामगारांच्या कल्याणार्थ कार्य सुरु केले. याच कार्यापासून प्रेरणा घेऊन राजकीय कार्यकर्त्यासाठी भारत सेवक समाज सुरु केला. प्रार्थना समाजाचे कार्यकर्ते असणाऱ्या महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांनी नंतरच्या काळात डिप्रेस्ड क्लासेस मिशनची स्थापना केली. १८७६ मध्ये भि. ल. चव्हाण यांनी मुंबईत रात्रशाळा सुरु करुन सर्व जाती जमातीच्या मुलांना प्रवेश दिला. समाजातील विविध थरातील लोकांचा त्यात समावेश होता. प्रार्थना समाजाने स्त्री शिक्षणाचा सुद्धा प्रसार केला.

अशा रितीने प्रार्थना समाजाने केलेल्या कार्यामुळे महाराष्ट्रात सामाजिक चळवळी व सामाजिक परिवर्तनाची चळवळ सुरू झाली व नावारूपास आली.

स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :

ब) पुढील विधाने चूक की बरोबर सांगा.

१) प्रार्थना समाजाची स्थापना राजा राममोहन रॉय यांनी केली.

२) प्रार्थना समाजाने स्त्री शिक्षणाला प्राधान्य दिले.

३) पंडिता रमाबाई यांनी आर्य महिला समाजाची स्थापना केली.

४) न्या. रानडे यांनी प्रार्थना समाजाला मदत केली नाही.

५) प्रार्थना समाजाने मानवी सेवा हीच ईश्वर सेवा मानली.

३.३.३ आर्यसमाज (Arya Samaj)

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात स्वामी दयानंद सरस्वती यांनी मुंबई येथे इ.स. १८७५ रोजी आर्य समाजाची स्थापना केली. स्वामी दयानंद सरस्वती यांचे मूळ नांव मूलशंकर असे होते. त्यांचे वडील अत्यंत कर्मठ व धार्मिक विचारांबाबत ठाम होते. इ.स. १८६० मध्ये जेव्हा स्वामी दयानंद सरस्वती हे मथुरा येथे गेले तेव्हा त्यांना खऱ्या अर्थाने वेदांचा अर्थ कळला. हिंदु धर्माबद्दल मनात प्रचंड अभिमान होता. त्यापोटीच त्यांनी जनतेला वेदांकडे वळा असा संदेश दिला. समाजातील अनिष्ट चालीरिती, परंपरा नष्ट करण्याचे प्रयत्न केले. मूर्तीपूजा करणे, पशुबळी देणे यासारख्या गोष्टीवर विश्वास नव्हता. त्यांच्यामते मनुष्याच्या जीवनातील चार वर्ण हे जन्माधारित नसून कर्मावर अवलंबून आहेत परमेश्वर हा सर्वव्यापी, निर्गुण, निराकार आहे असे आपले ठाम मत मांडले. स्वत:च्या आर्य समाजात सर्व जातीधर्मातील लोकांना त्यांनी प्रवेश दिला.

आर्य समाजाचा प्रसार पंजाब व महाराष्ट्र या दोन राज्यांत अधिक प्रमाणात झाला. या आर्य समाजाने अत्यंत महत्त्वाचे कार्य हे शैक्षणिक क्षेत्रात व शुद्धीकरण चळवळ यात केले. विविध ठिकाणी शैक्षणिक संस्थांची सुरूवात केली. गुरूकुल योजना राबविली, वेदांचा प्रसार करण्यासाठी दयानंद अँग्लो वैदिक स्कूलची स्थापना केली. महाराष्ट्रात कोल्हापूर, मुंबई, सोलापूर या ठिकाणी या शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. त्यापैकीच दयानंद महाविद्याल हे सोलापूर येथे आहे.

शुद्धीकरण चळवळीत जे काम केले ते म्हणजे जे लोक हिंदू धर्मामधून इतर धर्मामध्ये प्रवेशित झाले होते. त्यांना पुन्हा हिंदू धर्मात परत आणण्याचे काम त्यांनी केले. या शुद्धीकरण चळवळीने परधर्मात गेलेल्या हिंदूना पुनश्च स्वधर्मात आणण्याचे काम या आर्य समाजाने केले. या आर्य समाजाचे काम जसे महाराष्ट्रात झाले तसे ते लाहोर येथे देखील झाले. व पुढे लाहोर हे आर्य समाजाच्या कार्याचे मुख्य केंद्र झाले. स्वामी दयानंद सरस्वती यांनी अनेक ग्रंथ लिहिले. हिंदी भाषेतून व्याख्याने दिली. 'सत्यार्थ-प्रकाश' या नावाने प्रसिद्ध केलेल्या ग्रंथाने आपले विचार मांडले आहेत.

आर्य समाजाची मुख्य तत्त्वे :

आर्य समाजाने अनेक आपली तत्त्वे सांगितली आहेत ती पुढीलप्रमाणे :

१. परमेश्वर हा निर्गुण, निराकार, दयाळु, अनंत, सर्वस्पर्शी, शक्तीमान असा आहे.

२. प्रत्येकाने स्वत:च्या उन्नतीपेक्षा सर्वांच्या उन्नतीसाठी झटले पाहिजे.

३. अविद्येने समाजाचा नाश होतो म्हणून प्रत्येकांनी विद्येची कास धरली पाहिजे.

४. मनुष्याने सत्याचा विचार करून वर्तन करावे.

५. प्रत्येकाने सत्याचा स्विकार व असत्याचा त्याग करावा.

६. वेदांचा अभ्यास करुन इतरांनाही शिकविणे व वेदांकडे चला असा संदेश दिला होता.

७. प्रत्येकाने प्रत्येकाबरोबर प्रेमपूर्वक व धर्मानुसार वर्तन करावे.

या तत्त्वांनी प्रेरीत होऊन आर्य समाजाने समाजातील निराधारांना आधार देण्यासाठी अनाथालये स्थापन केली. दुष्काळ काळात विविध ठिकाणी अन्नछत्रे उभा केली, अशा त्यांच्या कार्यप्रणालीतून त्यांनी आपल्या सामाजिक चळवळीचा ठसा उमटविला.

आर्य समाजाचे तत्त्वज्ञान व शिकवण :

१) **वैदिक धर्माचे वैश्विक स्वरुप :** या नुसार ईश्वर एकच आहे. तो या विश्वाचा निर्माता आहे, तो कृपाळू, दयाळू आहे, मूर्तिपूजा नाही.

२) **वैदिक समाजाचे आदर्शत्व :** या समाजात कोणतेही कृत्रिम भेदभाव, कर्मकाडांचे अवडंबर नव्हते. पुरोहित वा मध्यस्थांचे प्रस्थ नव्हते. सत्य, प्रेम, न्याय, सहानुभूती यांना महत्व होते. व्यक्तीच्या कर्तबगारीला न्याय देऊन एकूण समाजाला आदर्शाकडे घेऊन जाणारी होती.

३) **वेदाचे महत्व :** खऱ्या हिंदू धर्माचे मानवतावादी तत्वज्ञान व आदर्श अशा कल्याणकारी समाजाचे विवेचन वेदात केले असल्याने वेदांना प्रमाणभूत मानावे. वेद या शब्दाचा अर्थ त्यांनी ज्ञान असा प्रतिपादन केला. वेदांचे अध्ययन करावे, वेदात प्रतिपादन केलेला धर्म विशुद्ध असून त्याचेच पालन केल्याने आदर्श अशी मानवतावादी समाज व्यवस्था स्थापन होऊ शकेल. वेदांचे अध्ययन करण्याचा हक्क सर्वांना आहे.

४) **वेदाकडे परत जाण्याचे आदेश :** प्रचलित धर्माला विकृत स्वरुप आले आहे व समाज व्यवस्था दोषास्पद झाली आहे. याचे कारण म्हणजे वेदांचे विस्मरण होय. तेव्हा खऱ्या ज्ञानाचे धडे असलेल्या वेदातील तत्वज्ञानाचा अंगीकार करावा व त्यानुसार पुन्हा नवीन समाजबांधणी करावी यासाठी आर्य समाजाने आपल्या हिंदू बांधवांना वेदाकडे परत चला असा संदेश दिला.

५) **सत्यार्थ प्रकाश :** भारतीयांना शुद्ध स्वरुपातील वैदिक धर्माची ओळख करुन देण्यासाठी त्यांनी वेदांवर सत्यार्थ प्रकाश ग्रंथ लिहून आर्य समाजाचे तत्वज्ञान अनुयायांच्या हाती दिले. सत्यार्थ प्रकाश हा आर्य समाजाचा प्रमाण ग्रंथ बनला.

समाज सुधारणा विषयक कार्ये :

आर्य समाज ही एक धर्मसुधारणा बाबींवर उभी राहिलेली सामाजिक चळवळ होती. या चळवळीने भारतीय समाज व्यवस्थेत जो परिवर्तनाचा आग्रह धरला व जे कार्य केले त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे –

१) **शिक्षण प्रसार :** अज्ञानी अशा भारतीय बांधवांना प्रथम शिक्षण दिले पाहिजे. त्यामुळे त्यांची विचारसरणी सुधारणावादी होईल. तसेच त्यांची आत्मिक भौतिक प्रगती शिक्षणाने साधता येईल. म्हणूनच निर्दोष समाजाचे व राष्ट्र उभारणीचे कार्य साध्य होईल अशी त्यांची धारणा होती. यासाठी त्यांच्या आर्य समाजाच्या स्थापनेपासून अनेक शिक्षण संस्था स्थापन करण्यात येऊ लागल्या. आर्य समाजाचा अभ्यास करणारी गुरुकुले स्थापन केली. संस्कृत पाठशाळा स्थापन केल्या. पौवात्य व पाश्चात्य या दोन्ही पद्धतीने शिक्षणाचा समन्वय घालण्यासाठी इंग्रजी महाविद्यालयेदेखील सत्यशोधक समाजाच्या अनुयायांनी स्थापन केली.

२) **स्त्री दास्य विमोचनास सुरुवात :** स्त्रियांचादेखील वेदकाळात पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा होता. प्रौढ विवाह पुरस्कार केला. बालविवाह निषेध केला. स्त्रियांना देखील शिक्षणाचा अधिकार मान्य केला. एवढेच नव्हे तर वेदांचा अभ्यास स्त्रियांनी करावा यावर भर दिला. स्त्रियांचा दर्जा उंचावण्यास चालना मिळाली, स्त्री-पुरुष समान लेखले जाऊ लागले.

३) **जातिभेदाविरुद्ध कार्य :** वैदिक काळात जी वर्णाश्रम पद्धत होती ती व्यक्तीच्या गुणवर्गांशी संबंधित होती. त्यांना जन्माधिष्ठित जातीची निश्चिती मान्य नव्हती. हा भेदाभेद व अस्पृश्यता मानू नये असे विचार त्यांनी मांडले. आर्य समाजाच्या शिकवणीने व संघटित झालेल्या त्यांच्या अनुयायांनी अस्पृश्यता निर्मूलन, जातिभेदाचे उच्चाटन याबाबत कार्य हाती घेतले.

४) **शुद्धी विषयक चळवळ :** सनातनवादी हिंदूंनी धर्माची दारे बंद केली होती. आर्य समाजाने अशा लोकांना हिंदू धर्मात परत घेण्यासाठी शुद्धीकरण चळवळ हाती घेतली. या त्याच्या कृतीने कर्मठ, मध्यस्थ लोकांनी हिंदू धर्माला जे संकुचित स्वरुप दिले होते त्यावर जबरदस्त प्रहार केले. हिंदू धर्माचे विश्वात्मक उदारमतवादी स्वरुप व्यक्त केले.

५) **जनसेवा :** स्वामी दयानंद सरस्वतींनी आपल्या समाज सुधारणेच्या चळवळीत ईश्वर भक्ती इतकेच जनसेवेला महत्व दिले. आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांनी केवळ शहरातून नव्हे तर खेड्यातूनदेखील

आपत्तीग्रस्त, दीन दुबळ्यांची मनोभावे मानवतावादी दृष्टिकोनातून सेवा केली, अनाथालये, विधवाश्रम स्थापन केले.

अशाप्रकारे आर्यसमाज ही धर्मिक क्षेत्रात मूलगामी सुधारणा करुन भारतीय समाजात परिवर्तन घडवून आणण्यावर भर देणारी एक महत्वाची सामाजिक चळवळी होती.

स्वयंअध्यपनासाठी प्रश्न

क) पुढील विधानातील रिकाम्या जागा भरा.

१. आर्य समाजाची स्थापना ..... यांनी केली.

२. आर्य समाजाची स्थापना ..... साली झाली.

३. ..... चळवळ ही आर्य समाजात महत्त्वाची मानली.

४. आर्य समाजाने सोलापूर येथे ..... महाविद्यालयाची स्थापना केली.

५. मानवाची सेवा हीच खरी ..... सेवा आहे असे आर्यसमाजाचे तत्त्वज्ञान आहे.

सत्यशोधक समाज : (Satyashodhak, Samaj)

समाजात चाललेली सामाजिक विषमता, स्त्रियांना व शुद्रांना मिळणारी अपमानास्पद वागणूक, अनिष्ट चालीरिती हे सर्व पाहून महात्मा फुले यांना दु:ख झाले. या सामाजिक विषमतेतून समाजाला बाहेर काढण्यासाठी महात्मा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली. इ.स. १८७३ ते १८९० हा पहिला टप्पा केला तर दुसरा टप्पा हा इ.स. १८९० ते १९१० व तिसरा टप्पा हा इ.स. १९१० ते पुढे असा होता. या तिन्ही टप्यात वेगवेगळी कामे केली म्हणजेच पहिल्या टप्प्यात सत्यशोधक समाजाची निर्मिती केली. महाराष्ट्रभर याच्या शाखा स्थापन केल्या याचे नेतृत्त्व महात्मा फुले यांनी केले. त्यांनी दर आठवड्याला सत्यशोधक समाजाची सभा घेऊन बहुजन समाजाच्या विविध समस्यांवर, प्रश्नांवर चर्चा घडवून आणली व त्याबाबत प्रबोधनही केले. त्यांच्या कार्याने समाजातील काही मंडळी म्हणजे कृष्णराव भालेकर, डॉ. विश्राम घोले, मारूतराव नवळे, डॉ. संतुजी लाड, नारायण लोखंडे इ. नी या समाजात प्रवेश केला व ही चळवळ अधिक तीव्र केली. समाजातील गरीब व शिक्षण घेऊ इच्छिणारी यांना शिष्यवृत्ती मिळवून दिली. ब्राम्हणाखेरीज विवाह सोहळा पार पाडता येतो हे दाखवून दिले. स्त्रिया, दलित, अस्पृश्य यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. १८९० मध्ये महात्मा फुले यांचा मृत्यू झाल्याने या चळवळीची गती मंदावली परंतु १९११ मध्ये पुन्हा एकदा छ.शाहूच्या प्रेरणेने या चळवळीने बळ धरले. इ.स. १९११ मध्ये कोल्हापूरात सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. कोल्हापूरात भाऊराव जाधव, गणपतराव कदम, हरिभाऊ चव्हाण, लठ्ठे इ. च्या सहकार्याने ही चळवळ सातारा, पुणे, नगर, नाशिक, जळगांव, धुळे, बेळगांव, सोलापूर इ. भागात वाढत गेली. व या चळवळीच्या तिसऱ्या टप्यात ग्रामीण भागात मेळा, तमाशा इ. मनोरंजनाच्या कार्यक्रमातून प्रबोधन होऊ लागले. अशारितीने सत्यशोधक समाजाची वाटचाल संपूर्ण महाराष्ट्रभर चालू राहिली.

सत्यशोधक समाजाचे कार्य :

सत्यशोधक समाजाने समाजातील उपेक्षित वर्गाकडे आपले लक्ष वळवून त्यांची गुलामगिरीतून मुक्तता करण्याचे कार्य हाती घेतले. त्यांच्यावर होणारे अत्याचार व अन्याय यापासून त्यांची मुक्तता व्हावी म्हणून प्रयत्न केले. प्रत्येकाने शिक्षण घेऊन ज्ञानी व्हावे. स्वदेशी वस्तूंचा वापर करावा, दारूबंदी व्हावी, अंधश्रद्धा व अनिष्ट चालीरितींना तिलांजली द्यावी. यासाठी प्रयत्न केले लोकशिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन करून समाज शहाणा केला. सामाजिक परिवर्तनाच्या माध्यमातून विवाहपद्धतीत बदल, वास्तुशांत याबाबत काही नियम केले. यासाठी महात्मा फुले यांनी शेतकऱ्याचा आसूड, गुलामगिरी, सार्वजनिक सत्यधर्म, इ. ग्रंथ लिहिले व प्रकाशित केले तर भालेकर यांनी 'दीनबंधु' हे साप्ताहिक काढले.

१) शिक्षणाची सार्वत्रिकता : परंपरागत समाज व्यवस्थेत शिक्षण घेणे व देणे हे ब्राह्मण वर्गाचे कार्य होते. उच्च वर्गीयांना इतरांची अज्ञानापोटी पिळवणूक करण्याचे कार्य चालू होते. महात्मा फुले यांनी बहुजन समाज व स्त्रियांना शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी कार्य व प्रयत्न केले. इ. स. १८४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा काढली. १८५१ साली अस्पृश्यांसाठी शाळा संपादन केली. गरिबांना, शेतकऱ्यांना, शुद्रांना व स्त्रियांनाही शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी प्रयत्न केले.

२) स्त्री दास्य मुक्ती म्हणजे समाजाचा उध्दार : स्त्रीबाबतचा अनिष्ट चालीरिती घालवून काही नवीन पाऊले उचलली ती पुढीलप्रमाणे –

१) स्त्री शिक्षण :

स्त्रियांना शिक्षण देऊन त्यांचे कुटुंबातील व समाजातील स्थान उंचाविण्याचे प्रयत्न केले. स्त्री शिक्षणाला महत्व दिले. मुलींसाठी शाळा काढल्या. सावित्रीबाईना मुलींच्या शाळेत शिक्षिका म्हणून नेमले. सनातनी लोकांनी सावित्रीबाईना त्रास दिला तरी देखील त्या आपल्या कार्यापासून ढळल्या नाहीत.

२) विधवांचे प्रश्न :

बालविवाहामुळे बालविधवांचे प्रमाण जास्त होऊ लागले. त्या बालविधवांचे पुनर्विवाह घडवून आणले. इ. स. १८६३ मध्ये आपल्या घराशेजारील बागेत भारतातील पहिले बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन केले. अशा स्त्रियांना येथे गुप्तपणे व सुरक्षितपणे मुलांना जन्म देण्याची सोय केली.

३) जातिभेद व अस्पृश्यता यांच्या निर्मूलनार्थ त्यांचे कार्य :

वर्ण व्यवस्थेतून विकसित झालेली जातिव्यवस्था व अस्पृश्यता ही एक जुनाट सामाजिक समस्या होती. इ. स. १८५२ मध्ये पुण्यातील वेताळ पेठेत स्वत:च्या खर्चाने अस्पृश्यांसाठी शाळा काढली. १८५३ साली महार, मांग इ. लोकांना विज्ञान शिकविण्याकरिता 'मंडळी' या नावाची एक शैक्षणिक संस्था त्यांच्या मित्रांच्या साहाय्याने काढली. सरकारने यास आर्थिक मदत केली. या संस्थेने पुण्यास इ. स. १८५८ पर्यंत अस्पृश्यांकरिता तीन शाळा स्थापन केल्या. अस्पृश्यांना पाणी पिण्याकरिता आपल्या घरातील पिण्याच्या पाण्याचा हौद त्यांनी खुला केला.

४) शेतकऱ्यांचा उध्दार :

शेतकऱ्यांचे अज्ञान व धर्मवेडेपणा यामुळेच त्यांना कर्जबाजारी व्हावे लागले. यासाठी त्यांना शिक्षणाची गरज आहे हे ओळखून शिक्षणाने शेतकऱ्यांचा कायापालट होईल या हेतूने पाठपुरावा करुन शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेचे महत्वाचे कारण अविद्या हे मानले व त्याबाबत 'दीनबंधू' या वृत्तपत्रातून त्यांच्याबाबत लिखाण केले व शेतकऱ्यांना शिक्षणासाठी प्रवृत्त केले.

५) ब्राह्मणेतर चळवळ :

ब्राह्मणेतर चळवळींची उद्दिष्ट्ये प्राप्त करण्यासाठी ब्राह्मणेतरापुढे सत्यशोधक समाजाद्वारे फलदायी कार्यक्रम ठेवला. शेतकऱ्यांचे प्रबोधन करणे, स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला. सत्यशोधकी जलसे, तमाशे, लावण्या, कीर्तने यांच्या माध्यमातून त्यांनी लोकशिक्षण दिले. ब्राह्मणेतरांना त्यांच्या आर्थिक व सामाजिक गुलामगिरीचा बेड्यातून मुक्त केले.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात मद्रास प्रांतात अनेक नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी ब्राह्मणेतरांच्या चळवळीतून ब्राह्मण वादास आवाहन दिले. मद्रास प्रांतातील ब्राह्मणेतरांच्या चळवळीने ॲनी बेझंट यांच्या होतकरु चळवळीस साहाय्य केले नाही. त्यांच्या मते ही होमसल चळवळी ब्राह्मण्यांचे हितसंबंध जोपासणारी आहे. जोपर्यंत ब्राह्मणेतरांना समान दर्जा मिळत नाही, तोपर्यंत कार्य चालूच राहील.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी देखील ब्राह्मणेतरांच्या चळवळीने व विचाराने प्रभावित होऊन शिक्षण क्षेत्रात अलौकिक कार्य केले. तळागाळातल्यांना शिक्षण दिले. रयत शिक्षणसंस्था स्थापन केली, वसतिगृहे, शाळा, महाविद्यालये काढली. यावरुनच त्यांची सत्यशोधक समाजाकडूनची प्रेरणा व कार्याची दिशा स्पष्ट झाली.

पुढे ब्राह्मणेतर चळवळीस भास्करराव जाधव, दिनकरराव जवळकर, शंकरराव मोरे, केशवराव जाधव यासारख्या धडाडीच्या नेत्यांनी या चळवळीला जागृती दिली. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्वाची प्रथा राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागावी म्हणून सुरु केली. १९२२ साली ब्राह्मणेतर पक्षाने 'छत्रपती मेळा' काढला.

अशाप्रकारे सामाजिक-आर्थिक गुलामगिरीच्या बेड्यातून ब्राह्मणेतरांची मुक्तता करण्यासाठी व सामाजिक, धार्मिक, राजकीय क्षेत्रात समानतेचे हक्क मिळविण्यासाठी स्थापन झालेल्या महात्मा फुल्यांचा सत्यशोधक समाज व त्यातून ब्राह्मणेतरांच्या चळवळीने भारतातील समाज सुधारणेच्या चळवळीतून सामाजिक विकास झाला.

सत्यशोधक समाजाची तत्त्वे :

सत्यशोधक समाजाची तत्त्वे ही परमेश्वर निर्मिक आहे असे महात्मा फुले यांनी जे मानले त्याआधारेच सांगितली आहेत.

१. ईश्वर हा एकच असून तो निर्गुण, निराकारच सर्वव्यापी आहे.

२. ईश्वराची भक्ती करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे.

३. ईश्वराची भक्ती करण्याची भगत, पुरोहित यांनी गरज नाही.

४. माणसाने नेहमी सत्यावर विश्वास ठेवून सदविचारी वर्तन करावे.

५. प्रत्येक व्यक्तिचे श्रेष्ठत्व हे त्यांच्या जन्मावर नसुन कर्तृत्वावर अवलंबुन आहे.

६. शिक्षणाचा प्रसार सर्वत्र व्हायला पाहिजे.

७. ईश्वर हा विश्वनिर्माता आहे.

८. समाजातील सर्व लोक हे ईश्वराची लेकरे आहेत.

९. समाजात जातीभेद, लिंगभेद व धर्मभेद असू नये.

१०. प्राणीमात्रावर दया करावी.

११. ईश्वरापुढे सर्व समान आहेत.

अशा पद्धतीने सत्यशोधक समाजाची कार्यप्रणाली संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जावुन पोहचली.

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न (Check your progress)

ड) पुढील विधानातील बहुपर्यायीपैकी योग्य त्या पर्यायाची निवड करा.

१. सत्यशोधक समाजाची स्थापना ..... यांनी केली.

अ) महात्मा फुले ब) छ. राजर्षी शाहू क) भाऊराव जाधव ड) भालेकर

२. सत्यशोधक समाजाची स्थापना इ.स. ..... साली झाली.

अ) १९२० ब) १८७३ क) १८२० ड) १७९०

३. सत्यशोधक समाजाचे कार्य ..... टप्प्यात झाले.

अ) पाच ब) चार क) तीन ड) दहा

४. सत्यशोधक समाजात ..... वर्गाकडे लक्ष दिले.

अ) सुधारलेल्या ब) मागासलेल्या क) दु:खी ड) उपेक्षित

५. ईश्वर हा ..... आहे असे सत्यशोधक समाजाचे तत्त्व आहे.

अ) विश्वनिर्माता ब) प्रमुख क) मार्गदर्शक ड) सर्वस्व

३.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

अ) १. ब्राह्मो समाजाची स्थापना राजा राममोहन रॉय यांनी केली.

२. ब्राह्मो समाजाची स्थापना इ.स. १८२८ मध्ये केली.

३. सतीप्रथा १८२९ मध्ये बंद झाली.

४. राजाराम राममोहन रॉय यांच्यानंतर ब्राम्होसमाजाचे कार्य देवेंद्रनाथ टागोर यांनी केले.

५. इ.स. १८२५ मध्ये वेदांत कॉलेजची स्थापना झाली.

ब) १) चूक २) बरोबर ३) बरोबर ४) चूक ५) बरोबर

क) १) स्वामी दयानंद सरस्वती २) इ.स. १८७५ मध्ये ३) शुद्धीकरण

४) दयानंद महाविद्यालय ५) ईश्वरसेवा

५) १) महात्मा फुले २) १९७३ ३) तीन ४) उपेक्षित ५) विश्वनिर्माता

(अ) सामाजिक सुधारणावादी चळवळी (Social Reform Movement)

भारतामध्ये १८ व्या शतकात आणि त्यानंतर मोठ्या प्रमाणात सामाजिक परिर्वतन घडून आले. ताठर स्वरूपाचा असलेल्या हिंदु समुदायामध्ये नवीन विचार प्रणाली आणि विचार प्रक्रियेतून बदल घडून येवू लागला. त्यामध्ये मुख्यत: भारतीय समाजावर झालेल्या पाश्चात्यीकरणाचा प्रभाव अधिक आहे. या प्रक्रियेचा परिणाम म्हणून, पारंपारिक आणि ताठर स्वरूपाच्या असलेल्या धार्मिक श्रद्धा आणि त्यांचा जनमानसावरील प्रभाव कमी-कमी होत गेला. पाश्चिमात्यीकरणामुळे हिंदूंचा त्यांच्या पारंपारिक संस्थांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलत गेला. त्यामुळे ज्या अनेक जुन्या मुल्ये, रूढी, परंपरा समाजाच्या दृष्टीने निष्कामी होत चालल्या होत्या त्याची जागा, नविन मुल्ये, रूढी आणि संस्था घेवू लागल्या. त्यामुळे भारतीय समाजामध्ये अनादीकाळापासून चालत आलेल्या बालविवाह, विधवा विवाह, आंतरजातीय विवाह, अस्पृश्यता, महिलांच्या समस्या बद्दलचा भारतीयांचा दृष्टीकोन बदलू लागला. या प्रकारच्या बदलांचा परिणाम म्हणूनच सामाजिक, राजकीय आणि धार्मिक जीवनामध्ये सर्व प्रथम सुधारणावादी चळवळी मूळ धरू लागल्या. त्यामध्ये राजाराम मोहन रॉय यांची ब्राह्मो समाज चळवळ, स्वामी दयानंद सरस्वती यांची आर्य समाज चळवळ, स्वामी विवेकानंद यांची रामकृष्ण मिशन, महात्मा गांधीजीची सर्वोदय आणि अस्पृश्यता विरोधी चळवळ इ. चळवळींचा समावेश होतो. या चळवळींच्या माध्यमातून केवळ वाईट सामाजिक प्रथा नष्ट झाल्या नाहीतर या चळवळींनी लोकांना नवीन आधुनिक मूल्याबाबतची माहिती देण्याचा प्रयत्न केला.

अ) ब्रह्मो समाज चळवळ :

आधुनिक भारताचे आद्य पुरुष म्हणून ओळखले जाणारे राजाराम मोहन रॉय यांनी भारतातील हिंदू समुदायामध्ये असलेल्या वाईट धार्मिक प्रथा, अंधश्रद्धा यांच्या विरोधात आवाज उठविला.

१) ब्राह्मो समाज चळवळीचा उदय : या चळवळीचा उदय बंगाल प्रांतात सर्व प्रथम झाला. त्यांनी भारतीय समाजाची धार्मिक गुलामगिरीतून मुक्तता करताना, सतीप्रथा बंद केली. विधवा पुनर्विवाह, महिला शिक्षणाला चालना देऊन जातीय विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी पाश्चात्य विचार आणि मूल्यांवर आधारीत अनेक ग्रंथ लिहिले. त्यांनी १८२२ मध्ये ब्राह्मो समाजाची स्थापना केली.

२) जातीय विषमतेविरोधी लढा : राजाराम मोहन रॉय यांनी जातीय व्यवस्था ही अमानवी प्रकार असून, त्यामुळे समाजात निर्माण होणाऱ्या जातीय विषमते विरुद्धचा लढा सुरू केला. त्यांनी मूर्तीपूजा, सती, बहुपत्नी विवाह, जातीव्यवस्थेविरुद्ध लढा सुरू केला व त्यांनी स्वत: विधवेशी लग्न करून सामाजिक प्रथेविरुद्ध आवाज उठविला. त्यांनी आंतरजातीय आणि वांशिक विवाहांना मान्यता देत असताना, बाल विवाहाची प्रथा बंद केली.

३) सती प्रथेविरुद्ध लढा : १८२९ मध्ये सती प्रतिबंध कायद्याच्या निर्मितीला राजाराम मोहन रॉय यांचे प्रयत्न कारणीभूत आहेत. त्यांनी हिंदू धर्मातील वेदांचा स्वीकार करताना प्राचीन हिंदु श्रद्धा आणि प्रथांना विरोध केलेला आढळतो. त्यांनी जाती विरहीत समाज निर्माण कावयाचा होता. त्यांनी हिंदू धर्माच्या सुधारणा करताना हिंदू धर्माची जुन्या अंधश्रद्धा आणि परंपरांच्या गुलामगिरीतून मुक्तता केली. त्यासाठी त्यांनी आपल्या चळवळीच्या माध्यमातून भारतीय साहित्य आणि संस्कृतीवर लिखाण केले.

ब) प्रार्थना समाज चळवळ :

१८४९ मध्ये ब्राह्मो समाजाची चळवळ ज्या वेळी महाराष्ट्रात प्रवेश करू लागली त्यावेळी मुंबई, 'भारत ब्राह्मो समाज' चळवळीचे संस्थापक केशवचंद्र सेन यांनी १८६७ मध्ये 'प्रार्थना समाजा'ची स्थापना केली.

१) समाज सुधारणा हाच केंद्रबिंदू : प्रार्थना समाज चळवळीचा 'समाजसुधारणा' हाच प्रमुख केंद्रबिंदू होता. आधुनिक विचारसरणीचा स्वीकार करताना हिंदू धार्मिक विचार आणि प्रथांच्या मध्ये सुधारणा घडवून आणणे, त्यांनी एकेश्वरवादाची शिकवण मान्य करताना धर्मगुरु आणि जाती प्रथांच्या गुलामगिरीतून धर्माची सुटका करण्याचा प्रयत्न केला. विविध जातींच्यामधील आंतरजातीय विवाहांना त्यांनी संमती दिली. त्यांनी हिंदूंच्या मधील जुनाट प्रथा बदलताना विधवा पुर्नविवाहाला मान्यता दिली. त्यांनी महिला वर्गासाठी सुधारणा घडवून आणीत असताना, वंचित गटातील महिलांसाठी खूप प्रयत्न केले. महिलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करताना दारिद्र्य रेषेखालील महिलांसाठी निवास स्थानाची सोय केली. दुर्लक्षित असलेल्या मुलांच्या सोयीसाठी पंढरपूर येथे अपंग वसतिगृह उभारले. विधवांच्यासाठी रात्रशाळा आणि निवासस्थान उभारले.

२) प्रार्थना समाजाचे नेतृत्व : गोपाळ गणेश आगरकर, महर्षि कर्वे, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, न्यायमुर्ती रानडे आणि इतर यांनी प्रार्थना समाज चळवळीचे नेतृत्व केले. या चळवळीने अनेक प्रकारची कार्ये प्रामुख्याने महाराष्ट्र राज्यात केली. याला प्रमुख कारण म्हणजे न्यायमूर्ती रानडे यांनी समाज सुधारणेसाठी विशेष प्रयत्न केला होता.

क) आर्य समाज चळवळ :

१८२४ ते १८८३ या कालखंडात हिंदू धर्म आणि समाजाची सुधारणा करण्याच्या उद्देशाने 'स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्य समाज चळवळ सुरू केली. प्रार्थना समाज चळवळ आणि आर्य समाज चळवळ या दोन्हीच्यावर पाश्चात्य विचारांचा प्रभाव असल्याने, पश्चिम आणि पूर्व यांच्यातील विचारासंबंधी नव्याने मांडणी करण्याचा प्रयत्न या दोन्ही चळवळींच्या माध्यमातून झाला आहे. परंतू आर्य समाज प्रामुख्याने राष्ट्रीय स्वरूपाची चळवळ असल्याने प्राश्चात्य विचारांच्या प्रभावाचा स्वीकार करीत नाही.

१) पाश्चात्य प्रभावाचा विरोध : ब्राह्मो समाज चळवळीमधील केशवचंद्र सेन आणि इतर कार्यकर्ते यांच्याशी स्वामीचा संपर्क आला असला तरी, त्यांनी त्यांच्या स्वत:च्या विचारातून आर्य समाज चळवळ सुरू करताना १८७४ मध्ये 'सत्यार्थ प्रकाश' संपादित करून आर्य समाज चळवळ उभारली. त्यांनी पाश्चात्य संस्कृतीचा स्वीकार करणाऱ्यांना परावृत्त करून वेद अभ्यासाचे महत्त्व पटवून दिले. या मधून त्यांच्या राष्ट्रप्रेमाची भावना स्पष्ट होते.

२) वंदे चळवळीचे प्रमुख प्रेरणा स्थान : यांच्या मते, वेदामध्ये सर्व प्रकारचे संपन्न ज्ञान आहे. वेदांचा विवेकशीलपणे अभ्यास करून भारतीय संस्कृतीचा संपूर्ण अर्थ जाणून घेता येतो. वेदांमध्ये असलेल्या ज्ञानाद्वारे वर्तमानकालीन समाजामध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न स्वामीनी केला होता. वेदांच्यामध्ये जातीय विषमता, बाल विवाह, सती प्रथा, विधवा विवाह निर्बंध अशा काही प्रथा नाहीत. त्यांनी हिंदू धर्माशी संबंधित असणाऱ्या पूजा-अर्चा, ब्राह्मण धर्मगुरु वर्चस्व आणि जाती-व्यवस्थेला विरोध केला होता. हिंदू धर्माच्या नावाखाली भारतीय समाजात ज्या काही अनिष्ठ प्रथा चालतात त्या बंद व्हाव्यात यासाठी आर्य समाज चळवळ सुरू केली. आणि प्राचीन वैदिक धर्म आणि संस्कृती पुर्नजिवित करण्याचा प्रयत्न केला.

३) पाश्चात्य शास्त्राच्या अभ्यासाला प्रोत्साहन : स्वामी दयानंद सरस्वती यांनी पाश्चात्य विचार आणि दृष्टीकोनाबाबत पूर्ण विरोध करणारे नव्हते. उलट त्यांनी पाश्चात्य शास्त्रांच्या अभ्यासाला महत्त्व दिले होते. स्वामीची, केशवचंद्र सेन, विद्यासागर न्यायमूर्ती रानडे, गोपाळ हरी देशमुख इ. समाज सुधारकांची चर्चा करून आर्य समाजाचे विचार, ब्राह्मो आणि प्रार्थना समाजांशी कशा प्रकारे मिळते-जुळते आहेत या विषयी आपले मत स्पष्ट केले.

४) आर्य समाज चळवळची कार्ये : समकालीन भारतीय समाजात आढळून येणाऱ्या अनिष्ठ प्रथांच्या विरोधात सामाजिक क्रांती केली. पाश्चात्य विचारांच्या धर्तीवर शिक्षण देण्यासाठी म्हणून आर्य समाज चळवळीतील नेत्यांनी प्रामुख्याने पंजाब आणि सिंध प्रांतात शाळा, कॉलेज आणि वसतीगृहे उभारली. महिलांचा दर्जा उंचावण्यासाठी त्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले. जाती व्यवस्था आणि अस्पृश्यतेविरुद्ध लढा दिला. शुद्रांना देखील वेदांचा अभ्यास करता येतो अशी भूमिका घेतली. सामाजिक समानतेबरोबर प्रत्येक व्यक्तीला आत्मसन्मान आणि आत्मनिर्भर करण्यामध्ये आर्य समाज चळवळीने प्रयत्न केला. एकूणच या चळवळीच्या प्रयत्नातून राष्ट्रवादाची भावना वाढण्यास मदत झाली.

ड) श्री रामकृष्ण मिशन :

कलकत्त्यामध्ये १८३४ ते १८८६ या कालखंडात धार्मिक सुधारणांच्यासाठी श्री रामकृष्ण मिशन चळवळ सुरू करण्यात आली. ही चळवळ श्री रामकृष्ण परमहंस आणि त्यांचे अनुयायी स्वामी विवेकानंद यांच्या विचारातून पुढे आली.

१) सर्वधर्म समभाव आणि मानवसेवा : संत रामकृष्ण परमहंस सारख्या एका अशिक्षित व्यक्तीच्या नावाने स्वतंत्ररित्या स्थापन झालेल्या रामकृष्ण मिशन चळवळीच्या माध्यमातून, सर्वधर्म समभावाची आणि मानव सेवेची मांडणी केली होती. 'मानव सेवा हीच ईश्वर सेवा असते' असा संदेश या चळवळीच्या

माध्यमातून दिला गेला. त्यांच्या मते, ईश्वरापर्यंत पोहचण्याचे अनेक मार्ग असले तरी मानवसेवा हा खरा मार्ग आहे.

२) पाश्चात्य भौतिकवादावर प्रतिबंध : या चळवळीच्या माध्यमातून भारतीय समाजाचे, पाश्चात्य भौतिकवादाच्या प्रभावापासून संरक्षण करण्याचा प्रयत्न केला होता. हिंसक प्रकारच्या माध्यमातून परिवर्तनाला विरोध करताना आर्थिक आणि सामाजिक सुधारणा सावकाशपणे करण्याचा प्रयत्न केला.

३) स्वामी विवेकानंद चळवळीचा बुलंद आवाज : स्वामी विवेकानंद या चळवळीच्या विचाराचे एक फलित होते. नंतरच्या काळात स्वामी विवेकानंद यांनी समकालीन भारतीय समाजाचे स्वरूप विचारात घेवून चळवळीला नवीन दिशा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. विवेकानंद यांनी विचार आणि कृती यांची सांगड घालत असताना हिंदू विचारसरणीचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. जाती व्यवस्था, असमानता यांचा विरोध केला. या चळवळीच्या शाखा भारताबराबेरच अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स या देशात आहेत. या चळवळीच्या माध्यमातून अनेक हॉस्पीटल, वसतीगृहे आणि आपदग्रस्तांना मदत दिली जाते.

इ) थियॉलॉजिकल सोसायटी :

१८७५ मध्ये अमेरिकेत स्थापन झालेली ही संस्था किंवा चळवळीनंतर भारतात १८८६ मध्ये मद्रास या ठिकाणी स्थापन झाली. ॲनी बेंझट यांच्या प्रयत्नामुळे या चळवळीला भारतात विशेष महत्त्व प्राप्त झाले. या चळवळीच्या माध्यमातून जगातील प्राचीन धर्म म्हणून हिंदू आणि पारशी धर्माचे विचार आणि तत्त्वज्ञान यांचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. या प्राचीन धर्माची शिकवण संपूर्ण विश्वामध्ये समान बंधूत्वाची भावना निर्माण करणारे आहेत. या धर्माच्या शिकवणीमधून ॲनी बेंझट यांनी, सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी वाराणसी या ठिकाणी 'Central Hindu School' स्थापन केले व नंतरच्या काळात ते मदन मोहन मालविया यांनी बनारस हिंदू विद्यापीठाच्या माध्यमातून पुढे चालू ठेवले. या चळवळीला पाश्चात्य विचारवंताचा देखील हातभार लागलेला आहे.

फ) सत्यशोधक समाजाची चळवळ :

महात्मा ज्योतिबा फुले यांनी १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना पुणे या ठिकाणी ब्राह्मणेत्तराची चळवळ म्हणून स्थापन केली. ब्राह्मणांच्या वर्चस्वाविरोधात कनिष्ठ जातींची असलेल्या या चळवळीना मागासवर्गाची चळवळ असे सुद्धा म्हणतात. ब्रिटीश कालखंडात ब्राह्मणांच्या वर्चस्वाविरोधात सत्यशोधक समाज नावाची चळवळ फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी केली. त्या काळात ब्रिटीशांनी ज्या आधुनिक सुख सुविधा सर्वासाठी सुरू केल्या होत्या त्याबद्दल त्यांनी ब्रिटीशांची प्रशंसा केली होती.

१) सत्यशोधक चळवळीची विचारसरणी : ब्राह्मण धर्मगुरुच्या धार्मिक गुलामगिरीमधून शुद्र आणि अति शुद्रांची मुक्तता करून त्यांना मानवी हक्काची जाणिव करून देणे हे मुख्य उद्दिष्ट होते. ही चळवळ उग्रवादी स्वरूपाची होती. आणि तिचा ब्राह्मण वर्चस्वाला थेट विरोध होता. त्यांनी शुद्र व अतिशुद्रांना विवाह कार्याच्या वेळी ब्राह्मण धर्मगुरुना निमंत्रित न करण्याचा सल्ला दिला. त्यांनी अस्पृश्यता, निरक्षरता आणि शुद्रांची ब्राह्मणाकडून होणारी पिळवणूक थांबविण्याचा प्रयत्न केला.

२) कनिष्ठ जातींच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार : फुलेंच्या मते, ब्राह्मणांच्या मक्तेदारीमुळे ब्राह्मणेत्तर समाज हा शिक्षणापासून वंचित राहिला आहे. त्यासाठी त्यांनी अस्पृशांच्यासाठी १८४८ मध्ये पहिली शाळा काढली. या शाळेत प्रामुख्याने, शुद्र, महार, मांग आणि चांभार समुदायातील मुली शिकत होत्या. त्यानंतर त्यांनी शिक्षणाचा विस्तार वाढविताना १८५१ आणि १८५२ मध्ये नविन शाळांची स्थापना केली. त्यामुळे फुलेंच्या या चळवळीला मागासवर्गीयांची चळवळ म्हणून सुद्धा ओळखले जाते. फुलेंच्या मृत्यूनंतर या चळवळीला कोल्हापूरचे श्री शाहू महाराज यांनी पुढे जिवित ठेवले. अशाप्रकारे सत्यशोधक समाज चळवळ ही एक खऱ्या अर्थाने मागास वर्गीयांची चळवळ होती.

ज) श्री नारायण गुरु धर्मप्रपालन योगम :

१८५४ ते १९२८ या कालखंडात १९०३ मध्ये केरळ राज्यात 'श्री नारायण गुरु' यांनी (S.N.D.P.) चळवळ सुरू केली. 'एक जात, एक धर्म आणि एक ईश्वर' हे ब्रीद वाक्य या चळवळीचे होते.

केरळमधील 'इझवा' या वंचित समुदायामधून नारायण गुरु आल्याने त्यांनी सर्वप्रथम या समुदायातील उन्नतीसाठी अनेक शाळा, महाविद्यालये उभारली. तसेच अनेक ठिकाणी मंदिरे उभारली. तसेच मंदिर पूजा, अंत्यविधी आणि विवाह संबंधी असणाऱ्या धार्मिक विधींच्या मध्ये साधेपणा आणला. श्री. नारायण गुरु यांनी आपल्या 'इझवा' समुदायाच्या सवयी आणि त्यांत्यातला आत्मविश्वास वाढावा यासाठी सलग १५ वर्षे काम केले. नारायण गुरु यांनी धार्मिक सुधारणा करताना हिंदू समुदायामध्ये असणाऱ्या काही अनियमित प्रथांच्यामध्ये सुधारणा केल्या. नारायण गुरु यांच्या काळात कनिष्ठ जातींना ब्राह्मण धर्मगुरु मंदिरे प्रवेश करू देत नसत. या प्राचीन प्रथा बंद करण्याचे कार्य नारायण गुरु यांनी केले. त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी शिवमंदीराची स्थापना करून ज्यांना मंदिर प्रवेश दिला जात नव्हता त्यांना संधी दिली. या शिवाय त्यांनी आपल्या समुदायातील व्यक्तींना धर्मगुरु म्हणून नेमणूक केली. आपल्या अनुयायांना मंदिरे स्थापन करण्याचा आदेश दिला व मुर्तीपूजा संमती केली.

सामाजिक कार्ये करताना या चळवळीच्या माध्यमातून 'इझवा' या मागास वर्गीयांना शिक्षणाच्या संधी एका बाजूला देत असताना त्यांच्यावर योग्य त्या प्रकारचे धार्मिक संस्कार करून त्यांच्यामध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या एकूण ३० वर्षाच्या अथक प्रयत्नांतून १९३६ साली मंदिर प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला. नारायण गुरु यांनी 'इझवा' समुदायामध्ये असणाऱ्या प्राचीन परंपरा व रूढी बदलण्याचा प्रयत्न केला. तसेच मद्यपानासारख्या समस्येतून 'इझवा' समुदायाला मुक्त करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी अस्पृश्यतेच्या प्रथेला विरोध केला. 'इझवा' समुदायाची SNDP ही एक महत्त्वपूर्ण संघटना असून त्यांच्या मार्फत अनेक पुस्तके प्रकाशित होतात. ही चळवळ पूर्णता अशासकीय स्वरूपाची होती.

अशाप्रकारे वरील सर्व प्रकारच्या चळवळी या सुधारणावादी चळवळी म्हणून ओळखल्या जातात.

३.५ सारांश :

या घटकात आपणाला इंग्रज राजवटीपासून सामाजिक सुधारणा चळवळी कशा घडत गेल्या हे अभ्यासायला मिळाले. यात ज्या चार समाजाचा अभ्यास केला आहे तो म्हणजे ब्राम्हो, प्रार्थना, आर्य व सत्यशोधक समाज यातून एकच संदेश मिळतो की परमेश्वर हा एकच असून तो निर्गुण, निराकार, सर्वस्पर्शी,

विश्वनिर्माता आहे. मुर्तीपूजा मान्य नाही, हिंदू धर्माबद्दल अभिमान आहे, वेदांचे उपासक आहेत, समाजसुधारक वेगवेगळा असेल तरी सर्वांनी आपल्या प्रबोधनातून अंधश्रद्धा, अनिष्ट चालीरिती, प्रथा-परंपरा यांनी तिलांजली देऊन ईश्वरापुढे सर्व समान आहेत या भावनेने वागले पाहिजे हा संदेश आढळून येतो. बालविवाह बंदी, सतीप्रथा बंदी, एकेश्वरवाद, मानवतावादाचा पुरस्कार यावर ब्राम्होसमाजात भर दिल्याचे आढळते तर प्रार्थना समाजात जातीभेद नष्ट करणे, स्त्रीशिक्षणाला प्राधान्य देणे, विधवा पुनर्विवाह, स्त्री-पुरूष समानता ही उद्दिष्ट्ये आढळून येतात. आर्य समाजात शैक्षणिक प्रसार व शुद्धीकरण चळवळ हे महत्त्वाचे घटक आढळतात. तर सत्यशोधक समाजात उपेक्षितांची परवड थांबणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षण प्रसार, पुरोहित मध्यस्थींची गरज नको असेच संदेश दिल्याचे आढळते. एकूण चारी समाजातून सामाजिक प्रबोधन झाल्याचे आढळून येते.

३.६ सरावासाठी स्वाध्याय (Excercise/Home Assignment)

अ) पुढील प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा.

१. ब्राम्हो समाजाची स्थापना करुन कोणती सामाजिक सुधारणा यशस्वी केली हे विशद करा.

२. प्रार्थनासमाजाबद्दल सविस्तर माहिती देऊन प्रार्थना समाजाचे तत्त्वज्ञान व उद्दिष्टे विशद करा.

३. आर्य समाजाच्या कार्याचा आढावा घ्या.

४. सत्यशोधक समाजाबद्दल सविस्तर माहिती द्या.

५. सामाजिक चळवळीतून कोणकोणत्या सामाजिक सुधारणा झाल्या याचा आढावा घ्या.

ब) टीपा लिहा.

अ) ब्राम्होसमाज

ब) प्रार्थनासमाज

क) आर्य समाज

ड) सत्यशोधक समाज

इ) सामाजिक सुधारणा चळवळी व समाज

३.७ क्षेत्रीय कार्य :

१. सामाजिक चळवळींचा अभ्यास केल्यानंतर तुमच्या आसपास सामाजिक प्रबोधन करणारी एखादी सामाजिक चळवळीचे कार्य करणाऱ्यांना भेट द्या व सामाजिक प्रबोधन कसे होते पहा.

२. आपल्या अवतीभोवती असणाऱ्या गरजू समाजाला सामाजिक प्रबोधन करा व निरक्षरता दूर करण्याचे प्रयत्न करा.

३. लोकशिक्षणाच्या माध्यमांतून सामाजिक प्रबोधन करण्यास हातभार लावा.

३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)

१. मार्डीकर मदन – इतिहास – हिमालया पब्लिशिंग हाऊस मुंबई – २००७.

२. लेवे अविनाश, अघोर अनिल, गिरी टी. डी. – आधुनिक भारत बालाजी पब्लीकेशनस पुणे – २००६.

३. राऊत गणेश – इतिहास–मॅकमिलन इंडिया लि. पुणे – २००७

४. कदम – काटे – समाजसुधारकांचा इतिहास – फडके प्रकाशन कोल्हापूर–२००५.

५. पाटील हि. ज्ञा. महाराष्ट्राचे कर्मवीर – वारणा खोरा प्रकाशन – भादोले.

६. गुजर जयवंत – जगावेगळा सत्यशोधक – गुरूवर्य केशवराव विचारे–प्रिन्ट ओम ऑफसेट, सातारा–२००४

७. वृत्तपत्रातील या संदर्भातील विविध लेख वाचावे.

✣ **संदर्भ :**

SHANKAR RAO C. N. 'Sociology of Indian Society' S. Chand & Company Ltd., New Delhi - 2010.

❑❑❑

घटक – ३ (ब)

भारतातील पारंपारिक सामाजिक चळवळी

Traditional Social Movements in India

घटक – संरचना

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ अभ्यास विषयाची मांडणी

- ३.२.१ शेतकऱ्यांच्या चळवळी
- ३.२.२ कामगारांच्या चळवळी
- ३.२.३ आदिवासीच्या चळवळी

३.३ स्वयंअध्ययन प्रश्न

३.४ सारांश

३.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

३.० उद्दिष्टे (Objective)

या घटकाच्या अध्ययनात आपल्याला

- स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकऱ्यांच्या चळवळीचे स्वरूप जाणून घेता येईल.
- भारतातील वेगवेगळ्या प्रदेशातील आदिमांच्या चळवळींची माहिती मिळेल.
- कामगार संघटनाच्या चळवळींची माहिती प्राप्त होईल.

३.१ प्रस्तावना : (Introdution)

संपूर्ण जगामध्ये कमी अधिक प्रमाणात सर्व समाजांमध्ये विविध प्रकारच्या चळवळी उदयाला आल्या. भारताच्या दृष्टिने विचार करता सरंजामशाही काळापासून सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक तसेच राजकीय हेतुंनी प्रेरित अशा अनेक चळवळी घडून आल्या आहेत. चळवळी ह्या कधी संघटनात्मक तर कधी

असंघटनात्मक स्वरूपाच्या घडत असतात. सर्व माणसे समान आहेत. सर्वांना सारख्याप्रमाणात जीवन जगण्याचा अधिकार आहे. सर्वांना सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचा अधिकार आहे. अशी नैसर्गिक स्थिती असताना जेव्हा एक व्यक्ती वा समूहाद्वारे दुसऱ्या व्यक्ती वा समूहांना सारख्या प्रमाणात जगण्याचे अधिकार हिरावून घेतले जातात तेव्हा जगणे मुश्किल होणाऱ्या व्यक्ती वा समूहे मिळून उठाव करतात. प्रोबोधनाच्या प्रेरणेने जागृत झालेल्या व्यक्तींना वा समूहाना आपल्यावरील अन्यायाची जाणीव निर्माण झाली की उठावाशिवाय किंवा चळवळीशिवाय पर्यार्य उरत नाही. जगा जगु द्या या साम्याच्या मूलतत्त्वाला जेव्हा धक्का बसतो तेव्हा व्यक्ती चळवळ करतात. चळवळी ह्या कधी सामाजिक परिवर्तनाला चालना देणाऱ्या असतात तर कधी परिवर्तनाला विरोध करणाऱ्या असतात मुलत: चळवळींची दिशा परिवर्तनाच्या स्वरूपात पुढे जाणारी असते. समाजातील शोषण, अन्याय, गुलामगिरी, विषमता यांच्या विरोधात घडत असतात. समाजातील काही चतुर, लोभी व्यक्ती स्वत:च्या भल्यासाठी दुसऱ्या व्यक्तींना लुबाडणाऱ्या प्रयत्न करतात तेव्हा जागृत झालेल्या व्यक्तीं एकत्र येऊन सामूहिक स्वरूपात त्याला विरोध करण्याचा प्रयत्न करतात. प्रामुख्याने समाजव्यवस्थेतील एखाद्या भागामध्ये बदल करू इच्छिणाऱ्या व्यक्ती सामुहिक स्वरूपात प्रयत्न करतात तेव्हा त्यातून चळवळ आकार घेते.

३.२ अभ्यास विषयाची मांडणी : (Presentation of Subject matter)

या घटकामध्ये आपल्याला आदिवासींच्या चळवळी, शेतकऱ्यांच्या चळवळी आणि कामगारांच्या चळवळी यांचा अभ्यास करावयाचा आहे. भारतातील आदिवासी लोक हे दुर्गम अशा प्रदेशांमध्ये वास्तव्य करून आहेत. निसर्गाच्या सानिध्यात आनंदी जीवन प्रगण्याचा ते प्रयत्न करत असतात. भारतात ब्रिटीश येण्यापूर्वी आदिवासी आपल्या भू-प्रदेशामध्ये सुखाने जीवन जगत होता. परंतु भारतात ब्रिटीशांनी प्रवेश केल्यानंतर त्यांच्या सुखी जीवनाला ग्रहण लागले. उद्योगधंदा व्यापार, व्यवसाय करून भांडवली माया जमावांच्या प्रयत्नात ब्रिटीशांनी आदिवासींच्या जगण्याचे मुख्य आधार स्त्रोत बळकावले. खाणीउद्योग, जंगल उद्योगातुन आदिवासींचे हक्काचे प्रदेश, जमीन, जंगल वनस्पती ब्रिटीशांनी त्याचबरोबर प्रगत लोकांनी बळकावण्याचे प्रयत्न केले. आदिवासींच्या जीवनात अनेक सामाजिक, आर्थिक, सासंस्कृतीक प्रश्न निर्माण झाले. त्यामुळे आदिवासीमध्ये अनेक प्रकारच्या चळवळी उदयाला आल्या.

आदिवासींच्या प्रमाणेच शेतकऱ्यांमध्येही अनेक प्रश्न निर्माण झाले. ब्रिटीशांनी सुरू केलेले महसूल विषयक कायदे, जमीनदारी पद्धती, सारापद्धती त्याचबरोबर त्यांना आकारलेले विविध कर यातून शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती दुर्बल बनली. ब्रिटीशाप्रमाणेच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर करण्यात आलेल्या जमीनविषयक सुधारणा पंचवार्षिक योजना उद्योगधंद्याचा विस्तार, जमीनविषयक कायदे, व्यापारविषयक धोरणे, आणि काही विकास प्रकल्प यामुळे शेतकऱ्यांचे शेतीविषयक हक्क व अधिकार यात बदल घडून आले. त्याचबरोबर शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादीत मालाला योग्य बाजारपेठ तसेच दर उपलब्ध न झाल्यामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना चळवळींच्या मार्गाने आपले अधिकार प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला.

कामगार वर्गांच्याबाबतीत नेहमीच अन्यायात्मक परिस्थिती उत्पन्न झालेली दिसून येते. कारखाना उत्पादनपद्धतीला प्रारंभ झाल्यापासून एका बाजुला कारखान्यांचा विकास होत गेला. तर दुसऱ्या बाजुला कामगार वर्गांचा आर्थिक ऱ्हास होत गेला. कारखाना मालक वर्गांने कामगारांना त्याच्या कामाचा योग्य

मोबदला देणे, कामाची शाश्वती देणे, वेतनवाढ देणे, बोनस देणे, त्यांना सुट्या देणे त्यांचे शारीरिक व सामाजिक, सांस्कृतिक जीवन सुधारणे या सेवासुविधा कामगारांना बहाल करणे आवश्यक आहे. पण कामागारांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला न देता मालक लोक त्यांचे मोठ्या प्रमाणात शोषण करतात. परिणामी अशा परिस्थितीतून कामगारांना संघटना निर्माण करून चळवळ करण्याशिवाय पर्याय उरत नाही.

३.२.१ शेतकऱ्यांची चळवळ :

प्रस्तावना :

१७६५ नंतर ईस्ट इंडिया कंपनीने स्वत:चे उत्पन्न वाढविण्यासाठी जमीन महसूलविषयक धोरणात बदल केले. सुरुवातीस बंगाल प्रातांत कायमधारा किंवा जमीनदारी पद्धत सुरू केली. या पद्धतीमुळे पूर्वीच्या राजवटीतील शेतकऱ्यांचे मालकी हक्क नष्ट झाले. त्यामुळे त्यांना कुले म्हणून रहावे लागले. ब्रिटीशांनी अगोदरच सारा दुप्पट केला होता. त्यातच जमीनदारांनी शेतकऱ्यांकडून अनिर्बध सारा गोळा करण्यास सुरूवात केल्यामुळे शेतकरी दरिद्री बनला. ब्रिटीशांनी ही जमीनदारी पद्धती बिहार, ओरिसा, उत्तरप्रदेश व मद्रास या प्रदेशात लागू केली.

ब्रिटीशांनी नंतरच्या कालखंडात जमीनदारी पद्धती नष्ट करून रतयवारी पद्धती सुरू केली. या पद्धतीमुळे शेतकऱ्याला जमिनीची मालकी मिळाली. जमीनदाराला मध्यस्थ न ठेवता प्रत्यक्ष शेतकऱ्याने सरकारकडे सारा जमा करण्याची पद्धत सुरू झाली. जोपर्यंत शेतकरी सारा भरेल तोपर्यंत जमिनीवर त्याची मालकी राहील असे धोरण ठरविण्यात आले. शेतकऱ्यांने सारा किती भरायचा हे निश्चित करण्यात आले. व तीस वर्षांनी साऱ्यात बदल किंवा वाढ करण्याचे ठरले. साऱ्यात बदल करताना प्रत्येक वेळी २५ ते ६० टक्क्यांनी वाढ करण्यात आली. शेतसारा पैशाच्या स्वरूपात सरकार जमा करण्याचे निश्चित झाले. दरम्यानच्या काळात खेड्यातील लोकसंख्या वाढली तसेच, हस्तव्यवसायावर अवलंबुन असलेला वर्ग शेतीकडे आकर्षित झाला. परिणामी शेतकऱ्यांना पैशाच्या स्वरूपातील सरकार जमा करावा लागणारा सारा भरणे मुष्कीलीचे झाले. सारा भरण्यासाठी खेड्यातील जमीनदारांकडून जमीन तारणावर कर्ज घेणे भाग पडले. परिणामी शेतकऱ्यांवर कर्ज भरता न आल्यामुळे जमीनदार किंवा सावकार हे शेतकऱ्यांच्या जमीनीचे मालक बनले. साहजिकच शेतकऱ्यांकडील जमीनी सावकारांच्याकडे हस्तांतरीत झाल्यामुळे आणि सरकारला पैशाच्या स्वरूपात सारा भरावा लागत असल्यामुळे शेतकऱ्याची आर्थिकस्थिती पूर्ण ढासळुन गेली.

थोडक्यात जमिनदारी पद्धतीमध्ये शेतकऱ्यांना अनिर्बंध सारा जमीनदारांना देता न आल्यामुळे आणि रयतवारी पद्धतीमध्ये पैशाच्या स्वरूपातील सरकारला सारा भरणे कठीण झाल्यामुळे शेतकऱ्यांने जमीनीवरील आपले हक्क गमवावे लागले व त्यांच्या जमिनी सावकार व जमिनदार यांच्याकडे हस्तांतरीत झाल्या. शेतकऱ्यांना दारिद्रयात आपले जीवन जगणे भाग पडले याला प्रतिकार करण्यासाठी शेतकऱ्यांची संघटना निर्माण करणे आवश्यक ठरले. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी अनेक चळवळी निर्माण झाल्या त्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

३.२.१ अ) स्वातंत्र्यपूर्वकाळातील शेतकऱ्यांची चळवळ :

या काळामध्ये अगदी १९ व्या शतकाच्या प्रारंभी काही शेतकरी चळवळी उदयाला आल्या त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) पुनर्स्थापनावादी चळवळ :

ब्रिटीशांची हकालपट्टी करून पूर्वीचे सरकार व शेती व्यवहार पूनर्स्थापित करण्यासाठी १७६५ ते १८५७ या काळात अनेक उठाव झाले या उठावांमध्ये हिंदु व मुस्लिम छोटे रजवाडे, पूर्वीचे मोगलाच्या राजवटीतील महसूल अधिकारी, आदिवासी टोळ्यांचे नायक, दक्षिण भारतातील जमीन मालकी असणारे लष्करी अधिकारी सामील झाले होते. अशा प्रकारे जवळ जवळ २९ उठाव झाले. त्यातील काही महत्त्वाची उठाव पुढील प्रमाणे आहेत.

१) अवधच्या हिंदु व मुसलमान जमीनदारांचा आणि राजा चैत सिंगचा १७७८ ते १७८१ मधील उठाव.

२) उत्तर अर्काटच्या तिनवेल्ली भागातील पाळेगाव व त्यांच्या शेतकऱ्यांचा १८०१ ते १८०५ मधील उठाव.

३) पळशी राजाच्या नेतृत्वाखाली हजारो गनिमी सैनिकांच्या मलबारमधील १७९६ ते १८०५ मधील उठाव.

४) त्रावनकोट व कोचीन मधील त्रावणकोर संस्थानच्या वेलु थंपी या प्रधानाने ३०,००० सशस्त्र सैन्यांसह केलेला उठाव.

५) १८५५-५६ मधील संधाल आदिवासींनी केलेला उठाव.

६) १८५७-५८ च्या सैनिकांचा उठाव. इत्यादी उठाव हे ब्रिटीशपूर्व राजवट पून: प्रस्थापित व्हावी यासाठी केले.

२) धार्मिक चळवळी :

स्टीफन फुक्स यांनी भारतातील धार्मिक चळवळींचा अभ्यास केला. अशा धार्मिक चळवळीतील नेता हा प्रेषिताप्रमाणे कल्पित आदर्श समाजाचे स्वप्न अनुयायांसमोर ठेवतो. हे स्वप्न दैवी चमत्काराने साकारले अशी अनुयायांची श्रद्धा बनलेली असते. या चळवळीने प्रस्थापित समाजरचना बदलते. अशा चळवळी हिंदु व मुस्लिम समाजात घडून आल्या. त्या चळवळी पुढीलप्रमाणे आहेत.

१) १८३० ते १८५० या काळातील मांबूराम टंगालच्या तेतृत्वाखालील मोपला शेतकऱ्यांची केरळातील कुलांची चळवळ.

२) १८६७ ते १८७० काळातील गुजरातमधील जोरिया भगत या हिंदु धार्मिक नेत्याच्या नेतृत्त्वाखालील नाइकदा आदिवासी जमातीची चळवळ.

३) १८९० मधील बिरमा मुंडाच्या नेतृत्त्वाखाली मुंडा आदिवासी जमातीची चळवळ.

४) १९०० सालातील तीव्र दुष्काळानंतर १९०० ते १९२२ या काळातील गोविंदगिरी या हिंदु झालेल्या आदिवासी नेत्यांच्या नेतृत्त्वाखालील पंचमहाल भागातील भिल्लांची चळवळ. इत्यादी चळवळींनी कल्पित आदर्श समाजाचे स्वप्न पृथ्वीवर साकारेल आणि शेतकऱ्यांमधील प्रश्नांचे निवारण होईल अशा आशावादावर संघटित प्रयत्न केले.

३) सामूहिक उठाव :

ब्रिटीशांच्या धोरणांचा शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर अनिष्ट परिणाम झाला. शेतकऱ्यांची अधिक पिळवणूक केली जाऊ लागली. यासाठी शेतकऱ्यांनी शांततापूर्ण मार्गाने सामुहिक मार्गाने उठाव दडपण्याचा प्रयत्न केला. त्याला प्रत्युत्तर म्हणून सशस्त्र प्रतिकार करण्यात आला. त्यातील महत्त्वाचे उठाव खालीलप्रमाणे आहेत.

१) १७८९ मधील विष्णुपूर व बिरभूममधील शेतकरी व दरोडेखोरांचे उठाव.

२) १८०१ मधील हरयाणातील जाट शेतकऱ्यांचे बंड.

३) १८५० मधील खानदेशातील शेतकऱ्यांचे बंड.

४) १९२१ मधील केरळमधील मोपळ्यांचे बंड.

५) १८७० मधील बंगालमधील संथालांचा उठाव.

६) १८७५ मधील दख्खनचे दंगे ३ उठावांणी शेतकऱ्यांच्या आर्थिक पिळवणूकीविरूद्ध न्याय हक्कासाठी प्रयत्न केला.

४) महाराष्ट्रातील उठाव :

ब्रिटीशांची राजवट आल्यानंतर महाराष्ट्रातील पेशव्यांचे राज्य गेले. बरोबरच आदिवासी राजांची राज्ये केली त्यामुळे ब्रिटीश सरकारविरूद्ध सशस्त्र उठाव करण्यात आले.

अ) कोळ्यांचा व रामोशांचा उठाव :

१८२६ मध्ये पुणे जिल्ह्याच्या दक्षिण भागात रामोशांचे बंड झाले. हे बंड उमाजी नाईक यांच्या नेतृत्त्वाखाली झाले. १८२७ ला उमाजी नाईक पकडला गेल्यानंतर हे बंड थंडावले. रामोशांच्या उठावानंतर १८३० व पुन्हा १८३९-४६ या काळात कोळ्यांनी बंड केले. भाऊ खेर, चिमणजी जाधव व नाना दरबारे या एकेकाळच्या पेशव्यांच्या चाकरांचा या बंडात पुढाकार होता.

ब) भिल्लांचा उठाव :

१८२२ ते १८२७ या काळात खानदेशातील भिल्लांनी वारंवार ब्रिटिशांविरूद्ध बंड केले.

क) १८५७ च्या उठावाचे पडसाद :

या उठावाने अनेक ठिकाणी पडसाद उमटले.

१) भंडारा व चंद्रपुर जिल्ह्यातील बापूराव वेंकटराव या दोघां जमीनदारांनी गोंड व रोहिण्यांना एकत्र करून ब्रिटीशांविरूद्ध उठाव केला. पण ब्रिटीशांनी त्यांचा उठाव मोडून काढला.

२) साताऱ्याच्या भोसल्याचे निष्ठावत सेवक रंगो बापुजी गुप्ते, रामोशी, कोळी, मांग यांची फौज उभी करून बंड केले. पण विश्वासघातामुळे रंगो बापुजी यांचे सहकारी पकडले गेले.

३) यानंतर १८५२ मधील दख्खनचे दोन उठाव. ईस्ट इंडिया कंपनीने मुंबई इलाख्यात रयतवारी पद्धती सुरू केली. या पद्धतीमध्ये शेतकऱ्यांना जमिनीची मालकी मिळाली. पण त्याच्या बदल्यात शेतसारा पैशाच्या स्वरूपात सरकारला जमा करणे भाग पडले. दरम्यानच्या काळात अवर्णनात्मक परिस्थितीमुळे शेतकऱ्याला शेतसारा पैशाच्या रूपात भरणे शक्य ना झाल्याने सावकारांच्याकडून जमीन गहाण ठेवून कर्ज काढणे भाग पडले. कर्जाची परतफेड वेळेत न करता आल्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी जमीनदारांनी बळकावल्या. जमीनदारांना कर्जाचे व्याज देणे व सरकारला सारा भरणं हे शेतकऱ्याला शक्य झाले नाही. त्यामुळे शेतकरी गरीब बनला. शेतकऱ्यांनी या बिकट परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी सरकारकडे शांततापूर्ण मार्गाने गाऱ्हाणे मांडली. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. १८६७ मध्ये पुण्यात स्थापन झालेल्या सार्वजनिक सभेने शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. पण सरकारने सारा वसुल करण्याचे सत्र सुरूच ठेवले. त्यामुळे चिडलेल्या शेतकऱ्यांनी नगर, सोलापुर, पुणे इत्यादी जिल्ह्यात गुजर-मारवाडी सावकारांविरूद्ध सामाजिक बहिष्कार सुरू केला. निरक्षर, अडाणी शेतकऱ्यांना फसवून सावकार शेतकऱ्यांच्या जमिनी बळकवत असत. त्यामुळे १८७५ च्या दंगलीत शेतकऱ्यांनी कर्जरोखे व दस्ताऐवज जाळण्यावर भर दिला. असे दख्खनचे दंगे मुख्यत: पुणे, अहमदनगर, सोलापूर जिल्ह्यांतील गावांमध्ये झाले.

ड) शेतकरी वर्गातील सांस्कृतिक क्रांती :

म. फुले यांनी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात सामाजिक सुधारणेची चळवळ सुरू केली. त्यांनी शेतकऱ्यांच्या सामाजिक हिताला विरोध करणाऱ्या सावकार व भटजी यांच्या कारवायांबद्दल शेतकरी वर्गात जागृती निर्माण केली. म. फुले यांनी सावकार, कुलकर्णी, भट व जमीनदार शेतकऱ्यांचे शोषण कसे करतात हे आपल्या लिखाणातून समाजासमोर ठेवले. १८७९ साली 'दीनबंधू' नावाचे एक साप्ताहिक सुरू करून शेतकरी व कामगारांची शोषण याविषयी आवाज उठविण्याचा प्रयत्न केला.

ज्याप्रमाणे १९ व्या शतकाच्या प्रारंभी काही चळवळी घडून आल्या त्याच प्रमाणे १० व्या शतकाच्या शेवटी व २० व्या शतकाच्या प्रारंभी शेतकऱ्यांच्या काही चळवळी घडून आल्या त्यांची माहिती पुढील प्रमाणे आहे.

म. गांधीनी भारतातील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी विशेष रस घेतला. जमीन महसूल, शेतसारा दुष्काळ-निवारण आणि कर इत्यादींचा संबंध ब्रिटीश सरकारशी होता. अशाच प्रश्नासंबधी म. गांधीनी शेतकऱ्यांच्या चळवळीला प्रोत्साहन दिले. गरीब शेतकरी कुले, शेतमजुर यांचे प्रत्यक्ष शोषण करणाऱ्या जमीनदार, श्रीमंत शेतकरी, व्यापारी व सावकरांविरूद्ध उभे राहतील असे लढे मागे घेतले. थोडक्यात

शेतकऱ्यांमधील वर्गीय भावना नष्ट करून ब्रिटीश राज्यकर्त्यांविरूद्ध चळवळीची दिशा निश्चित करण्यात आली. असे लढे पुढीलप्रमाणे आहेत.

१) चंपारण सत्याग्रह : (बिहार १९१७–१८)

युरोपिय मळेवाले नील लागवडीसाठी भारतीय शेतमजुर व शेतकऱ्यांना अमानुष व बेकायदेशीर, अल्प मजुरीवर राबवून घेत होते. म. गांधीनी चंपारण्यातील शेतकऱ्यांना संघटित करून त्यांचा उठाव उभारला. याचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांवरील नील लागवडींची सक्ती रद्द केली प्रत्यक्षात हा लढा मळेवाल्यांशी साटेलोटे करणाऱ्या राज्यकर्त्यांविरूद्धचा होता.

२) खेडा सत्याग्रह : (गुजरात १९१९)

हा सत्याग्रह खेड्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी जुलमी ब्रिटीश नोकरशाही विरूद्ध म. गांधी यांच्या नेतृत्त्वाखाली केला. दुष्काळ सदृश्य परिस्थितीमुळे अन्नधान्यांचे उत्पादन होऊ शकले नाही. असे असतानाही सरकारी नोकरशाहीने महसूल आकारणी केली. त्या वर्षाची महसूल आकारणी रद्द करावी यासाठी २००० शेतकऱ्यांनी सार्वजनिक शपथ घेतली. गांधीजी व त्यांचे कॉंग्रेसमधील सहकारी यांनी ही मागणी उचलून धरली. सरकारी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना नमविण्यासाठी दडपशाहीचा वापर केला. पण शेतकरी नमले नाहीत. अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य केल्यावर आंदोलन मागे घेतले. या सत्यागृहात म. गांधींच्याबरोबर सरदार वल्लभाई पटेल, इंदुलाल याज्ञिक, ना.म.जोशी, शंकरलाला पारिख इत्यादी कॉंग्रेस नेते सामील झाले होते. या नेत्यांनी शेतकऱ्यांची सरकारी अधिकाऱ्यांबद्दल असणारी भीती दूर केली व राष्ट्रवाद व आर्थिक मागण्या यांची यशस्वी सांगड घालून चळवळ छेडली.

३) भोपळ्याचे बंड : (मलबार १९२१)

मलबारमधील जमीनदारांनी खंडामध्ये केलेली वाढ आणि मोपले मुसलमान शेतमजुर कुलांना हुसकावून लावण्याच्या केलेल्या प्रयत्नामुळे मोपले कुलांनी १९२१ मध्ये एकत्र येऊन सभा घेतल्या व जमीनदारांवर बहिष्कार टाकला. मोपळ्याच्या या चळवळीत खिलाफत व कॉंग्रेसच्या असहकार चळवळीने सहभाग घेतला आणि त्यांनी स्थानिक प्रश्न व राष्ट्रीय आंदोलन अशा दोन्हीचे काम केले. मोपले हे मलबारमधील मुसलमान शेतमजुर व कुले असुन जमिनदार वर्ग हा हिंदु असल्याने मुळची शेतकऱ्यांची व कुलांची आर्थिक मागणी असणारी चळवळ धार्मिक किंवा जमातवादी बनविण्याचा प्रयत्न झाला. पुढे मोपले चळवळीने जमीनदारांची घरे लुटणे, शस्त्रांस्त्रे गोळा करणे व ब्रिटीशांच्या राज्यांच्या खुणा नष्ट करणे हे एकच उद्दिष्ट राहिले. नंतरच्या काळात सरकारने सैन्याची मदत घेऊन डिसेंबर १९२१ पर्यंत मोपळ्याचे बंड मोडून काढले.

४) साताऱ्याचे बंड : (१९२१–१९२१)

सत्यशोधक समाज चळवळीच्या प्रभावाने सातारा जिल्ह्यातील खंडकरी शेतकऱ्यांनी ब्राम्हण व मारवाडी जमीन मालकांविरूद्ध आंदोलन केले. खंडकरी शेतकऱ्यांची मागणी होती की, त्यावेळी असणाऱ्या पद्धतीप्रमाणे एकूण पिकाच्या २/३ किंवा ३/४ खंड न घेता तो १/२ घेतला जावा. या मागणीसाठी त्यांनी

शेतीच्या मशागतीवर बहिष्कार टाकला. या आंदोलनात तासगाव, कराड, वाळवा, कोपरगाव तालुक्यातील ३० गावातील खंडकरी सामिल झाले होते. त्यांचा हा बहिष्कार संघटित नसल्यामुळे प्रभावी ठरला नाही.

५) मुलशीपेट्याचा सत्याग्रह : (१९२०)

पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील मुळशी पेट्यातील निळा व मुळा नद्यांच्या संगमावर वीजनिर्मितीसाठी धरण बांधण्याची योजना टाटा वीज कंपनीने हाती घेतली होती. या धरणात ५४ गावांतील जमिनी बुडणार होत्या आणि १० ते १५ हजार मावळ रहिवाशंना त्याचे परिणाम भोगावे लागणार होते. मावळ्यांनी टाटा कंपनी रेल्वे कंपन्याचे मालक, इंग्रज भांडवदार व साम्राज्यवादी राज्यकर्ते यांना प्रचंड विरोध करण्याचे ठरविले. बहुतेक सर्व शेतकऱ्यांनी जमीनदारांकडून कर्ज घेतलेली होती. जर जमीन पाण्याखाली बुडाली तर जमीनदारांच्या कर्जाची परतफेड करण्याचा प्रश्न निर्माण होणार होता. सरकारने भूमिसंपादनासाठी शेतकऱ्यांना नोटिसा दिल्या गव्हर्नरने शेतकऱ्यांना पर्यायी जागा देण्याचे नाकारले. कंपनी सरकारच्या मदतीने बळजबरीने शेतकऱ्यांच्या जमिनीवर कब्जा करण्यास सुरूवात केली. १२०० मावळा शेतकऱ्यांनी आपल्या बायका-मुलांसह १६ एप्रिल १९२१ रोजी सत्याग्रह करून कंपनीच्या ५००० मजुरांचे काम बंद करण्यास भाग पाडले. या सत्याग्रहाचे नेतृत्त्व सेनापती बापट यांनी केले. पुढे सत्याग्रहांनी कंपनी सरकारबरोबर करार केला व भूसंपादनाच्या कायद्याखाली जमीन मिळविली. पुढे मावळ्यांनी नुकसान भरपाई मिळाली. पण कर्जपरतफेडीच्या कारणाने ती सावकारांच्या घशात गेली. शेतकरी भूमिहीन, निर्धन व भूमिहीन राहिला.

६) सविनय कायदेभंग चळवळ आणि शेतकरी :

सविनय कायदेभंग चळवळीमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी व त्यांच्यात राजकीय जाणवीजागृती करण्यासाठी पुढील चळवळी करण्यात आल्या.

अ) बार्डोली सत्याग्रह (१९२८) :

रयतवाडी पद्धतीत नियमित कालावधीनंतर सारा वाढीचा निर्णय घेण्यात आला. या सारा वाढीच्या विरोधात म. गांधीनी सुरत जिल्ह्यातील पाटीदार युवक मंडळ, कनिष्ठ जाती व आदिवासी यांच्यामध्ये चरखा, दारूबंदी इत्यादी रचनात्मक कार्याद्वारे संघटन निर्माण केले. या लढ्याला म. गांधीची प्रेरणा मिळाली असली तरी लढ्याचे प्रत्यक्ष नेतृत्त्व सरदार वल्लभाई पटेल यांनी केले. लढ्यात सहभागी झालेल्या ऐक्याला 'खेडूत' हे संबोधन वापरण्यात आले. या सत्याग्रहात शेतकरी मालक, खंडकरी भूमिहीन शेतमजुर इत्यादींनी आपसातील अंतर्विरोध बाजूला ठेवून सहभाग घेतला. सरकारने दडपशाहीचा मार्ग अवलंबला पण अखेर तडजोडीच्या मार्गाने या प्रश्नावर उपाय काढण्यात आला.

ब) अवध (उत्तर प्रदेश) मधील सारा बंदीची चळवळ (१९३०) :

१९२९ मध्ये निर्माण झालेल्या जागतीक मंदीच्या फटका उत्तर प्रदेशातील अवध प्रांतातील गरीब शेतकरी व श्रीमंत जमीनदार यांना बसला. पं. जवाहरलाल नेहरू यांनी शेतकऱ्यांना संघटित करून १९३० च्या सुमारास सारा बंदीची चळवळ सुरू केली. ही चळवळ सुरू असताना जमीनदार व खंडकऱ्यांमध्ये विरोध निर्माण झाला. याचे कारण म्हणजे जमीनदारांनी अगोदरच सरकारला देणे असलेला महसूल भरलेला

होता. पण खंडकऱ्यांनी तो खंड देण्यास विरोध केला. त्यावेळी जमीनदारांनी कुलांना जमिनीवरून हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसने जमीनदार व कुले यांच्यात समझोता घडवून आणला. नंतर १९३१ मध्ये गांधी-आयर्विन करार झाला पण सरकार प्रस्ताव नंतर अमान्य झाल्यामुळे १९३२ सालच्या मध्यापर्यंत ही चळवळ सुरू राहिली.

क) महाराष्ट्रातील साराबंदी व तुकडेबंदीविरूद्ध चळवळ (१९२९)

मुंबई सरकारने १९२७ साली छोट्या जमिनीसंबंधी विधेयक तयार केले. यात तुकडेबंदीविरूद्ध तरतुदी होत्या. या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले तर ८०% शेतकरी भूमिहीन होतील अशी परिस्थिती होती. या विधेयकाला विरोध करण्यासाठी सातारा, पुणे, अहमदनगर जिल्ह्यातील तालुक्याच्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या सभा झाल्या. २५ जुलै १९२८ रोजी पुण्यात घेण्यात आलेल्या संभेत 'मुंबई प्रादेशिक शेतकरी संघ' स्थापन करण्याचे आवाहन केले. या सभेत महाराष्ट्रातील व कर्नाटकातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन 'लहान जमीनधारणा' विधेयकाला जमीन महसूल सुधारणा विधेयकाला आणि मुंबई सरकारच्या 'बार्डोली धोरणाला' तीव्र विरोध प्रकट करण्यात आला.

ड) जंगल सत्याग्रह (१९३०) :

सरकारच्या जंगल कायद्यात शेतकऱ्यांना वेगवेगळ्या मार्गांनी दंडकरण्याच्या व जंगल संपतीवरील त्यांचे नैसर्गिक अधिकार काढून घेण्याचा तरतुदी होत्या. अहमदनगर, नाशिक, पश्चिम खानदेश, सातारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या संदर्भात काही प्रमुख मागण्या केल्या. १) गुरे चारण्याचे शुल्क कमी करावे. २) जंगली जनावरांपासून संरक्षण करण्यासाठी शस्त्रे बाळगण्याची परवानगी मिळावी. ३) राखीव जंगलाच्या लिलावत शेतकऱ्यांना सवलती द्याव्यात. ४) वाळलेले लाकुड, सरपण, पाचोळा इत्यादी शेतकऱ्यांना मोफत घेऊ द्याव्या. ५) मालकीच्या जमीनीमध्ये वाढलेल्या सागवानाच्या झाडांवर शेतकऱ्यांचा हक्क असावा. इत्यादी प्रमुख मागण्यांसाठी १९३० साली अहमदनगर जिल्ह्यातील अकोला व संगमनेर तालुक्यामध्ये जंगल कायदा तोडण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला. गावांवर जबर दंड बसवला व चळवळ पुढे चळवळ सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला.

७) किसान सभेचे कार्य :

शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी डाव्या गटांनी एकत्र येऊन १९३६ मध्ये 'अखिल भारतीय किसान सभा' स्थापन केली. बिहाद्द प्रादेशिक किसान सभेने स्वामी सहजानंदाच्या नेतृत्वाखाली जमीनदाराविरूद्धी कुलांच्या जमिनीचे संरक्षण करण्यासाठी चळवळ सुरू केली. आंध्रमधील किसान सभेचे नेतृत्त्व प्रा. एन. जी. रंगा यांनी केले. त्यांनी मध्यम व श्रीमंत शेतकऱ्यांचे प्रश्न हाताळले. काहीवेळा गरीब शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडेही लक्ष दिल. डिसेंबर १९३६ मध्ये अखिल भारतीय किसान सभेचे दुसरे अधिवेशन महाराष्ट्रात फैजपुर या ठिकाणी भरले. या अधिवेशनात शेतसारा वेठाबिगारी व ग्रामीण कर्ज या विषयांच्या मागण्या मांडण्यात आल्या.

अ) वारल्यांचा लढा :

१९४५ मध्ये किसान सभेने ठाणे जिल्ह्यातील वारली आदिवासींची चळवळ केली.

१) वेठबिगारी नष्ट करणे.

२) शेतमजुरी वाढवून घेणे.

३) वारल्यांवर होणारे अत्याचार थांबविणे. या प्रमुख प्रश्नांसाठी किसान सभेने गोदावरी परूळेकर यांच्या नेतृत्त्वाखाली चळवळ केली.

आ) तेभागा आंदोलन :

बंगालमध्ये 'कायमधारा' पद्धतीनुसार जमीनदारी पद्धती विभागून जोतेदारांना दीर्घमुदतीच्या भाड्याने देत असत. जोतेदारांना कायम स्वरूपाचे हक्क असत. त्यामुळे जातेदार जमीनीचे आणखी विभाजन करून कसण्यासाठी कुलांना देत असत. अशा कुलांना बर्गदार म्हणतात. बर्गदारांचा जमीनीवर कोणत्याही स्वरूपाचा हक्क नसे. साधारणत: एक वर्षासाठी जोतेदार बर्गदारांना जमिनीचा तुकडा कसण्यासाठी देत असत. त्यानंतर त्यांना दुसरीकडे जावे लागे.

वाहतुकीच्या सुविधा वाढल्यानंतर नवीन बाजाराची अर्थव्यवस्था अस्तित्त्वात आली. शेतीमधून अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी जोतेदारांनी आपल्या जमिनी वर्गदारांना कसण्यासाठी दिल्या. वर्गदार जोतेदारांना उत्पन्नाच्या अर्धा हिस्सा देत असत. १९४३ मध्ये बंगालमध्ये मोठा दुष्काळ पडल्यामुळे अन्नधान्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाले. अन्नधान्यांची टंचाई व शेतमजुरांची कमतरता यामुळे धान्यांच्या किंमती जशा वाढल्या तसेच शेतमजुरीही वाढली. या परिस्थितीचा फायदा जोतेदारांना व शेतमजुरांना झाला. मात्र वर्गदारांना त्याचा फायदा झाला नाही उलट त्यांची आर्थिक परिस्थिती आणखीच घटली अशा परिस्थितीत शेतमालापैकी अर्धा हिस्सा जोतेदारांना देणे कठीण झाले. बर्गदारांच्या या प्रश्नांना बंगाल किसान सभेने न्याय मिळवून देण्यासाठी 'तेभाग' चळवळ उभी केली. ही चळवळ दिनाजपुर जिल्ह्यातील अतवाटी या गावात प्रथम सुरू झाली. तेथील वर्गदारांनी जोतेदारांना अर्धा हिस्सा देण्याचे नाकारले. त्यांनी मागणी होती की, उत्पन्नापैकी १/३ हिस्सा जोतेदारांनी घ्यावा व २/३ हिस्सा बर्गदारांना मिळावा. यासाठी किसान सभेने प्रयत्न केले. परंतु पोलिसांनी हे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला.

बंगाल सरकारने आपल्या गॅझेटमध्ये प्रस्तावित 'वर्गदार विधेयक' छापले या विधेयाकामागे वर्गदारांची 'तेथागा' ची म्हणजे १/३ आणि २/३ अशी वाटणी करण्याची मागणी मान्य झाली होती. पुढे हे विधेयक कायदे मंडळापुढे मांडले नाही. त्यामुळे 'तेभाग' आंदोलन चालूच राहिले.

३.२.१. ब) स्वांतत्र्योत्तर काळातील शेतकरी चळवळ :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शेतीविकासाच्या धोरणातील बदल घडून आले. या शेतीविकास धोरणांमुळे शेतकऱ्यांमध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले. शेतकऱ्यांची जमीन, उत्पादीत मालाचे भाव, जमिनीवरील शेतकऱ्यांचे हक्क शेतमजुरांना मिळणारे वेतन या सारखे अनेक प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावे लागले. त्याचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांनी संघटित स्वरूपाच्या चळवळी सुरू केल्या. त्या चळवळींची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

१) तेलंगणातील शेतकरी उठाव (१९४६–५१) :

तेलंगणा हा पूर्वीच्या निजामाच्या हैद्राबाद या संस्थांनी राज्याचा एक भाग. या संस्थानात सरंजामशाही शेतीपद्धतीमुळे शेतकरी, कुले व शेतमजुर यांना अत्याचारांना तोंड द्यावे लागत होते. सावकार पिळवणूक करत, कुलांना मुदतीची निश्चिती नसे. वारेमाप खंड द्यावा लागे. देशमुख व जहागीरदारांकडून होणारी वेठबिगारीची सक्ती या सर्व गोष्टीविरूद्ध शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांनी छोटे व मोठे शेतकरी, कुले व शेतमजुर यांना संघटित करून आंदोलन उभारले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने वेठबिगार पद्धती बंद करणे शेतमजुरीत वाढ व्हावी, जमीनदारी पद्धती नष्ट व्हावी व शेतकऱ्यांवरील कर्जे रद्द करावीत इत्यादी मांगण्यासाठी चळवळ उभारली. जमीनदारांनी दडपशाही करून आंदोलनाला प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. तथापि शेतकऱ्यांनी संघटित प्रतिकार करून जमीन आपल्या ताब्यात घेतला.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हैद्राबाद संस्थान भारतात विलीन करण्यास निजामाने नकार दिला. त्यांच्या आशीर्वादाने मुस्लिम रझाकारांच्या टोळ्या अत्याचार करू लागल्या. त्यावेळी शेतकऱ्यांच्या दलांनी चोख प्रतिकार करून तेलंगणातील काही प्रदेश कम्युनिस्ट प्रणित शेतकरी दलाच्या अमलाखाली आला. १९४८ मध्ये भारत सरकारने सैन्याच्या बळावर शेतकरी दलाचा उठाव मोडून काढला. पुढे या शेतकरी दलातून श्रीमंत शेतकरी बाहेर पडले. त्यामुळे केवळ गरीब शेतकऱ्यांनी ही चळवळ पुढे १९५१ पर्यंत चालू ठेवली.

२) शेतकऱ्यांची आंदोलने (१९५१ ते १९६५) :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेसने सरकार स्थापन केले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आंदोलनामागे कॉंग्रेस उभी राहण्याची शक्यता संपली. काँग्रेसने सरकारमध्ये राहून शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना आखून त्यांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला. जमीनदारी पद्धतीचे निर्मुलन कुळकायदे, कमाल जामिनधारणा इत्यादी योजना धडाक्याने सुरू ठेवल्या. गरीब शेतकरी, शेतमजुर यांचे प्रश्न घेऊन कम्युनिस्टपक्ष काँग्रेसशी सहकार्याची भूमिा घेऊ लागला. कॉंग्रेसने नवीन केलेल्या कायद्यांचा तसेच ध्येयधोरणांचा गरीब शेतकरी व शेतमजुर यांच्यावर थोडाफार अनिष्ट परिणाम होऊ लागला. पण शेतकऱ्यांची चळवळ मोठ्याप्रमाणावर जोर धरू शकली नाही. भारत सरकारचे सर्व लक्ष भाषिक प्रश्नाकडे केंद्रित झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाले. याचा परिणाम म्हणून १९६५ नंतर ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला.

ज) नक्षलवादी चळवळ १९६७ :

प. बंगालमधील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षांतील एका कार्यकर्त्या गटाचे असे मत होते की, शासनाच्या जमीनसुधारणा कार्यक्रमातून शेतकऱ्यांचा विकास होत नाही. अशा सुधारणावादी योजनांना विरोध करण्यासाठी गरीब शेतकरी, आदिवासी, भूमिहीन शेतमजुर यांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. प. बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यातील सिलिगुडी तालुक्यात नक्षलवादी येथील संथाल आदिवासींनी १९६७ मध्ये जमिनदारांविरूद्ध उठाव केला. आणि त्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या. पोलिसांनी शेतकऱ्यांविरूद्ध कृती करण्याचा प्रयत्न केला तेव्हा शेतकऱ्यांनी पोलिसांना सशस्त्र प्रतिकार केला. या लढ्याचे नेतृत्त्व चारू

मझुमदार कानू रुन्थाल व जंगल संदाल या नेत्यांनी केले. या नेत्यांवर मार्क्स व लेनिन बरोबरच माओ ओ डाँग या चीनच्या क्रांतीकारी नेत्यांचा प्रभाव होता. शेतकऱ्यांच्या क्रांतीतूनसर्वकष क्रांती घडवून आणणे हा या विचारप्रणालीचा गाभा होता. या विचारप्रणालीच्या मुद्यांवरून नक्षलवादी चळवळीच्या नेत्यांचे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षांबरोबर मतभेद झाले. यातुन १९६९ साली नक्षलवादी विचाराचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्स-लेनिनवादी) या नावाचा दुसरा गट तयार झाला. १९६९ नंतर आंध्रप्रदेशात श्रीकाकुलम येथे नक्षलवादी उठाव झाला होता. नक्षलवाद्यांची चळवळ कमी-अधिक प्रमाणात बिहार प. बंगाल, आंध्रप्रदेश, तामिळनाडू व महाराष्ट्राच्या काही भागात चालू राहिला.

१९७० साली किसानसभा आणि शेतमजुर संघ यांनी अखिल भारतीय पातळीवर 'जमिन बळकाव' आंदोलन केले. जंगल जमीन सरकारी जमीन व अतिरिक्त जमीन ताब्यात घेण्यात आल्या. ही जमीन भूमिहीनांमध्ये वाटणे हा मुख्य हेतु या चळवळीचा होता. १९७० नंतर हरितक्रांतीचे विपरीत परिणाम शेतकऱ्यांवर झाले. शेतीसाठी लागणाऱ्या भांडवलासाठी शेतकऱ्यांना शहरी उद्योग व सावकार यांच्यावर अवलंबुन रहावे लागत होते. तसेच नगदी पिके पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना बाजारपेठेतील किंमतींच्या चढउतारांचे परिणाम भोगावे लागत होते. तसेच भांडवली शेतीकरणाऱ्या शेतकऱ्यांकडून शेतमजुरांची पिळवणूक होत होती. आदिवासी भागामध्ये बाहेरील श्रीमंत शेतकऱ्यांनी जादा नफ्याच्या आशेने गरीब व अज्ञानी आदिवासींना फसवुण त्यांच्या जमीनी लुबाडण्याचा प्रयत्न केला होता. या विरोधात नक्षलवादी चळवळी उभ्या करण्यात आल्या.

या दशकामध्ये पंजाब, तामिळनाडू, कर्नाटक या राज्यांमधील मध्यम श्रीमंत शेतकऱ्यांनी आदानाच्या वाढत्या किंमतीबाबत सरकारविरूद्ध चळवळी केल्या. उदा. तामिळनाडुमध्ये शेतकऱ्यांनी श्री नारायणस्वामी नायडू या नेत्याच्या नेतृत्त्वाखाली वीजेचे वाढलेले दर देण्यास नकार दिला. आपला निषेद तिव्र करण्यासाठी कर बंदीचे आंदोलन केले. बिहारमध्ये संचाल मुंडा व इतर आदिवासी शेतमजुरांनी आणि कोळसाखाण कामगारांनी एकत्र येऊन 'झारखंड मुक्ती मोर्चा' या संघटनेखाली आपल्यावरील अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला.

४) महाराष्ट्रातील १९७० नंतरच्या शेतकरी चळवळी :

महाराष्ट्रातील डावेपक्ष आणि शेतकरी संघटनांनी शेतीच्या प्रश्नांसंबंधी अनेक चळवळी केलया. त्या चळवळ करण्यामागे अनेक कारणे होती.

१) जमीनसुधारणा कुळांना जमिनीची मालकी मिळावी.

२) शेतमजुरांना किमान वेतन जीवन वेतन मिळावे.

३) बेरोजगारांसाठी शासनाने रोजगार हमी योजना सुरु करावी.

४) दुष्काळ अवर्णन परिस्थितीत दुष्काळी कामे सुरू करावीत.

५) शेतमजुरांच्या कामाचे तास नियंत्रित करून त्यांना सुट्या मिळाव्यात.

६) आदिवासी शेतकरी व शेतमजुरांवरील सावकारांकडून होणार अन्यास दूर व्हावा.

७) आदिवासी तसेच इतर शेतकरी, शेतमजुर यांना कर्जपुरवठा करण्यात यावा.

८) शेतमालाला रास्त भाव मिळावा.

९) वेठबिगारी नष्ट व्हावी या व अशा अनेक कारणांसाठी शेतकरी चळवळ उभी करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात ज्या विविध शेतकरी चळवळी झाल्या त्यांची माहिती खालीलप्रमाणे.

अ) डाव्या पक्षांची आंदोलने :

१९७० मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या किसान संस्थेने व शेतमजुर संघाने 'जमीन बळकाव' या आंदोलनात भाग घेतला. महाराष्ट्रात ५०,००० गरीब शेतकरी व शेतमजुर या आंदोलनात सहभागी झाले. १९७२ मध्ये किसान संभेने जमीनधारणेची कमाल मर्यादा कमी करणे आणि अतिरिक्त जमिनीचे वाटप करणे यासाठी आंदोलन केले. १९७२ च्या दुष्काळात शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्यासाठी दुष्काळ निवारण्याची कामे सुरू करावीत, त्यांना रोजगार पुरविण्यात यावा यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्ष मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, लालनिशाण पक्ष, शेतकरी कामगार पक्ष यांनी एकत्र येऊन सर्वत्र आंदोलन उभारले.

ब) शेतकरी कामगार पक्षाचे कार्य :

१९४८ साली काँग्रेस पक्षातील पूर्वाश्रमीचे केशवराव जेधे, शंकरराव मोरे, दत्ता देशमुख यांनी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना करून शेतकऱ्यांची कर्जमाफी व शेतसारा कमी करावा. या काही प्रमुख मागण्यांसाठी प्रयत्न केले. १९५० साली दाभाडी येथे भरलेल्या पक्षाच्या अधिवेशनात एक जाहिरनामा संमत करण्यात आला. त्याला 'दाभाडी प्रबंध' असे म्हटले जाते. या १७ कलमी कार्यक्रमात जमीनसुधारणा, शेतमजुरांना पुरेसे वेतन, सावकारी नष्ट करणे. उत्पादन खर्च व नफा धरून धान्यांच्या किंमती ठरविणे, शेती व्यवसायाला कर्जपुरवठ्याची सोय करणे. इत्यादी शेतीविषयक मागण्या मांडण्यात आल्या.

क) लालानिशाण पक्षाचे कार्य :

१९४२ साली कम्युनिस्ट पक्षातुन फुटून निघाल्यानंतर एस. के. लिमये व त्यांच्या सहकार्यांनी 'नवजीवन संघटना' स्थापन केली १९४८ मध्ये शेतकरी कामगार पक्षात सामील होऊन नंतर मतभेद होऊन १९५१ मध्ये दत्ता देशमुख व त्यांच्या सहकार्यांनी कामगार 'किसान पक्ष' स्थापन केला. १९६५ पासून या पक्षाला लालनिशान पक्ष नांव मिळाले. लालनिशाण पक्षाने शेतमजुरांची त्यांच्या विशिष्ट मागण्यांसाठी संघटना बांधण्याचा विचार मांडला. या पक्षाने गाव पातळीवर कोतवालांची संघटना तसेच जिल्हापरिषद कर्मचाऱ्यांनी संघटना बांधली. १९७० मध्ये लालनिशाण पक्षाने शेतकऱ्यांमध्ये संघटन निर्माण करण्यासाठी अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यात भूमिहीन शेतमजुरांची परिषद घेतली. या परिषदेत दुष्काळ निर्मलनाच्या प्रश्नांची चर्चा करण्यात आली. तसेच शासकीय शेते व उसाच्या शेतांवर कामकरणाऱ्या मजुरांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. शेतमजुरांच्या कामाचे तास, सुट्या आणि किमान वेतनाच्या प्रश्नांवर आंदोलने करण्यात आली.

ड) शहादाची श्रमीक संघटनेची चळवळ :

१९७० नंतर धुळे जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील भिल्ल शेतकरी, शेतमजुरांनी संघटित होऊन अन्यायाचा प्रतिकार केला. ब्रिटीश काळात धुळे जिल्ह्यात स्थायिक झालेल्या शेती करणाऱ्या गुजर व लेवा पाटील जातीच्या लोकांनी साटा वसुलीची कामे स्वत:कडे घेतली. या कामात त्यांना पैसा व राजकीय सत्ता मिळाली. त्यांनी आदिवासी शेतकऱ्यांना भरमसाठ व्याज दराने कर्ज देऊन त्या कर्जांची परतफेड न झाल्याने आदिवासींच्या जमिनी बळकावल्या. त्यामुळे आदिवासी दरिद्री बनले. व स्वत:च्या जमिनीमध्ये त्यांना शेतमजुर म्हणून काम करावे लागले. या जमीनबळकावणाऱ्या गुजर जमिनदारांविरूद्ध उठाव करण्यासाठी अंबरसिंगानी जानेवारी १९७२ मध्ये शहाद्याला शेतकऱ्यांची 'भुमुक्ती' परिषद बोलवली. या परिषदेमध्ये भिल्ल आदिवासी सेवामंडळ, भूमिहीन शेतमजुर व गरीब शेतकरी संघटना यांनी सहभाग घेतला. या आघाडीने अमरसिंगाच्या नेतृत्त्वाखाली 'श्रमिक संघटना' या संघटनेची स्थापना केली. या संघटने अंतर्गत

१) न्याय पद्धतीने आदिवासी शेतकऱ्यांच्या मालकिच्या असणाऱ्या जमिनी त्यांच्या ताब्यात देणे.

२) रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारावर दडपण आणणे.

३) आदिवासींची सरकारी संस्थांची सर्व कर्ज माफ करणे

४) १९४७ सालानंतर झालेली आदिवासींची जमिनींची हस्तांतरणे रद्द करणे.

५) सरकारने शेतमजुरांसाठी किमान वेतन निश्चित करणे यासाठी प्रयत्न करणे हे श्रमिक संघटनेने आद्य कर्तव्य समजले.

इ) पालघर तालुक्यातील भूमिसेना आंदोलन :

१९७० साली ठाणे जिल्ह्यातील पालघर तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांची संघटना 'भूमिसेना' तयार करण्यात आली. आदिल नावाच्या आदिवासी नेत्याच्या नेतृत्त्वाखाली आदिवासींनी उत्स्फूर्तपणे सावकार व जमीनदारांविरूद्धच्या लढायांमध्ये भाग घेतला. लढाच्या सुरुवातीच्या टप्यात आदिवासींनी शेतात जावुन उभी पिके कापून स्वत:च्या ताब्यात घेण्याचा धडाका सुरू केला. ही जमीन सावकारांनी आदिवासींच्याकडून बळकावली होती. भूमिसेनेने या जमिनीच्या गैरव्यवहारबाबत स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे तक्रारी नोंदविल्या होत्या. पण त्याची दखल घेतली जात नव्हती. पिक कापण्याच्या आंदोलनामुळे अधिकाऱ्यांना या केसेसकडे लक्ष द्यावे लागले. मात्र त्याचबरोबर पोलिसांनी भूमिसेनेच्या कार्यकर्त्यांना अटकही केली. आदिवासींचे पीक कापण्याचे सत्र तरीही चालूच राहिले. त्यानंतर स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लक्ष घालुन जवळजवळ ८०० प्रकरणे सोडविली व आदिवासींना त्यांच्या जमिनी परत मिळाल्या. भूमिसेनेने सावकार व श्रीमंत शेतकऱ्यांविरुद्ध शेतमजुर व गरीब शेतकऱ्यांना संघटित करून त्याचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.

५) शेतकरी संघटनेच्या चळवळी :

शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसंबधी महाराष्ट्रात आणि देशभर शेतकरी संघटनेचे काम उल्लेखनिय ठरले आहे. शेतकरी संघटना ही एक राजकीय शक्ती बनली. १९७८ साली पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात शरद जोशी यांनी ही संघटना बांधण्याचे काम केले. या संघटनेने शेतमजुरांना योग्य मजुरी मिळावी व शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य किंमत मिळावी यासाठी प्रयत्न केले. शेतकऱ्यांच्या उत्पादनाचा खर्च भरून येईल असे भाव-हमी किंमत शासनाने द्यावी त्यासाठी वेगवेगळ्या शेतीमालाच्या किंमतीसाठी संघटनेने वेळोवेळी आंदोलने केली. त्याचा थोडक्यात आढावा पुढील प्रमाणे आहे.

अ) कांदा आंदोलन :

कांदा उत्पादनातून शेतकरी आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यासाठी त्यांच्या कांद्याला भाव घसरले, त्यामुळे शेतकरी संघटनेने कांद्याला भाव वाढवून मिळावा यासाठी फेब्रुवारी १९८० मध्ये शेतकऱ्यांनी आंदोलन सुरू केले. १ मार्च १९८० रोजी चाकण येथे पुणे-नाशिक महामार्ग आडवुन धरण्याचा सत्याग्रह सुरू केला. अखेर १५ मार्च रोजी शासनाने नाफेड या सहकारी खरेदी-विक्री संस्थेतर्फे कांदा खरेदीची योजना सुरू केली. बहुतेक मागण्या मान्य झाल्यामुळे संघटनेने आंदोलन मागे घेतले.

ब) ऊस आंदोलन :

ऊसाला योग्य दर मिळावा यासाठी महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेने आंदोलने केली आहेत. नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील शेतकऱ्यांनी ऊसाला प्रतिटन ३०० रूपये भाव मिळावा यासाठी शेतकरी संघटनेच्या नेतृत्त्वाखाली आंदोलन सुरू केले. साखर कारखान्यांना गळीताच्या हंगामात ऊस न देण्याचा ठराव करण्यात आला. साखर कारखाना महासंघाचे श्री माधवराम बोरस्ते यांनी शेतकऱ्यांच्या मागणीला पाठिंबा दिला. सरकारने ऊसाच्या पिकासाठी पाणीपुरवठा व वीजपुरवठा बंद करून दहशतीचा मार्ग अवलंबिला. त्यावेळी १० नोव्हेंबर १९८० रोजी नाशिक, धुळे व नगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी 'रास्ता रोको' आंदोलन केले. तसेच खेरवाडी येथे 'रेल रोको' आंदोलन सुरू केले. १० नोव्हेंबर रोजी पोलिसांनी शेतकऱ्यांवर लाठीमार व गोळीबार केला. शेतकरी नेत्यांसह अनेकांना अटक केली. शरद जोशींना तुरूंगात उपोषण सुरू केले. २० नोव्हेंबरला विदर्भातील कापूस शेतकऱ्यांनी एक दिवसाचे 'चक्का जाम' आंदोलन करून ऊसाच्या आंदोलनाला पाठिंबा दिला. २७ नोव्हेंबर १९८० रोजी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी ऊसाला ३००/- प्रतिक्विंटल भाव देण्याची घोषणा केली.

क) तंबाखू आंदोलन : निपाणी मार्च १९८१ :

तंबाखु उत्पातकांचे व्यापाऱ्यांकडून शोषण केले जात होते. त्यांच्या तंबाखुला योग्य भाव मिळावा यासाठी शेतकरी संघटनेने सरकारला निवेदन सादर केले. परंतु सरकारने या मागणीकडे दुर्लक्ष केले. १४ मार्च १९८१ रोजी शरद जोशींच्या नेतृत्त्वाखाली ५० हजार शेतकऱ्यांनी पुणे - बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग अडवला. हे रस्ता रोको २३ दिवस सुरू होते. कर्नाटक शासनाने हे आंदोलन मोडून काढण्यासाठी चळवळीच्या नेत्यांना व ८००० आंदोलन स्त्री-पुरूषांना अटक केली. आंदोलकांवर अश्रुधूर व लाठीमार करून आंदोलन मोडून

काढण्याचा प्रयत्न केला. बेछुट गोळीबारात १२ शेतकरी मरण पावले. त्यांनतर कर्नाटक सरकारने २० एप्रिलला शेतकऱ्यांच्या तंबाखूची खरेदी-विक्री प्रक्रिया करण्यासाठी एक सहकारी संस्था स्थापन केली. यामुळे आंदोलन स्थगित करण्यात आले.

ड) दूध आंदोलन :

जून १९८२-२२ एप्रिल १९८२ रोजी धुळ्यात भरलेल्या शेतकरी संघटनेच्या मेळाव्यात दुध आंदोलनाची हाक देण्यात आली. संघटनेने मागणी केल्याप्रमाणे दुधाचे भाव वाढवुन मिळणार नाहीत असे शासनाने सांगितले. २८ जून १९८२ रोजी दुध आंदोलन करण्यात आले. या आंदोलनास पुणे, सातारा, मांगली, धुळे जिल्ह्यामधुन योग्य प्रतिसाद मिळाला. पण इतस्त्र हे आंदोलन पुर्णत : फसल्यामुळे दुध आंदोलन मागे घेण्यात आले.

इ) कापूस आंदोलन :

कृत्रिम धाग्याच्या कापडांवर बहिष्कार टाकून त्यांची होळी करण्याचे कार्यक्रम शेतकरी संघटनेने जागोजागी सुरू केले. २३ नोव्हेंबर १९८६ रोजी कृत्रिम धाग्याच्य विरोधात नागपूर, चंद्रपुर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा या जिल्ह्यात शेतकरी संघटनेने 'रास्ता रोको' केले. त्यांनतर दुसऱ्या टप्यात कृत्रिम धाग्याची वस्त्रे घालणाऱ्या प्रवाशांना अडवून त्यांच्या कपड्यावर संघटनेचा शिक्का मारण्याचा उपक्रम केला. संघटनेने रेल रोकोचा निर्णय घेतला. पण शासनाने ८-१० हजार आंदोलकांना अटक करून आंदोलन मोडून काढले.

ई) कर्जमुक्ती आंदोलन :

१९८८-८९ शेती मालाला रास्त दर दिला जात नाही. असा तुटीचा धंदा करण्यासाठी शासन जे कर्ज देते त्याची परतफेड होणे जवळजवळ अशक्यच असते. म्हणून शेतकऱ्यांनी या कर्जातुन नादारी घोषित करून मुक्त व्हावे असा विचार कर्जमुक्ती आंदोलनामागे होता. हे आंदोलन शेतकऱ्यांकडून कर्जमाफीचा अर्ज भरून घेऊन न्यायालयाद्वारे करण्यात आले व कर्जवसुलीवर स्थगिती आणली ही न्यायालयीन लढाई दीर्घकाळ चालली. दरम्यान केंद्रशासन आणि राज्यशासनाने कर्जमाफीची योजना सुरू केली. त्यामुळे कर्जमुक्ती आंदोलन स्थगित करण्यात आले.

ड) स्वाभिमानी शेतकरी संघटना :

खासदार राजु शेट्टी यांना ऊस उत्पादक आणि दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या कच्चा मालाला योग्य दर मिळावा यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना स्थापन केली. महाराष्ट्रातील कोल्हापुर, सांगली, सातारा व सोलापुर इत्यादी जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्च भागेल अशा स्वरूपाचा ऊसाला दर मिळाला पाहिजे यासाठी चळवळीच्या माध्यमातून प्रयत्न केला. महाराष्ट्र सरकारने उत्पादन खर्चावर आधारित ऊसाला हमी भाव निश्चित न केल्यामुळे आणि साखर सम्राटांची ऊसाच्या दराबाबतची मनमानी यामुळे शेतकऱ्यांना कर्जबाजारी बनले. राजु शेट्टी यांच्या नेतृत्त्वाखाली स्वाभिमानी शेतकरी संघटनेने कारखाना स्थलांतर तसेच प्रशासकीय कचेऱ्यांवर मोर्च्याने जाऊन आंदोलने केली. साखर सम्राटांकडून शेतकऱ्यांचे

शोषण कसे केले जाते यासंबंधी शेतकऱ्यांना जागृत करण्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी परिषदा भरवल्या, कार्यकर्ते निर्माण केले आणि ऊसाला रास्त दर मिळवून दिला. ऊस आंदोलनाबरोबरच त्यांनी दुध आंदोलन करुन दूध उत्पादक संघातील पदाधिकारी, संचालक लोण्याचे गोळे कसे हाडप करतात हे शेतकऱ्यांना पटवून दिले. त्यासाठी त्यांनी दुधाचे टेंपो आडवुन आंदोलन केले. महाराष्ट्रातील शेतकरी ऊस आणि दुधउत्पादन करून आपले सर्वसाधारण जीवन जगतो. त्यासाठी त्यांना जगण्याचा अधिकार मिळावा आणि उत्पादन खर्च भागुन कर्जमुक्त होता यावे यासाठी मोठी शेतकऱ्यांची चळवळ उभारली यांचाच परिणाम म्हणून गेल्या पाच-सहा वर्षांमध्ये दुध व ऊसाच्या किंमतीमध्ये वाढ होत गेली आहे.

३.२.२ कामगार चळवळ :

समाजव्यवस्थेत सत्ता, संपत्ती, हक्क व सवलती यांच्या वाटपात असंतुलन निर्माण झालेले असते. त्यातून निर्माण होणारा लोकांमधील असंतोष हा कोणत्यातरी चळवळीचे कारण असते. त्या असंतोषाचे निदान करून तो असंतोष दुर करण्याचा कोणीतरी विचार मांडावा लागतो. या असंतोषाला विचारांची जोड देऊन कृतीद्वारा प्रयत्न केल्यास चळवळ आकाराला येते. कामगारांमधील प्रश्नांना वाचा फोडून त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी जेव्हा कृतीशील प्रयत्न केले जातात. तेव्हा कामगारांची चळवळ निर्माण होते. कामगार विचारांनी एकत्र येऊन आपल्यावरील असंतोष दूर करण्याचा योग्य नेतृत्त्वाच्या साहाय्याने संघटित अशी कृती करतात तेव्हा कामगारांच्या चळवळीला मोठे बळ प्राप्त होते.

कामगारांच्या चळवळी ह्या कामगारांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मिळावा, कामाची शाश्वती मिळावी, कामगारांना संरक्षण व साहाय्य मिळावे यासारख्या अनेक कारणांसाठी घडून आल्या आहेत. सध्या उत्पादनाच्या साधनावर मालकी असणारा भांडवलदार वर्ग त्यांच्या उद्योगधंद्यात कष्ट करणाऱ्या व उत्पादनाच्या साधनांवर मालकी नसणाऱ्या श्रमीक वर्गाचे मोठ्या प्रमाणात शोषण करतो. त्यामुळेच शोषीत कामगार वर्गामध्ये असंतोष निर्माण झालेला आहे. त्याचा परिणाम म्हणून शोषण करणाऱ्या भांडवलदार वर्गांच्याविरूद्ध कामगारांनी संघटित चळवळी निर्माण केल्या आहेत.

कामगार संघटनेची व्याख्या :

१) व्ही. व्ही. गिरी यांच्या मते, "सामूहिक कृत्तीद्वारे आपले हितसंबंध प्रस्थापित करण्यासाठी व ते हितसंबंध अबाधित ठेवण्यासाठी कामगारांनी स्थापन केलेल्या ऐच्छिक संघटना म्हणजे कामगार संघटना होय.''

२) सिडने वेब यांच्या मते, "एक किंवा अधिक व्यवसायातील कामगारांची संघटना दैनंदिन कामाच्या संदर्भांतील कामगारांच्या आर्थिक हितसंबंधांचे संरक्षण व विकसन हे अशा संघटनेचे मुख्य कार्य असते.''

३) चेंबर्स एनसायक्लोपियात पुढील प्रमाणे व्याख्या केलेली आढळते. "ट्रेड युनियन ही रोजगार मिळविणाऱ्यांची अशी एकजुट आहे की त्यातून कामगारांच्या व्यावसायिक लक्ष्याच्या संरक्षणासाठी ती प्रामुख्याने सामुदायिक कृत्ती असते.

वरील व्याख्यांवरून असे दिसून येते की, कारखानदार व कामगार यांच्यातील असंतोषामुळे कामगार संघटनांची निर्मिती झालेली आहे. ह्या कामगार संघटनांचे मुख्य हेत असे आहेत की,

१) कामगारांच्या हिताचे रक्षण करणे व त्यांच्या शोषणाचे मार्ग बंद करणे.

२) भारतातील राहणीमानाचा विचार करून त्यांच्या गरजा व्यवस्थित पूर्ण होतील अशी वेतनाची निश्चिती करणे.

३) भांडवलदारांना उद्योगधंद्यामध्ये होणाऱ्या कायद्याचा विचार करून कामगारांना योग्य प्रमाणात बोनस मिळावा.

४) वाढती बेकारी लक्षात घेऊन कामगारांना रोजगाराची शाश्वती मिळवून देणे.

५) कामगार कल्याणाचा विचार करून त्यांचे कौटूंबिक आरोग्य, कामाचे तास व सुट्या, शैक्षणिक सेवासवलती आणि कामाच्या ठिकाणाचे योग्य वातावरण इत्यादी गोष्टी पुरविणे.

६) समाजातील हितसंबंधांची दखल घेऊन उद्योग, व्यवसाय व व्यापार यामध्ये कामगारांचे साहाय्य वाढविणे इत्यादी. हेतू पूर्ण करण्यासाठी कामगार संघटनांचे सहकार्य महत्त्वाचे ठरते.

कामगार चळवळी विषयक कांही दृष्टीकोन :

१) भूतदयावादी कल्याणकारी दृष्टिकोन :

कामगार हा असुरक्षित दु:खात आहे. कारखान्यांचे मालक त्याचे शोषण करतात. अशा या कामगारांना शोषणमुक्त करणे या मानवतावादी भावनेतूनन काही कार्यकर्ते एकत्र येऊन कामगारांची संघटना निर्माण करतात.

२) व्यावसायिक दृष्टिकोन :

कामगारांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी ज्यांच्याकडे कायदा, अर्थशास्त्र हिशेब तंत्रज्ञान व डावपेच यांचे ज्ञान आहे त्यांनी पैसा, प्रतिष्ठा व पद मिळविण्यासाठी कामगारांना एकत्र करून त्यांची संघटना बांधली.

३) औद्योगिक संबंधवादी दृष्टिकोन :

उद्योगधंदे चांगले चालविण्यासाठी त्यातील सर्व घटकांनी वैयक्तिक आणि सांघित उत्पादन वाढविले पाहिजे. त्यामुळे कारखानदार आणि मालक यांचे जीवन सुरक्षित राहणार आहे. जर उद्योगधंद्यात कारखानदार आणि कामगार यांच्यामध्ये संघर्षाचे वातावरण असेल तर ते कारखानदार आणि कामगारांच्या अहिताचे असते म्हणून कारखानदार आणि कामगार यांच्यातील संघर्ष दूर करून त्यांच्यातील औद्योगिक संबंध दृढ बनविण्याचा प्रयत्न कामगार संघटनांच्याद्वारे केला जातो.

४) राजकीय दृष्टिकोन :

या दृष्टिकोनात राजकीय उद्दिष्टांच्या चौकटीत राहूनच कामगारांच्या हितांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न केला जातो. या राजकीय दृष्टिकोनात तीन प्रवाह दिसून येतात. ते पुढीलप्रमाणे आहेत.

अ) प्रस्थापितवादी :

या विचारप्रवाहामध्ये भांडवलशाहीला महत्त्व दिले जाते. भांडवलशाही विकासावरच बहुसंख्य श्रमिक वर्गांचे जीवन अवलंबून आहे. त्यामुळे भांडवलदार व श्रमिकवर्ग यांच्यामध्ये त्यांच्यातील काही हेतुतील भिन्नतेमुळे संघर्षाचे वातावरण असले तरी कामगार संघटनांनी त्यांच्याशी जुळवून घेणे आवश्यक आहे असा विचार मांडला जातो.

ब) उदारमतवादी :

या राजकीय दृष्टिकोनामध्ये कामगारांचे हित जपण्याचा प्रयत्न केला जातो. भांडवलदार व कामगार यामध्ये काही कारणांनी संघर्ष असले तरी कामगार हा सुद्धा एक माणूस आहे त्याला मानवतावादी दृष्टिकोनातून वागणूक दिली पाहिजे. यासाठी कामगार संघटना भांडवलदार व कामगार यांच्यामध्ये समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न करते.

क) क्रांतीवादी :

भांडवलशाही समाजव्यवस्था उलथवून कामगारांचे राज्य निर्माण करावयाचे असा क्रांतीकारी विचार कामगार संघटनांचा असतो. क्रांतीवाद्यांच्या मते कामगारांना त्यांच्या हिताची खरीखुरी जाणीव करून दिली जाते. बहुसंख्य कामगार वर्गांच्या श्रमातून भांडवलशाहीचा उदय आणि विकास ही झालेला आहे. कामगारांच्या शोषणामध्ये भांडवलशाहीच्या अस्ताची बीज दडलेली आहेत. त्यातून साम्यवादी आदर्श समाजरचनेचा उदय होणार आहे असा क्रांतीकारी राजकीय दृष्टिकोन कामगार संघटनेचा असतो.

कामगार संघटनांचे प्रकार :

कामगार संघटनेची व्याप्ती, सदस्य कोण, मालक कोण इत्यादींच्या आधारे कामगार संघटनांचे पुढील प्रकार पडतात.

अ) सभासदत्वावरून :

पेशानिहाय संघटना, उद्योगनिहाय संघटना, संस्थानिहाय संघटना, मालकनिहाय संघटना, सामाजिक संघटना, संलग्नित महासंघ इत्यादी प्रकार पडतात.

ब) व्यापकतेवरून :

कारखाना पातळीवरील संघटना, शहरव्यापी संघटना, राज्यव्यापी संघटना, राष्ट्रव्यापी संघटना व जगण्याची संघटना इत्यादी प्रकार पडतात.

कामगारांचे प्रश्न व संघटनेचे कार्य :

कामगारांचे प्रश्न अगणित असतात, कमी-अधिक तीव्रतेचे असतात. त्या सर्व प्रश्नांचा विचार करून ते सोडविण्याचा प्रयत्न कामगार संघटना करत असतात.

१) **किमान हक्क** - नोकरीत कायम करणे, किमान वेतन, बोनस, भविष्य निर्वाहनिधी, उत्पादन, राज्य कामगार विमा योजना, रजा, सुट्या, कामाचे तास, अपघातील नुकसान भरपाई इत्यादी गोष्टी कायद्याच्या आधारे पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो.

२) **मागण्या** - कामगारांच्या अनेक प्रकारच्या मागण्या असतात. उदाहरणार्थ वेतनवाढ, महागाई भत्ता, वार्षिक पगार वाढ, बोनस बक्षीस इत्यादी.

३) **प्रतिमागण्या** - कारखाना व्यवस्थापनाकडूनही कामगार संघटनेकडे प्रतिमागण्या केल्या जातात. काम वाढ उत्पादन वाढ, उत्पादननिगडीत वेतनपद्धती स्वयंचलितीकरणाला सहकार्य, पुन:प्रशिक्षण व श्रेणींची पुनर्रचना, गुणवत्तेची हमी, अपव्यय कमी करणे, शिस्त नियमांचे पालन, निवृत्तीवेतन कमी करणे. संकटकालामध्ये सहकार्य करणे इत्यादी प्रतिमामागण्यांचा यामध्ये समावेश होतो.

४) **संकट** - बाह्य कारणांनी कारखान्यावर संकट आल्यास त्याची झळ कामगारांना सोसावी लागते. स्पर्धा, मंदिची लाट, एखादी मोठी मागणी दाताची जाणे, कच्चा माल, वीज किंवा इंधन यांचा पुरवठा बंद पाडणे. नैसर्गिक आपत्ती, अपघात किंवा दंगली उसळणे इत्यादी संकट कालांमध्ये कामगार कमी करणे, कायदेशीर तात्पुरती काम बंदी, स्वेच्छानिवृत्ती, सक्तीची रजा इत्यादी गोष्टी घडून येतात. कामगार संघटनांना कारखान्यावर आलेल्या संकट परिस्थितीचा विचार करून काही वेळा नमते धोरण घ्यावे लागते.

५) **तक्रार निवारण** - कारखान्यात काम करताना कामगारांच्या अनेक तक्रारी निर्माण होतात. रजा, बढती, बदली, कामातील अडचणी कामाची परिस्थिती, वागणूक, जाच, कारखान्याती प्रदुषण व आरोग्यविषयक प्रश्न इत्यादी बाबत कारखाना व्यवस्थापकाकडे तक्रार कस असतो. तक्रारींचे निवारण झाले नाही तर संघर्ष निर्माण होऊ शकतो तेव्हा कामगार संघटना कायदेशीर पद्धतीने मार्ग काढण्याचा प्रयत्न करतात.

६) **गैरवर्तन** - कामगार संघटनांनी कामगाराचेच नुकसान करणारी गैरवर्तन कमी व्हावीत यासाठी प्रयत्न करावयाचा असतो. कामगारांची गैरहजेरी, कामामध्ये हलगर्जी करणे, चोरी, लबाडी, लाच घेणे, बेकायदेशीर संप करणे. सुरक्षेचे नियम न पाळणे, आज्ञाभंग, दारू पिणे, कारखान्यातील नियमांचा भंग करणे इत्यादी गैरवर्तन दूर करण्याचा प्रयत्न केला जातो.

७) **लढा** - लढ्यातून उद्‌भवणारी गैरवर्तन, संप किंवा टाळेबंदीचा कायदेशीरपणा, संपकाळातील पगार, लढ्यातून उद्‌भवणारे फौजदारी खटले हे सर्व लढ्याच्या प्रश्नांमध्ये समाविष्ट असतात.

८) **संघटनात्मक प्रश्न** - संघटना ही युनियन ॲक्टप्रमाणे नोंदवावी लागते व त्यानुसार कामकाज चालावे हे अपेक्षित असते तसे न घडल्यास संघटनात्मक प्रश्न निर्माण होतात.

कामगार चळवळी :

३.२.२ अ) स्वातंत्र्यपूर्वकालातील कामगार चळवळी :

१९ व्या शतकांच्या उत्तरार्धातील २५ वर्षाच्या काळात कामगारांची परिस्थिती फार हलाखीची होती. त्याचे कारण म्हणजे मुंबई, कलकत्ता, अहमदाबाद, कानपूर या ठिकाणी औद्योगिक केंद्र झपाट्याने वाढली. लॉर्ड डलहौसीच्या काळात रेल्वेमार्ग टाकण्यास प्रारंभ झाला. १८८२ पर्यंत साधारणत: दहा हजार चौरसमैल रेल्वेमार्ग वाहतुकीसाठी उपलब्ध झाला. त्यामुळे ग्रामीण भागातून औद्योगिक शहरांकडे लोकांचा ओढा वाढला. त्यावेळेस जे काम मिळेल ते स्वीकारून १२ ते १५ तास लोक काम करू लागले. कामगारांना साप्ताहिक सुट्टी नव्हती, कामाचा दर्जा कमी झाल्यास दंड होई अथवा कामावरून काढले जाई. एवढे असूनही कामगारांना पुरेसा पगार मिळत नव्हता. मात्र उद्योगधंद्याना मोठा नफा मिळाला. स्वातंत्र्यपूर्वकाळात आपल्या न्याय मागण्यांसाठी कामगारांनी अनेक चळवळी केल्या.

१) रावबहादुर लोखंडे आणि कामगार चळवळ :

भारतात कामगार चळवळीचा पाया नारायण मेघाजी लोखंडे यांनी घातला. काही काळ रेल्वेत आणि नंतर पोष्टामध्ये त्यांनी नोकरी केली. १८७० मध्ये ते एका कापडगिरणीत भांडारपाल म्हणून रूजु झाले. तेथेच त्यांचे कामगाराविषयक चक्र सुरू झाले. मुंबईत असताना त्यांच्यावर म. फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा प्रभाव पडला. मुंबई व ठाणे या ठिकांणी त्यांनी जातीभेद निर्मुलन, स्त्री-पुरूष समानता इत्यादी गोष्टींसाठी पुढाकार गेतला. 'दिनबंधु' या नियतकालीकातून श्री. लोखंडे यांनी कामगारांमध्ये जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. वस्तीवस्तीवर जाऊन त्यांनी कामगारांमध्ये कामगार संघटनेचे महत्त्व पटवून दिले. आणि पिळवणूकीने त्रस्त झालेल्या कामगारांना एकत्र आणले. पुढे त्यांच्या अध्यक्षतेखाली 'बॉम्बे मिल हॅण्ड असोसिएशन' ही संघटना उदयाला आली. सन २३ सप्टेंबर १८८४ रोजी ह्या संघटनेच्या सभेला चार हजार कामगार उपस्थित होते. ५,५०० कामगारांच्या सह्यांचे पत्रक काढून ते फॅक्टरी कमिशन अध्यक्षांना १५ ऑक्टोबर १८८४ ला सादर करण्यात आले. त्यामध्ये खालील मागण्या करण्यात आल्या होत्या.

१. आठवड्यातील रविवारी पूर्ण दिवसाची सुट्टी असावी.

२. दररोज दुपारी जेवणासाठी अर्धातास सुट्टी असावी.

३. महिन्याचा पगार १५ तारखेपूर्वी मिळावा.

४. कामावर असताना अपघात झाल्यास कामगाराला पूर्ण पगारी रजा मिळावी आणि मृत्यू झाल्यास त्याच्या कुटूंबियांना पेन्शन मिळावी.

लोखंडे यांनी या मागण्यांसाठी लढा दिला आणि मिल मालकांवर दबा आणला. पुढे फॅक्टरी लेबर कमिशनवर लोखंडे यांची कामगार नेते म्हणून नेमणूक झाली. नवा फॅक्टरी कायदा मंजुर होऊन इ.स. १८९२ मध्ये त्याची अंमलबजावणी सुरू झाली. कामगारांच्या कामाचे तास बारा करण्यात आले. तसेच जेवणाची सुट्टीही देण्यात आली. स्त्रिया व बालमजुर ह्यांना सुविधा व स्वच्छतेच्या सोयी पुरवण्यात आल्या. हे सर्व झाले असल तरी कारखान्याचे मालक तो अंमलात आणित नव्हते. म्हणून लोखंडे यांनी संघर्ष चालूच

ठेवला. मुंबईत जेकब मिलच्या चारशे स्त्री-पुरूष कामगारांनी उठाव केला. त्यामुळे फॅक्टरी अधिकाऱ्यांनी काही स्त्रियांना शिक्षा केली. म्हणून स्त्रियांनी चिडून जाऊन अधिकाऱ्यांना ठोकून काढले. त्या कृत्यामुळे स्त्रियांना दंडही झाला. हा कामगार स्त्रियांचा पहिला संघर्ष होय. तेव्हापासून २५ मार्च हा दिवस स्त्री मुक्ती दिन म्हणून पाळावा असे ठरले.

२) लोकमान्य टिळकांना काळ्या पाण्याची शिक्षा आणि कामगार चळवळ :

राजद्रोही म्हणून लोकमान्य टिळकांना १९०८ मध्ये सहा वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली. तेव्हा संतापलेल्या मुंबईच्या कामगारांनी संप पुकारला. बाजारपेठ बंद पाडल्या. गव्हर्नरला काळे झेंडे दाखवून निषेद नोंदविला. नंतर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात १४ माणसे ठार झाल्याचे सरकारने नोंदविले. हा संप सहा दिवस चालला. ह्या संपाची दखल घेऊन लेनिन यांने म्हटले आहे की हिंदुस्थानात श्रमजीवी वर्ग जागृत झाला आहे.

३) महात्मा गांधीधींना अटक आणि कामगार चळवळ :

कामगारांनी स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय चळवळीत मोठ्या प्रमाणात भाग घेतला. त्याचे उदाहरण म्हणजे रौलट सत्याग्रहात महात्मा गांधीजीना अटक झाल्याने अहमदनगरच्या गिरणी कामगारांनी संप पुकारला त्यात २८ लोक मारले गेले, १२३ लोक जखमी झाले. ह्याच वेळेस अमृतसर येथे १९१९ मध्ये कॉग्रेसच्या अधिवेशनात सर्व दृष्टीने कामगारांच्या उत्कर्षासाठी देशभर एक कामगार संघटना उभी करण्याचे ठरविले. त्यातून पुढे आयटकचा जन्म झाला. सुरूवातीस जे बाप्टीस्टा, सी.एफ. ॲन्ड्रयुज, बी.पी. वाडीया, एन.एम.जोशी इत्यादी उच्चशिक्षीत क्रांतीकारी नेते होते. त्यानंतर कामगार चळवळीस बुद्धीवादी व उच्चवर्णियामधूनच नेतृत्त्व मिळाले.

४) अनुसया साराभाई यांच्या नेतृत्त्वाखालील चळवळ :

१९१६ मध्ये गुजरात येथे प्लेगची साथ आली कामगार शहर सोडून जाऊ लागले. त्यावेळी औद्योगिक पेचप्रसंग निर्माण झाला. कामगारांनी शहर सोडून जाऊ नये यासाठी ७५% प्लेगभत्ता देऊन त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. पण उभी वीण करणाऱ्या कापडगिरणी कामगारांना त्यातून वगळल्यामुळे त्यांच्यात असंतोष निर्माण झाला. त्यांनी प्लेगभत्त ऐवजी प्लेग बोनसची मागणी केली. परंतु ती फेटाळण्यात आली. त्यावेळेस कामगार वस्तीत कामगार कल्याणाची कामे करणाऱ्या समाज सेविका अनुसया साराभाई यांच्या नेतृत्त्वाखाली ४ डिसेंबर १९१७ रोजी संपाला सुरूवात झाली. २० दिवस चाललेला संप मिल मालकांनी रोजगाराच्या रक्कमेत २०% वाढ केल्यावर मिटला.

५) वेतनवाढीसाठी महात्मा गांधी यांच्या नेतृत्त्वाखाली कामगार चळवळ :

प्लेगची साथ जशी हळूहळू कमी होऊ लागली तसा मिल मालकांनी प्लेग बोनस रद्द करून केवळ २०% रोजंदारीत वाढ देण्याचा निर्णय घेतला. त्यातून कामगारांमध्ये असंतोष वाढला. त्यांनी ही वाढ नाकारून वेतनाच्या ५० टक्के दैनिक भत्ता देण्यात यावा अशी मागणी केली. ही मागणी मिल मालकांनी नाकारली व २० फेब्रुवारी १९१८ ला त्यांनी टाळेबंदी केली. या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन महात्मा

गांधींनी ५० टक्क्याहून ३५ टक्के वेतन वाढीचा आग्रह धरला जोपर्यंत वेतनवाढ मिळत नाही. तोपर्यंत कामगार कामावर रूजु होणार नाही असे घोषित केले. मागणी मान्य होईपर्यंत महात्मा गांधींनी उपोषणाची घोषणा केली. त्यामुळे शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. कामगारांनी अहिंसेच्या मार्गाने चळवळ करून मागण्या मान्य करून घेतल्या.

६) बॉम्बे लेबर युनियन :

१९२६ साली बॉम्बे लेबर युनियनचा जन्म झाला तो एन.एम.जोशी यांच्या नेतृत्त्वाने बॉम्बे युनियन लेबर ही इंडियन ट्रेड युनियन ॲक्टनुसार स्थापलेली भारतातील पहिलीच कामगार संघटना होय.

७) आयटक कामगारांची संयुक्त चळवळ :

लाला लजपत राय यांच्या अध्यक्षतेखाली तयार झालेली 'आयटक' ही कामगारांची पहिली संयुक्त चळवळ होती. ह्यात प्रमुख तीन गट होते. १) राष्ट्रीय कामगार संघटना २) कम्युनिस्ट पक्ष आणि ३) समाजवादी पक्ष. राष्ट्रीय कामगार संघटनेचे नेतृत्त्व महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केले. कम्युनिस्ट पक्षाचे नेतृत्त्व श्री. डांगे व एम.एस. राय यांनी केले. तर समाजवादी कामगार चळवळीचे नेतृत्त्व श्री. व्ही.व्ही. गिरी व एन.एम. जोशी यांनी केले.

नंतरच्या काळात काँग्रेस नेत्यांनी 'हिंदुस्थान मजदुर सेवक संघ स्थापन केला. पण त्याला पाठिंबा मिळाला नाही. तेव्हा सरदार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली आयएनटीयुसीची (Indian National Trade Union Congress) स्थापन केली. यानंतर कामगार संघटनेमध्ये मतभेद होऊन विविध संघटना तयार झाल्या.

३.२.२ ब) स्वातंत्र्योत्तर काळातील कामगार चळवळी :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात कामगार हिताच्या दृष्टिकोनातून विधायक पाऊल उचलण्यात आले. १९४८ साली किमान वेतन कायदा करण्यात आला. १९५२ मध्ये कामगार भविष्य निर्वाह निधीचा कायदा झाला. १८५१ पासून पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात कामगार संघटना स्थापन करण्याचा अधिकार मान्य करण्यात आला. १९५४ पासून समाजवादी समाजरचना हे धोरण मांडण्यात आले.

१९६५ नंतर देशात आर्थिक स्थिती खालावली महागाई वाढली. जीवनावश्यक वस्तूंचे भाव कडाडले. आर्थिक आणीबाणीमुळे कामगारांमध्ये असंतोष निर्माण झाला. ठिकठिकाणी संपाचे प्रमाण वाढू लागले. २९ डिसेंबर १९६६ रोजी महाराष्ट्र बंद पाळण्यात आला. आयुर्विमा महामंडळाच्या ४० हजार कामगारांनी १९६७ मध्ये संप पुकारला. यानंतर ८ मे १९७४ रोजी देशभर रेल्वे संपास सुरुवात झाली. तो संप तीन आठवडे चालला १५ मे १९७४ ला देशव्यापी हरताळ पाळण्यात आला. त्यात ४० हजार कामगारांना अटक करण्यात आली. देशात सर्वत्र असंतोष पसरला. त्यावेळी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी देशभर आणीबाणी घोषित केली.

१) संघटित कामगारांच्या चळवळी :

स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिकीकरण, पंचवाषिक योजना, सरकारचे कामगारविषयक धोरण आणि कामगार कायद्यांची अंमलबजावणी यातून कामगार संघटनांची वाढ झाली. उदा. सी.पी.आय, सी.पी.आय

(एम.) हिंदु मजदुर सभा, प्रजा समाजवादी, संयुक्त समाजवादी, हिंदु मजदुर पंचायत इत्यादी. ह्या ट्रेड युनियनचा प्रसार भारताच्या विविध क्षेत्रात दिसून येतो. उदा.

१. मुंबई व महाराष्ट्रात शिवसेनेची भारतीय कामगार संघटना.

२. मद्रास व तामिळनाडूमधील डीएमकेची लेबर प्रोग्रेसिव्ह फेडरेशन.

३. मुंबईमधील डॉ. दत्ता सामंत यांची कामगार आघाडी.

४. पुण्यात व त्या आसपासच्या भागात राजन नायर यांची महाराष्ट्र लेबर युनियन.

या कामगार संघयनांवरून राजकीय पक्षांशी संलंग्नता व व्यक्तीवादामुळे भेदभाव दिसतात. औद्योगिकीकरणाच्या व्यापकतेतून कामगारांचे नेतृत्त्व करणाऱ्या नेत्यांमध्ये वैचारिक मतभेद व राजकीय पक्षांशी असलेले संबंध यामुळे संघटना निरनिराळ्या गटामध्ये विभागल्या गेल्या. या प्रक्रियेतून कामगार वर्गात हक्काविषयी जाणीव जागृती झाली आणि आपल्या हितांचे रक्षण करणाऱ्या गटागटांमध्ये कामगार विभागले गेले. त्यातून औद्योगिक ताणतणाव व कलह वाढत गेले. शासनाने त्याची दखल घेऊन कामगार कायदे व कामगार कल्याण यावर लक्ष केंद्रित केले.

२) असंघटित कामगार :

असंघटित कामगारांमध्ये लहान उद्योगधंद्यातील कामगार, दुकानांमध्ये काम करणारे कामगार, घरगडी, मोलकरणी, स्वयंपाकी बांधकामावरील कामगार, विटभट्टीवरचे कामगार, शेतीवरचे मजुर इत्यादींचा समावेश होतो. हे सर्व कामगार असंघटित आहेत. विदर्भात नागपूर येथे प्रा. रूपा कुलकर्णी यांनी मोलकरणी संघटना स्थापण्यात नेतृत्त्व केले. त्याअंतर्गत मार्चे, अधिवेशने भरवून सरकारला मोलकरणींच्या हितासाठी व घरेलु कामगारांसाठी काही मागण्या मान्य कराव्या लागल्या. इ.स. १९९५ साली हमाल पंचायत स्थापन झाली. या संघटनेने शासनावर दबाव आणून माथाडी कायदा व योजना अंमलात आणल्या काही असंघटित कामगार आपापल्या स्तरावर संघटित होऊन आपले प्रश्न सोडवून घेण्याचा प्रयत्न करत आहेत.

कामगार संघटनांची सद्य:स्थिती :

कामगारांनी अगदी सुरूवातीपासूनच आपले वेतन बोनस, भत्ते, कामाची शाश्वती, सुरक्षितता इत्यादी स्वहित जमण्याचा प्रयत्न केला. मात्र सामाजिक हितसंबंधाच्या जपणूक करण्यामध्ये ते उदासिन राहिले. समाज हिताच्या अनुषंगाने कामगारांचा सहभाग असणे अवश्यक आहे. पण केवळ आपल्या आर्थिक मागण्यासाठीच कामगार संघटनांनी घोडदौड सुरू राहिली. परिणामी त्याचा परिणाम त्यांच्या कामाच्या शाश्वतीमध्ये अस्थिरता निर्माण होण्यात झाला आहे. सद्य:स्थितीत हे परिणाम पुढीलप्रमाणे उद्‌भवले आहेत.

१. कामगारांनी कामगार कपातीचे धोरण आखून प्रामुख्याने स्वेच्छानिवृत्ती योजना राबविण्याचे ठरविलेले आहे.

२. काही कंपन्यांनी उपलब्ध असलेली अतिरिक्त जमीन विकण्याचा संकल्प केला.

३. काही कारखानदार कामगारांसहित त्यांचा कारखाना विक्रीस काढू लागले आहेत.

४. सहकारीकरणातून कारखाने बंद पडले आहेत. तेव्हा काही संघटनांनी पुनवर्सन योजना आखली आहे.

सद्या कामगार संघटनांच्या नेतृत्त्वात बदल होत आहे. नवीन संघटना तयार होत आहेत. संघटनांकडून हिंसात्मक कृत्य वाढत आहेत. उदा. मुंबईच्या खाजगी उद्योगांमध्ये एका तरून कामगारांच्या नेतृत्त्वाने भारतीय कामगार महासंघाने अंदाजे १०० छोट्यामोठ्या कारखान्यांमध्ये युनियन स्थापन केल्या व काही ठिकाणी संघर्ष केले. नवीन संघटना, नेतृत्त्व ह्या सर्व गोष्टींमधून कामगार संघटना ह्या स्वातंत्र्य, समता व बंधुता ह्या उदात्त हेतूंपासून बाजुला जात आहेत.

स्वयं:अध्ययन प्रन २

१. नीळ लागवडीसाठी युरोपियन मळेवाल्यांकडून भारतीय शेतमजुरांचे शोषण थांबावे यासाठी महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली ..... सत्याग्रह करण्यात आला.

२. दुष्काळ सदृश्य परिस्थितीत शेतकऱ्यांवर जमीन महसूल आकारू नये यासाठी ब्रिटीश नोकरशाहीविरूद्ध म. गांधीच्या नेतृत्त्वाखाली गुजरातमध्ये ..... सत्याग्रह झाला.

३. मलबार येथील जमीनदारांनी खंडामध्ये केलेली वाढ व मोपले कुळांना जमीनीवरून हसकावून लावण्याच्या कारणांनी १९२१ मध्ये ..... चे बंड झाले.

४. पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील मुळशीपेट्यातील नीळा व मुळा नद्यांच्या संगमावर वीजनिर्मितीसाठी बांधण्या जाणाऱ्या धरणांमुळे पाण्याखाली गेलेल्या जमिनीला पर्यायी जमीन मिळावी यासाठी १९२० मध्ये ..... सत्याग्रह केला.

५. गुजरातमधील सुरत जिल्ह्यात जमीनदारांनी केलेल्या सारावाढीच्या विरोधात महात्मा गांधी यांनी शेतकऱ्यांना संघटित करून १९२८ मध्ये ..... सत्याग्रह केला.

६. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी डाव्या गटांनी एकत्र येऊन १९३६ मध्ये ..... स्थापन केली.

७. उत्तर प्रदेशातील अवध प्रातांतील गरीब शेतकऱ्यांनी जागतिक मंदीचा फटका बसल्यामुळे १९३० च्या सुमारास पं. जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्त्वाखाली ..... ची चळवळ सुरू केली.

८. ..... चळवळ दिनाजपुरू जिल्ह्यातील अतवारी या गावात प्रथम सुरू झाली.

३.२.३ आदिवासींच्या चळवळी :

आदिवासींच्या चळवळी या घटकामध्ये अदिवासी समाजामध्ये घडून आलेल्या अनेक चळवळींचा सविस्तर अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. आदिवासी चळवळींच्यामागे अनेक कारणे आहेत. प्रामुख्याने आदिवासी समाजाच्या स्वायत्तेला धोका निर्माण झाला आहे. संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेमधून संपर्कात आलेल्या हिंदु, मुस्लिम, ख्रिश्चन यासारख्या धर्मांच्या जीवनपद्धतींच्या आदिवासींच्या जीवनावर मोठा प्रभाव पडला आहे. संपर्कात आलेल्या या उच्च वाटणाऱ्या संस्कृतीचे आदिवासींनी अनुकरण करण्यास सुरूवात

केली आहे. आदिवासींच्या पारंपारिक धार्मिक श्रद्धा आणि आचार पद्धतींमध्ये बदल घडून आला आहे. अज्ञान, दारिद्रय यांनी ग्रासलेल्या या आदिवासी लोकांचे बिगर आदिवासींकडून सामाजिक, सांस्कृतिक तसेच आर्थिक शोषण होऊ लागले आहे. जमीन, जंगल व जंगल उत्पादनावरील हक्क आदिवासी गमावुन बसला आहे. जमीनदार, सावकार, जंगल ठेकेदार, तसेच प्रशासकीय अधिकारी आदिवासींना कर्जबाजारी बनवून त्यांच्या जमिनी बळकावत आहेत. त्यामुळे आदिवासी लोकांना आपल्याच जमीनेमध्ये कुले म्हणून किंवा सालगडी म्हणून गुलामीचे जीवन जगावे लागत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विकास प्रकल्पांच्या नावाखाली जवळजवळ ५० टक्के आदिवासी स्थलांतरीत होऊन देशोधडीला लागला आहे. त्यांच्या या होत असलेल्या शोषणाविरूद्ध आदिवासी संघटित होऊन चळवळीला सज्ज झाला आहे.

आदिवासींच्या चळवळींचे प्रकार

अ) राजकीय स्वायत्ततेच्या चळवळी :

स्वायत्तता म्हणजे राजकीय स्वांतंत्र्याचा अविष्कार आहे. घटनेच्या ५ व्या व ६ व्या परिशिष्टातील प्रयोजनानुसार अनुसूचित जमातींना राखीव मतदार संघ ठेवण्यात आले आहेत. आदिवासींना भारतीय राज्यघटनेत 'अनुसूचित जमात' असा उल्लेख केला आहे. तथापि, स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आदिवासी समाजाचा चौफेर विकास झालेला नाही. उलट आदिवासींच्या सामाजिक, सांस्कृती आणि आर्थिक जीवनावर आक्रमण केले जात आहे. सद्या आदिवासींना स्वायत्तता बहाल करण्यात यावी, ५ व्या परिशिष्टातील अनुसूचित जमातींना ६ व्या परिशिष्टातील तरतुदी लागू करून स्वायत्त प्रदेश, स्वायत्त जिल्हे निर्माण करण्यात यावेत या प्रमुख मागण्यासाठी मध्यप्रदेश, महाराष्ट्र, बिहार आसाम मधील आदिवासी लोक चळवळी करत आहेत.

स्वायत्ततेचा अर्थ :

भारतीय राज्य घटना कलम क्र २४४ (२) नुसार ६ व्या परिशिष्टाद्वारे आसाम, मेघालय, त्रिपुरा, मिझोराम या प्रदेशांपुरचे स्वायत्त प्रदेश, जिल्हे, परिषदांचे प्रयोजन करण्यात आलेले आहे. भारतातील आदिवासींच्या इतर क्षेत्रात स्वायत्त प्रदेश, जिल्ह्याचे प्रयोजन नाही.

६ व्या परिशिष्टानुसार स्वायत्तता प्रदान करणे म्हणजे आदिवासींकडून आदिवासीद्वारा आदिवासींसाठी केलेले प्रशासन होय. स्वायत्त प्रदेशांना स्वंतत्र कायदे, स्वतंत्र न्यायपालिका, कार्यकारी मंडळ बनविण्याचे अधिकार दिले आहेत. प्रशासन चालवताना घटनेच्या कलम क. २७१ (१) नुसार स्वायत्त प्रदेशांना वेगळा निधी मिळण्याची तरतुद आहे. प्राथमिक शाळा दवाखाने उघडणे, प्रादेशिक निधी गोळा करणे, जमीन महसूल गोळा करणे नवीन करांने प्रयोजन करणे, खनिज शोधून काढण्यासाठी परवनो देणे. वार्षिक आर्थिक अहवाल तयार करणे इत्यादी अधिकार बहाल केले आहेत. आदिवासींनी राजकीय स्वायत्तेसाठी ज्या काही चळवळी केल्या त्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) आसाममधील विद्यार्थी संघटनेची चळवळ :

आसाममधील कवी विद्यार्थी संघटना आणि एन.सि.हिल्स प्रयत्न करत आहे. विद्याथी संघटनांची संयुक्त आघाडी (Autonomus State Demond Committee) निर्माण करण्यात आली आहे. या संयुक्त

आघाडीने आसामच्या मुख्यमंत्र्यावर दबाव आणून १ फेब्रुवारी १९९२ रोजी स्वायत्त राज्य निर्माण करण्याचा राज्यस्तरावर निर्णय होऊन केंद्र सरकारला प्रस्ताव पाठविण्याचे ठरले दि. २७ मे १९९२ रोजी दिल्ली केंद्रसरकार, राज्यसरकार आण ॲटोनॉमस स्टेट डिमांड कमिटींची त्रिशुंक बैठक घेण्यात आली. घटनेचे कलम क्र. २४४ (अ) प्रमाणे आसामच्या मुख्यमंत्र्यांनी स्वायत्तराज्याला कोणतेही नाव न देता तत्वत्त : मान्यतादिली. पुढे राजकीय अधिकारांचे विभाजन झाले असले तरी कायदा व सुरक्षेचे पूर्ण अधिकार गृहमंत्र्यांकडून हस्तातरीत करण्यासी असमर्थता दर्शविली. परिणामी बिन अधिकारांचे राज्य निर्माण झाले.

२) महाराष्ट्रातील स्वायत्त प्रदेशासाठीच्या चळवळी :

१९८९ मध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातर्फे 'सुररंगणा अदिवासी परिषदेमध्ये स्वायत्त प्रदेशांचा ठराव मंजुर करण्यात आला. त्यामध्ये धुळे, नासिक, ठाणे, रायगड, पुणे, नगर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपुर, गडचिरोली, नागपूर, भंडारा, नांदेड इत्यादी जिल्ह्यातील आदिवासी प्रवण जनक्षेत्र एकत्र करून त्याच्या कारभारासाठी 'स्वायत्त आदिवासी प्रदेश मंडळ' आणि 'महाराष्ट्र राज्य स्वायत्त आदिवासी प्रदेश मंडळाची स्थापना' भारतीय राज्यघटनेच्या ६ व्या परिशिष्टात घटना दुरूस्त करून करण्यात यावी. महाराष्ट्र राज्य विधान सभेत २०/०४/१९८९ तारखेला ही मागणी फेटाळण्यात आली. त्याबाबत आदिवासी विकास राज्यमंत्री मधुकर विचड म्हणाले, 'स्वंतत्र मंडळ स्थापन करून आदिवासींना राष्ट्रीय प्रवाहापासून दूर करणे किंवा त्यांच्यात अलगतेची भावना निर्माण करणे योग्य ठरणार नाही.'

३ डिसेंबर १९९५ ला यवतमाळ येथे विदर्भस्तरीय स्वायत्त परिषद भरविण्यात आली. ५ व्या परिशिष्ट अंतर्गत येणाऱ्या आदिवासी भागांना ६ व्या परिशिष्टात समाविष्ट करून स्वायत्त प्रदेशाच्या तरतुदी लागू कराव्यात अशी मागणी केली. परंतु काँग्रेस शासनाच्या नकारात्मक भूमिकेमुळे आणि राजकीय पातळीवर मतभेदांमुळे या मागणीचा विचार करण्यात आला नाही. २६ जानेवारी १९९६ रोजी गुजरातमधील निझर तालुक्यात राजुपर येथे ५० हजार आदिवासींचे महासंमेलन झाले. त्यात आदिवासींगा स्वायत्त प्रदेश मिळावे ही प्रमुख मागणी करण्यात आली. १८ मार्च १९९६ रोजी महाराष्ट्रातील आदिवासीचा राज्यपाल भवनावर भव्य मोर्चा आयोजित करण्यात आला त्यामध्ये आदिवासींना स्वायत्त प्रदेश मिळावेत अशी मागणी करण्यात आली. नागपूर येथे ३ मार्च ते ८ मार्च १९९७ पर्यंत आंतरराष्ट्रीय आदिवासींचे संमेलन भरवण्यात आले होते त्यामध्ये भारतातील आदिवासींना ६ व्या परिशिष्टांनुसार स्वायत्त प्रदेश देण्यात यावेत असा ठराव भारत प्रशासनाला कळविण्यात आला.

१४ डिसेंबर १९९५ रोजी नागपूर येथे महाराष्ट्र राज्य विधान सभेवर दोन लाख आदिवसींच्या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी आदिवासींना ६ व्या परिशिष्टानुसार स्वायत्त प्रदेश मिळावे अशी जोरदार मागणी करण्यात आली. मुंबई येथे २८ जानेवारी १९९६ रोजी आदिवासी एकतेची परिषद भरविण्यात आली होती. ११ फेब्रुवारी १९९६ ला स्वायत्त प्रदेश देण्यात यावे यासाठी एकमताने ठराव पास करण्यात आला.

३) नागा जमातीची चळवळ :

१९२९मध्ये नांगानी सरकारला एक निवेदन सादर करून आपल्याला अगामी घटनात्मक बदलामधुन वगळावे आणि ब्रिटीश सत्तेच्या शासनाखाली राहू द्यावे असे सुचविले. त्यांनी अशी भिती व्यक्त केली की,

भारतीय लोक त्यांचा कायदा आणि रूढी लादून आमची स्वत:ची पारंपारिक कायदा व्यवस्था नष्ट करतीय. १९४७ नंतर नागा जमातीच्या सामाजिक, राजकीय परिस्थितीतील बदल, नागांच्या स्वतंत्र अस्तित्त्वाला निर्माण झालेला धोका तसेच नागा टेकड्यांवरील मालकी हक्कावरील गडांतर या परिस्थितीमुळे नागा चळवळ सुरू झाली. नागांचे ख्रिस्तीकरण व औपचारिक शिक्षण प्रसार यामुळे नागा जमातींच्या स्वतंत्र अस्तित्वाला धोका निर्माण झाला. नागा जमातीमध्ये कोन्याक नागा, आओ, अंगामी इत्यादी उपजमाती आहेत. नाना जमातीच्या लोकांना आपणही स्वतंत्र 'नागा राज्य' करू शकु या भावनेतून नागा स्वायत्ता चळवळीला प्रारंभ झाला. नागा चळवळीच्या मुख्य ध्येय म्हणजे नागालँडची एकता टिकविणे, नागांच्या राजकीय समस्या सोडविणे, परकीय राष्ट्रांच्या प्रभावापासून स्वत:चे स्वतंत्र अस्तित्त्व निर्माण करणे आणि शांततापूर्ण सहअस्तित्त्व ही होत. स्वातत्र्य प्राप्तानंतर नागा चळवळीने केंद्र सरकाशी आपल्या स्वतंत्र राज्याच्या निर्मितीसाठी व इतर मागण्यांसाठी चर्चा करण्याची तयारी दर्शविली आणि १९५० मध्ये नागा डोंगरी जिल्ह्याच्या घटनेच्या ६ व्या परिशिष्टात स्वायत्ततेचा दर्जा दिला आणि येथील लोकांना आसाम विधान सभेमध्ये प्रतिनिधित्त्व देण्यात आले.

घटनेच्या ६ व्या परिशिष्टांमध्ये नागा डोंगरी जिल्ह्याला स्वायत्ततेचा दर्जा देण्यात आला असला तरी १९५६ मध्ये भूमिगत नागांनी भारतातून फुटून निघून स्वतंत्र राज्य स्थापन करण्याच्या आशेने अनाधिकृतपणे **नागा केंद्रिय** सरकारची स्थापना केली. १९५७ मध्ये नागा डोंगरी जिल्हा आसाममधून वेगळा करण्यात आला आणि १९६० मध्ये नागा लोकांच्या प्रतिनिधींनी १९६० मध्ये पंतप्रधानांनी नागा लोकांसाठी स्वतंत्र नागालँड राज्य स्थापन केल्याची घोषणा केली.

४) मिझो जमातीची चळवळ :

१९४६ मध्ये पर्वतीय लुशाई प्रदेशातील वेगवेगळ्या जमातींच्या लोकांमध्ये राजकीय एकता व संघटना प्रस्थापित करण्यासाठी **मिझो युनियन** ही एक औपचारिक राजकीय पक्ष अस्तित्त्वात आला. या पक्षाने आपली बहुतेक अभिवचने पूर्ण केली. इ.स. १९५७ मध्ये '**मिझो युनियन**' ही '**ईस्टर्न ट्रायबल कौन्सिल**' चा एक भाग बनली. या पक्षाने भारतीय संघराज्यात पर्वतीय प्रदेशातील लोकांसाठी काही प्रमाणात स्वातंत्र्य अपेक्षित असल्याचे मत मांडले. दरम्यानच्या काळामध्ये मिझोराममध्ये भाषिक प्रश्न निर्माण झाला. **आसाम साहित्य** सभा आणि आसाम सरकार यांनी आसामी भाषेला राज्य भाषेचा दर्जा दिला. मिझो प्रदेशातील काही जमातींना आपली भाषा आणि हक्क धोक्यात येतील असे वाटू लागले. पुढे **मिझो नॅशनल फ्रंट (MNF)** यांनी असे सुचविले की, मिझो लोक भारतातील इतर धर्मियांपेक्षा वेगळे आहेत व हिंदु लोक हे ख्रिश्चन धर्मियांच्या विरूद्ध आहेत. यातून मिझो युनियनने १९६४ पर्यंत मिझो पर्वतीय प्रदेशासाठी एक वेगळे राज्य स्थापन करण्याची मागणी केली. **MNF** ने मिझो टेकड्यावरील काही खेड आपल्या वर्चस्वाखाली ठेवली. परंतु केंद्र सरकारने सैन्याच्या बळावर तेथील सेनापती, जमात प्रमुख व नेते यांचा प्रभाव संपुष्टात आणला. तथापि, भूमिगत मिझो बंडखोरांकडून काही विघातक कृत्ये घडून आली. सरकारने बंडखोरांना प्रतिबंध केला हे ख्रिश्चन धर्मगुरूंना पसंत पडले नाही.

मिझो जिल्ह्याच्या मध्यभागी राहणाऱ्या वेगवेगळ्या वांशिक गटांमध्ये वांशिक जाणीव निर्माण झाली होती. **पावी** व **लाखेर** या दोन्ही जमातीमध्ये वैरभाव होते. पावी लोकांच्या वर्चस्वामुळे अखेर लोकांनी सहकार्य थांबवले व मिझो स्वतंत्र पार्टीची स्थापना केली. पावी जमातींचे लोक ख्रिश्चन धर्मिय व बंडखोर वृत्तीचे होते. मिझो जिल्ह्यातील वेगवेगळ्या जमातीं अंतर्गत वांशिक, जातीय मतभेद आणि संघर्ष सुरू असतानाच मेघालय, मणिपूर व त्रिपुरा या स्वतंत्र वेगळ्या राज्यांची मागणी पुढे आली. त्यातून २१ जानेवारी १९७२ मध्ये इंदिरा गांधी यांनी मिझोराम या केंद्रशासित राज्याची स्थापना केली. तथापि, मिझो नॅशनल फ्रंटच्या हिंसात्मक कृती चालूच राहिल्या. सरकारने सैनिकी बळाचा वापर करून त्या थांबविण्याचा प्रयत्न केला.

५) खासी जमातीची चळवळ :

मेघालयातील खासी व जैंतिय टेकड्यांच्या प्रदेशामध्ये खासी जमातीचे लोक राहात होते. खासी जमातिच्या लोकांनी आपल्या सांस्कृतिक वारसा आणि राजकीय व्यक्तिमत्त्व अबादीत राखण्यासाठी चळवळ उभारली **खासी जमातीच्या** लोकांनी समूह नृत्य, धार्मि सण समारंभ साजरे करून चळवळीचे ऐक्य वाढविण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये खासी लोकांचा बाहेरच्या प्रदेशातील व्यापारी व धंदे करणाऱ्या लोकांबरोबर संपर्क मोठ्या प्रमाणावर निर्माण झाला. या बाहेरील बिगर आदिवासी लोकांनी आदिवासी खेड्यातील लोकांची जमीन व इतर मालमत्ता हडप करण्याचा प्रयत्न केला. याला प्रतिबंध करण्यासाठी जिल्हा कौन्सिलने उपाययोजना केली. उदा. खासींचे हितसंबध सुरक्षित ठेवण्यासाठी अनेक कायदे मंजुर केले व आदिम जाणीव मजबुत केली. या कायद्यांची अंमलबजावणी केल्यामुळे एका बाजुला राजकीय नेत्यांमध्ये तणाव निर्माण झाला तर दुसऱ्या बाजुला पारंपारिक जमातप्रमुख यांच्यामध्येही तणाव निर्माण झाला.

भारतीय राज्यघटनेच्या अंमलबजावणीनंतर खासींच्या अपेक्षा व आकांक्षा धुळीला मिळाल्या. आसामी राजकीय नेत्यांचे नियंत्रण करणे व शासन करणे ही अवघड बाब होती. म्हणून प्रत्येक खासींच्या कपाळी निराशा आली. त्यामुळे खासीय भारतीय संघराज्यातील एक वेगळे पर्वतीय लोकांचे राज्य निर्माण करण्याची मागणी करण्यात आली. ईस्टर्न इंडिया ट्रायबल युनियनने सर्व पूर्वेकडील पर्वतीय लोकांना एकत्र आणून पर्वतीय लोकांचे राज्य निर्माण करण्याच्या प्रयत्न केला. नागांना स्वतंत्र अस्तित्व सोडून देण्याचा आग्रह धरला आणि त्यानां एका क्षेत्राखाली आणून पूर्ण आसामीकरणाचा मार्ग सुचविला. पण त्याला खासी राजकीय संघटनांनी विरोध केला पुढे खासी, जैंतिया, गारो लोकांसाठी एक वेगळे राज्य असावे यासी आदिवासींनी केलेल्या राजकीय चळवळीचे फलीत म्हणून २१ जानेवारी १९७२ रोजी मेघालय राज्य जन्मास आले.

६) बोदो जमातीची चळवळ :

आसाममधील बोदो आदिवासी लोकांनी आपल्या भाषिक हक्कासाठी जी एक चळवळ सुरू केली होती तिलाच राजकीय चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. १९६७ च्या निवडणुकीपूर्वी 'मैदानी आदिवासी परिषदेची' स्थापना झाली. बोदो लोकांना बिगर बोदो लोकांकडून होणारी पिळवणूक व त्यांचे राजकीय वर्चस्व नको

होते. त्यांना स्वत:ची भाषा, संस्कृती व परंपरांचे संरक्षण करावयचे होते. पूर्ण स्वातंत्र्य मिळविण्यसाठी त्यांनी अहिंसक मार्ग स्वीकारला आणि क्रोकाजर लोकसभा मतदार संघातुन लढविण्यात आलेल्या पोट निवडणूकीवर बहिष्कार टाकला. २६ जानेवारी १९५० पासून ढेबर कमीशनच्या जमीन हस्तांतरणाचे नियंत्रण व अटकाव या बाबतीतील शिफारशी प्रभावीपणे अंमलात आणाव्यात यासाठीही चळवळीने प्रयत्न केले.

७) अहोम जमातीची चळवळ :

आसाममधील अहोम जमातीने ६०० वर्षापूर्वी स्वतंत्र राज्य स्थापन केलेले होते. १९६७ मध्ये केंद्र सरकारने आसामचे पुनर्संघटन करण्याचा प्रस्ताव मांडल्यानंतर अहोम लोकांनी अप्पर आसाममधील इतर वांशिक समुहांच्या मदतीने चळवळ सुरू केली. अप्पर आसाममधील प्रगतशील अर्थव्यवस्था आणि औद्योगिकरण यामुळे बाहेरील राज्यांतील बिगर आदिवासींनी आसाममध्ये स्थलांतर केले. बाहेरील स्थलांतरीत आदिवासींनी विकासाचे सर्व फायदे उपटले. स्थानिक आदिवासी विकासाच्या संधीपासून वंचित राहिले. केंद्रसरकारने अहोम लोकांच्या जमिनी नाममात्र किमतीने आपल्या ताब्यात ठेवल्या त्याच्या बदली लागवडी योग्य जमीन आदिवासींना न मिळाल्यामुळे ते भुमिहीन बनले या परिस्थितीतुन मार्ग काढण्यासाठी 'The Ujani Ahom Rajya Parishad' ही संघटना उदयाला आली.

अहोम चळवळीच्या मुळाशी 'सांस्कृतिक पुनरूज्जीवन' हा विचा असला तरी पुढे ती राजकीय ऐक्याच्या जाणीवेतून संघटित झाली. १९६४ मध्ये 'All Aassam Ahom Association' ही संघटना 'अहोम ताई' लोकांच्या ऐतिहासिक-सांस्कृती मंडळामध्ये विलीन झाली. ही संस्था कालांतराने 'अहोम ताई मंगोलिया राज्य परिषद' (ATMRP) बरोबर सलंग्न राहिली या संस्थेने अप्पर आसामच्या वेगळ्या राज्याची मागणी उचलून धरली. यामध्ये एक स्वतंत्र महसूल अंदाजपत्रक मांडणे, गौहत्ती हायकोर्टाची स्थापना करणे, तेल शुद्धीकरण व पेट्रोकेमिकल संकूल, दिब्रुगडपर्यंत ब्राँडगेज सुविधा, भूमिहीनांना जमीन, शाळा, रस्ते, पुल इत्यादी मागण्या मांडल्या. तथापि, अहोम चळवळ ही सामाजिक-सांस्कृतिक राहिल्यामुळे राजकीय स्वायत्ततेचा उद्देश बाजूला राहिला.

काही आदिवासी जमातींना राजकीय स्वायत्तता बहाल करण्यात आली असली तरी त्यांना कायदे बनविण्याचा घटनेने अधिकार दिलेला नाही. उलट घटनेच्या निमंत्रणाखालीच कायदे करण्याचा व त्यांची अंमलबजावणी करण्याचा अधिकार दिला आहे. घटनेच्या सातव्या परिशिष्टाचा यादीनुसार आदिवासींना स्वतंत्र ओळख बहाल करणे, त्यांना स्वनिर्धाराचे अधिकार देणे, आदिवासींना मूल निवासी म्हणून व्याख्याबद्ध करणे प्रयोजन नाही. शिवाय आदिवासींचा 'वैयक्तिक कायदा' तसेच त्यांच्या परंपरागत कायद्यानाही स्वायत्तता तरतुदी प्रमाणे मान्यता नाही. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे आदिवासींच्या स्वायत्त प्रदेशातून निवडून आलेले खासदार किंवा आमदार हे कोणत्यातरी राजकीय पक्षाचे गुलाम असतात. त्यांनी आदिवासींच्या अस्मितेच्या प्रश्नावर, आदिवासींना मूल निवासी म्हणून व्याख्याबद्ध करण्याच्या प्रश्नावर तसेच त्यांच्या स्वनिर्धारणाच्या प्रश्नांवर कधीच आवाज उठविलेला नाही.

आदिवासींना स्वनिर्धारणाप्रमाणे जमीन संपादनाचा अधिकार देणे, वस्तुंचे उत्पादन उपभोग व वितरण करण्याचा अधिकार देणे, स्वत:ची आर्थिक यंत्रणा निर्माण करून त्यावर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार देणे,

स्वत:ची सांस्कृतिक जीवनपरंपरा जतन करण्याचा व नव्या पिढीला सुसंस्कारीत करण्याचा अधिकार देणे, त्याचे स्वशासन व पारंपारिक राजकीय अधिकार कायम ठेवणे आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यापर करण्याचा व वित्तिय संस्था व संघटनांशी सलंग्न होण्याचा अधिकार देणे, त्यांच्या जीवनामध्ये शांती व सुरक्षितता राखण्याचे अधिकार देणे हे अत्यंत महत्तवाचे आहे. कारण या स्वनिर्धारणातूनच आदिवासींना स्वत:चा आर्थिक तसेच सामाजिक-सांस्कृतिक विकास करता येईल.

सारांश :

भारतातील काही मर्यादित आदिम जमातींनी राजकीय स्वायतत्ता प्राप्तीसाठी चळवळी केल्या, प्रामुख्याने ईशान्य पूर्व प्रदेशातील नागा, मिझो खासी, बोदो आदिवासींना स्वायत्त प्रदेशांसाठी चळवळी केल्या. घटनेच्या सहाव्या परिशिष्टानुसार राजकीय स्वायत्ता प्रदान करणे म्हणजे आदिवासीकडून आदिवासींद्वारा आतिवासींच्यासाठी केलेले प्रशासन होय. या प्रशासकीय सत्ताप्राप्तीसाठी आसाममधील कवी विद्यार्थी संघटना, मिझो युनियन संघटना, एस.सी.हिल्स विद्यार्थी संघटना, ऑल आसाम अहोम असोशियशन इत्यादी संघटनांनी चळवळीद्वारा प्रयत्न केला. आदिवासींनी स्तव:चा भूप्रदेश, सामाजिक-सांस्कृतिक जीवनपरंपरा, भाषा आणि स्वायत्त राज्य या मूलभूत हक्कांसाठी आणि मूल निवासी म्हणून आदिवासींची स्वतंत्र ओळक वा अस्मिता यासाठी कधी अहिंसक तर कधी हिंसक मार्गांनी चळवळी केल्या.

ब) आदिवासींच्या शेतजमिन विषयक चळवळी :

ब्रिटिशांचे जमीनविषयक धोरण, करपद्धती, महसूल विषयक कायदे आणि प्रशासन यंत्रणा यांच्या संयुक्तीक आक्रमणांमुळे आदिवासींच्या जमिनी जमीनदार आणि सावकारांनी हडप केल्या. त्यामुळे आदिवासींना भुमिहीन, कर्जबाजारी बनावे लागले. याचा परिणाम म्हणून मुंडा, संभाल कोल, भिल्ल इत्यादी जमातींना बंड करावे लागले. त्यांच्याच जमिनीची मशागत करण्याचा मोबदला (जमिनीवरील कर) देण्यास आदिवासींनी विरोध केला. जमिनीचे संक्रमण, कर्जावरील अधिक व्याज सक्तीच्या मजूरीवर राबविणे, जमीन हिसकावून घेणे इत्यादी कारणांसाठी स्वातंत्र्याच्या काळामध्ये आणि नंतरसुद्धा आदिवासींनी चळवळी छेडल्या आहेत. आंध्रप्रदेशातील आदिवासीं जमीन मालक सक्तीने मजूर म्हणून राबवुन घेत यासाठी 'तेलंगणा' चळवळीमध्ये आदिवासी लोक सहभागी झाले. पश्चिम भारतातील आदिवासींनी सावकार, जमीन मालक आणि दारू विकणारे यांच्या विरूद्ध चळवळ केली. मध्ये गुजरातमध्ये आदिवासींनी 'महसूल बंद' आणि 'जमिन बळकाव' आंदोलने छेडली आहेत आणि त्यांनी जाहीर केले की, आम्ही मूळचे जमिन मालक आहोत. १९५० मध्ये समाजवादी पक्षाच्या नेतृत्वाखाल दक्षिण गुजरातमधील पारडी तालुक्यातील आदिवासींनी जमीनसुधारणा कायद्याची अंमलबजावणी आणि कसणाऱ्या शेतकऱ्याला जमिनीची वाटणी या मागणीसाठी आंदोलन उभारले. १९६९ च्या दशकात पश्चिम बंगाल आणि आंध्रप्रदेशातील नक्षलवादी आंदोलन हे आदिवासींच्या शोषणविरूद्ध होते.

आदिवासी शेतजमिनीविषयक प्रमुख चळवळी पुढीलप्रमाणे आहेत.

१) वारली चळवळ :

महाराष्ट्रातील ठाणे व नाशिक जिल्ह्यातील वारली आदिवासींचे जमीनदार, जंगल कंत्राटदार व्यापारी यांनी शोषण केल्यामुळे त्यांना दारिद्र्याच्या परिस्थितीला सामोरे जावे लागले. परिणामी त्यांच्यात स्वातंत्र्याची भावना निर्माण झाली १९४४ मध्ये उंबरगाव तालुक्यातील आदिवासींना शेतीकामासाठी दर दिवसी १२ आणि मजुरी मिळावी यासाठी चळवळ केली. श्री. एस.व्ही.परूळेकर आणि श्रीमती गोदा री परूळेकर यांच्या 'किसान सभेने' त्यासाठी पुढाकार घेतला. १९४५ साली ठाणे जिल्ह्यात 'टिटवाला' येथे किसान सभेची पहिली प्रादेशिक शेतकरी परिषद भरली होती. २३ मे १९४७ रोजी झरी येथे झालेल्या किसान सभेच्या परिषदेमधून प्रेरणा घेऊन डहाणू तालुक्यातील वारल्यांनी 'वेठबिगारी' आणि 'सालदार गडी' यांना मुक्त करण्यासाठी बंड केले. ऑक्टोबर १९४५ मध्ये गवत कापणीच्या मजुरीमध्ये वाढ व्हावी यासाठी वारल्यांनी संप केला. जमीनदारांनी त्यांच्यावर खोटे आरोप करून फौजदारी गुन्हे दाखल केले आणि चळवळ दडपण्याचा प्रमान केला.

स्वातंयोत्तर काळात वारली चळवळीला कम्युनिष्ट पार्टी ऑफ इंडिया व भूमिसेना किंवा कष्टकरी संघटना यांनी पाठिंबा दिला. या चळवळीला जमीनदार, सावकार व्यापारी व पारंपारिक नेते यांनी तिवअ विरोध केला. १९७८ मध्ये वारली चळवळीशी संबंधीत तरूणांनी 'कष्टकरी संघटना स्थापन करून वारली लोकांवरील अन्यायाला वाचा फोडली ठाणे जिल्ह्यातील ३८ लाख हेक्टर जमिनीचे क्षेत्र हे एकूण जमिनीच्या ४० टक्के जंगल व्याप्त आहे. वारली लोकांना जंगल जमिनीची मालकी मिळालेली नव्हती. सरकारने वनीकरणातील जमिन त्यांना दिली होती. तरीसुद्धा सरकारने वारली लोकांना दंड केला. जमीन सोडण्यास व वन अधिकाऱ्यास लाच देण्यास भाग पाडले. १९७८ च्या जुलैमध्ये जनता पार्टी, भूमिसेना, ग्राम स्वराज्य समिती यांनी सरकारी जमिनीवर व जंगल जमिनीवर वारल्यांचे झालेले अतिक्रमण नियंत्रित करावे यासाठी मागणी केली.

२) भिल्लांची चळवळ :

महाराष्ट्रातील धुळे, नाशिक, जळगाव, अहमदनगर व औरगांबाद जिल्ह्यांमध्ये भिल्ल आदिवासींची संख्या सर्वाधिक आहे. धुळे जिल्ह्यातील शेतजमीन अत्यंत सुपिक असल्यामुळे गुजरातमधील गुजर समाज त्याकडे आकर्षित झाला. धुळे जिल्ह्यातील शहादा व तलोदा तालुक्यातील ६० खेड्यातील जवळ जवळ १०,००० एकर जमीन आदिवासींकडून गुजर लोकांनी हडप केली. ही जमीन हस्तारणाची प्रक्रिया ब्रिटीश सत्तेच्या काळात म्हणजेच १९३० पासून सुरू होती. ब्रिटीशांच्या जमीन व भाडेकरार या कायद्यानुसार कुळवहिवाटीने आदिवासींच्या जमिनीचे गुजर लोक मालक बनले. भिल्ल लोकांची गरीबी, कर्जबाजारीपण यामुळे त्यांच्या जमिनी सावकारांच्या ताब्यात गेल्या. परिणामी भिल्ल भूमिहीन, अल्पभूधारक बनले. भूमिहीन व अल्पभूधारक यामुळे शेती उत्पन्नातील अल्प भाग त्यांच्या वाट्याला आला काही भिल्ल सालदार बनले.

भिल्ल आदिवासींच्या जमिनी गुजर जमीनदारांकडे हस्तांतरीत होण्याची अनेक कारणे आहेत. त्यामध्ये १) सावकारांनी आदिवासींच्या जमिनी बोली स्वरूपात स्वत:कडे ठेवल्या. कर्ज परतफेडीनंतरही त्यांनी

आदिवासींच्या जमिनी परत केल्या नाहीत. २) सावकारांनी विनिमयाच्या स्वरूपातील आदिवासींच्या जमिनी स्वत:कडे ठेवल्या परंतु त्याच्याबदली स्वत:कडील जमीन आदिवासींना दिली नाही. ३) अनेक सावकारांनी जिल्ह्याधिकाऱ्याच्या संमतीशिवाय आदिवासींच्या जमिनी दीर्घ मुदतीच्या करारावर स्वत:कडे ठेवल्या पुढे कुलवहिवाटीचा 'भाडे कायदा' नुसार सावकार त्या जमिनीचे हक्कदार बनले. ४) स्वातंत्र्यानंतर हस्तांतरनीय इनाम जमिन निश्चित स्वरूपाची रक्कम भरल्यानंतर दस्तांतरणीय बनली गरीब आदिवासींना ती निश्चित स्वरूपाची रक्कम भरता न आल्यामुळे सदरची जमीन बिगर आदिवासी लोकांनी विकत घेतली. ५) सहकार्य पत संस्थांनी आदिवासी लोकांना दिलेल्या कर्जाची परतफेड न झाल्यामुळे त्यांच्या जमिनी लिलाव केल्या. त्या जमिनी जमीनदार सावकारांनी घेतल्या. यामुळेच भिल्ल आदिवासी भूमिहीन, कर्जबाजारी व गरीबीच्या खाईत लोटला गेला. भिल्लानां स्वत:च्या अस्तित्वासाठी बंडाशिवाय पर्याय उरला नाही. भिल्लांनी संघटितपणे गुजर जमीनदारांविरूद्ध बंड पुकारले. बंडाचे कारण केवळ भिल्लांच्या जमिनी बळकावल्या ऐवढेच नव्हते तर आदिवासी स्त्रियांवर अन्याय, छळ विहीरीमध्ये विष टाकणे, यांच्या दोषाच्या

भिल्ल चळवळ सुरू करण्यामध्ये **शहादा** तालुक्यातील सर्वोदय कार्यालयचा सचिव **अंबरसिंग सुरतकंती** यांनी पुढाकार घेतला. जमीनदार, पोलिस व कॉंग्रेसपक्ष यांच्या युतीमुळे अंबरसिंगने स्वत:च लढण्याचा निर्णय घेतला. त्याने भजनी मंडळातुन आदिवासींबरोबर संपर्क साधून त्यांच्या वरील अन्यायाची कल्पना दिली. आदिवासींचच्या तक्रारी ऐकूण घेऊन त्यासाठी निश्चित योजना कार्यान्वित करण्यात आली. परंतु अंबरसिंगच्या खेड्यातील ६१ झोपड्या जळाल्याने त्यांची ग्राम स्वराज्य समिती व कायदेशीर सल्ला कार्य यांना विरोध झाल्यामुळे त्यांच्या कार्याला यश आले नाही.

स्वातंत्र्योत्तर काळात भिल्ल आदिवासीवरील अन्याय व छळ थांबले नाहीत. मे, १९७१ मध्ये पाटीलवाडी, म्हसवाडी येथील भिल्लांचा छळ, कलक व गंभीर जखमी करणे या कारणांमुळे एक क्रांतीकारी संघटना निर्माण करऱ्याजी गरज निर्माण झाली. ३० जानेवारी १९७२ मध्ये शहादा तालुक्यात 'भुमुक्ती परिषद' भरवली त्यामध्ये सातपुडा सर्वोदय मंडळ, ग्रामसेवक स्वराज्य समिती भूमिहीन शेतमजुर, लाल निशान गटाचे नेतृत्व लाभलेल्या गरीब शेकतरी संघटना, भिल्ल सेवा मंडळ, माजगावकरांचे मान्सून फाऊंडेशन या संघटनांनी भाग घेतला पुढे या परिषदेचा परिणशम म्हणून श्रमिक संघटनेची स्थापन झाली. या संघटनेने आदिवासींच्या मुळ जमिनी परत मिळाव्यात, नोकरीची हमी योजना अंमलात आणावी जमीन हस्तांतरण कायदा १९४७ प्रमाणे सरकारी संस्थांना देऊ असणारी आदिवासींची कर्जे नष्ट करावीत व शेतकऱ्यांना किमान वेतन कायदा लागू करावा. या मागण्या केल्या. श्रमिक संघटनेच्या प्रयत्नातून बिगर आदिवासींकडून ४००० एकर जमीन परत मिळाली.

धुळे जिल्ह्यातील **सिक्री व नवापूर** तालुक्यातील १०,००० एकराच्या जमिनीवर जवळ जवळ ३५००-४००० कुटूंबानी अतिक्रमण केले होते. सरकारने भूमिहीनांना जंगल वाटून द्यावी यासाठी सरकारबरोबर संघर्ष सुरू केला त्यामध्ये १५० आदिवासींना तुरूंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली. शहादा व तळोदा तालुक्यातील १३००० ते १५००० जंगल जमीन भूमिहीन आदिवासींना वाटता येईल त्यांना किमान वेतन कायदा लागू करता येईल असे अश्वासन सरकारने मतांवर डोळा ठेवून श्रमिक संघटनेला दिले. दुसऱ्या बाजुला गुजर समाजाने काँग्रेस पक्षाला पैसा आणि मते देण्याचे कबुल केल्यामुळे सरकारने गुजर जमीनदारांना

विशेष पोलिस संरक्षण दिले. पुढे पोलिसांनी श्रमिक संघटनेच्या संदस्यांवर अन्याय व छळ करण्यास सुरूवात केली. थोडक्यात भिल्ल चळवळीचे वैशिष्ट्य हे की त्यांनी श्रमिक संघटनेच्या मदतीने गुजर समाजाच्या लोकांनी बळकावलेल्या जमिनी परत मिळाव्यात, भूमिहीन आदिवासींना जंगलातील पडीत जमीन मिळावी, किमानवेतन कायदा लागू करावा, वेठबिगारी पद्धती व सालदार पद्धती बंद व्हावी यासाठी संघटित संघर्ष केला.

३) कोल चळवळ :

छोटा नागपूर आणि जंगल महाल हे सारे क्षेत्र जेव्हा ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकारात होते तेव्हा कंपनीने मुसलमान जमीनदार बाहेरून आणून येथील कोल लोकांवर लादले. जमीनदारांनी कोल आदिवासींवर जमिनीचे कर जकात व इतर कर लादून त्यांचे जीवन कष्टदायी बनविले. कर वसुलीसाठी त्यांच्यावर अन्याय अत्याचार केले. कुमांग गावचा जमीनदार मोहम्मद अली यांनी त्यांची गुरे हाकून न्हेल्यामुळे आदिवासींना धमकावले होते. ११ डिसेंबर १९३१ रोजी मोहम्मद अली व त्यांच्यासारख्या अनेक जमीनदारांवर संघटित हल्ला केला. लगेचच २० डिसेंबर १९३१ रोजी सुमारे सातशे आदिवासी 'लरका हो' ची गर्जना करत कुमांग येथील जमीनदारांवर तुटून पडले. इतर चार गावातील जमीनदारांचे वाडे (महाल) त्यांनी उद्धवस्त केले. सिंगभुम मधील गाव प्रमुख व मानकऱ्यांनी या संघर्षाचे नेतृत्त्व केले होते.

एका कोल महिलेला रखेली म्हणून ठेवणाऱ्या याजर अली या अत्याचारी जमीनदारास २५ डिसेंबर १९३१ रोजी ठार मारले. सोनपुर परगण्यातील सर्व जमीनदारांना ठार मारण्याची कोल लोकांनी प्रतिज्ञाच केली. तीनशे कोल आदिवासींच्या तुकडीने जमीनदार कोलखान याच्या गावावर आणि जमीनदार सैफुलाह खान यांच्या संझी गावावर हल्ल केला. त्यांची घरे उद्धवस्त केली व पेटवून दिली. कोलकान मारला गेला. १९३२ साली अगदी सुरूवातीलाच सुमारे एक हजार कोल आदिवासींनी कामांग आणि कोरुबुरू गावांच्य जमीनदारांवर हल्ला केला. ३ जानेवारील गार्गरावर हल्ला चढवला व बेलकुद्रा प्रांत स्वतंत्र केला. पुढे गोंविदपुर ठेणे, बरकागढ, परगणा आणि सोनपुरच्या उत्तरेकडील सर्वक्षेत्रातील इंग्रजांची सर्व ठाणी नष्ट केली. २६ जानेवारी १९३२ पर्यंत पालकोटच्या दक्षिणेकडील काहीभाग सोडला तर सर्व छोटा नागपूर स्वतंत्र केले होते. तथापि ईस्ट इंडिया कंपनीच्या बंदुकधारी फौजानी कोल आदिवासींवर जोरदार हल्ला चढवला त्यामध्ये अनेक कोल मारले गेले. गावे बेचिराख केली. शेवटी स्वत:च्या स्वाभिमानाचे रक्षण करण्यासाठी कोल लोकांनी डोंगर व जंगलांचा आश्रय घेतला पण कोलाना कंपनीच्या फौजांना नमवण्यात अपयश आले.

सारांश :

एकेकाळी डहाणू, शहापूर, वाडा, भिवंडी, मुरबाड या तालुक्यात ९५ टक्के जमिनी आदिवासींच्या मालकीच्या होत्या. १९३८ साली सेमिंग्टनच्या अहवालात तशी नोंद आहे. पण आता ३० टक्के जमिनी देखील आदिवासीकडे राहिल्या नाहीत. ठाणे जिल्ह्यामध्ये कायदेशीर व बेकायदेशीर जमीन हस्तांतरणे मोठ्या प्रमाणात झाली. आदिवासींच्याकडे आता जमिनीचे क्षेत्र कमी राहिले आहे. त्यामुळे जमीन, जंगल यांच्या मूळ हक्क व आधिकारांसाठी आदिवासींनी चळवळींचे शस्त्र उपसले आहे.

क) आदिवासी जमातींच्या संस्कृतीकरणाची चळवळ :

डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी संस्कृती करण्याची संकल्पना मांडली. भारतातील परिवर्तनाच्या मूळाशी असलेल्या घटकांचे आकलन करून घेण्यासाठी ही संस्कृतीकरणाची संकल्पना त्यांनी 'कुर्गातील धर्म आणि समाज' (Religion and Society Among Coorgs) या ग्रंथामध्ये मांडली. त्याच्या मते, "संस्कृतीकरण म्हणजे ही अशी प्रक्रिया आहे की ज्यात कनिष्ठ जातीतील हिंदु किंवा आदिवासी किंवा अन्य गट आपल्या प्रथा, धार्मिकविधी, विचार प्रणाली आणि एकूण जीवनपद्धती यात अशा पद्धतीने परिवर्तन करतात की त्यांनापण उच्च जातीचे व विशेषत: द्विज जातीचे समजावे.''

संस्कृतीकरणाच्या या प्रक्रियेत निम्न समजल्या जाणाऱ्या आदिवासी जमातींच्या लोकांनी हिंदु धर्मातील उच्च विशेषत: ब्राम्हण जातीच्या लोकांचे आचार-विचार, रिती-रिवाज,धर्मविषयक श्रद्धा इत्यादींचे अनुकरण करून हिंदुच्या जाती व्यवस्थेत उच्च समाजिक स्थान मिळविणाचा दावा करणे होय. संस्कृतीकरणाच्या या प्रक्रियेत हिंदु जाती व्यवस्थेतील उच्च ब्राम्हण जातीच्या आणि ब्राम्हण नसलेल्या जातींच्या जीवनपद्धतींचे अनुकरण केलेले दिसून येते.

डॉ. जी. एस. घुर्ये यांनी हिंदुच्या जातीव्यवस्थेमध्ये अनेक आदिम जमाती सामील झाल्याचे आणि होत असल्याचे स्पष्ट केले आहे. उत्तर भारतातील हिमालय पर्वत प्रदेशातील थारू व खासा जमातींमध्ये ही सामीलीकरणाची प्रक्रिया दिसून येते.

१) खासा जमातीचे लोक आपल्या जमातींच्या जीवन परंपरा पाळतात. परंतु शेजारील मैदानी प्रदेशातील राजपुत व ब्राम्हण समाजांच्या जीवन पद्धतींचा स्विकार करतात. ते स्वत:ला राजपुत या उच्च जातीचे समजतात. हिंदु समाजातील उच्च स्थान असलेल्या राजपुत जातीच्या जीवन परंपरांच्या अनुकरणाने त्यांना उच्च सामाजिक दर्जा प्राप्त झाल्याचे मानसिक आत्मिक समाधान मिळते. शिवाय, त्यांनी हिंदु समाजातील आडनावेही स्वीकारलेली आहेत.

२) खास जमातीप्रमाणेच थारू जमातीचेही लोक या हिंदु समाजाच्या सामीलीकरणाच्या प्रक्रियेत येऊन ते स्वत:ला ठाकूर समजू लागले. ठाकूर समाजाशी विवाह संबंध प्रस्थापित करणे, हिंदु धार्मिक विधी, सण-समारंभ तसेच जान्हवे वापरणे इत्यादी गोष्टी त्यांनी आत्मसात केल्या आहेत. याशिवाय हिमाचल प्रदेशातील लाहोली, किन्नर व गट्टी जमातीच्या लोकांनी हिंदु-धर्मियांशी निकटचे संबंध प्रस्थापित केले आहेत.

३) मध्ये प्रदेशातील भूमिज जमातीने 'भूमिज क्षेत्रिय मंडळ' स्थापन करून हिंदु समाजातील क्षत्रिय जातीचा दर्जा मिळावा म्हणून चळवळ उभारली. भूमिज जमातीच्या ऐतिहासिक मानववंशीय अध्ययनात 'जमाती-रजपुर' संबंधाबाबत स्पष्टीकरण देण्यात आले आहे. याचाच परिणाम म्हणून भूमिज लोकांनी क्षत्रिय जातीमध्ये स्वत:ला सामिल करून घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

४) आदिवासी जमातीचा हिंदु समाजाशी अनेक कारणांनी संबंध प्रस्थापित झाल्यामुळे त्यांनी हिंदु समाजातील राज्यशाही पद्धतीचे अनुकरण केले आणि वेगवेगळी राज्य स्थापन केली आहेत. उदा. छोटा नागपुरचे 'मुंडा राज्य' बिटभूमचे 'भूमिज राज्य' गोंडवनाचे 'राजगोंड राज्य' इत्यादी.तत्कालीन

मुण्डा, भूमिज आणि राजगोंड जमातींनी राज्य स्थापन केली होती याचाच अर्थ असा की मुण्डा, भूमिज व राजगोंड या जामातींनी हिंदु समाजातील क्षत्रियांच्या राज्यव्यवस्थेचे अुनकरण केले होते ते नाकारता येत नाही. गोंड जमातीच्या प्रमुखाला राजगोंड म्हणतात. हिंदु समाजातील उच्च जातीव्यवस्थेतील स्थान तसेच प्रतिष्ठा आदिवासींना प्राप्त होऊ शकते. तथापि आदिवासी समाजाचे जमात प्रमुख हे एक वैशिष्ट्य सांगितले आहे या वैशिष्ट्याच्या आधारे मुळातच आदिवासी समाजामध्ये राज्यशाही शासनपद्धती असली पाहिजे असे वाटते. त्यामुळे आदिवासींनी हिंदुच्या राज्यपद्धतीने अनुकरण केले असे म्हणणे वादाचे ठरते.

५) मुण्डा जमातीवर हिंदु समाजातील भक्तीपंथाचा प्रभाव पडलेला आहे. मुण्डांनी बोंगा शक्तीवर विश्वास कमी करून हिंदु धर्मातील धार्मिक विधी, कर्मकाण्डे, पंचाग लग्नविधी, मंत्र अंत्यविधी इत्यादी गोष्टींचे अनुकरण केले आहे. धार्मिक कार्यासाठी ब्राम्हण पुरोहिताला ते बोलावतात. मुण्डा जमातीतील एका विभागाने हिंदु जीवन पद्धतीचा स्वीकार केल्यामुळे त्यातून 'मंजीश' य स्वतंत्र जातीचा उदय झाला आहे.

६) हिंदु समाजातील भगत चळवळीने मध्य भारतातील काही जमातींमध्ये व त्यांच्या अनेक उप-विभागांमध्ये संस्कृतीकरणाची प्रक्रिया घडवून आणली. हिंदु समाजातील वैष्णव पंथीयांचा आदर्श समोर ठेवून भगत चळवळीने जमातींच्या धार्मिक व सामाजिक जीवनाचे शुद्धीकरण करणे हे मुख्य ध्येय समोर ठेवले होते. शरदचंद्र रॉय या मानवशास्त्रज्ञाच्या मते, उरॉव जमातीमध्ये हिंदु समाजाच्या संपर्कामुळेच भगत चळवळ सुरू झाली. भगत चळवळीचा परिणाम म्हणून छोटा नागपूरमधील अनेक जमातीमध्ये विष्णु भगत, महादेव भगत, कबीर पंथीय भगत, यांना भगत असे गट निर्माण झाले.

७) ताना भगत या संताने 'उरॉव धर्म' व 'कुरूखधर्मांचे' पुनरूज्जीवन करण्यासाठी ताना भगत ही चळवळ सुरू केली. जमातीमधील अंधश्रद्धा, भूत-पिशाच्च यावर नियंत्रण आणले. मांसाहार, मद्यपान वर्ज केले. भक्तीमार्ग व एकेश्वरवादाची संकल्पना स्विकारली व हिंदु समाजव्यवस्थेमध्ये उच्च सामाजिक दर्जा संपादन्याचा प्रयत्न केला. पश्चिम भारतातील भिल्ल जमातीमध्ये वैष्णव पंथीय भगत आढळतात. या जमातीने भगत समुह हा संदर्भसमूह स्वीकारून हिंदु ब्राम्हण जातीमधील देवदेवता सण-उत्सव, धर्माचरण इत्यादी गोष्टींचा स्वीकार केला. पश्चिम बंगालमधील 'बौटी' जमातीच्या लोकांनी हिंदु समाजातील चालीरीतींचा अंगीकार केला आहे बौटी लोक आपल्या मुलाच्या जन्मानंतर ११ दिवस सुतक पाळतात, वैष्णव पंथाची उपासना करतात, जान्हवे वापरतात.

८) महाराष्ट्रातील विदर्भातील अनेक जमातींचा प्रगत समाजातील शास्त्रक (राजे) व्यापारी, ब्राम्हण पुरोहित, समाजसेवक इत्यादी लोकांचा अनेक वर्षापासून संपर्क आल्यामुळे त्यांच्यात हिंदु समाजातील जाती-व्यवस्थांचा प्रभाव पडलेला आहे. त्या जमातींच्या लोकांच मराठा जातीशी संपर्क आला त्यांनी मराठा जातीतील हनुमान, बाजीराव, महिपतराव, केशवराम पांडू, तुकाराम, गंगाराम इत्यादी नांवाचा स्वीकार केला. शिवा रामायण, महाभारत, पुराणे व पौराणिक कथांचाही त्यांच्यावर प्रभाव पडला आहे. काही जमातींनी समसंस्कृतीकरणाच्या प्रक्रियेतुन प्रादेशिक हिंदु समाजाच्या जीवनपद्धतीचा स्वीकार केला

आहे. त्यांना हिंदुच्या जातीव्यवस्थेत उच्च स्थान न मिळाल्यामुळे कनिष्ठ जातीमध्ये स्थान मिळाले आहे.

९) परधान आदिवासी जमातीच्या लोकांनी वांजत्री केलच्या द्वारा हिंदु समाजातील रामायण, महाभारत या काव्यांचे गोंड जमातीमध्ये सादरीकरण करून हिंदुच्या जीवनपद्धतीचा प्रसार केला आहे. याचा परिणाम म्हणून गोंड आदिवासींनी अर्जराव भीमा, महादु, पांडू, संभू, कृष्णाजी इत्यादी देवदेवतांची नावे स्वीकारली आहेत. भगत चळवळीने गोंड जमातीमध्ये हिंदु धर्माचा प्रसार केला आहे. तथापि, हिंदुच्या जातीव्यवस्थेतील पवित्र-अपवित्रतेची कल्पना गोंडानी स्वीकारली असली तरी त्यांच्यामध्ये पवित्र-अपवित्रतेच्या संदर्भातील नियम पालन केले जात नाहीत. कपाळाला व दंडाला गंध, गंधरेखा ओढणे, जपमाळ, नवीन संकेत, अभिवादन पद्धती भगवी वस्त्रे, केशभूषा इत्यादी गोष्टींचा मात्र त्यांनी स्वीकार केला आहे.

३.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :

१. १९८९ मध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातर्फे ..... आदिवासी परिषदेमध्ये स्वायत्त प्रदेशांच्या ठराव मंजुर करण्यात आला.

२. ३ डिसेंबर १२९९५ रोजी ..... येथे विदर्भस्तरीय स्वायत्त परिषद भरविण्यात आली.

३. राजकीय स्वायत्ततेसाठी आसाममधील ..... विद्यार्थी संघटनेने चळवल केली.

४. २६ जानेवारी १९९६ रोजी गुजरातमधील निझर तालुक्यात ..... येथे ५० हजार आदिवासींचे महासंमेलन झाले.

५. १९४६ मध्ये पर्वतीय लुशाई प्रदेशातील वेगवेगळ्या जमातींच्या लोकांमध्ये राजकीय एकता व संघटना प्रस्थापित करण्यासाठी ..... ही एक औपचारिक राजकीय संघटना अस्तित्त्वात आली.

६. मध्य गुजरातमध्ये आदिवासींनी ..... आणि ..... आंदोलने छेडली.

७. १९४५ साली ठाणे जिल्ह्यात टिटवाला येथे ..... ची पहिली प्रादेशिक शेतकरी परिषद भरली होती.

८. भिल्ल चळवळ सुरू करण्यामध्ये शहादा तालुक्यातील सर्वोदय कार्यालयाचा सचिव ..... यांनी पुढाकार घेतला.

९. ३० जानेवारी १९७२ मध्ये शहादा तालुक्यात ..... परिषद भरवली होती.

१०. डॉ. एम.एन. श्रीनिवास यांनी ..... या ग्रंथामध्ये संस्कृतीकरणाची संकल्पना मांडली.

११. खासी आदिवासींनी हिंदु समाजातील उच्च स्थान असलेल्या..... जातीच्या जीवनपरंपरांचे अनुकरण केले.

१२. मध्यप्रदेशातील भूमिज जमातीने ..... स्थापन करून हिंदु समाजातील क्षत्रिय जातीचा दर्जा मिळविण्यासाठी चळवळ उभारली.

१३. भूमिज आणि राजगोंड या जमातींनी हिंदु समाजातील ..... राज्यव्यवस्थेचे अनुकरण केले.

१४. मुण्डा जमातातील एका विभागाने हिंदुच्या जीवनपद्धतींचा स्वीकार केल्यामुळे त्यातून ..... या स्वतंत्र जातीचा उदय झाला.

१५. शरदचंद्र रॉय या मानवशास्त्राच्या मते उरॉव जमातीमध्ये हिंदु समाजाच्या संपर्कामुळे ..... चळवळ सुरू झाली.

१६. ताना भगत या संताने ..... व ..... चे पुनरूज्जीवन करण्यासाठी तानाभागात ही चळवळ सुरू केली.

१७. १८५५ ते १८५७ या ब्रिटीशकाळामध्ये पूर्वीचे सरकार व शेतीव्यवहार यांची पुर्नस्थापना करण्यासाठी ..... चळवळ सुरू झाली.

१८. १८७० ते १८५० या काळात मांबूराम टंगालच्या नेतृत्त्वाखाली ..... केरळमध्ये शेतकरी कुलांची चळवळ घडून आली.

१९. १८९० मध्ये ..... यांच्या नेतृत्त्वाखाली मुण्डा अदिवासींची चळवळ झाली.

२०. शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर अनिष्ट परिणाम करणाऱ्या ब्रिटीशांच्या धोरणाला विरोध करण्यासाठी बंगालमधील १८७० मध्ये ..... चा उठाव झाला.

२१. १८२६ मध्ये पुणे जिल्ह्याच्या दक्षिण भागात ब्रिटीश सरकारविरूद्ध ..... यांच्या नेतृत्त्वाखाली रामोशांचे बंड झाले.

२२. १८२२ ते १८२७ या काळात भिल्लांनी ..... च्या विरूद्ध उठाव केला.

२३. नीळ लागवडीसाठी युरोपियन मळेवाल्यांकडून भारतीय शेतमजुरांचे शोषण थांबावे यासाठी महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली ..... सत्याग्रह करण्यात आला.

२४. दुष्काळ सदृश्य परिस्थितीत शेतकऱ्यांवर जमीन महसूल आकारू नये यासाठी ब्रिटीश नोकरशाहीविरूद्ध म. गांधीच्या नेतृत्त्वाखाली गुजरातमध्ये ..... सत्याग्रह झाला.

२५. मलबार येथील जमीनदारांनी खंडामध्ये केलेली वाढ व मोपले कुळांना जमीनीवरून हसकावून लावण्याच्या कारणांनी १९२१ मध्ये ..... चे बंड झाले.

२६. पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील मुळशीपेट्यातील नीळा व मुळा नद्यांच्या संगमावर वीजनिर्मितीसाठी बांधण्या जाणाऱ्या धरणांमुळे पाण्याखाली गेलेल्या जमिनीला पर्यायी जमीन मिळावी यासाठी १९२० मध्ये ..... सत्याग्रह केला.

२७. गुजरातमधील सुरत जिल्ह्यात जमीनदारांनी केलेल्या सारावाढीच्या विरोधात महात्मा गांधी यांनी शेतकऱ्यांना संघटित करून १९२८ मध्ये ..... सत्याग्रह केला.

२८. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी डाव्या गटांनी एकत्र येऊन १९३६ मध्ये ..... स्थापन केली.

२९. उत्तर प्रदेशातील अवध प्रातांतील गरीब शेतकऱ्यांनी जागतिक मंदीचा फटका बसल्यामुळे १९३० च्या सुमारास पं. जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्त्वाखाली ..... ची चळवळ सुरू केली.

३०. १९४५ मध्ये जमिनदारांच्याविरुद्ध .....ने जिल्ह्यातील वारली आदिवासींची चळवळ सुरु केली.

३१. .....चळवळ दिनाजपुरू जिल्ह्यातील अतवारी या गावात प्रथम सुरू झाली.

३२. शेती उत्पन्नातील १/३ हिस्सा जोतेदारांना आणि २/३ हिस्सा बर्गदारांना मिळावा या संबंधीचे विधेयक बंगाल सरकारने कायदेमंडळापुढे व मांडल्यामुळे ..... सभेने ..... आंदोलन सुरू ठेवले.

३३. १९४६-५१ या काळात निजामाच्या हैद्राबात संस्थानातील सरंजामशाही शेतीपद्धतीमुळे शेतमजुर व कुळांवरील अत्याचार रोखण्यासाठी ..... तील शेतकरी उठाव झाला.

३४. १९६७ मध्ये पं. बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यातील सिलिगुडी तालुक्यातील नक्षलबाडी येथील..... आदिवासींनी जमीनदारांविरुद्ध उठाव केला.

३५. १९७० साली किसानसभा व शेतमजुर संघ यांनी अखिल भारतीय पातळीवर ..... आंदोलन केले.

३६. १९४८ साली शेतकऱ्यांची कर्जमाफी व शेतसारा कमी करावा यासाठी केशवराव जेथे, शंकरराव मोरे व दत्ता देशमुख यांनी ..... पक्षाची स्थापना केली.

३७. १९५० मध्ये दाभाडी येथे भरलेल्या शेतकरी कामगार पक्षाच्या अधिवेशनात १५ कलमी कार्यक्रमांच्या अंतभार्व असणारा ..... हा जाहिरनामा संमत करण्यात आला.

३८. १९५१ मध्ये दत्ता देशमुख व त्यांच्या सहकार्यांनी कामगार ..... स्थापन केला व १९६५ पासून या पक्षाला ..... पक्ष हे नाव मिळाले.

३९. १९७० साली ठाणे जिल्ह्यातील पालघर तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांची ..... संघटना तयार करण्यात आली.

४०. १९७८ मध्ये ..... यांनी पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात शेतकरी संघटनेची स्थापना केली.

४१. शेतकरी संघटनेने कांद्याला योग्य भाव मिळावा म्हणून १ मार्च १९८० रोजी ..... येथे पुणे-नाशिक मार्गावर धरणे आंदोलन केले.

४२. १४ मार्च १९८१ रोजी ..... यांच्या नेतृत्वाखाली तंबाखूला योग्य भाव मिळावा यासाठी निपाणी येथे ५० हजार शेतकऱ्यांनी पुणे-बंगलोर राष्ट्रीय महामार्ग आडवून आंदोलन केले.

४३. २३ नोव्हेंबर १९८६ रोजी कृत्रिम धाग्याच्या विरोधात महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यात शेतकऱ्यांनी रास्ता रोको करून ..... आंदोलन केले.

४४. भारतात कामगार चळवळीचा पाया ..... यांनी घातला.

४५. रावबहादूर लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली ..... ही संघटना उदयाला आली.

४६. ..... सत्याग्रहात म. गांधीनी अटक झाल्यावर अहमदनगरच्या गिरणी कामगारांनी संप पुकारला.

४७. गुजरात येथील कापड गिरणी कामगारांना प्लेग बोनस मिळावा म्हणून समाज सेविका ..... यांच्या नेतृत्त्वाखाली ४ डिसेंबर १९१७ रोजी संप सुरू झाला.

४८. १९२६ साली ..... यांच्या नेतृत्त्वाखाली बॉम्बे लेबर युनियनचा जन्म झाला.

४९. लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली ..... ही पहिली तयार झालेली संयुक्त चळवळ होती.

५०. कामगारांच्या हितासाठी १९४८ मध्ये ..... कायदा आणि १९५२ मध्ये ..... ची कायदा झाला.

३.४ सारांश :

भारतातील पारंपारिक सामाजिक चळवळी म्हणून शेतकरी, कामगार व आदिवासी चळवळींचा अभ्यास आपण या घटकामध्ये केला. शेतकरी चळवळी प्रामुख्याने स्वांतत्र्योत्तर काळात जोमाने सुरु झाल्या. परंतु त्याची सुरुवात ही ब्रिटीश राजवटीतच झाली. शेतकऱ्यांचे प्रश्न आणि त्यांच्यावर सावकार, भांडवलदार, मोठे जामिनदार यांच्याकडून होणारी पिळवणूक करण्याच्या उद्देशाने शेतकरी चळवळी अस्तित्वात आल्या. त्यामुळेच काही प्रमाणात शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणे शक्य झाले.

कामगारांना कामाची शाश्वती, कामाचा योग्य मोबदला, त्यांना संरक्षण व सहाय्य मिळाले. याच हेतूने कामगार चळवळ अस्तित्वात आल्या. त्यासाठी कामगार संघटनांची निर्मिती झाली. ब्रिटीश राजवटीपासून आजपर्यंत या कामगार संघटना चळवळी कामगांराच्या हितासाठी कार्यरत असल्याचे दिसते.

आदिवासींच्या चळवळी प्रामुख्याने आदिवासींचा प्रश्नांची संपर्क आल्यानंतर अस्तित्वात आल्या. आदिवासीवर प्रगतीकडून होणाऱ्या अन्यायातून बाहेर काढण्याच्या दृष्टीने पुढे आल्या. स्वातंत्र्या आधी व स्वातंत्र्योतर काळातही या चळवळी कार्यरत असल्याचे दिसते. आदिवासीचे प्रश्न समजून देऊन त्यांना योग्य त्या गोष्टींची पूर्तता करणे चांगले जीवनमान प्राप्त करुन देणे हा त्यामागील उद्देश होता.

थोडक्यात, चळवळी पारंपारिक असो ना नवीन त्या प्रामुख्याने समाजात निर्माण होणाऱ्या अवास्तवी परिस्थितीमुळे अस्तित्वात येत गेल्याचे दिसून येते.

३.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

१) सुरांगणा २) यवतमाळ ३) कब्री

४) राजपूर ५) मिझो युनियन ६) महसूलबंद आणि जमीन बळकाव

७) किसान सभेची ८) अंबरसिंग सुरतकांनी ९) भुमुक्ती

१०) 'कुर्गातील धर्म आणि समाज ११) राजपुत १२) भूमिज क्षेत्रिय मंडळ

१३) श्रत्रियांच्या १४) मंजीश १५) भगत

१६) 'उरॉव धर्म' आणि कुरूखधर्मांचे १७) पुनर्स्थापनावादी १८) मोपला

१९) बिरसा मुण्डा २०) संथालांचा २१) उमाजी नाईक

२२) ब्रिटीशांच्या २३) चंपारण २४) खेडा

२५) मोपल्यांचे २६) मूळशी पेट्याचा २७) बार्डाली

२८) अखिल भारतीय किसान सभा २९) साराबंदीची ३०) किसान सभेने

३१) तेभाग ३२) किसान, तेभाग ३३) तेलगंणा

३४) संथाल ३५) जमीन बळकाव ३६) शेतकरी कामगार

३७) दाभाडी प्रबंध ३८) किसान पक्ष, लालनिशाण ३९) भूमिसेना

४०) शरद जोशी ४१) चाकण ४२) शरद जोशी

४३) कापूस आंदोलन ४४) नारायण मेघाजी लोखंडे ४५) बॉम्बे मिल हॅण्ह असोसिएशन

४६) रौलट ४७) अनुसया साराभाई ४८) एन.एम.जोशी

४९) आयटक ५०) किमान वेतन, कामगार भविष्य निर्वाह निधीचा.

३.६ सरावासाठी स्वाध्याय :

१. सामाजिक चळवळीची व्याख्या सांगा.

२. आदिवासी चळवळींची थोडक्यात चर्चा करा.

३. आदिवासींच्या राजकीय स्वायत्ततेच्या चळवळी विशद करा.

४. आदिवासींच्या शेती आधारित चळवळींची माहिती द्या.

५. आदिवासी जमातींच्या संस्कृतीकरणाच्या चळवळी स्पष्ट करा.

६. भारतातील शेतकऱ्यांच्या चळवळ सांगा.

७. स्वातंत्र्यूपर्व काळामध्ये शेतकऱ्यांच्या कोणत्या चळवळी निर्माण झाल्या.

८. स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकऱ्यांच्या चळवळींची माहिती द्या.

९. महाराष्ट्रातील डावेपक्ष आणि शेतकरी संघटनांच्या चळवळींची चर्चा करा.

१०. शेतकरी संघटनांच्या चळवळींची चर्चा करा.

११. कामगारांच्या चळवळींची माहिती द्या.

१२. स्वातंत्र्यपूर्व काळात कोणत्या कामगार संघटनांच्या चळवळी उदयाला आल्या.

१३. स्वातंत्र्योत्तर काळातील कामगार संघटनांच्या चळवळींची चर्चा करा.

१४. कामगार संघटनाचे प्रकार सांगा.

१५. कामगारांचे प्रश्न आणि कामगार संघटनेचे कार्य यासंबंधी चर्चा करा.

१६. १९ व्या शतकाच्या प्रारंभकाळात कोणत्या शेतकरी चळवळी घडून आल्या.

१७. १९ व्या शतकाच्या अखेरीस आणि २० व्या शतकाच्या प्रारंभी कोणत्या शेतकरी चळवळी निर्माण झाल्या.

१८. महाराष्ट्रातील आदिवासींच्या स्वायत्त प्रदेशासाठीच्या चळवळी विशद करा.

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

1. Singh K.S. : Tribal Movements in India.
2. Pascual Gisberts : Fundamentals of Indistrial Sociology
3. R.N. Sharma : Indian Society Topic : 'Medival Social Reform Movements'
4. C.N. Shankarrao : Sociology of Indian Society Topic : 'Social Movements in India.#

५. डॉ. राजेंद्रकुमार शर्मा : औद्योगिक समाजशास्त्र

६. टी.के.ओमन अनुवाद संगीता फाटक : भारतीय समाजातील समस्या व वाद प्रकरण 'उत्तरपूर्व भारतातील सरकार व तेथील सामाजिक चळवळी'

७. गोदावरी परूळेकर : जेव्हा माणूस जागा होतो.

८. डॉ. एस.जी. देवगांवकर, डॉ. शैलजा देवगावकर, डॉ. जयमाला डुमरे : सामाजिक चळवळी परंपरा आणि नवीन, प्रकरण : 'पारंपारिक चळवळी'

९. प्रा. पी.के. कुलकर्णी : उद्योगाचे समाजशास्त्र, प्रकरण 'कामगार संघटना'

१०. घनश्याम शहा, अनुवादक प्राची चिकटे : भारतातील सामाजिक चळवळी प्रकरण : 'जमातींच्या चळवळी.'

११. गुरूनाथ नाडगोंडे : सामाजिक आंदोलने, प्रकरण : 'आदिवासींचा अस्तित्त्व लढा'

१२. डॉ. गोविंद गारे: आदिवासी विकासाचे शिल्पकार, प्रकरण : 'वारली लढ्याच्या सेनापती- गोदावरी परूळेकर'

१३. डॉ. गोविंद गारे : स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी क्रांतीकारक, प्रकरण : 'सरकार जमीनदार आणि सावकारांविरूद्ध वारल्यांच्या अस्तित्त्वाचा लढा.'

❑❑❑

घटक – ४

भारतातील नवीन सामाजिक चळवळी

(New Social Movement in India)

घटक संरचना :

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय-विवेचन

४.२.१ दलित चळवळ

४.२.२ महिलांची (स्त्रियांची) चळवळ

४.२.३ पर्यावरण चळवळ

४.२.४ शेतकरी चळवळ

४.३ सारांश

४.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सरावासाठी स्वाध्याय

४.६ क्षेत्रीय कार्य

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

४.० उद्दिष्टे : (Objective)

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणाला भारतातील नवीन सामाजिक चळवळीच्या प्रकाराबद्दल –

- स्त्रियांच्या चळवळीची निर्मिती, कारणे, स्थिती स्पष्ट करता येईल.
- दलित चळवळीची निर्मिती, प्रकार, स्थिती याविषयक माहिती मिळेल.
- पर्यावरण चळवळ निर्मितीमागची कारणे, प्रकार, परिस्थिती हे अभ्यासता येईल.
- या चळवळींमुळे समाजात काय परिवर्तन घडले. या चळवळीं कशा पूरक ठरल्या हे अभ्यासता येईल.

४.१ प्रस्तावना : (Introduction)

या घटकाद्वारे आपणास भारतातील सामाजिक नवीन उदयास आलेल्या चळवळी अभ्यासायला मिळणार आहेत. आंतरराष्ट्रीय महिला दशकामुळे महिलांच्या चळवळी कशा निर्माण झाल्या व पुढे त्या विस्तारित होत गेल्या याची माहिती मिळणार आहे. तर दलित चळवळींचा उदय केंव्हा व कसा झाला. महात्मा गांधीनी याबाबत काय म्हटले याविषयकची माहिती यात मिळणार आहे. तसेच पर्यावरणात्मक चळवळ ही तशी नवीन व अलिकडे उदयास आलेली चळवळ आहे. ती कशी निर्माण झाली, का निर्माण झाली, याविषयकची माहिती आपण या प्रकरणात अभ्यासणार आहोत.

इंग्रज सरकारने १७६५ नंतर ईस्ट इंडिया कंपनीचे उत्पन्न वाढविण्यासाठी जमीन महसूलविषयक धोरणात बदल करून प्रायोगिक तत्त्वावर सुरुवातीला बंगाल प्रांतात जमीनदारी पद्धती सुरू केली. यामुळे शेतकऱ्यांचे मालकी हक्क नष्ट झाले व त्यांना कुळाने रहावे लागले. इंग्रजांनी शेतसारा दुप्पटीने वसूल केल्याने शेतकरी दारिद्र्यात पिचत पडले.

ब्रिटिशांनी कालांतराने जमीनदारी पद्धती बंद करून रयतवारी पद्धती सुरू केली. यामुळे शेतकरी पुन्हा मालक झाला. परंतु शेतकऱ्याने शेतसारा प्रत्यक्ष येऊन सरकारकडे भरायचा. जर का तो भरला नाही तर मालकी हक्क राहणार नाही. ३० वर्षानंतर शेतसारा वाढविला तोही शेतकऱ्यांना न परवडणारा केला. त्यामुळे शेतकऱ्याला सावकाराकडून कर्ज घ्यावे लागत असे. कर्जाची परतफेड न झाल्याने सावकारच शेताचे मालक व्हायला लागले. व शेतकऱ्यांची मालकीची शेती सावकार व जमिनदार यांच्या घश्यात जायला लागली. यामुळेच शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात चळवळी उभ्या राहिल्या.

भारतीय शेतकरी हा कर्जातच जन्मतो, कर्जातच वाढतो आणि कर्जातच मरतो असे म्हटले जाते. ते एकादृष्टीने खरेही आहे. भारतात नेहमी पडणारे दुष्काळ तसेच लहरी पाऊस यामुळे पाण्यावर अवलंबून असणारा शेतकरी चरितार्थासाठी शेती पिकविण्यासाठी वारंवार अडचणीत येतो. कर्जबाजारी होतो. दारिद्र्यात पिचत पडतो. चक्रव्यूहात अडकतो. सावकारी पाश वाढत गेल्याने शेतकरी आत्महत्त्येकडे वळतो. या सगळ्या अडचणींची पार्श्वभूमी पाहिली की ब्रिटीश काळात शेतकऱ्यांचा असंतोष वाढून उठाव झाले. वैयक्तीक सूडापोटी हिंसक हल्ले झाले. संथाळांचे बंड, तेलंगणातील लढा, खेडा सत्याग्रह, भोपळ्याचे बंड, साताऱ्याचे बंड असे अनेक उठाव, बंड, सत्याग्रह शेतकऱ्यांनी केले.

स्वातंत्र्योत्तर काळात या चळवळीला अधिक बळ भरले. खुद्द महाराष्ट्रातही शेतकऱ्यांच्या चळवळी उभ्या राहिल्या.

४.२ विषय विवेचन : (Presentation of subject matter)

या घटकामध्ये नवनवीन सामाजिक चळवळी भारतात कशा निर्माण झाल्या. त्या कोणत्या कालावधीत निर्माण झाल्या. त्यांचे प्रवर्तक कोण आहेत. त्या चळवळीमागचा हेतू कोणता होता. त्यामुळे समाजाला त्याचा काही फायदा झाला का व त्यामुळे समाजात कोणते परिवर्तन झाले. हे अभ्यासण्यासाठी व त्याची

सविस्तर माहिती यातून मिळणार आहे. यासाठी या घटकाची विभागणी तीन विभागात केली आहे. ती म्हणजे –

अ) दलित चळवळ

ब) महिलांची चळवळ

क) पर्यावरण चळवळ

ड) शेतकरी चळवळ

४.२.१ दलित चळवळ :

अनुसूचित जातींना पूर्वी 'हरिजन' असा शब्द प्रयोग वापरला होता. हा शब्द काही लोकांना मानहानीकारक वाटला. त्याऐवजी त्यांना दलित म्हटलेले त्यांना आवडे कारण दलित म्हणजे दडपलेले असा अर्थ संबोधित केला आहे. कायद्याने जरी आता अस्पृश्य हा शब्द प्रयोग व अस्पृश्यता पाळली जात नसली तरी व्यवहारात कित्येक जणांना हा कलंक सहन करावा लागतो.

भारतीय लोकसंख्येच्या एकूण १६% इतकी लोकसंख्या अनुसूचित जातींची आहे. २००१ साली त्यांची संख्या १६८० लाख एवढी होती. त्यापैकी ३६% लोक कामगार/मजूर आहेत. हलक्या दर्जाचे काम करावे लागते. अनुसूचित जातीचे लोक देशभर विखुरलेले आहेत.

महाराष्ट्रातील महारांची चळवळ संपूर्ण भारताच्या पातळीवर अमंलात आणली गेली. अर्थातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जातीने महार होते आणि संपूर्ण भारताचे पुढारी होते. बिटीशांबरोबर आणि जातिवंत हिंदूबरोबर बोलणी करताना ते पूर्ण देशभराच्या दलितांचे प्रतिनिधित्व करीत. भारतातील अस्पृश्यताविरोधी चळवळी आणि दलित स्वातंत्र्याच्या चळवळींची एक सामान्य रूपरेषा गेल ओमवेत्त आणि भारत पाटणकर आणि घनश्याम शाहू यांच्या दोन शोधनिबंधांवरून येते. वसाहतकालीन आणि वसाहतकालानंतरचे दलित चळवळीचे वादाचे मुख्य विषय हे अस्पृश्यतेच्या प्रश्नांशी संबंधित आहेत. राष्ट्रीय पातळीवर, दलित चळवळीचे विश्लेषण करण्याचे प्रयत्न न झाल्यामुळे चळवळीचे प्रकार कोणते ते ठरविण्याचे प्रयत्न झाले नाहीत.[१]

राष्ट्रीय पातळीवर दलित चलवळीचे विश्लेषण करण्याचे प्रयत्न न झाल्यामुळे चळवळींचे प्रकार कोणते ते ठरविण्याचे प्रयत्न झाले नाहीत. घनश्याम शाह यांनी त्यांचे सुधारणात्मक आणि पर्यायात्मक चळवळी असे दोन प्रकार केले आहेत. पहिल्या प्रकारची चळवळ अस्पृश्यतेचा प्रश्न सोडविण्यासाठी जातिव्यवस्था सुधारण्याचा प्रयत्न करते. दुसऱ्या धर्मात प्रवेश करून किंवा शिक्षण मिळवून आर्थिक प्रतिष्ठा आणि राजकीय ताकद वाढवून पर्यायी सामाजिक, सांस्कृतिक ढाचा निर्माण करण्याचा पर्यायी चळवळ प्रयत्न करते. आपापली ध्येये गाठण्यासाठी दोन्ही प्रकारच्या चळवळी राजकीय मार्ग अवलंबतात, सुधारणावादी चळवळीचे अजून दोन प्रकार केले आहेत.

१) भक्ती चळवळ २) नव वेदान्तिक चळवळ ३) संस्कृतकरण चळवळ पर्यायवादी चळवळीचे १) धर्मांतर चळवळ २) धार्मिक किंवा निधर्मी चळवळ, दलितांच्या आदर्शवाद आणि त्यांचे व्यक्तीमत्व

यांच्या संदर्भात दलित चळवळीचे १) सांस्कृतिक मतैक्यातील चळवळी २)स्पर्धात्मक आदर्शवाद आणि अ-हिंदू व्यक्तीमत्व ३) बौद्ध दलित ४) प्रति आदर्शवाद आणि दलित आदर्शवाद १९९० साली निवडणूकीतील वाढलेला राजकीय सहभाग आणि उत्तर प्रदेशातील बहुजन समाजपार्टीला मिळालेले थोडेफार यश यामुळे काही अभ्यासकांचे म्हणणे आहे की लढ्यासाठी एकत्र येणे ही दलितांची नवी राजकीय चळवळ आहे.[२]

१९२० मध्ये या चळवळीला सुरूवात झाली. ह्या चळवळीचा मुख्य रोख असा होता की अस्पृश्यांची एक स्वतंत्र गट स्थापन व्हावा. १९३० पर्यंत ह्या चळवळीने स्वत:चा चांगलाच ठसा उमटविला. उत्तर भारतामध्ये सलामीपंथाचे अनेक अनुयायी आढळून येतात. समानतेच्या शोधासाठी दलितांनी धार्मिक-सामाजिक सुधारणेची चळवळ केली. २० व्या शतकात अस्पृश्यांपैकी काहींनी त्यांचे पारंपरिक धंदे सोडून देऊन किंवा चालू ठेवून आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला आणि जातिव्यवस्थेच्या वरच्या स्तरावर जाण्यासाठी धडपड केली. त्यांनी संस्कृत कल्पना आणि कर्मकांड यांची कास धरला. योग्य प्रकाचऱ्या पौराणिक कथा शोधून काढून त्यांनी स्वत:चा सामाजिक उच्च स्तराचा हक्क मागण्याचा प्रयत्न योग्य असल्याचा वादा केला. परंपरेने लादलेली कमतरता दूर करण्यासाठी केलेल्या प्रयत्नात सर्व अस्पृश्य जातींना यश आलेले नाही. तामिळनाडू मधील शानर किंवा नाडर यांनी मात्र अस्पृश्यतेची मर्यादा ओलांडली आहे. केरळमधील ईरावा यांनीपण अस्पृश्यतेच्या मर्यादा कमी केल्या.

महाराष्ट्रात १९२० साली अस्पृश्यताविरोधी फार मोठी चळवळ उभारण्यात आली व ती चळवळ आजपर्यंत सुरू आहे. ह्या चळवळीची मुळं जरी महाराष्ट्रात रोवली गेली तरी ती देशाच्या इतर भागांमध्ये पसरली आणि तिला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यांचे पुढारी म्हणून उदयास आले. १९२० च्या दरम्यान महाराष्ट्रातील अस्पृश्यते विरोधी महारांनी एक अयशस्वी चळवल उभी केली. कामगार वर्गाच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला. नंतर डॉ. आंबेडकर यांनी १९५४ मध्ये शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच (एस.सी.एफ.) स्थापना केली. अनुसूचित जाती, जमाती आणि मागास जाती यांना आपल्यामध्ये सामावून घेऊन पक्षाचा पाया भरभक्कम करण्यासाठी १९५६ साली एस.सी.एफ. चे रिपब्लिकन पार्टीमध्ये रूपांतर करण्यात आले.

१९७० च्या सुरूवातील महाराष्ट्रातील दलितांनी दलित पँथर चळवळ सुरू केली. सुरूवातील महाराष्ट्राच्या शहरी भागात ही चळवळ पसरली. नंतर ही चळवळ गुजरात, कर्नाटक, आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश आणि इतर राज्यांमध्ये पसरली.

दलित व्यक्तीमत्वाचा ठसा उमटविणे हा दलित चळवळीचा सर्वात महत्वाचा आणि मध्यवर्ती विचार झाला आहे. आंबेडकरशिवाय अजून काही अखिल भारतीय पातळीवरचे हरिजन नेते होते. बहुजन समाजपार्टीचे नेते कांशीराम यांनी या चळवळीबाबत काम केले. दलित चळवळींनी सत्ताधारी वर्गावर यशस्वीरित्या चांगलाच दबाव आणला. १९५६ मध्ये काका कालेलकर कमिशननी भारत सरकारने नेमलेले त्यांनी सुमारे ३००० जाती-जमातींची बाकी मागासवर्गीय असे वर्गीकरण केले. १९८० मध्ये मंडळ कमिशनने लोकसंख्येच्या ५२% लोकसंख्या हिंदू नसलेल्याचा पण अंतर्भाव केला होता व मदर बॅकवर्ड क्लास म्हणून

संबोधले. स्वातंत्र्योत्तर काळातील चळवल ही राजकीय निवडणूकांपुरतीच मर्यादित राहिली. दबावतंत्राचा अवलंब करून नोकरीमध्ये राखीव जागा आणि शैक्षणिक सोयी मिळवून देणारा गट असे त्यांचे कार्य झाले.[३]

या दलित चळवळीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यानंतर प्रकाश आंबेडकर, काशीराम, मायावती बसप या लोकांनी प्रयत्न केले व ही एक स्वतंत्र आणि एकसंघ चळवळ ठेवण्याचा प्रयत्न केला. पुढे वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या दबावासाठी ही संघटना विस्कळीत होत गेली. पण ही संघटना एकसंघ राहणे गरजेचे आहे.

संदर्भ :

१. शहा घनश्याम : भारतातील सामाजिक चळवळी, २००४, पान नं. ९५ ते ९८ डायमंड पब्लिकेशन, पुणे.

३. शहा घनश्याम : भारतातील सामाजिक चळवळी, २००४, पान नं.१०० ते १०३ डायमंड पब्लिकेशन, पुणे.

३. शहा घनश्याम : भारतातील सामाजिक चळवळी, २००४, पान नं. १०७ ते ११२ ते ११३ डायमंड पब्लिकेशन, पुणे.

भारतात पूर्वीपासून जी वर्णव्यवस्था अस्तित्वात होती त्यामध्ये ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण अस्तित्वात होते. त्यानुसार समाजात त्यांची दिनचर्या चालू होती. त्यापैकी शुद्र हा सर्वात शेवटचा वर्णव्यवस्थेतील असल्याने त्याला उरलेले तिन्ही वर्णव्यवस्थेतील लोक तुच्छ मानीत. त्यांनी कोणी शुद्र तर कोणी अस्पृश्य अशा पद्धतीची शब्द प्रयोग करण्याची वृत्ती होती. परंतु महात्मा गांधीना असे शब्द कधी आवडत नव्हते. इ.स. १९३३ मध्ये महात्मा गांधीनी अस्पृश्यासाठी 'हरिजन' हा शब्द वापरला, परंतु अस्पृश्यांच्या नेत्यांना तो शब्द भावला नाही. त्यांनी म्हटले जे दडपलेले ते 'दलित' असा शब्दप्रयोग करा.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात महात्मा फुले यांनी या प्रथा-परंपराविरूद्ध आपल्या लेखनीतून आवाज उठविला. इंग्रजांच्या कालखंडातही अस्पृश्यता पालनावर बंदी आणली. अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले. दलितासाठी पहिला संघर्ष करणारे गोपाळ बुवा वलंगणकर यांनी आपले कार्य पुढे चालू ठेवण्यासाठी शिवराम जानबा कांबळे यांच्यावर सोपविले. त्यांनी दलितांची पहिली परिषद भरविली. १९२० च्या दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत व हितकारिणी सभा स्थापन करून बंडाचे निशाण उभारले. महात्मा फुलेचेही कार्य याबाबत मोठे होते. १९४२ मध्ये नागपूरमध्ये 'अखिल भारतीय अनुसूचित जाती फेडरेशन' ची स्थापना केली व त्याचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर झाले याचेच रूपांतर पुढे 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' असे झाले.

इ.स. १८८० ते १९२० च्या दरम्यान अस्पृश्यात शिक्षणाचा प्रसार झाला. त्यामुळे त्यांच्यात जागृती झाली. १९१७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वत:चे शिक्षण घेऊन भारतात आले. १९२० मध्ये 'मूकनायक' हे वृत्तपत्र सुरू केले. तसेच कोल्हापूर नजीक असणारे मानगांव याठिकाणी अस्पृश्यांची परिषद भरविली. या परिषदेला छत्रपती राजर्षी शाहू महाराज हजर होते. व त्या परिषदेमध्ये आपले मनोगतही व्यक्त

केले. विठ्ठल रामजी शिंदे यांनी नागपूर येथे जी अखिल भारतीय अस्पृश्य परिषद भरविली होती त्यात असे मत व्यक्त केले की डिप्रेस्डक्लास मिशनने कायदे मंडळावर अस्पृश्यांचे प्रतिनिधीची निवड कायदे मंडळातील सदस्यांमार्फत केली जावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

महाराष्ट्रात देखील ज्या अनेक चळवली झाल्या त्यामध्ये मंदीरप्रवेश ही चळवळ मोठी होती. १९३० मध्ये नाशिक येथे काळाराम मंदीरात प्रवेश, १९२५ च्या अमरावती येथील प्रवेश हे विशेष उल्लेखनीय असून हजारोंच्या संख्यने मंदीर प्रवेश केला. त्यावेळी चळवळीला प्रतिचळवळ देखील झाली. दगडफेक झाली, लोक जखमी झाले, पण चळवळ न रोखता ती यशस्वी केली व मंदीर प्रवेश हा केलाच. अशाच प्रकारे महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह देखील हजारोंच्या संख्येने केला गेला.

महाडचे चवदार तळे सत्याग्रह :

हा सत्याग्रह डॉ. बाबासो आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शकानुसार केला गेला. यासाठी १९ व २० मार्च १९२७ रोजी कुलाबा जिल्ह्यात एक अधिवेशन घेण्यात आले. या अधिवेशनात अनंत चित्रे यांनी महाडचे चवदार तळे व त्यातील पाणी प्राशन करण्यासाठी समुदायाने जावे असे सुचविले त्यांच्या या सूचनेचा सर्व समुदाय व अध्यक्ष यांनी विचार केला व त्यानुसार महाडचे चवदार तळे याठिकाणी लोक गेले. लोकांच्या समुदायाला सवर्ण हिंदूकडून विरोध होत होता. हल्ला प्रतिहल्ला झाला तरी डॉ. बाबासो आंबेडकर यांनी उत्तर दिले होते की ''चवदार तळ्याचे पाणी पिण्याकरिता आम्ही आलो आहोत असा समज होऊ देऊ नका. इतरांप्रमाणे आम्ही माणसे आहोत हे सिद्ध करण्यासाठी आम्हांस जावयाचे आहे.'' यांनी या विचारानेच महाडचा सत्याग्रह बाबासो आंबेडकरांनी यशस्वी करून दाखविला.

या संदर्भात महात्मा गांधीनी इ.स. १९३२ मध्ये 'All India Untouchability Lig' (ऑल इंडिया ॲन्टी-अनटचे बिलीटी लीग) ही संस्था स्थापन केली. पुढे तिचे नांव 'Servent of Untouchable Society' (सर्व्हंटस ऑफ अनटचेबल सोसायटी) असे करण्यात आले. त्यांच्या या सभेत काही ठराव केले ते म्हणजे अस्पृश्यत पालनाविरोधी मोहीम आखणे. सार्वजनिक विहिरी, धर्मशाळा, रस्ते, सार्वजनिक नळ, मंदीरे, पाणवडे, शाळा व स्मशानभूमी इ. सर्वांना खुळे करणे. इ.स. १९२१ मध्ये महार वतन नाहीसे केले. पुढे १८ जुलै १९४२ रोजी डॉ. आंबेडकरांनी 'Scheduled Caste Federation' (शेडयुल्ड कास्ट फेडरेशन) ची स्थापना केली. त्याचे अध्यक्ष मद्रासचे एन. शिवराज होते. नागपूर येथे दोन दिवसाचे अधिवेशन घेण्यात आले. डॉ. बाबासो आंबेडकरांच्या निधनानंतर शेड्यूलड कास्ट फेडरेशन बरखास्त करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया असे नांव देण्यात आले. इ.स. १९७० मध्ये महाराष्ट्रात दलित पँथर ही चळवळ सुरू झाली. या चळवळीत दलित शेतकऱ्यांच्या जमिनींने प्रश्न हाती घेतले. भूमिहीन शेतकऱ्यांनी जमिन कशी देता येईल याचा विचार केला. सर्व दलितांना रोजगार हमी, बेकारांना बेकार भत्ता, मोफत शिक्षण, स्वस्त धान्य यासारख्या सुविधा मिळाल्या पाहिजेत याची मागणी करण्यात आली.

पुढे दलित पँथर आणि भटक्या विमुक्तांच्या चळवळीचे काम बाबा आढाव यांच्याकडे आले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ही चळवळ झपाट्याने पसरत असताना काही ठिकाणी विरोधही झाले. या कालखंडात ज्या चळवळी झाल्या त्या विद्यापीठ नामांतर, मंडळ आयोग यासारख्या महत्वपूर्ण गोष्टींवर त्यांनी आपल्या

चळवळीचे लक्ष वेधले. अशा पद्धतीने दलित चळवळीचा प्रवास होऊन त्यात यशस्वीता संपादन करण्याचे कार्य या थोर मंडळींनी केले.

स्वयंअध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

ब) रिकाम्या जागा भरा.

१) भारतात जातीव्यवस्थेत ..... अस्तित्वात होती.

२) महात्मा गांधींनी अस्पृश्यांना ..... यांनी संबोधले होते.

३) नाशिक येथील ..... मंदिरात सामुदायिक प्रवेश केला.

४) महाडचे चवदार तळे येथे पाणी ग्रहण कार्यक्रम ..... साली झाला.

५) महाराष्ट्रात दलित पँथर ही चळवळ ..... साली सुरू झाली.

४.२.२ महिलांची (स्त्रियांची) चळवळ : (Women's Movement)

स्त्रीपुरूष हा भेद निसर्गाने निर्माण केला आहे. दोघांमधील ही भिन्नता मान्य करूनही किंवा त्यामुळे का होईना, स्त्री ही मानव आहे आणि सजीव प्राण्यांमध्ये अगदी अग्रस्थानी आहे हे मान्य करावे लागते. मानव म्हणून स्त्री आणि पुरूष ह्यांच्यात विभिन्नतेपेक्षा अधिक प्रमाणात साम्य आहे ही वस्तुस्थिती पुष्कळ वेळा नजरेआड केली जाते. आपण पुरूषांपेक्षा वेगळे आहोत हे स्त्रियांवर फार मोठे दडपण होते. स्त्री पुरूषातील भेदांमुळे व भिन्न कार्यामुळे जो वागणूकीत फरक आढळतो त्यासंबधी पाश्चात्य देशांत थोडेबहुत संशोधन झाले आहे.

स्त्रीपुरूषांच्या कार्यात स्त्रीपुरूषत्व भेदामुळे आजवर जो फरक केला जात होता तो प्रतिकूल परिस्थितीला तोंड देण्याकरता होय. जो फरक अजूनही औद्योगिक प्रगत राष्ट्रांत आढळतो.

अमेरिकन स्त्रीस्वातंत्र्याच्या पुढारी मिसेस हिल्डे म्हणतात की जोपर्यंत पुरूषांच्या हाती राष्ट्राची राज्यसूत्रे आहेत तोपर्यंत कोणतेही राज्य आपला लष्करी दृष्टिकोन सोडणार नाही.[१]

१९ व्या शतकात सामाजिक सुधारणांविषयक चळवळी जोर धरत होत्या. २० व्या शतकात स्वातंत्र्य लढ्याची जोड त्यांना मिळाली. त्या दोन लढ्यांचा परिणाम म्हणून स्त्रियांच्या प्रश्नांवर समस्यांवर देशभर विचार व कृती होत होत्या. महाराष्ट्रात महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. अनेक थोर नेत्यांनी स्त्री मुक्ती चळवळीची मूहर्तमेढ रोवली. राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीत ओढल्या गेलेल्या स्त्रियांची मूळ प्रेरणा ही राष्ट्र प्रेमाची असली, तरी या अनुभवातून त्यांची रचना बद्दलची व स्त्रियांच्या प्रश्नांसंदर्भांतील जाणीवही जागृत झाली. त्यातील अनेक स्त्रिया आजही स्त्री-मुक्ती चळवळीत व स्त्री-मुक्ती आंदोलन संपर्क समितीत सक्रिय आहेत आणि बदलत्या स्त्री-मुक्ती चळवळीला त्यांच्या कामाचा अनुभवाचा फार मोठा आधार आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात साधारण १९५० च्या सुमारास डाव्या विचारसरणीच्या पक्षांनी आपल्या महिला आघाड्यांतर्फे स्त्रियांचे प्रश्न हाती घेण्यास सुरूवात केली. नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या हक्कांसंदर्भात त्यांनी अनेक आंदोलने छेडली. १९६९ ते १९७५ ह्या काळात महागाई ने सर्वानाच ग्रासले. त्या काळात महागाई विरोधात लढण्यासाठी मुंबईतील डाव्या पक्षाच्या मार्क्सवादी कम्युनिस्ट, भारतीय कम्युनिस्ट, समाजवादी इ. च्या नेतृत्वाखाली महिला आघाडी स्थापन झाली. मध्यमवर्गीय महिलामंडळे, कामगार स्त्रियां, नोकरदार, महिला ह्या सर्वांना सामावून घेणारे एक फार मोठे आंदोलन उभे राहिले. १९७५ च्या आणीबाणीत ह्या आंदोलनातील सर्व प्रमुख स्त्रीने त्या मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर, तारा रेड्डी, मंजू गांधी, प्रमिला दंडवते इ. सर्वांना अटक करण्यात आली.

१९७० च्या काळात धुळे जिल्ह्यातील आदिवासी पट्टपातील स्त्रिया अंबरसिंग महाराजांच्या नेतृत्वाखाली संघटित होऊन स्त्रियांच्या प्रश्नांवर लढा देत होत्या. मुंबई-पुण्यातील काही मार्क्सवादी विचाराच्या स्त्री कार्यकर्त्या ह्या लढ्यात सक्रिय सहभागी होत होत्या. १९७३ साली आदिवासी स्त्रियांची एक मोठी परिषद शहादा तालुक्यात भरली. त्यात सहभागी झालेल्या डाव्या विचारांच्या स्त्री कार्यक्रर्त्यांना राज्यव्याप्ती परिषद घ्यावी असे तीव्रतेने वाटू लागले व १९७५ हे वर्ष स्त्री-मुक्ती वर्ष म्हणून जाहीर केले.[२]

स्त्रियांच्या चळवळीचे वर्गीकरण :

वेगवेगळ्या अभ्यासकांनी स्त्रियांच्या चळवळीचे वर्गीकरण आपआपल्या तात्विक दृष्टीकोनातून केलेले आहे. नीरा देसाई म्हणतात, स्त्रियांची चळवळ म्हणजे समानता आणि स्वातंत्र्य हे समान ध्येय मिळविण्यासाठी केलेला संघटित प्रयत्न आणि स्त्रियांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्याा निर्णायक बाबींविषयी संवेदनशीलता त्यामध्ये गृहीत धरलेली असते. आदर्शवादी नमुन्याच्या आधारावर गेल ओमवेद (१९७८) ह्यांनी स्त्रियांच्या चळवळीचे दोन प्रकार सांगितले. १) स्त्रियांच्या समानतेच्या चळवळी २) स्त्रियांच्या मुक्तीच्या चळवळी.

एव्हरेट यांनी १९७९ मध्ये स्त्रीत्वाच्या दोन वेगवेगळ्या आदर्शवादावर आधारित वर्गीकरण केले आहे. १) स्त्रिया म्हणून राजकारणामध्ये आपला विशेष ठसा उमटवू शकतात. असा दावा करणारी सामुदायिक स्त्रीत्वाची चळवळ. २) स्त्रिया या पुरूषांच्या बरोबरीने असल्यामुळे पुरूषांना मिळालेले हक्क स्त्रियांच्या चळवळीचे वर्गीकरण करतात.

सध्याच्या समाजात असलेली स्त्रियांची असमान पातळी आणि त्यांना जुलमापासून मुक्त करण्याच्या त्यांच्या कार्यपद्धतीप्रमाणे त्यांनी केलेले प्रकार - १) सौम्य किंवा स्त्रियांच्या हक्कांची परिस्थिती. २) अस्सल स्त्रीत्व ३) सामाजिक स्त्रीत्व (१९८४).

संगरी आणि वैद स्त्रियांच्या चळवळीचे दोन तात्विक प्रकार १) स्त्रियांना ताब्यात ठेवणाऱ्या पितृसत्ताक पद्धतीचे आधुनिकीकरण २) घरी आणि कामाच्या ठिकाणी लिंगाधारित नात्यांचे लोकशाहीकरण.

भारतातील स्त्रियांच्या चळवळीचे कालाप्रमाणे सुद्धा प्रकार पडतात. कुमार, चौधरी, गांधी आणि शाहू यांनी सांगितलेले प्रकार

१) स्वातंत्र्याच्या चळवळीच्या वेळची सामाजिक सुधारणेची चळवळ.

२) १९४७ ते १९७५ या काळातील चळवळी.

३) आंतरराष्ट्रीय स्त्री दशकाच्या दरम्यान आणि नंतर निर्माण झालेल्या चळवळी.[३]

आंतरराष्ट्रीय महिला दशकामध्ये म्हणजे १९७५ ते १९८५ या काळात महिलांच्या चळवळीला एक वेगळी दिशा मिळाली. त्यामुळे स्त्रियांचा समाजातील दर्जा उंचावला. लिंगभेदानुसार दिली जाणारी असमानतेची वागणूक याबाबत इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्चने अभ्यास केला. तर विद्यापीठ अनुदान मंडळाने देखील लिंगभेदावर आधारित अभ्यासक्रमांना अग्रक्रम दिला. तर अनेक विद्यापीठांत स्त्री-अभ्यासकेंद्रे स्थापन केली.

ऋग्वेद काळापासून स्त्रीचा कालखंड पाहता त्याच काळापासून स्त्रीच्या बंडखोरीला सुरूवात झाली. याच कालखंडात स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार प्राप्त झाला. पण हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्याच स्त्रियांचा त्या शिक्षण प्रक्रियेत समावेश होता. या काळात मुलीचा विवाह विवाह करताना कन्यादान करून दिले जाई. स्त्रीचे संरक्षण ही पुरूषांची जबाबदारी म्हणून पाहिले जाई. वैदिक काळापासून ते १९ व्या शतकाच्या काळापर्यंत या कालखंडात महिलानी जी अपार दु:खे भोगली, ज्या अनिष्ट प्रथा-परंपरांनी स्त्रियांना जखडून टाकले होते. त्यामुळे अपार दु:खे भोगूनही त्यातून काही कर्तबगार महिला तयार झाल्या. व त्यांच्या कर्तबगारीनेच स्त्रियांची चळवळ निर्माण झाली. इ.स. ८ व्या ते ९ व्या शतकापर्यंतच्या कालखंडात कर्तबगार महिलांचा नामोल्लेख झालेला आहे. परंतु सर्वसामान्य स्त्रियांच्या जीवनात अंध:कार निर्माण झाला होता व मूठभर असणाऱ्या स्त्रिया या उच्च वर्णीय व श्रीमंत कुटूंबातील होत्या. या कालखंडात बालविवाह, सतीची चाल, हुंडापद्धती, केशवपन यासारख्या दुष्ट प्रवृत्ती अस्तित्वात होत्या. त्यात अनेक महिलांचा बळी दिला जात होता. पुनर्विवाहाला बंदी असल्याने स्त्रियां घरात डाबल्या जात होत्या. अशा स्त्रियांच्या समस्यांबाबत समाजसुधारकांनी जे प्रयत्न केले त्यामुळे स्त्री वर्गाची या समस्येतून सुटका झाली.

स्त्रीला स्वातंत्र्य मिळणे गरजेचे होते. त्यासाठीच ही एवढी चळवळ उभी केली गेली. स्त्रीच्या वाट्याला आलेली पराधिनता किंवा परावलंबीत्व हे तिच्या अंगवळणी पडले होतो. रामायण, महाभारत काळातील काही अपवादात्मक कर्तृत्ववान स्त्रियांचा उल्लेख केल्याचे आढळत असले, तरी सामान्य स्त्रियांची पिछेहाटच होत होती. अल्पकालीन विवाह, शिक्षणावर बंदी, बळजबरी विवाह अशा अनिष्ट प्रथांना त्या बळी पडत असल्याने त्यांची सुटका होणे गरजेचे होते. स्त्रीचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल एवढेच मर्यादित होते. रांधा वाढा उष्टी काढा हे तिच्या नशिबी असल्याचे चित्र बदलण्यासाठी स्त्रियांना स्वातंत्र्य मिळण्याची गरज होती. त्यासाठीच ही चळवळ उभी राहिल्याचे आढळते.

स्त्री सुधारणावादी काळ :

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात अनेक समाजसुधारकांच्या प्रयत्नांनी स्त्रियांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम केले. स्त्रियांवर होणारे अन्याय व लादली जाणारी बंधने काढून टाकण्यासाठी बंडाचे निशाण रोवणारे महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, कर्वे, न्यायमूर्ती रानडे, लोकहितवादी, पंडिता रमाबाई यासारख्या समाजसुधारकांनी हिरिरिने भाग घेतला आणि स्त्रीच्या मानेवरची जोखाडे काढून टाकली.

स्त्रीच्या शिक्षणाने काही सुधारणा होईल यादृष्टिने महात्मा फुले यांनी मुलींसाठी पुण्याला पहिली शाळा काढली. आपल्या पत्नीला म्हणजे सावित्रीबाईस स्त्रीशिक्षिका म्हणून नेमले. स्त्रियांच्या उन्नतीसाठी झगडणाऱ्या स्त्रिया निर्माण झाल्या. मग त्या रमाबाई रानडे असतील की आनंदीबाई जोशी असतील. १९३२ च्या सुमारास अनेक संघटना राष्ट्रीय पातळीवर स्थापन झाल्या. १९२७ मध्ये जी महिलांची परिषद झाली त्यात स्त्रियांचे शिक्षण, कायदे, मतदानाचा अधिकार, देवदासीची चाल अशा समस्यांना वाचा फोडणारी ही संघटना होती. त्यामुळे १९ व्या शतकाच्या काळात स्त्री मुक्तीचा पाया समाजसुधारकांनी घातला असला तरी सर्व महिलांना एकत्र करून त्यांच्यापर्यंत संदेश पोहचविण्याचे काम महात्मा गांधीनी केले. त्यांच्या १९३२ च्या सविनय कायदेभंाच्या लढ्यात हजारो स्त्रियांनी सहभाग घेतला होता. प्रचंड संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या. तसेच १९४२ च्या लढ्यातही महिला सहभागी झाल्या होत्या. स्त्रीमुक्ती चळवळीची ही पहिली पायरी होती व त्यात अनेक पुरूषांचे सहकार्य लाभले होते.

पुण्यामध्ये महिला समाजाची स्थापना पंडिता रमाबाईनी केली, तर ११ मार्च १८८९ मध्ये शारदा सदन मुंबईला निर्माण झाले, स्त्रियांच्या सामाजिक कार्यात आनंदीबाई जोशी, काशीबाई कानिटकर, पंडिता रमाबाई तर रमाबाई रानडे या महिलांनी आघाडी घेतली होती. कर्वे यांनी महिला विद्यापीठाची स्थापना १९१६ मध्ये केली. स्त्रियांच्यातील निरक्षरता घालविण्यासाठी फुले दापत्यांनी मोठे शैक्षणिक कार्य केले.

स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री चळवळ :

स्त्रियांनी स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी एकत्र येऊन केलेले प्रयत्न म्हणजे स्त्री चळवळ होय. वैदिक काळापासून स्त्रियांना आपल्या हक्कांसाठी चळवळ ही करावीच लागली. १९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केले. इ.स. १९८० ते १९९० च्या कालखंडात लिंगभेदावर अभ्यास केला गेला. स्त्रियांवर जे काही लिखाण झाले त्यात महिलांचे आर्थिक, सामाजिक, राजकीय स्थितीबाबत जो काही लढा दिला गेला हे दर्शविले आहे. त्यालाच चळवळ असे म्हटले आहे. स्त्रियांनी दारूच्या दुकानांविरूद्ध चळवळ उभा करून शासनामार्फत दारूबंदी केली. या चळवळीत त्यांना यश आले. जेंव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांच्या चळवळीमध्ये स्त्रियांचा सहभाग घेतला तेंव्हा तो मोठ्या प्रमाणात होता. महाडच्या चवदार तळ्यातील पाणी चाखण्यासाठी देखील महिलांचा सहभाग होता. तर नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश करतानाही महिलांचा सहभाग होता. अशा पद्धतीने महिलांनी एकजुट करून आपली चळवळ वाढविण्याचा प्रयत्न केला. अन्यायाविरूद्ध आवाज उठविला, स्वत:चे अस्तित्व दाखवून देऊन स्वत:ची क्षमता दाखवून दिली. शिक्षणाबरोबरच आर्थिक स्वातंत्र्य मिळावे, व्यक्तीमत्व विकासास संधी मिळावी व स्त्रीला सक्षम होता यावे यासाठी ही स्त्रीमुक्ती चळवळ निर्माण केली. स्त्री-पुरूष समानता हे तत्व कायद्याने मान्य केले. याचाच परिणाम म्हणून १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून जाहीर झाले.

१९८० मध्ये नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठाने निरंतर शिक्षण योजनेअंतर्गत महिलांची परिषद भरविली व त्यात अत्याचार, अन्यायाविरूद्ध आवाज उठविला. १९८१ ला महिला आयोग स्थापन झाले एकूणच स्त्री सक्षमीकरणाचे उद्दिष्ट समोर ठेवूनच या चळवळी उभारल्या गेल्या.

१९७५ ला मेक्सिको येथे पहिली महिला परिषद तर दुसरी कोयन हेगन येथे झाली. त्यात असंख्य महिलांचा सहभाग वाढला. त्यामुळे त्यांच्या प्रश्नांची चर्चा झाली. समान वेतन, समान संधी यावर ही चर्चा झाली. १९८५ ला तिसरी महिला परिषद नैरोबी येथे झाली. १९९४ ला महिला धोरण ठरले. या सर्व ठिकाणी महिलांना रोजगार, मालकी हक्क, राजकीय सहभाग इ. ची चर्चा झाली. तर इ.स. २००१ हे वर्ष सुधारित महिला धोरण जाहीर झाले. यामध्ये महिलांचे संरक्षण, ग्रामसभा, स्वयंसाहाय्यता गट, महिला सक्षमीकरण यासारखी मोठी उद्दिष्ट्ये गाठण्याचा प्रयत्न केला. यासाठी सर्व जाती, धर्म, पंथ वंशातील स्त्रिया एकत्र आल्या व अनिष्ट प्रथा-परंपरांना विरोध करून स्वत:चे स्वातंत्र्य मिळविले.

महिला चळवळीचे फायदे :

१. अन्यायाविरूद्ध आवाज उठविता आला.

२. स्त्री साक्षरता दर वाढला.

३. आठ मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून देशभर साजरा होतो.

४. महिला ग्रामसभेची संकल्पना महिला धोरणात मांडली.

५. मुलामुलीचे लग्नाचे वय वाढवून वय वर्ष मुलाचे २१ व मुलीचे १८ करण्यात आले.

६. बालविवाह रोखण्यात यश आले.

७. १९६१ हुंडा प्रतिबंधक कायदा करण्यात आला.

८. ४९८ अ सारख्या कायद्याची तरतूद होऊन हुंडाबळी रोखता आला.

९. कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा २००५ चा अस्तित्वात आला.

१०. परित्पक्त्या स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फुटली

११. ७३ व्या ७४ व्या घटना दुरूस्तीने महिलांना जिल्हा परिषद व नगरपालिका, ग्रामपंचायत या ठिकाणी महिलांना ३३% आरक्षण मिळाले.

१२. मुलगा-मुलगी एक समान मानून गर्भजल परीक्षेवर बंदी आणली.

स्वयंअध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

अ) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. आंतरराष्ट्रीय महिला दशकाचे साल कोणते?

२. स्त्रियांना शिकविण्यासाठी कोणत्या महिलेने पुढाकार घेतला?

३. आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून केंव्हा घोषित झाले?

४. महिला आयोगाची स्थापना केंव्हा झाली?

५. कोणत्या घटना दुरूस्तीने महिलांना ३३% आरक्षण मिळाले?

४.२.३ पर्यावरण चळवळ (Environmental Movement)

बहुतेक वेळ ज्या लोकांचे जीवनमान जंगल आणि त्यावरच्या साधनांवर आधारलेले असते. त्यांच्या संघर्षालाच पर्यावरण चळवळ म्हणून संबोधले जाते. जंगलांशी संबंधित चळवळींना आदिवासींची चळवळ म्हणूनच संबोधले गेले आहे. याबाबतीत गुहा आणि गाडगीळ यांनी आपली निरीक्षणे पुढीलप्रमाणे नोंदविली आहेत.

''ब्रिटीश काळातल्या भारतातील शेतीवादाचा मुख्य भर हा जमिनीबाबतचा आणि शेतमालाच्या वाटपाबाबत होता. त्यातून नैसर्गिक समतोलाचा, मासेमारी, चराऊ कुरण, जल व्यवस्थापन आणि या विषयासंदर्भातली राज्य सरकारची भूमिका यामुळे प्रश्न निर्माण झाले.'' (१९८९ :१४२)

बावीस्कर यांनी मध्यप्रदेशातले आदिवासी आणि राज्य सरकार पुरस्कृत विकासाला त्यांचा असलेला विरोध हा केंद्रबिंदू मानून अभ्यास केला. आदिवासीच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचेही विश्लेषण केले आहे. आणि विकासाला असलेला विरोधही तपासून बघितला आहे. तसेच चिपको आंदोलन व नर्मदा आंदोलनाबाबतही बावीस्कर यांनी अभ्यास केला आहे. हिमालयातील नैसर्गिक बदल आणि शेतमजुरांची विरोधी भूमिका या मुद्यांचा अधिक व्यापक तुलनात्मक दृष्टीने अभ्यास केला आहे.[१]

१९३० मध्ये जंगलवासियांनी जंगलातले अतिक्रमण या मुद्यावरून फॉरेस्ट डिपार्टमेंटबरोबर सत्याग्रह केला होता. अगदी याच पद्धतीने स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळातही संघर्ष होत गेला. शेतकरी किंवा जंगलवासियांनी जंगलतोड करणाऱ्यांना, जंगल भ्रष्ट करणाऱ्यांना विरोध केल्याच्या आणखीही बऱ्याच घटना आहेत. अशासारख्या घटनामधून जंगलवासीय आणि वनसंरक्षक खात्यामधील तणाव स्पष्ट होतो.[२]

आधुनिकतेसाठी विज्ञानाचा आधार घेऊन शास्त्रीय पद्धतीने वनीकरण करणाऱ्यांना विज्ञानाचा समाजहितासाठी उपयोग करू इच्छिणाऱ्या, गरिबांसाठी कार्यरत असणाऱ्या कृतिगटांकडून नेहमीच आव्हान दिले जात असते. पर्यावरणवादी चळवळीची व्याख्या केली ती अशी की 'नैसर्गिक स्त्रोतांचा अधिक दीर्घकाळ वापर करण्यासाठी, निसर्गाची अवनती रोखण्यासाठी आणि नैसर्गिक स्त्रोतांचे पुनरूज्जीवनीकरण करण्यासाठी केलेली सामुदायिक सामाजिक कृती होय.'' (१९८९:४५५) पाश्चिमात्य देशांमध्ये नैसर्गिक स्त्रोतांचा अधिकाधिक आणि उपयुक्ततेसाठी वापर करणे आणि शक्य तेवढे त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या कृतीला पर्यावरणवादी चळवळ म्हणून संबोधले जाते. जयंता बंडोपाध्याय आणि वदंना शिवा (१९८८) यांच्या मते स्वतंत्र भारतातील पर्यावरणवादी चळवळी ही बाजारीकरणाच्या दबावामुळे वाढणाऱ्या नैसर्गिक स्त्रोतांच्या शोषणाच्या विरोधातच अधिक वाढली आहे. निसर्गाचे शोषण करणाऱ्यांच्या अशा कृतीमुळे गरीब आणि निर्बलांचे जीवनच धोक्यात आले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार 'भारतातील पर्यावरणवादी चळवळ म्हणजे नैसर्गिक स्त्रोतांचे अर्थकारण आणि बाजारीकरणावर आधारित विकासतंत्राला विरोध करण्याच्या प्रयत्नांची अभिव्यक्ती आहे.' (शिवा १९८६, सेठी १९९३)[३]

हर्ष सेठी 'पर्यावरणविषयक संघर्षाची' पाच वर्गामध्ये विभागणी करतात.

१) जंगलविषयक – वनधोरण, वनांमधील स्त्रोतांचा वापर करण्यासंदर्भात

२) जमीनविषयक – औद्योगिकीकरण आणि शेतजमिनीच्या हानीच्या संदर्भात वाढती लोकसंख्या, रासायनिक खतांच्या वापरामुळे होणारी जमिनीची हानी, पाण्याच्या अति वापरामुळे जमिनीची नापीकता.

३) मोठ्या धरणांच्या विरोधात – अशा मोठ्या धरणांच्या बांधकामापूर्वी नदीपात्रातल्या ग्रामीण आणि वनवासी निवासी लोकांचे विस्थापन, जंगलतोड आदीमुळे होणारे पर्यावरणाचे नुकसान.

४) औद्योगिकरणामुळे होणारे प्रदूषणाच्या विरोधात ५ सागरी स्त्रोतांच्या अतिरिक्त वापराच्या विरोधात अंधारिया आणि सेनगुप्ता (१९९८) यांनी सध्याची पर्यावरणवादी चळवळीची पाच गटांमध्ये वर्गवारी केली आहे.[४]

पर्यावरण चळवळ ही मानवाने पर्यावरणविरोधी केलेल्या वर्तनामुळे करावी लागणारी बाब झाली. कारण पर्यावरणाचे समतोल बिघडल्याने प्रदूषण निर्माण होते व मानवी जीवनावर विघातक परिणाम दिसून येऊ लागले. यासाठी मानवाने एकत्र येऊन इ.स. १९७२ साली स्टॉकहोम येथे पर्यावरणावर आधारित परिषद भरली. यामध्ये पर्यावरण वाचविणे, त्याचे जतन करणे पर्यावरणाची हानी होऊ नये यादृष्टिने विचार करणे व ती टिकविण्यासाठीची उपाययोजना करणे, यादृष्टिने विचारविनियम झाले. ही चळवळ अमेरिकेतील हरितक्रांतीमुळे इ.स. १९८० मध्ये जगभर पसरली.

पर्यावरण म्हटले की हवा, पाणी, जंगल व सागर संपत्ती याचा वापर विवेकपूर्वक करणे आहे. या संपत्तीची वाढ करणे व तिचे जतन करणे हे महत्वाचे शहरी भागात असणारे मोठमोठाले कारखाने, उद्योगधंदे, वाहने, यामुळे होणारे प्रदूषण हे सर्व प्रकारचे आढळते. पाण्यात मिसळणाऱ्या रासायनिक द्रव पदार्थ, कारखान्यांचे धूर, वाहनांचे कर्कश आवाज यामुळे होणारे जल, वायू व ध्वनी प्रदूषण होते. मानवाने याकडे दुर्लक्ष केले तर त्यात वाढ होते. व आरोग्याला ते घातक ठरते व मानवी जीवनावर विघातक असे परिणाम होतात. ओझन वायूची कमतरता भासू लागली आहे. सूर्याची उष्णता वाढली आहे. त्यामुळे सूर्यकिरणांची मानवी जीवनावर विघातक परिणाम होऊ लागली आहे.

मानवाने चालविलेली जंगलतोड, पाणी अडवून मोठेमोठाली धरणे बांधणे, दळणवळणासाठी वाहतूक साधने वाढली असून धूर सोडत जातात. चैनीच्या गोष्टीकडे लक्ष लागले आहे व त्यानुसार त्याचा वापर केला जातो. प्लॅस्टिक पिशव्या कचरा याचा दुरूपयोग होत असल्याने व पाण्यात बऱ्याच गोष्टी विसर्जित होत असल्याने पर्यावरणाचे संतुलन बिघडते आणि प्रदूषण होते.

आदिवासींच्या भागात तर मोठ मोठाली जंगले असून त्या जंगलसंपत्तीवर जगणारे व जंगलाची देखभाल करणारे आदिवासी स्वत:च्या जीवन जगण्यासाठी आवश्यक तेवढीच वृक्षतोड करीत. पण पेपर मीलचे मालक वारेमाप आणि अवैद्य मार्गाने जंगलतोड करीत असल्याचे दिसून येते. त्यामुळे आदिवासींचे जीवन विस्कळीत व असुरक्षित होते. त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणी मोठाली धरणे बांधली जातात. त्यामुळे त्यांचे जनजीवनही उद्धवस्त होते. हे सर्व स्थिती पाहून सुंदरलाल बहुगुणा, बाबा आमटे व मेधा पाटकर यांनी पुढाकार घेऊन आंदोलने केल. त्यापैकी काही म्हणजे चिपको आंदोलन, टेहरी बांध आंदोलने, नर्मदा बचाव आंदोलन ही महत्वाची आंदोलने झाली.

चिपको आंदोलनामुळे वैज्ञानिक दृष्टीकोनातून जंगलांचे महत्व कळले. सुंदरलाला बहुगुणा यांच्या नेतृत्वाखाली हजारो आदिवासी या आंदोलनात सहभागी झाले. आदिवासी महिलांनी जंगलतोड करायला आलेल्या ठेकेदारांना आम्हांला कापा आधी व नंतर वृक्षाला कापा असे म्हणून झाडाला चिकटून बसल्या. म्हणून तर याला चिपको आंदोलन असे म्हटले आहे.

भारत सरकारने कृषी विकासासाठी मोठ मोठाली धरणे बांधली. उदा : भाकरा-नांगल, हिराकुंड, कोयना धरण, नर्मदा सरोवर. या धरणांच्या बांधकामातून शेतीला पाणीपुरवठा होईल व त्याचा फायदा होईल असे सांगितले. पण प्रत्यक्षात मात्र यामुळे गावची गाव बुडणार होती. तेथील लोक विस्थापित होणार होते म्हणून अनेक सामाजिक कार्यकर्ते यांनी आंदोलने करून आदिवासी व विस्थापित यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये मेधा पाटकर असतील बाबा आमटे यासारखे नेतृत्व होते.

नर्मदा सरदार सरोवर याला पर्यावरणवाद्यांनी विरोध केला. सरकारला त्यांच्या सूचना मान्य कराव्या लागल्या व विस्थापिततांना नुकसान भरपाई द्यावी लागली.

अशी ही आंदोलने भोपालपदृणम, ईचमपल्ली महाराष्ट्रातील, आंध्र, मध्यप्रदेश याठिकाणीची जंगलसंपत्ती नष्ट करणारी धरणे याविरोधी आंदोलने केली गेली.

याबरोबरच वायू प्रदूषण देखील होत असल्याचे आढळते, भोपाळला झालेली विषारी वायूची गळती त्यामुळे झालेल्या प्रदूषणात हजारो लोक मृत झाले. काहींना अपंगत्व आले भोपाळसारखेच पंढरपूर जवळ दाऊ कंपनीचा गॅस प्रकल्प याला वारकरी संप्रदायातील लोकांनी विरोध केला. एन्रॉनसारखे प्रकल्प यालाही विरोध झाला.

तसेच ध्वनी-प्रदूषणामुळेही लोकांना त्रास होतो. गणेशोत्सव, दुर्गादेवी, धार्मिक स्थळे याठिकाणचे स्पीकर हे १०० डेसिबल्सपेक्षा जास्त आवाज देऊन ध्वनी प्रदूषण करतात. त्यामुळे बरीच माणसे बहिरी होतात. तर आजारी, बाळंत झालेल्या स्त्रियांना त्याचा त्रास होतो. लहान बाळांना त्रास होतो, दिवाळीतील फटाके, लग्नातील बँडबाजा यामुळे ही आवाजाचे प्रदूषण होते तर कर्णकर्कश आवाजाची वाहने यामुळे वायू व ध्वनी प्रदूषण होते.

या सर्वाविरोधी माणसाने आंदोलन करून पर्यावरण टिकविण्याचा प्रयत्न केला आहे. हजारो झाडे लावून शुद्ध हवा मिळविण्याचा केवील प्रयत्न चालू आहे. पण पर्यावरण वादींची संख्या वाढती असून हजारोंच्या संख्येने हे यशस्वी आंदोलन चालू आहे.

स्वयंअध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

क) योग्य त्या पर्यायाची निवड करा.

१) पर्यावरणाचा समतोल बिघडला की ..... निर्माण होते.

अ) हवामान ब) प्रदूषण क) पर्यावरण ड) वातावरण

२) इ.स. १९७२ साली ..... येथे पर्यावरणावर आधारित परिषद भरली.

अ) स्टॉकहोम ब) बिर्जींग क) श्रीलंका ड) आशिया

३) सुंदरलाल बहुगुणा यांच्या मार्गदर्शनाखाली ..... आंदोलन झाले.

अ) नर्मदा ब) टहेरी क) चिपको ड) दाऊ

४) मेधा पाटकर यांनी ..... धरण बांधकामाला विरोध केला.

अ) भाक्रा ब) हिराकुंड क) कोयना ड) नर्मदा

५) ..... वायू गळतीने प्रदूषण झाले.

अ) भोपाळ ब) आंध्र क) कर्नाटक ड) गोवा

४.२.४ शेतकरी चळवळ

स्वातंत्र्यपूर्वकाळातील शेतकऱ्यांची चळवळ

१९ व्या शतकाच्या प्रारंभी काही शेतकरी चळवळी उदयाला आल्या त्या पुढीलप्रमाणे-

१) पुनर्स्थापनावादी चळवळ : १७६५ ते १८५७ या काळात अनेक उठाव झाले. ब्रिटीश सरकारची हकालपट्टी करून शेती व्यवहार पुनर्स्थापित करण्यात आली. उठावामध्ये हिंदू-मुस्लीम, छोटे रजवाडे, पूर्वीचे मोगल्याच्या राजवटीतील महसूल अधिकारी, आदिवासींचे नायक, दक्षिण भारतातील जमीन मालकी असणारे लष्करी अधिकारी या चळवळीत सामील झाले होते. यावेळी जवळ-जवळ २९ उठाव झाले. त्यातील काही महत्त्वाचे उठाव पुढीलप्रमाणे-

१) १७७८ ते १७८१ मधील अवधच्या हिंदू व मुस्लीम जमीनदारांचा आणि राजा चैत सिंगाचा उठाव.

२) १८०१ ते १८०५ मधील उत्तर अर्काटच्या तिनवेल्ली भागातील पाळेगाव व त्यांच्या शेतकऱ्यांचा उठाव.

३) १७९६ ते १८०५ मधील पळशी राजाच्या नेतृत्वाखाली हजारो गनिमी सैनिकांच्या मलबारमधील उठाव.

४) श्रावणकोर व कोचीन मधील श्रावणकोर संस्थानच्या वेळु थंपी या प्रधानाने ३०,००० सशस्त्र सैन्यांसह केलेला उठाव.

५) १८५५-५६ मधील संथाल आदिवासींनी केलेला उठाव.

६) १८५७-५८ चा सैनिकांचा उठाव.

हे सर्व उठाव ब्रिटीशपूर्व राजवट पुनःप्रस्थापित व्हावी यासाठी केले.

२) धार्मिक चळवळी : या चळवळींचा अभ्यास स्टीफन फुक्स यांनी केला. त्यांच्या मते हिंदू व मुस्लीम यांच्यात अशा चळवळी होतात. त्यामुळे समाजरचना बदलून जाते. अशा घडलेल्या चळवळी काही पुढीलप्रमाणे–

१) मोपला शेतकऱ्यांची केरळमधील कुलांची चळवळ : १८३० ते १८५०

२) गुजरातमधील जोरिया भगत या हिंदू धार्मिक नेतृत्वाखालची नाइकदा चळवळ : १८६७ ते १८७०

३) मुंडा आदिवासी जमातीची चळवळ : १८९०

४) पंचमहाल भागातील भिल्लांची चळवळ : १९०० ते १९२२

३) सामूहिक उठाव : ब्रिटीश धोरणामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर अनिष्ट परिणाम झाला. यामुळे शेतकऱ्यांची आधिकाधिक पिळवणूक होऊ लागली. म्हणून शेतकऱ्यांनी सामुहिकरित्या उठाव केला. त्यामधील काही उठाव पुढीलप्रमाणे–

१) १७८९ मधील विष्णूपूर व बिरभूममधील शेतकरी व दरोडेखोरांचे उठाव.

२) १८०१ मधील हरयाणातील जाट शेतकऱ्यांचे बंड

३) १८५० मधील खानदेशातील शेतकऱ्यांचे बंड

४) १९२१ मधील केरळमधील मोपळ्यांचे बंड

५) १८७० मधील बंगालमधील संथालांचा उठाव

६) १८७५ मधील दख्खनचे दंगे

४) महाराष्ट्रातील उठाव : ब्रिटीश राजवट आली आणि पेशवांचे राज्य गेले. आदिवासी राजांची राज्ये ब्रिटीशविरुद्ध सशस्त्र उठाव करीत होते. त्यापैकी काही उठाव पुढीलप्रमाणे–

कोळ्यांचा व रामोशांचा उठाव, भिल्लांचा उठाव, १८५७ चा उठाव.

असे उठाव करून शेतकऱ्यांचे होणारे शोषण थांबविण्याचा प्रयत्न सुरू होता.

महात्मा गांधीनी भारतातील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यासाठी चळवळी, सत्याग्रह उभारले, लढे उभा केले.

१) बिहारमध्ये चंपारण्य सत्याग्रह उभारला. शेतमजूर, शेतकऱ्यांची अमानुष पद्धतीने करून घेतली जाणारी मजूरी, राबवणूक इ. संबंधी हा उठाव केला.

२) खेडा सत्याग्रह हा खेडा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ब्रिटिश सरकारविरुद्ध केला. महसूल आकारणी रद्द करावी अशी मागणी केली.

३) भोपळ्याचे बंड मलबार येथे १९२१ ला झाले. जमीनदारी खंडामध्ये केलेली वाढ व मुस्लीम शेतमजूर कुलांना हुसकावून लावणे या संदर्भात हे बंड केले.

४) **साताऱ्याचे बंड :** साताऱ्यात सत्यशोधक समाजाच्या प्रभावाने प्रेरित होऊन शेतकरी वर्गात ब्राह्मण व मारवाडी जमीन मालकांविरुद्ध आंदोलने केली. शेताच्या मशागतीचे काम करण्यावर बहिष्कार टाकला. अशा पद्धती बंड करण्याचा प्रयत्न केला व त्यासाठी सांगली जिल्ह्यातील वाळवा, तासगांव येथील शेतकरी तसेच कराड व कोपरगाव येथील पण लोकांची मदत घेतली.

५) **मुलशीपेट्याचा सत्याग्रह :** पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील मुळशी पेट्यातील निळाव मुळा नद्यांच्या संगमावर वीजनिर्मितीसाठी धरण उभारण्याची योजना टाटा वीज कंपनीने योजली होती. पण यामुळे ५४ गावांतील जमिनी बुडणार होत्या १० ते १५ हजार रहिवाशांच्या अनेक समस्या उद्‌भवणार होत्या. मावळ्यांनी टाटा कंपनी रेल्वे कंपन्याचे मालक, इंग्रज भांडवलदार व कंपनी रेल्वे कंपन्याचे मालक, इंग्रज भांडवलदार व राज्यकर्ते यांना प्रचंड विरोध करण्याचे ठरविले. सावकारी पाशात अडकलेले शेतकरी जमिनी पाण्याखाली गेल्यात तर कर्जातच राहणार. त्याकाळात शेतकऱ्यांचे प्रश्न तीव्र होते त्यामुळे लोक लांबून-लांबून एकत्र येऊन काम बंद पाडण्यास भाग पाडू लागले. तरीही दंडेलशाही काही शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेतल्या. त्यामुळे ते भूमीहीन निर्धन व भूमिहीन झाले.

६) **बार्डोली सत्याग्रह :** महात्मा गांधीनी सुरत जिल्ह्यात युवक अनुसूचित जाती-जमातींना एकत्र करून चरखा, दारूबंदी इ. कार्यक्रम सुरू केले. लढ्यात सहभागी झालेल्या ऐक्याला खेडूत असे म्हटले गेले. सरकारने दडपशाहीचे धोरण अवलंबून सत्याग्रह मोडीत काढण्याचा प्रयत्न केला पण फारसे यश त्यांना लाभले नाही.

७) **साराबंदी चळवळ :** ही चळवळ उत्तर प्रदेशात १९२९ मध्ये निर्माण झाली. जागतिक मंदीचा फटका शेतकऱ्यांना बसला. पं. जवाहरलाल नेहरूंनी शेतकऱ्यांना संघटित करून १९३० च्या सुमारास साराबंदी चळवळ सुरू केली. यावेळी जमीनदार व खंडकरी यांच्यात संघर्ष निर्माण झाले.

८) **जंगल सत्याग्रह :** सरकारने जंगल कायद्यात शेतकऱ्यांना वेगवेगळ्या मार्गांनी दंड आकारणे व जंगल संपत्तीवरील अधिकार काढून घेण्याच्या तरतूदी केल्या. यासंदर्भात नाशिक, नगर, सातारा जिल्ह्यातून लोकांना एकत्र करून गुरे चारण्याचे शुल्क कमी करावे जंगली जनावरांपासून संरक्षण करावे यासाठी शस्त्रे वापरण्याची संधी मिळावी. वाळलेली लाकडे, पालापाचोळा मोफत द्यावे. अशा विविध मागण्या करून आंदोलने केली.

९) **किसान सभेचे कार्य :** शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी डाव्या गटांनी एकत्र येऊन १९३६ मध्ये 'अखिल भारतीय किसान' स्थापन केली. आंध्रमधील किसान सभेचे नेतृत्व प्रा. एन. जी. रंगा यांनी केले. त्यांना मध्यम व श्रीमंत शेतकऱ्यांचे प्रश्न हाताळले. १९३६ मध्ये अखिल भारतीय किसान सभेचे दुसरे अधिवेशन महाराष्ट्रात फैजपूर या ठिकाणी भरले. या अधिवेशनात शेतसारा, वेठबिगारी व ग्रामीण कर्ज या विषयांच्या मागण्या मांडण्यात आल्या.

याबरोबरच १९४५ मध्ये किसान सभेने ठाणे जिल्ह्यातील वारली आदिवासींची चळवळ केली व त्यात वेठबिगारी नष्ट करणे, शेतमजुरी वाढवून घेणे, वारल्यांवर होणारे अत्याचार थांबविणे या समस्यासाठी गोदावरी परूळेकर यांच्या नेतृत्वाखाली चळवळ उभी केली.

तेभागा आंदोलनही बंगालमध्ये सुरू केले. वाहतुकीच्या सुविधा उपलब्ध केल्यास शेतकऱ्यांना आर्थिक व्यवहार करणे सोपे होईल. यासाठी व यासारख्या अनेक मागण्यांसाठी तेभागा आंदोलन झाले.

या सर्व शेतकरी चळवळींचा भाग स्वातंत्र्यपूर्व स्थितीतील आहे. तर स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकरी चळवळी झाल्याचेही दिसून येते.

स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकरी चळवळी : स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शेतीविषयकच्या धोरणात बदल झाल्याचे दिसून आले. शेतकऱ्यांचे असणारे अनेक प्रश्न शेतजमीनीचे प्रश्न, मालाला भाव न मिळणे, शेतमजूराना मिळणारे वेतन यासारख्या अनेक समस्यांना वाचा फोडण्यासाठी शेतकरी चळवळी उभ्या राहिल्या. त्यापैकी काही चळवळी पुढीलप्रमाणे–

१) तेलंगणातील शेतकरी उठाव : तेलंगणा हा भाग हैद्राबाद संस्थानचा म्हणजे तत्कालीन निजामाचा भाग. सरंजामशाही पद्धतीमुळे शेतकऱ्यांचे प्रश्न, त्यांच्यावरी अत्याचार, सावकाराकडून होणारे छळवाद, वेठबिगारी, खंडणी इ. मुळे शेतकरी हैराण होई. त्यातून निर्माण होणारा शेतकऱ्यांचा असंतोष यासाठीच १९४८ ते १९५१ या कालखंडात उभी केलेली चळवळ व त्यातून झालेली फूटाफूट गरीब–श्रीमंत शेतकरी अशी झाली व स्वतःच्या हक्कांसाठी गरिबांनी ही लढाई उभा केली.

२) शेतकऱ्यांची आंदोलने : स्वातंत्र्य मिळाले आणि काँग्रेसला सत्ता स्थापन करण्याची संधी मिळाली पण शेतकऱ्यांच्या तीव्र प्रश्नांमुळे शेतकऱ्यांची आंदोलने सुरू झाली. त्यांच्या या आंदोलनांना सुरुवातीला पाहिजे तेवढ्या मोठ्या प्रमाणात यश प्राप्त झाले नाही. गरीब–श्रीमंत अशी दरी निर्माण झाली. यातूनच काही शेतकऱ्यांनी आपल्या न्याय मागण्यासाठी जोर धरला.

३) महाराष्ट्रातील १९७० नंतरच्या शेतकरी चळवळी : महाराष्ट्र हा पुरोगामी महाराष्ट्र शेतकरी संघटनांनी शेतकऱ्यांच्या संदर्भातील विषयांनुसार अनेक चळवळी केल्या ते विषय म्हणजे –

१) शेतमजूरांना किमान वेतन मिळावे.

२) दुष्काळी भागात दुष्काळी कामे सुरू करून लोकांना रोजगार द्यावा.

३) जमीन सुधारणा कुळांना जमिनीची मालकी मिळाली.

४) बेरोजगारांसाठी शासनामार्फत रोजगारहमी योजना सुरू करावी.

५) शेतमजूरांना सुट्ट्या मिळाव्यात व कामाचे तास नियंत्रित करून द्यावेत.

६) सावकारी पाशाचा विळखा आदिवासी व शेतमजूरांना बसतो त्याला वेळीच आवर घातला पाहिजे.

७) वेठबिगारी नष्ट व्हावी.

८) शेतमालाला रास्त भाव मिळावा.

इतर बाबी :

डाव्या पक्षांनी आंदोलने केली. ही आंदोलने १९७० मध्ये झाली. ५०,००० गरीब शेतकरी, शेतमजूर यांनी यात सहभाग नोंदविला. १९७२ च्या भीषण दुष्काळात हाताला काम व पोटाला भाकरी मिळावी म्हणून आंदोलने केली.

यासाठी काही राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्यानी सहभाग नोंदविला. त्यापैकी दत्ता देशमुख, केशवराव जेधे हे होते. १९५१ मध्ये दत्ता देशमुख यांनी किसान पक्ष स्थापन केला. १९६५ पासून या पक्षाला लालनिशाण पक्ष नांव दिले.

१९७० मध्ये धुळे जिल्ह्यातील आदिवासींनी शहादा तालुक्यात श्रमीक संघटनेची चळवळ उभी केली. आदिवासींच्या बळकावलेल्या जमिनी त्यामुळे आलेले दारिद्र्य याविरोधात ही श्रमिक संघटना उभी राहिली.

१९७० मध्ये ठाणे जिल्ह्यातील पाळघर तालुक्यातील भूमिसेना संघटना तयार केली. सावकाराविरोधात ही संघटना काम करते. व या संघटनेमार्फत सावकार व श्रीमंत शेतकऱ्यांविरुद्ध शेतमजूर व गरीब शेतकऱ्यांना संघटित करून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.

शेतकरी संघटनेच्या चळवळी : शेतकरी संघटनांनी आपल्या वेगवेगळ्या समस्यांवर चर्चा करून अनेक शेतकरी एकत्र आणून मोठी चळवळ उभा केली. या चळवळीला राजकीय मंडळींचे वरदहस्त लाभल्याने शेतकऱ्यांची चळवळ ही राजकीय शक्ती बनली. शरद जोशीनी ही संघटना १९७८ साली पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात उभी करण्यासाठीचे प्रयत्न सुरू केले. यामध्ये शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा, शेतमजूरांना योग्य ती मजुरी मिळावी. यासाठी वेळोवेळी आंदोलने करण्यात आली. त्यातील काही महत्त्वपूर्ण आंदोलने पुढीलप्रमाणे–

१) कांदा आंदोलन : शेतकऱ्याचा कांदा जेव्हा शेतात तयार होत असतो तेंव्हा कांद्याचे भाव गगनाला भिडलेले असतात. आणि जेंव्हा कांदा बाजारात विक्रीला येतो तेंव्हा कांद्याचे भाव ढासळलेले असतात. असे सातत्याने घडत असल्याने कांदा उत्पादनातून शेतकरी स्वतःच्या आर्थिक गरजा देखील पूर्ण करू शकत नाही. केवढे कष्ट करून मेहनत वाया गेली. यामुळे नाराज होतो. हे पाहूनच शेतकरी संघटनांनी कांद्याचे भाव वाढवून द्यावेत म्हणून १९८० ला शेतकऱ्यांनी आंदोलन सुरू केले. तसेच १ मार्च १९८० रोजी चाकण येथे पुणे–नाशिक महामार्गावर सत्याग्रह सुरू केला. अखेर शासनाने नाफेड मार्फत सहकारी खरेदी विक्री संस्थेमार्फत कांदा खरेदीचा प्रकल्प सुरू केला व आंदोलन समाप्त झाले.

ऊस आंदोलन : ऊसाला योग्य भाव मिळावा म्हणून शेतकरी संघटनेने वारंवार आंदोलने केली. ऊसाला भाव प्रतिटन ३००/– रु. मिळावा यासाठी आंदोलने झाली, साखर कारखान्यांना गळतीच्या हंगामात ऊस न देण्याचा ठराव करण्यात आला. सरकारने ज्या पद्धतीने पाऊले उचलली व शेतकऱ्यांनी ती जाचक ठरली यामुळे शेतकऱ्यांनी रास्तारोको आंदोलन केले. ही आंदोलने विशेषतः नाशिक, धुळे, नगर या जिल्ह्यात

झाली. तर खेरवाडी येथे 'रेलरोको' आंदोलन झाले. १० नोव्हेंबर १९८० रोजी शेतकऱ्यांना व त्यांचे नेते शरद जोशी यांना अटक झाली. शरद जोशींनी तुरुंगात उपोषण केले. २० नोव्हेंबर १९८० रोजी विदर्भातील कापूस शेतकऱ्यांनी एक दिवसाचे 'चक्का जाम' आंदोलन झाले. १९८० नंतरही अनेक आंदोलने झाली. शरद जोशींच्या नेतृत्वाखाली ऊसाचे भाव, कांद्याचे भाव व कापसाचे भाव यासाठी आंदोलने झाली व पुढे तर ही शेतकरी चळवळ राजकीय चळवळ झाली.

तंबाखू आंदोलन : शेती करताना वेगवेगळ्या प्रकारचे पीक घेतले जाते तसे तंबाखूचे पीक घेणारा शेतकरी वर्ग देखील आहे. अशा शेतकऱ्यांचे व्यापाऱ्यांकडून शोषण केले जाते. त्यांच्या तंबाखूला योग्य भाव मिळावा यासाठी शेतकरी संघटनेने सरकारला निवेदन सादर केले. परंतु सरकारने या मागणीकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे शरद जोशींच्या मार्गदर्शनाखाली ५० हजार शेतकऱ्यांनी १४ मार्च १९८१ रोजी पुणे-बेंगलोर हायवेवर रस्तारोको केले. कर्नाटक सरकारने हे आंदोलन मोडीत काढण्यासाठी चळवळीच्या नेत्यांना व त्यांच्या अनुयांयाना अटक केली. आंदोलकावर अश्रूधूर, लाठीमार करण्यात आला. काही शेतकरी गोळीबारात मरण पावले. तरी शेतकऱ्यांनी आपले आंदोलन न थांबवता सुरूच ठेवले. त्यामुळे सरकारने तंबाखूची खरेदी-विक्री प्रक्रिया करण्यासाठी एका सहकारी संस्थेची स्थापना केली व त्यानंतर आंदोलन स्थगित झाले.

दूध आंदोलन : दूधाला भाव वाढवून मिळावेत म्हणून वेळोवेळी शेतकऱ्यांनी आंदोलने केली. १९८२ पासून ही आंदोलने सुरू आहेत. या आंदोलनास सातारा, सांगली, पुणे व धुळे जिल्ह्यातून चांगलाच प्रतिसाद मिळाला. अगदी अलिकडे २०१५ ते २०१७ च्या दरम्यान केलेले दूध आंदोलन यामध्ये दूधाचे भाव वाढवून द्या. म्हणून दूध रस्त्यांवर ओतण्यात आले. परंतु हा प्रतिसाद फक्त वरील ४ जिल्ह्यातच मिळाल्याने आंदोलन यशस्वी होऊ शकले नाही व तेथे माघार घ्यावी लागली. काही वेळा अल्पशा दूधाचे भाव वाढवून तोंडाला पाने पुसण्याचे काम शासनाने केले.

कापूस आंदोलन : कापसाला योग्य तो भाव मिळावा म्हणून शेतकऱ्यांची वेळोवेळी आंदोलने झाली. यासाठी कृत्रिम धाग्याच्या कापडांवर बहिष्कार टाकला. त्या कपड्यांची होळी केली. रास्ता रोको झाले, रेल रोको आंदोलन झाले. यासाठी मोठ्या प्रमाणात २३ नोव्हेंबर १९८६ रोजी कृत्रिम धाग्याच्या विरोधात नागपूर, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा या जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी व त्यांच्या संघटनेने रास्तारोको केले. पण शासनाने हेही आंदोलन मोडीत काढण्यात यश मिळविले.

स्वाभिमानी शेतकरी संघटना : खासदार राजू शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली ही संघटना उभी राहिली. ऊसाला दर मिळावा, दूधाला भाव मिळावा, कच्चा मालाला योग्य दर मिळावा हे महत्त्वपूर्ण विषय घेऊन ही संघटना स्थापन झाली. सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर इ. जिल्ह्यातून या संघटनेला चांगला प्रतिसाद मिळू लागला. राजू शेट्टीच्या नेतृत्वाखाली स्वाभिमानी शेतकरी संघटनेने कारखाने, सरकारी ऑफीस यावर मोर्चे नेले. आंदोलने केली. शेतकऱ्यांचे शोषण थांबविण्यासाठी व शेतकऱ्यांच्यात जनजागृती करण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी परिषदा घेतल्या. ऊसाला दर मिळालाच पाहिजे या हेतूने आंदोलन यशस्वी केले. दुधाला योग्य तो भाव मिळण्यासाठीचे आंदोलन केले. शेतकऱ्यांना जागृत केले व ऊसाला व दूधाला भाव मिळवून दिला हेच जनजागृतीचे फलित होय.

पुढे खासदार राजू शेट्टी व कृषीमंत्री सदाभाऊ खोत यांच्यातील मतभेदामुळे सदाभाऊ खोत स्वाभिमानी संघटनेतून बाहेर पडून स्वतंत्र शेतकरी संघटना स्थापन करून कामकाज सुरू आहे.

लव दाय फार्मर चळवळ : औरंगाबादचे शेतकरी शिवाजी गायकवाड हे मोसंबीचे पीक घेणारे आहेत. पण त्यांना किलो मागे फक्त १५ रु. मिळू लागले. श्रम, वेळ व पैसा तर खर्च झाला. याचे दुःख फेसबुकवर मांडले. त्यांच्या या व्यथेला आंतरराष्ट्रीय कंपनीत बिजनेस मॅनेजर म्हणून काम करणारे रणजित पवार यांनी दाद दिली. जर्मनीतील पवारांचे मित्र यांच्याकडून तातडीने फेसबुक पेज तयार केले. त्याला नाव दिले लव दाय फार्मर. ६ सप्टेंबर २०१५ रोजी हे फेसबुक पेजची चळवळ उभी राहिली. याचे फलित म्हणजे शिवाजी गायकवाडांना सातत्याने विक्रीसाठीचे फोन खणाणू लागले.

ई कॉमर्सनं जग बदललं असलं, एका क्लीकवर जगातली कुठलीही वस्तू घरपोच मिळत असली तरी शेतकरी मात्र या सेवेपासून दूरच आहे. यासाठी शिवाजी गायकवाड यांनी ई कॉमर्सचा वापर करून जास्तीत जास्त मोसंबी विकण्यासाठी मदत कार्य सुरू केले. ७ सप्टेंबर २०१५ पासून मुंबई, पुणे शहरातून मोसंबीची ऑर्डर इतकी वाढली की फेसबुकचं पेज पुर पडणार नव्हतं. यातूनच www.luvthyfarmer.com ही वेबसाईट तयार करण्यात आली. शेतकऱ्यांना फायदा मिळावा यासाठी खारघरचे प्रोफेसर कुरूष दलाल, प्रभादेवीच्या अनुराधा पवार आणि ठाण्याच्या वरुणा राव आणि चेंबूरच्या वैशाली नारकर यांनी पिक-अप पॉईंटसाठी आपले दवराजे २४ तास उघडे ठेवले.

या चळवळीला यश आले. लव दाय फार्मर डॉट कॉम या वेबसाईटवर कमीत कमी ५ किलो मोसंबीची ऑर्डर देण्याची सोय आहे. मोसंबी ज्युस एन्जॉय करत असल्याचा फोटो फेसबुकवर पोस्ट करायचा. याला वन ग्लास मोसंबी चॅलेन्ज असं नाव देण्यात आले. याचा परिणाम म्हणजे एका महिन्यात ५ टन मोसंबी विकली गेली. हे त्याचे यश होय. मोसंबी प्रमाणेच डाळिंब, केळी, स्ट्रॉबेरी यांचेही काम होती घेऊन शेतकऱ्यांना थेट माल विक्रीसाठी ही वेबसाईट काम करून त्यातही यश संपादन करणार आहे.

अशारितीने शेतकऱ्यांच्या चळवळी सुरू झाल्या. शेतकरी संघटनेच्या चळवळीच्या उदयापासून आजपर्यंत या संघटना वेगवेगळ्या नेतृत्वाखाली आपली चळवळ यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील राहिली व कमीजास्त प्रमाणात यश प्राप्त करून घेतले.

स्वयं अध्ययन प्रश्न

अ) एका वाक्यात उत्तरे द्या.

१) स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रणेते कोण?

२) शरद जोशीनी कोणती संघटना स्थापन केली.

३) स्वातंत्र्यपूर्व काळातील शेतकरी चळवळीची नावे सांगा.

४) स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकरी चळवळीची नावे सांगा.

५) लव दाय फार्मर चळवळ कोणी उभी केली?

ब) रिकाम्या जागा भरा.

१) साराबंदी ही चळवळ उत्तर भारतात ..... साली निर्माण झाली.

२) किसान सभेची स्थापना ..... साली झाली.

३) स्वाभिमानी शेतकरी संघटना ..... यांनी सुरू केली.

४) दूध आंदोलनाची सुरुवात ..... साली झाली.

५) लव दाय फार्मर चळवळ ..... साली सुरू झाली.

४.३ सारांश :

भारतातील या सामाजिक चळवळी नव्याने उदयाला आल्या. त्यामध्ये महिलांच्या चळवळीने स्वत:साठीचे हक्क हस्तगत केले तर दलित चळवळीने त्यांच्यावरील होणाऱ्या अन्यायांना वाचा फोडली. पर्यावरण चळवळीमुळे पर्यावरणाचा समतोल राखणारे घटक कोणते व असमतोल करून प्रदूषण करणे, बिघडविणे हे घटक कोणते हे कळले व पर्यावरण टिकविण्यासाठी काय उपाययोजना करता येऊ शकतील हे ही समजले.

४.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

अ) १) वर्णव्यवस्था २) हरिजन ३) काळाराम ४) १९२७ ५) १९७०

ब) १) १९७५ ते १९८५ हे आंतरराष्ट्रीय महिला दशकाचे वर्ष होय.

२) सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, पंडिता रमाबाई यांनी महिलांना शिकविण्यासाठी पुढाकार घेतला.

३) मार्च १९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर झाले.

४) १९८१ ला महिला आयोगाची स्थापना झाली.

५) ७३ वी व ७४ वी घटना दुरूस्तीमुळे महिलांना ३३% आरक्षण मिळाले.

क) १) प्रदूषण (ब) २) स्टॉकहोम (अ) ३) चिपको (क) ४) नर्मदा (ड) ५) भोपाळ (अ)

४.५ सरावासाठी स्वाध्याय :

अ) पुढील प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा.

१) महिला चळवळीतून नेमके काय साध्य झाले?

२) दलित चळवळीबद्दल सविस्तर लिहा.

३) आंतरराष्ट्रीय महिला दिनातून काय साध्य झाले?

४) पर्यावरण चळवळ विशद करा.

५) चिपको आंदोलन होण्यामागची कारणे सांगा.

ब) टीपा लिहा.

अ) महिला चळवळ

ब) पर्यावरण चळवळ

क) दलित चळवळ

ड) चिपको आंदोलन

इ) धरणग्रस्तांचे प्रश्न

४.६ क्षेत्रीय कार्य :

तुमच्या आसपासच्या पर्यावरणाचा व प्रदूषणाचा अभ्यास करण्यासाठी प्रात्यक्षिक पाहणी करा.

तुमच्या आसपास असणाऱ्या महिला संघटनांना भेटी द्या.

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१) डॉ. देवगांवकर, डॉ. देवगावकर शैलजा व डॉ. डुमरे जयमाला 'सामाजिक चळवळी', श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर : २००९.

२) घनश्याम शहा : भारतातील सामाजिक चळवळी :२००४

३) बोबडे प्रकाश : आर्थिक विकास व सामाजिक चळवळी : श्री. मंगेश प्रकाशन : २००७.

४) जैन पी.सी. सामाजिक आन्दोलन का समाजशास्त्र : २००३ नॅशनल पब्लिशिंग हाऊस, जयपूर.

५) वृत्तपत्रातील या संदर्भात वेळोवेळी येणारे विविध लेख वाचावे.

❑❑❑